No. MCS/205/2020-2022. R. N. I. Reg. No.MAHMAR 2006/19943
मुंबई, रविवार, ९ मे २०२१
मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध
वर्ष १२, अंक १२, ५ रुपये, शहर आवृत्ती★
पृष्ठे १२ + लोकरंग

# रविवार लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

LOKSATTA.COM | FACEBOOK.COM/LOKSATTALIVE | TWITTER.COM/LOKSATTALIVE | LOKSATTA.COM/APPS

तापमान
कमाल ३५° सें | किमान २७° सें

हवामानाचा अंदाज
आकाश निरभ्र राहील.



लोकरंग
तुझी गोधडी चांगली…

Vencobb
एक्स फार्म ब्रॉयलर चिकनचा दर* ८५ रु. प्रति किलो
किरकोळ विक्रीचा दर*
जिवंत कोंबडी ११३ रु. प्रति किलो
ड्रेस्ड (स्किनसह) दर* १३९ रु. प्रति किलो
अंड्याचा किरकोळ विक्रीचा दर* ६० रु. प्रति डझन

MIDC
लोकसत्ता महाराष्ट्र गाथा व्याख्यानमाला
सारस्वत बँक | चितळे

## 'महाराष्ट्राचा तर्कवाद' या विषयावर उद्या व्याख्यान

**मुंबई :** देशातील अन्य अनेक राज्यांच्या जडणघडणीत महाराष्ट्राचे वेगळेपण दिसते, ते येथील विचारवंतांच्या योगदानामुळे. नवनवीन संकल्पनांना वाट करून देणाऱ्या अनेक मराठी विचारवंतांनी महाराष्ट्राचा खास विशेष असलेला तर्कवाद जोपासला आणि त्याची मशागतही केली. या तर्कवादाचे स्वरूप समजून घेण्यासाठी आणि त्याचे आजच्या काळातील महत्त्व समजण्यासाठी उद्या, सोमवारी, दि. १० मे रोजी 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांचे 'महाराष्ट्राचा तर्कवाद' या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. - पान ८

## राज्याच्या करोनालढ्याचे पंतप्रधानांकडून कौतुक



**मुंबई:** राज्याच्या करोना विरोधातील लढ्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी कौतूक केले. तर राज्यात लसीकरण वाढविण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. मात्र त्यासाठी स्वतंत्र ॲप तयार करण्याची परवानगी देण्याची विनंती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. पंतप्रधानांनी मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरून संवाद साधत राज्यातील करोना स्थितीची माहिती घेतली. - पान ८

## आरोग्य विद्यापीठाच्या परीक्षा लांबणीवर



**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे यंदा होणाऱ्या वैद्यकीय (मेडिकल) विद्य शाखेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रम परीक्षा २४ जून २०२१ पासून सुरू होणार होत्या. तथापि सद्यपरिस्थिती पाहून या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. नवीन वेळापत्रक लवकरच विद्यापीठातर्फे जाहीर करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा नियंत्रक डॉ अजित पाठक यांनी दिली आहे.

### महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेकडून सेवाकार्याचा अनुसरणीय आदर्श

# करोना रुग्णांना आपलेपणा देणारे उपचारकेंद्र

**विद्याधर कुलकर्णी, लोकसत्ता**

**पुणे :** दररोज सकाळी चहा - न्याहारी, त्यानंतर प्राणायाम आणि हास्ययोगाची प्रात्यक्षिके, डॉक्टरांकडून नियमित तपासणी, सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमासह नैराश्यामध्ये असलेल्या व्यक्तींचे तज्ज्ञांकडून समुपदेशन, रात्रीचे भोजन… अगदी घरच्यासारखी सेवा-शुश्रूषा करणारी ही दिनचर्या आहे महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील करोना काळजी केंद्रामध्ये दाखल झालेल्या पावणेतीनशे रुग्णांची.

महिला शिक्षणासाठी अग्रेसर असलेल्या या संस्थेमध्ये सेवाकार्याचे अनोखे दर्शन घडत (पान ८ वर)




भीषण विषाणू पर्वातही समाजातील काही नागरिक आणि संस्था करोना रुग्णांच्या अडचणी-समस्या सोडविण्यासाठी चांगली कामे करीत आहेत. वैद्यकीय मदतीसाठी ज्ञात नसलेल्या सामाजिक संस्था काळजी केंद्र उभारून रुग्णांच्या वेदनांवर फुंकर घालत आहेत. राज्यभरातील अशा संस्थांच्या योगदानाची दखल आजपासून 'पीड़ पराई जाने रे…' या वृत्तमालिकेतून…



महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील करोना काळजी केंद्रामध्ये रुग्णांसाठी सायंकाळी मनोरंजनासह समुपदेशन असे उपक्रम राबविले जातात.

या संस्थेत सेवाभावाचा नवा आदर्श तरुण स्वयंसेवकांनी सर्वांसमोर ठेवला आहे. डॉक्टरांना मदत करण्यासाठी तीन पाळ्यांमध्ये प्रत्येकी २५ स्वयंसेवकांची

**तरुणांचा उत्स्फूर्त पुढाकार…**

फळी उभारण्यात आली आहे. हे स्वयंसेवक रुग्णांची अत्यंत आस्थेने चौकशी आणि शुश्रूषा करीत आहेत. तसेच स्वयंसेवक म्हणून काम करण्यासाठी युवकांची प्रतीक्षा यादी करावी लागली आहे, इतके तरुण येथे सेवा योगदान देण्यास इच्छुक आहेत.

# मोदी सरकारला आत्मसंतुष्टता भोवली!

## करोना साथ हाताळणीवर 'लॅन्सेट' नियतकालिकाची परखड टीका

**अनुराधा मस्कारेन्हास, एक्स्प्रेस वृत्तसेवा**

**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने करोना विषाणू साथ हाताळण्यात आलेल्या अपयशाबद्दलच्या टीकाटिप्पण्या काढून टाकण्यास ट्विटरला भाग पाडले, पण ही टीका दडपण्याची कृती अक्षम्य आहे, असे सडेतोड मत जगप्रसिद्ध 'दी लॅन्सेट' या वैद्यकीय क्षेत्रातील नियतकालिकाने मांडले आहे. त्याचबरोबर सरकारला आत्मसंतुष्टता भोवली, अशी टीकाही केली आहे.

'दी इन्स्टिट्यूट फॉर दी हेल्थ मेट्रिक्स अँड इव्हॅल्युएशन' या संस्थेने दिलेल्या माहितीच्या संदर्भाचा उल्लेख करून 'दी लॅन्सेट'च्या संपादकीयात असे म्हटले आहे, की १ ऑगस्टपर्यंत भारतात दहा लाख बळी जाण्याची शक्यता आहे. जर तसे झाले तर ते मोदी सरकारने बेजबाबदार वर्तनाने ओढवून घेतलेले (पान ८ वर)

**सरकारने कोणत्या चुका केल्या?**

- भारत पहिल्या लाटेतील यशामुळे हुरळून गेला, परिणामी जे यश मिळाले त्यावर पाणी फेरले गेले.
- मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊ शकणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांना परवानगी देण्याची चूक.
- एप्रिलपर्यंत परिस्थिती चांगली होती, परंतु तोपर्यंत करोना कृतिदलाच्या बैठकाच झाल्या नाहीत.
- विषाणू साथ असतानाही निवडणूक प्रचारसभा, त्यांत करोना नियमांचे उल्लंघन.
- ऑगस्टपर्यंत बळींची संख्या वाढली तर ते मोदी सरकारने ओढवून घेतलेले संकट ठरेल.
- सरकारने साथीचा मुकाबला करण्यात आत्मसंतुष्टता मानली.
- सरकारवरील ट्विटर टीका दडपण्याची कृती अक्षम्य.

# सर्वोच्च न्यायालयाचा प्राणवायूसाठी हस्तक्षेप

## वितरणासाठी राष्ट्रीय कृतिगट; १२ तज्ज्ञांचा समावेश

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

**करोना साथीच्या** संकटात राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना प्राणवायू पुरवठ्याची शास्त्रीय वितरण कार्यपद्धती तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने शनिवारी १२ सदस्यांचा राष्ट्रीय कृतिगट स्थापन केला.

शास्त्रीय पद्धतीने प्राणवायूचे वितरण करण्याची कार्यपद्धती तयार करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर अशा कृतिगटाची आवश्यकता असल्याचे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती एम. आर. शहा यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

केंद्र सरकारकडे उपलब्ध असलेल्या प्राणवायूचे वितरण आणि पुरवठा याची जबाबदारी निश्चित करण्यासाठी प्राणवायू वितरणाचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. जोपर्यंत कृतिगटाच्या शिफारशी सादर केल्या जात नाहीत तोपर्यंत प्राणवायू पुरवठा आणि वाटप पद्धतीत बदल होणार नाही, (पान ९ वर)



**कृतिगट कशासाठी?**

- केंद्राच्या मंजुरीनंतरच या कृतिगटाची स्थापना करण्यात आली आहे. हा गट लगेच काम सुरू करणार असून त्यामुळे प्राणवायू पुरवठ्यातील अडचणी दूर होतील.
- कृतिगटाचा कार्यकाल सहा महिने आहे. देशभरात गरज, उपलब्धता आणि वितरण या घटकांच्या आधारे प्राणवायूचा पुरवठा करण्याच्या प्रक्रियेचे मूल्यमापन हा गट करेल.
- कृतिगटामुळे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना शास्त्रीय आणि समान वितरणावर आधारित प्राणवायू पुरवठा प्रक्रिया सुरू करण्यास मदत होईल.
- प्राणवायूचा पुरवठा वाढवणे, सध्याच्या मागणीचा अंदाज घेणे अशा अनेक मुद्द्यांचा विचार हा गट करेल. साथीच्या प्रत्येक टप्प्यावर शिफारशीही करेल.

> सध्याच्या संकटाला तोंड देण्यासाठी आम्ही देशातील तज्ज्ञ डॉक्टरांचा राष्ट्रीय कृतिगट स्थापन केला आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने विज्ञानावर आधारित तर्कसंगत आणि पारदर्शक उपाय सुचविण्याचे काम तो करेल.
> – धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती, सर्वोच्च न्यायालय

# मुंबई, ठाण्यात रुग्णवाढीचा आलेख घसरणीला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** शहरातील करोना संसर्गाचे प्रमाण दिवसेंदिवस घटत असून रुग्ण दुपटीचा कालावधीही १४५ दिवसांवर घसरला आहे. महिन्याभरापूर्वी हा कालावधी ३५ दिवस इतका होता.

शहरात शनिवारी २,६७८ रुग्ण आढळले, तर ६२ रुग्णांचा मृत्यू झाला. रुग्णसंख्यावाढीचा दरही गेल्या आठवड्यापासून घटू लागला आहे.

**ठाणे जिल्ह्यात १,९६६ बाधित**

जिल्ह्यात शनिवारी १,९६६ नवे रुग्ण आढळले, तर ६८ जणांचा मृत्यू झाला. सर्वाधिक मृत्यू कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात झाले. २४ तासांतील बाधितांमध्ये कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात ५३३, ठाणे ४७९, ठाणे ग्रामीण २४१, नवी मुंबई २३९, मीरा-भाईंदर २२५, बदलापूर ९७, अंबरनाथ ७०, उल्हासनगर ७० आणि भिवंडीतील १२ रुग्णांचा समावेश आहे.

■ राज्यातील रुग्णसंख्येतही घट / पान ३
■ देशात २४ तासांत ४,१८७ बळी / पान २

## 'डीआरडीओ'च्या औषधास आपत्कालीन परवानगी

पुणे : संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेतर्फे (डीआरडीओ) तयार करण्यात आलेल्या करोनावरील 'टू-डिऑक्सी-डी-ग्लुकोज' (टू डीजी) या औषधाच्या आपत्कालीन वापराला केंद्रीय औषध महानियंत्रकांनी (डीसीजीआय) परवानगी दिली आहे. हे औषध रुग्णांचे प्राणवायूवरील अवलंबित्व कमी करत असल्याचे चाचण्यांमधून स्पष्ट झाले आहे. - पान २

# दहावीच्या मूल्यमापनाबाबत संदिग्धता

## अकरावीसह विविध अभ्यासक्रमांचे प्रवेश यंदाही रखडण्याची भीती

**रसिका मुळ्ये, लोकसत्ता**

**मुंबई :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे (सीबीएसई) अनुकरण करत राज्याच्या शिक्षण विभागाने दहावीच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घाईने जाहीर केला. मात्र, पंधरा दिवस झाले तरीही अद्याप विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे करावे याबाबत शिक्षण विभाग निष्कर्षाप्रत पोहोचलेला नाही. त्यामुळे अकरावीसह विविध अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष यंदाही रखडण्याची शक्यता आहे.

'सीबीएसई'ने परीक्षा रद्द करण्याचे जाहीर केल्यानंतर पालकांच्या मागणीपुढे नमते घेत राज्याच्या शिक्षण विभागानेही राज्यमंडळाच्या दहावीच्या परीक्षा रद्द केल्या. 'सीबीएसई'ने त्यांच्या मूल्यमापनाचे (पान ८ वर)



**नवे प्रश्न…** अकरावीचे प्रवेश हे स्वतंत्र परीक्षेच्या आधारे करण्याच्या पर्यायाबाबतही अद्याप संभ्रम आहे. प्रवेशासाठी स्पर्धा असलेल्या नामवंत महाविद्यालयांसाठीच प्रवेश परीक्षा घ्यावी की सर्वच प्रवेश हे परीक्षेच्या माध्यमातून करावेत, याबाबत आतापर्यंत झालेल्या चर्चांमध्ये मतांतरे आहेत. नामवंत महाविद्यालयांसाठीच प्रवेश परीक्षा घ्यायची असल्यास ती सर्व शाखांसाठी घ्यावी का, कशी घ्यावी, कुणी घ्यावी असे प्रश्न समोर उभे राहिले आहेत.


### पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी 'आयसीएआर-सिरकोट'चा उपक्रम

# अंत्यसंस्कारासाठी 'हरित स्मशानभूमी'चा पर्याय

**राखी चव्हाण, लोकसत्ता**

**नागपूर :** भारतात दरवर्षी सुमारे ७५ लाख माणसे मृत्युमुखी पडतात आणि त्यांच्यावरील अंत्यसंस्कारासाठी तब्बल दीड ते दोन कोटी वृक्ष कापले जातात. त्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी 'हरित स्मशानभूमी' ही नवी संकल्पना समोर आली आहे. यात पर्यावरणाचा ऱ्हास थांबू शकतो, त्यासह अंत्यसंस्काराचा खर्चही कमी होतो.

'आयसीएआर-सिरकोट' यांनी हा पर्याय दाखवून दिला आहे. भारतात शेतातील पीक कापणीनंतर निघणारा कचरा शेतातच जाळून टाकला जातो. त्यामुळे शेतातील मातीतदेखील प्रदूषण होते. पीककापणीनंतर निघणारा कचरा जाळून न टाकता त्याचे एकत्रिकरण करून ते अंत्यसंस्कारासाठी वापरले जाऊ शकते. त्यामुळे प्रदूषण कमी होते. 'आयसीएआर-सिरकोटने या घटकांवर (बायोमास) अंत्यसंस्कार पार पाडता यावे याकरिता दहनपिंजरे तयार केले आहेत. या पिंजऱ्याला 'ब्लोअर' लागले आहेत. यामुळे अंत्यसंस्कार झाल्यानंतर दहन पिंजरे थंड होऊन पुन्हा सहा-आठ तासांत दुसरा अंत्यसंस्कार त्या दहनपिंजऱ्यात करता येतो. सध्या लाकडांचा वापर केल्यानंतर दुसऱ्या अंत्यसंस्कारासाठी दहा ते बारा तास वाट पाहावी लागते. त्यामुळे देशभरात या हरित स्मशानभूमीचा पर्याय स्वीकारल्यास पर्यावरणचा ऱ्हास थांबवण्यास मदत होईल. शेण आणि शेतीतील तणांपासून (पान ८ वर)



**संकल्पना काय?** पीककापणीनंतर उरलेल्या शेतातील तण आणि इतर घटकांचे एकत्रीकरण करून त्यांचा वापर अंत्यसंस्कारासाठी करण्यासाठी 'आयसीएआर-सिरकोट' यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी त्यासाठी दहनपिंजरे तयार केले आहेत. हा पर्याय स्वीकारल्यास पर्यावरणाच्या रक्षणासह अंत्यसंस्काराचा खर्चही कमी होईल.



# ‘डीआरडीओ’च्या करोनाप्रतिबंधक औषधाला मान्यता

## सौम्य ते तीव्र लक्षणे असलेल्या रुग्णांसाठी उपयुक्त



पीटीआय, नवी दिल्ली

**संरक्षण संशोधन** आणि विकास संघटनेने (डीआरडीओ) विकसित केलेल्या ‘२ डीऑक्सी-डी-ग्लुकोज’ (२-डीजी) या कोविड-१९ प्रतिबंधक औषधाला भारताच्या औषध महानियंत्रकांनी (डीसीजीआय) आपत्कालीन वापरासाठी मंजुरी दिली आहे. हे औषध करोनाची सौम्य ते तीव्र लक्षणे असलेल्या रुग्णांवर सहायक उपचार पद्धती म्हणून वापरले जाईल. ते तोंडावाटे घ्यावयाचे आहे.

‘२ डीऑक्सी-डी-ग्लुकोज’ (२-डीजी) हे औषध रुग्णालयात भरती असलेल्या रुग्णांना लवकर बरे होण्यात मदत करत असल्याचे, तसेच प्राणवायूच्या अतिरिक्त पुरवठ्यावरील त्यांचे अवलंबित्व कमी करत असल्याचे नैदानिक चाचण्यांमध्ये आढळून आले आहे, असे संरक्षण मंत्रालयाने सांगितले.

देश करोना महासाथीच्या लाटेशी झुंजत असताना आणि यामुळे देशाच्या आरोग्य यंत्रणेवर कमालीचा ताण पडला असताना या औषधाला मंजुरी मिळालेली आहे.

‘कोविड-१९च्या सध्याच्या दुसऱ्या लाटेत फार मोठ्या संख्येतील रुग्ण प्राणवायूवर अवलंबून असून त्यांना रुग्णालयात दाखल होण्याची गरज आहे. संसर्ग झालेल्या पेशींमध्ये हे औषध ज्या रीतीने कार्य करते, त्यामुळे ते अनेक मौल्यवान जीव वाचवण्याची अपेक्षा आहे. या औषधामुळे करोना रुग्णांचा रुग्णालयातील वास्तव्याचा कालावधीही कमी होईल’, असे मंत्रालयाने नमूद केले.

करोनाविरुद्ध सहायक उपचार पद्धती म्हणून वापरासाठी २-डीजी हे औषध डीआरडीओतील आघाडीची प्रयोगशाळा असलेल्या इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लियर मेडिसिन अँड अलाइड सायन्सेस (इन्मास)ने हैदराबाद येथील डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीजच्या सहकार्याने विकसित केले असल्याचीही माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली. सहायक उपचारपद्धती (अॅडजंक्टिव्ह थेरपी) ही प्राथमिक उपचारांना मदत म्हणून वापरली जाते.

करोना महासाथीच्या विरुद्ध तयारी करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षाच्या सुरुवातीला केले होते, त्यानंतर डीआरडीओने या प्रकल्पावर काम सुरू केले असे संरक्षण मंत्रालयातर्फे सांगण्यात आले.

### विषाणूवाढीला प्रतिबंध कसा होतो?

२-डीजी हे औषध पावडरच्या स्वरूपात येते. ते पाण्यात मिसळून घेतले जाते. विषाणूचा संसर्ग झालेल्या पेशींमध्ये ते जमा होते आणि विषाणूजन्य संश्लेषण व ऊर्जेचे उत्पादन थांबवून ते विषाणूची वाढीला प्रतिबंध करते. नेमक्या विषाणू संसर्गित पेशींमध्ये जमा होणे हे या औषधाचे वैशिष्ट्य आहे. या औषधाचे सहजरीत्या उत्पादन करता येऊन ते देशात मुबलक प्रमाणात उपलब्ध केले जाऊ शकते, असेही संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले.

### अतिरिक्त प्राणवायूवरील अवलंबित्व कमी

२-डीजी औषधाने उपचार करण्यात आलेल्या रुग्णांच्या लक्षणांमध्ये विविध निकषांवर नियमित उपचारांपेक्षा अधिक वेगाने सुधारणा दिसून आली. रुग्णालयात भरती असलेल्या रुग्णांना लवकर बरे होण्यात मदत करत असल्याचे, तसेच प्राणवायूच्या अतिरिक्त पुरवठ्यावरील त्यांचे अवलंबित्व कमी करत असल्याचे या औषधाच्या नैदानिक चाचण्यांत आढळून आले आहे. या औषधासह उपचार करण्यात आलेल्या कोविड रुग्णांमध्ये आरटी-पीसीआर चाचणी निगेटिव्ह येण्याचे अधिक होते, याचाही मंत्रालयाने उल्लेख केला आहे.

## तीन टप्प्यांत चाचण्या


लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** ‘२ डीऑक्सी-डी-ग्लुकोज’ हे औषध रुग्णांचे प्राणवायूवरील अवलंबित्व कमी करत असल्याचे तिसऱ्या टप्प्यातील चाचण्यांमधून स्पष्ट झाले आहे.

पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील चाचण्यांच्या समाधानकारक निकालांनंतर केंद्रीय औषध महानियंत्रकांनी नोव्हेंबर २०२० मध्ये तिसऱ्या टप्प्यातील चाचण्यांना परवानगी दिली.

डिसेंबर २०२० ते मार्च २०२१ या काळात दिल्ली, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक आणि तामिळनाडूतील २७ कोविड रुग्णालयांमध्ये या औषधाची तिसऱ्या टप्प्यातील चाचणी करण्यात आली. चाचण्यांच्या निकालांमध्ये प्राणवायू पुरवठ्यावर असलेल्या रुग्णांचे त्यावरील अवलंबित्व तिसऱ्या दिवसापासून कमी झाल्याचे दिसून आले. पाण्यात मिसळून प्यायले असता हे औषध विषाणू वाढीला प्रतिबंध करते असा निर्वाळा चाचण्यांच्या निकालांमधून मिळाला असल्याचे केंद्रीय औषध महानियंत्रकांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### सध्या केवळ रुग्णालयांनाच पुरवठा



डीआरडीओतर्फे विकसित करण्यात आलेल्या या औषधाचे उत्पादन हैदराबादमधील डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीतर्फे केले जाणार आहे. सद्याच्या स्थितीत हे औषध केवळ रुग्णालयांना उपलब्ध करून दिले जाईल, कारण त्याचा आपत्कालीन वापर उपचारांदरम्यान प्राणवायू पुरवठ्यावर असलेल्या रुग्णांसाठी केला जाणार आहे. कालांतराने डॉक्टरांच्या चिठ्ठीवर हे औषध दुकानांतून मिळण्याची शक्यता असल्याची माहिती डीआरडीओकडून देण्यात आली आहे.

## करोना उपचारांसाठी २ लाखांहून अधिक रोख स्वीकारण्यास मुभा

**नवी दिल्ली :** कोविड-१९ रुग्णांच्या उपचारांसाठी रुग्णालये व शुश्रूषागृहे यांना २ लाख रुपये व त्याहून अधिक रक्कम रोखीत स्वीकारण्याची मुभा देणारी अधिसूचना प्राप्तिकर खात्याने जारी केली आहे. प्राप्तिकर खात्यासाठी धोरण निश्चित करणाऱ्या केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) अशा आशयाची अधिसूचना शुक्रवारी जारी केली. रुग्णालये, औषधालये, शुश्रूषागृहे, कोविड केअर सेंटर्स किंवा रुग्णांना करोनाविषयक उपचार पुरवणारी इतर वैद्यकीय केंद्रे यांना प्राप्तिकर कायद्याच्या कलम २६९ एसटी अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आले असल्याचे यात म्हटले आहे. ही ताजी तरतूद १ एप्रिल ते ३१ मे या कालावधीसाठी करण्यात आली असून, रुग्णाचा किंवा बिल अदा करणाऱ्याचा पॅन किंवा आधार क्रमांक घेतल्यानंतर, तसेच रुग्ण आणि पैसे देणारा यांच्यातील नात्याची पडताळणी केल्यानंतर ती लागू होईल, असे अधिसूचनेत नमूद केले आहे. उपचारांसाठी रुग्णालयांत जाणाऱ्या करोना रुग्णांचे नातेवाईक व मदतनीस यांची अडचण दूर करणे हा या तरतुदीचा उद्देश आहे.

## सोनोवाल, सरमा मुख्यमंत्रिपदाचे दावेदार

**नवी दिल्ली :** आसामचे पुढील मुख्यमंत्री कोण, ते अद्याप गुलदस्त्यात असतानाच या पदाचे दावेदार असलेले सर्वानंद सोनोवाल आणि हिमंत विश्व सरमा यांनी येथे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली.

भाजप विधिमंडळ पक्षाचे बैठक रविवारी गुवाहाटीत होण्याची शक्यता असून पुढील सरकारबाबतच्या सर्व प्रश्नांची उत्तरे तेथे मिळतील, असे सरमा यांनी येथे वार्ताहरांना सांगितले.

आसामचे विद्यमान मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवाल आणि आरोग्यमंत्री सरमा यांना शुक्रवारी केंद्रीय नेतृत्वाने दिल्लीत पाचारण केले होते. त्या वेळी आसामच्या नेतृत्वाच्या प्रश्नावर चर्चा करण्यात आली. सोनोवाल, सरमा, नड्डा, शहा आणि पक्षाचे सरचिटणीस (संघटना) बी. एल. संतोष यांच्यात चर्चेच्या तीन फेऱ्या झाल्या. पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये भाजपच्या उच्चपदस्थ नेत्यांनी सोनोवाल आणि सरमा यांची स्वतंत्रपणे भेट घेतली. तर चर्चेच्या तिसऱ्या फेरीच्या वेळी भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांनी दोन्ही नेत्यांची एकत्रित भेट घेतली. आसाममध्ये सरकार स्थापन करणे आणि पुढील मुख्यमंत्री कोण, या बाबत प्रामुख्याने चर्चा झाली.

## अफगाणिस्तानातील बॉम्बस्फोटात २५ ठार

**काबूल :** अफगाणिस्तानच्या शियाबहुल अशा पश्चिम काबूल जिल्ह्यातील एका मुलींच्या शाळेजवळ शनिवारी एका बॉम्बचा स्फोट होऊन किमान २५ जण ठार झाले. त्यांच्यापैकी बहुतांश ११ ते १५ वर्षांदरम्यानच्या विद्यार्थिनी होत्या, असे अफगाण सरकारच्या प्रवक्त्याने सांगितले. नागरिकांना लक्ष्य करून झालेल्या या हल्ल्याचा तालिबानने निषेध केला असून, यासाठी आपण जबाबदार नसल्याचे सांगितले आहे.

## खाणीतील स्फोटात ९ कामगारांचा मृत्यू

**अमरावती (आंध्र प्रदेश) :** कडाप्पा जिल्ह्यात शनिवारी चुनखडीच्या एका खाणीत स्फोट होऊन किमान नऊ कामगार ठार झाल्याचे वृत्त आहे. केवळ पाच मृतदेह हाती लागले आहेत, असे पोलिसांनी सांगितले.

## करोना रुग्णाच्या अंत्यसंस्कारानंतर २१ जणांचा मृत्यू; चौकशी सुरू

पीटीआय, जयपूर

**राजस्थानच्या सीकर** जिल्ह्यात करोनाचा रुग्णाच्या मृतदेहावर आवश्यक ती खबरदारी न घेता अंत्यसंस्कार करण्यात आल्यानंतर गेल्या तीन आठवड्यांत २१ जण मृत्युमुखी पडले आहेत. तथापि, १५ एप्रिल ते ५ मे या कालावधीत करोनामुळे केवळ ४ मृत्यू झाले असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, करोनाचा संसर्ग झालेला मृतदेह २१ एप्रिल रोजी खीवरा खेड्यात आणण्यात आला. सुमारे दीडशे लोक अंत्यसंस्काराला हजर होते आणि करोनाविषयीच्या नियमांचे पालन न करता हा अंत्यसंस्कार पार पडला.

‘२१ मृत्यूंपैकी फक्त ३ ते ४ मृत्यू कोविड-१९ मुळे झाले आहेत. मृत्युमुखी पडलेले बहुतांश लोक वयोवृद्ध आहेत. तरीही, हे करोनाचे सामुदायिक संक्रमण आहे काय हे तपासण्यासाठी, ज्या कुटुंबात मृत्यू झाले आहेत तेथील १४७ सदस्यांचे नमुने आम्ही घेतले आहेत,’ असे लक्ष्मणगढचे उपविभागीय अधिकारी कुलराज मीणा यांनी पीटीआयला सांगितले. प्रशासनाने या खेड्यात निर्जंतुकीकरणाची मोहीम राबवली आहे.

या घटनेच्या संबंधात स्थानिक अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवण्यात आला असून, तो मिळाल्यानंतरच आपण याबाबत काही सांगू शकू, असे सीकरचे मुख्य वैद्यकीय व आरोग्य अधिकारी अजय चौधरी म्हणाले.

## रुग्णवाढीमुळे कैद्यांच्या सुटकेचे आदेश

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

**देशात करोनाचा** प्रसार मोठ्या प्रमाणावर होत असल्याने ज्यांना गेल्या वर्षी जामीन किंवा पॅरोल मंजूर करण्यात आला आहे अशा सर्व कैद्यांना सोडून देऊन तुरुंगातील गर्दी कमी करावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने शनिवारी दिले आहेत.

सुमारे चार लाख कैदी सध्या तुरुंगात असून त्यांनाही जगण्याचा व आरोग्याचा अधिकार आहे असे सांगून सरन्यायाधीश एन. व्ही. रमण यांनी म्हटले आहे, की गेल्यावर्षी मार्चमध्ये ज्यांना राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या उच्चस्तरीय समित्यांनी जामीन मंजूर केला आहे त्यांची, कुठलाही फेरविचार न करता तुरुंगातून सुटका करण्यात यावी. त्यात विलंब करता कामा नये. ज्या कैद्यांना पॅरोल मंजूर करण्यात आला आहे त्यांना आणखी ९० दिवसांचा पॅरोल साथीच्या काळात मंजूर करण्यात यावा, असे न्या. एल. नागेश्वर राव व न्या. सूर्य कांत यांचा समावेश असलेल्या न्यायपीठाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर हा आदेश प्रसारित करण्यात आला आहे.

आपल्याकडील तुरुंगात क्षमतेपेक्षा जास्त कैदी असून तेथे कुठल्याही पुरेशा सुविधा नाहीत, वैद्यकीय सुविधांचाही अभाव आहे. साथ रोग काळात तुरुंगात योग्य व्यवस्था असावी लागते. २३ मार्च २०२० रोजी न्यायालयाने सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना असा आदेश दिला होता, की ७ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा असलेल्या कैद्यांना अंतरिम जामीन किंवा पॅरोल मंजूर करावा. त्यामुळे तुरुंगातील जागा मोकळी होईल.

### तमिळनाडूत १० ते २४ मे संपूर्ण टाळेबंदी

**चेन्नई :** तमिळनाडूत कोविड रुग्णांची संख्या वेगाने वाढत असून तेथे संपूर्ण राज्यात १० मे ते २४ मे दरम्यान टाळेबंदी जाहीर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एम.के.स्टालिन यांनी सांगितले, की अपरिहार्य कारणामुळे ही टाळेबंदी लागू करण्याची वेळ आली असून आढावा बैठकातून जी माहिती हाती आली आहे त्यातून हा निर्णय घेण्यात आला आहे. वैद्यकीय व पोलिस अधिकारी यांच्याशी सल्लामसलतीनंतर टाळेबंदीचा हा निर्णय घेण्यात आला असून केंद्रीय आरोग्य व गृह मंत्रालयाचे मतही विचारात घेण्यात आले आहे. १० मे रोजी पहाटे ४ वाजेपासून २४ मे च्या पहाटे चार वाजेपर्यंत ही टाळेबंदी असेल.

## देशात २४ तासांत ४,१८७ मृत्यू

पीटीआय, नवी दिल्ली

**देशात गेल्या** २४ तासांत करोनामुळे चार हजार १८७ जणांचा मृत्यू झाला असून दिवसभरातील मृतांची ही आतापर्यंतची सर्वाधिक संख्या आहे. देशातील मृतांची एकूण संख्या दोन लाख ३८ हजार २७० वर पोहोचली आहे, तर गेल्या एका दिवसात आणखी चार लाख एक हजार ०७८ जणांना करोनाची लागण झाल्याने बाधितांची एकूण संख्या दोन कोटी १८ लाख ९२ हजार ६७६ वर पोहोचल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयातर्फे शनिवारी सांगण्यात आले.

देशात सध्या ३७ लाख २३ हजार ४४६ उपचाराधीन रुग्ण असून हे प्रमाण एकूण बाधितांच्या १७.०१ टक्के इतके आहे, तर बरे होण्याचे प्रमाण ८१.९० टक्क्यांवर आले आहे.

### ९ लाख रुग्ण प्राणवायूवर

देशात १ लाख ७० हजार ८४१ रुग्ण हे श्वसनयंत्रावर असून ९ लाख २ हजार २९१ रुग्ण हे प्राणवायूवर आहेत, असे आरोग्य मंत्री हर्षवर्धन यांनी सांगितले. १.३४ टक्के रुग्ण हे अतिदक्षता विभागात, ०.३९ टक्के श्वसनयंत्रावर, तर ३.७० टक्के प्राणवायूवर आहेत.

करोनातून आतापर्यंत एक कोटी ७९ लाख ३० हजार ९६० जण बरे झाले असून मृत्युदर १.०९ टक्के आहे. देशात गेल्या एका दिवसात चार हजार १८७ जणांचा मृत्यू झाला त्यापैकी ८९८ जण महाराष्ट्रातील आहेत. देशात आतापर्यंत दोन लाख ३८ हजार २७० जणांचा मृत्यू झाला असून त्यामध्ये महाराष्ट्रातील ७४ हजार ४१३ जणांचा समावेश आहे.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत

लोकसत्ता मार्ग यशाचा २९




# मिलिटरी स्कूल (२)

राष्ट्रीय मिलिटरी स्कूलमध्ये सीबीएसई (सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन)ने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकवला जातो. १२वी नंतरच्या वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा, प्रवेश परीक्षा आणि चाळणी परीक्षांसाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरतो. त्यामुळे मिलिटरी स्कूलमधील विद्यार्थ्यांना नॅशनल डिफेन्स अॅकॅडमीमधील निवड सुलभ जाते. याशिवाय लष्करातील वेगवेगळ्या पदांच्या भरतीच्या दृष्टीने हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरतो. या ठिकाणी ऑल इंडिया सीनिअर स्कूल सर्टिफिकेट परीक्षा आणि लष्कर भरतीच्या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची तयारी करून दिली जाते. अभ्यासक्रम हिंदी आणि इंग्रजीमधून शिकवला जातो. विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण आणि सर्वसमावेशक मूल्यमापन केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास होतो. हा निवासी अभ्यासक्रम आहे. या मिलिटरी स्कूल्स बेंगळूरु, बेळगाव (कर्नाटक), अजमेर, धोलपूर (राजस्थान) आणि छैल (हिमाचल प्रदेश) येथे आहेत. या शाळांची प्रशासकीय जबाबदारी डायरेक्टोरेट जनरल ऑफ मिलिटरी ट्रेनिंग यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. या शाळांच्या केंद्रीय प्रशासन मंडळाचे प्रमुख संरक्षण खात्याचे सचिव असतात. ११ वीतील प्रवेश मिलिटरी स्कूलमध्ये ११ व्या वर्गातील प्रवेशासाठी दहावीतील गुणांचा आधार घेतला जातो. वर्ग ९ आणि वर्ग १० मधील प्रवेश हा उपलब्ध जागांनुसार केला जातो. वसतिगृहात राहणाऱ्या मुलांसाठीच हा प्रवेश मर्यादित आहे. राखीव जागा (१) ७० टक्के जागा या भूदल, नौदल आणि वायूदलातील ज्युनियर कमिशन्ड ऑफिसर्स किंवा अदर रँक्स यांच्या पाल्यांसाठी राखीव असतात. यामध्ये निवृत्त अधिकाऱ्यांच्या पाल्यांचाही समावेश आहे. प्रत्येक संवर्गामध्ये १५ टक्के जागा अनुसूचित जाती आणि ७.५ टक्के जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात येतात. (२) ३० टक्के जागा भूदल, नौदल आणि वायूदलातील अधिकारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या पाल्यांसाठी राखीव ठेवण्यात येतात. यामध्ये निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांच्या पाल्यांचाही समावेश आहे. (३) कर्तव्य बजावत असताना शहीद झालेल्या सैनिकांच्या पाल्यांसाठी ५० जागा राखीव ठेवण्यात येतात. अंतिम निवड विशिष्ट गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय चाळणी परीक्षेसाठी निवडले जाते. या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावरच अंतिम निवड केली जाते. ही वैद्यकीय चाचणी लष्कराच्या अखत्यारीतील रुग्णालयातूनच करावी लागते. हा निकाल आर्मी इंट्रानेट होम पेजवर आणि

- www.indianarmy.nic.in,
- www.rashtriyamilitaryschools.in

या संकेतस्थळांवर घोषित केला जातो. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यावरच मूळ प्रमाणपत्रे तपासली जातात. त्यात काही त्रुटी आढळल्यास प्रवेश नाकारला जाऊ शकतो. संपर्क- ● राष्ट्रीय मिलिटरी स्कूल ऑफ इंडिया छैल, सिमला हिल्स, हिमाचल प्रदेश- १७३२१२, दूरध्वनी- ०१७९२-२४८३२६, ईमेल- chail@rashtriyamilitaryschools.in ● राष्ट्रीय मिलिटरी स्कूल ऑफ इंडिया, अजमेर राजस्थान, ३०५००१, दूरध्वनी- ०१४५-२६२४१०५, ईमेल- ajmer@rashtriyamilitaryschools.in ● राष्ट्रीय मिलिटरी स्कूल ऑफ इंडिया बेळगाव, कर्नाटक-५९०००९, दूरध्वनी- ०८३१-२४०७५२४०. ईमेल- princirmsbgm@gmail.com ● राष्ट्रीय मिलिटरी स्कूल ऑफ इंडिया, पोस्ट बॉक्स-२५०४० म्युझियम रोड, बेंगळूरु कर्नाटक- ५६००२५, दूरध्वनी- ०८०-२५५४९७२, फॅक्स-२५३०८१९१. ईमेल- rmsbengaluru@gmail.com संकेतस्थळ- http://www.rashtriyamilitaryschools.in, ● राष्ट्रीय मिलिटरी स्कूल ऑफ इंडिया, धोलपूर, राजस्थान- ३२८०२८, दूरध्वनी- ०५६४२- २२०७४९, ईमेल- principalrmsd@gmail.com

नेव्ही बॉईज स्पोर्ट्स कंपनी नौदलाच्या क्रीडाशाखेतील नेव्ही बॉईज स्पोर्ट्स कंपनीमध्ये उद्योन्मुख तरुण क्रीडापटूंना शिक्षणाची संधी दिली जाते. या योजनेसाठी पात्र होण्यासाठी संबंधित उमेदवार आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्तरावरील कनिष्ठ क्रीडा स्पर्धेत यॅचिंग (नौकानयन) किंवा सेलिंग (नौका विहार) या क्रीडा प्रकारात सहभागी झालेला असावा. या योजनेंतर्गत मर्यादित जागा उपलब्ध असल्याने पदक विजेता वा जिल्हा/ राज्य/ राष्ट्रीय स्तरावर प्रमाणपत्र प्राप्त उमेदवारांचा प्राधान्याने विचार केला जातो. संबंधित उमेदवाराने किमान पाचवी उत्तीर्ण केले असावे. इंग्रजी आणि हिंदी या दोन भाषा अवगत असाव्यात. संबंधित उमेदवाराचे वय १२ ते १५ वर्षे असावे. मोफत शिक्षण : या योजनेंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना ६ वी ते १० वीपर्यंतचे इंग्रजी माध्यमातील शिक्षण केवी मांडवी येथे मोफत दिले जाते. यासोबत त्यांना यॅचिंग आणि सेलिंग या क्रीडा प्रकारातील उच्च दर्जाचे प्रशिक्षण, राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरण अथवा नौदलातील नामवंत प्रशिक्षकांकडून दिले जाते. १०वी उत्तीर्ण झाल्यावर या उमेदवारांची नौदलात भरती केली जाते. प्रशिक्षणाच्या काळात समाधानकारक प्रगती नसलेल्या आणि या क्रीडा कौशल्यात ठरविलेल्या निकषापर्यंत प्रगती न केलेल्या किंवा वैद्यकीय/ शारीरिकदृष्ट्या अपात्र असलेल्या उमेदवारांना प्रशिक्षणातून बाहेर काढले जाते. तसेच खोटी माहिती देणाऱ्या किंवा प्रमाणपत्रे सादर करणाऱ्या उमेदवारांनासुद्धा प्रशिक्षणातून बाद केले जाते. आतापर्यंत या प्रशिक्षणावर झालेला खर्च संबंधित उमेदवाराच्या पालकाकडून वसूल केला जातो. निवड प्रक्रिया- उमेदवारांची प्रारंभिक निवड सेलिंग क्रीडा प्रकारातील त्याच्या उच्च प्रतिच्या कामगिरीवर आधारित केली जाते. निवड प्रकिया तीन दिवस चालते. त्याच वेळी मूळ प्रमाणपत्र सादर करावे लागतात. या निवड प्रक्रियेचा एक भाग वैद्यकीय चाळणी/ परीक्षा आहे. यामध्ये उमेदवार पात्र ठरल्यास अंतिम निवड यादी तयार केली जाते. वैद्यकीयदृष्ट्या तात्पुरते अपात्र ठरलेल्या उमेदवारास २१ दिवसांच्या कालावधीत पुनर्विलोकनाची संधी दिली जाते. हा उमेदवार लष्कराच्या निवडक रुग्णालयात वैद्यकीय चाचणी करू शकतो. अर्हतेसाठी आवश्यक बाबी- ● वयोमर्यादा- किमान १२ कमाल १५ वर्षे, ● ह्रदयाशी संबंधित कोणतीही व्याधी/ तक्रार नसावी, ● कानाचे विकार नसावे, ● फिट्सचा आजार नसावा, ● कोणताही मनोविकार नसावा, ● दृष्टीसाठी शस्त्रक्रिया केलेली नसावी, ● पाय किंवा गुडघ्यावरील शस्त्रक्रियेमुळे डिफॉर्मिटी (शारीरिक दोष/ व्यंग) निर्माण झालेली नसावी, ● शरीराच्या कोणत्याही भागावर कायमस्वरूपी टॅटू नसावेत. संपर्क- द सेक्रेटरी, इंडियन नॅव्हल सेलिंग असोसिएशन, सेव्हन्थ फ्लोअर, चाणक्य भवन, इंटिग्रेटेड हेडक्वार्टर्स, मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स, नवी दिल्ली-११००२१, दूरध्वनी-०११-२६११०८४२.

### शिष्यवृत्ती :

■ शिष्यवृत्ती केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागामार्फत ही शिष्यवृत्ती तरुण वैज्ञानिकांना दिली जाते. विज्ञान, वैद्यकीय, अभियांत्रिकी, शाखांमध्ये, पीएचडीसाठी जे उमेदवार सध्या संशोधन कार्य करत आहेत, त्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. कालावधी- पाच वर्षे. या शिष्यवृत्तीमध्ये दरमहा २५ रुपयांच्या अर्थसाहाय्याचा समावेश आहे. संपर्क- डिपार्टमेंट ऑफ सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी भवन, न्यू मेहराली, नवी दिल्ली- ११००१६, दूरध्वनी- ०११-२६५१२२१७, संकेतस्थळ- dst.gov.in

■ नरोत्तम सेखसारिया स्कॉलरशिप नरोत्तम सेखसारिया स्कॉलरशिप फाऊंडेशन मार्फत व्याजमुक्त शिष्यवृत्ती (लोनस्कॉलरशिप) योजना राबवली जाते. सामाजिकशास्त्रे, उपयोजितशास्त्रे, विज्ञान, विधी, स्थापत्य कला, व्यवस्थापन या विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती मिळू शकते. अशा विद्यार्थ्यांना देश आणि परदेशातील नामवंत विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळालेला असावा. पदवीप्राप्त उमेदवार किंवा पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाला असलेले उमेदवार या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकतात. वयोमर्यादा- ३० वर्षे. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना १०वी, १२वी, पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व सत्रांचे गुणपत्रक, पदवी प्रमाणपत्र, जीआरई (ग्रॅज्युएट रेकॉर्ड एक्झामिनेशन) किंवा कॅट (कॉमन अॅडमिशन टेस्ट) किंवा जीमॅट (ग्रॅज्युएट मॅनेजमेंट ऑप्टिट्यूड टेस्ट) किंवा गेट (ग्रॅज्युएट ऑप्टिट्यूड टेस्ट इन इंजिनीअरिंग) परीक्षेचे गुणपत्रक, परदेशातील ज्या शिक्षण संस्थेत प्रवेश मिळाला असेल त्या संस्थेचे पत्र, पासपोर्ट (पारपत्र)ची साक्षांकित प्रत, बंद केलेल्या लिफाफ्यात संदर्भ पत्र, अभ्यासक्रमाच्या शुल्काची माहिती, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, पालकांचे आयकर भरल्याची माहिती, ही कागदपत्रे सादर करावी लागते. संपर्क- नरोत्तम शेखसारिया फाऊंडेशन, पहिला माळा, निर्मल बिल्डिंग, नरिमन पॉइंट, मुंबई- ४०००२१, संकेतस्थळ- http://pg.nsfoundation.co.in/

सुरेश वांदिले
ekank@hotmail.com

# राज्यातील एकूण बाधित ५० लाखांवर

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** करोनाचा प्रादुर्भाव झाल्यापासून राज्यात आतापर्यंत ५० लाखांपेक्षा अधिक जणांना करोनाची बाधा झाली आहे. एवढी रुग्णसंख्या होणारे महाराष्ट्र हे देशातील आतापर्यंतचे एकमेव राज्य ठरले.

गेल्या २४ तासांत राज्यातील रुग्णसंख्येत घट झाली असून, ५३,६०५ नव्या रुग्णांची नोंद झाली तर ८६४ जणांचा मृत्यू झाला. करोनाची साथ सुरू झाल्यापासून राज्यात आतापर्यंत ५० लाख ५३ हजार जणांना करोनाची बाधा झाली. यापैकी ४३ लाख ४७ हजार रुग्ण करोनामुक्त झाले. आतापर्यंत ७५,२७७ जणांचा करोनामुळे मृत्यू झाला. राज्यात सध्या ६ लाख २८ हजार रुग्ण उपचाराधीन आहेत. सर्वाधिक ९ लाख १८ हजार रुग्ण पुणे जिल्ह्यात बाधित झाले.

दिवसभरात पुणे शहर २९७७, उर्वरित पुणे जिल्हा ४३५२, पिंपरी-चिंचवड २०३३, नाशिक शहर २२२४, उर्वरित नाशिक जिल्हा १७००, नगर जिल्हा ३३८०, सोलापूर २३७१, सातारा २३२३, रत्नागिरी ७३४, सिंधुदुर्ग ६३०, सांगली १९७६, अमरावती जिल्हा १०८५, नागपूर शहर २१४९, उर्वरित नागपूर जिल्हा १७५८ असे नवे रुग्ण आढळले.

# खाटा कमी पडल्यास पुण्यातील रुग्ण मुंबईत- उच्च न्यायालय

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** पुण्यातील रुग्णालये वाढत्या रुग्णसंख्येचा ताण सहन करण्यास सक्षम नसतील तर तेथील रुग्ण मुंबईत हलवण्याचे निर्देश आम्ही देऊ, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

करोना गैरव्यवस्थापनाशी संबंधित याचिकांवर सध्या मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. न्यायालयाच्या याबाबतच्या आदेशाची प्रत शनिवारी उपलब्ध झाली. त्यात पुण्यातील रुग्णालये वाढत्या रुग्णांचा ताण सहन करण्यास सक्षम नसतील तर तेथील रुग्ण मुंबईतील सरकारी तसेच करोना काळजी केंद्रात हलवण्याचे निर्देश आम्ही देऊ, असे न्यायालयाने म्हटले आहे.

राज्याच्या आरोग्य विभागातर्फे राज्यातील उपचाराधीन रुग्णांची जिल्हानिहाय आकडेवारी न्यायालयात सादर करण्यात आली होती. ही आकडेवारी पाहिल्यावर करोनाच्या संसर्गाबाबत पुणे सर्वाधिक प्रभावित असून जिल्ह्यात उपचाराधीन रुग्णांची संख्या ही मुंबईपेक्षाही दुप्पट असल्याबाबत न्यायालयाने चिंता व्यक्त केली होती. तसेच पुण्यात एवढ्या संख्येने उपचाराधीन रुग्ण का आहेत, त्याची कारणे काय आहेत, याबाबत न्यायालयाने पुणे पालिकेकडे विचारणा केली होती. त्यावर पुण्यात उपचारांसाठी येणाऱ्या स्थलांतरितांची संख्या अधिक असल्याने पुण्यातील उपचाराधीन रुग्णांची संख्या ही वाढलेली दिसत असल्याचे पुणे पालिकेतर्फे ॲड्. अभिजीत कुलकर्णी यांनी न्यायालयाला सांगितले होते. याबाबत पुणे पालिका आयुक्तांनी मंगळवारपर्यंत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

## ‘पर्यायी औषधांची माहिती नागरिकांना द्या’



**गंभीर करोना रुग्णांसाठी रेमडेसिविर व टोसिलीझुमॅब या महागड्या वा परदेशी औषधांना भारतात तयार केल्या जाणाऱ्या कमी किंमतीच्या इटुलिझुमॅब, डेक्सामेथसॉन, मेथलप्रेडनीसलॉन या तीन औषधांचा पर्याय उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनातील रेमडेसिविर आणि टोसिलीझुमॅब या औषधांबाबतचा गैरसमज दूर करून पर्यायी औषधांबाबत जागरूक करण्याचा सल्ला उच्च न्यायलयाने केंद्र व राज्य सरकारला दिला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही या औषधांऐवजी पर्यायी औषधे लिहून देण्यास सांगितले जावे, अशी सूचना न्यायालयाने केली आहे.**

# मुंबईत रुग्ण दुपटीचा कालावधी महिनाभरात ३५ वरून १४५ दिवसांवर

**मुंबई :** शहरातील नव्याने बाधित होणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असून मुंबईचा रुग्ण दुपटीचा कालावधी १४५ दिवसांवर आला आहे. महिनाभरापूर्वी हा कालावधी ३५ दिवस होता. शहरात शनिवारी २,६७८ रुग्णांचे नव्याने निदान झाले आहे, तर ६२ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

शहरात एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात करोनाच्या दुसऱ्या लाटेने उच्चांक गाठला होता तेव्हा रुग्ण दुपटीचा कालावधी ३५ दिवसांचा होता. त्यावेळी दैनंदिन नव्याने बाधित होणाऱ्या रुग्णांची संख्या सुमारे दहा हजार होती. महिनाभरात रुग्णसंख्येचा आलेख पुन्हा खाली जाऊ लागल्याने आता दैनंदिन निदान होणाऱ्या रुग्णसंख्येची संख्या कमी होत आली आहे आणि रुग्ण दुपटीच्या कालावधीतही चौपटीहून अधिक वाढ झाली आहे.

शनिवारी शहरात २,६७८ रुग्णांचे निदान झाले आहे. तर रुग्ण दुपटीचा कालावधी १४५ दिवसांवर गेला आहे. शनिवारी ३,६०८ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत.

**ठाणे जिल्ह्यात दिवसभरात १,९६६ करोनारुग्ण**

ठाणे जिल्ह्यात शनिवारी १ हजार ९६६ नवे करोना रुग्ण आढळून आले, तर ६८ जणांचा मृत्यू झाला.

सर्वाधिक मृतांची नोंद कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात (१८) नोंदविण्यात आली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ४ लाख ८६ हजार ७३७ करोनाबाधित आढळले असून ८ हजार तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

# दोन पोलीस कर्मचाऱ्यांचे करोनामुळे निधन

**मुंबई :** कांदिवली पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक संभाजी नागरे (५४) यांचे शनिवारी सायंकाळी, तर दहिसर पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार म्हणून कार्यरत असलेले संदीप तावडे (४९) यांचे शुक्रवारी रात्री करोनाने निधन झाले. पश्चिम उपनगरातील सेव्हन हिल्स रुग्णालयात उपचार सुरू असताना या दोघांची प्राणज्योत मालवली.

vesim
V.E.S. Since 1962
Vivekanand Education Society's
Institute of Management
Studies & Research
Accredited by NAAC & NBA
495-497, Hashu Advani Memorial Complex, Collectors Colony, Chembur, Mumbai - 74.
Tel. No. 022-6789 3000 / 2553 7110 • Email: mailus.vesim@ves.ac.in • Website: vesim.ves.ac.in
('A' Grade awarded by DTE Govt. of Maharashtra, Affiliated to University of Mumbai and Approved by AICTE)
(Sindhi Linguistic Minority and Unaided Institute)
Intake of the Course: Total 10 Seats. - Seats Available for Admission : Total 04 Seats
ADMISSION NOTICE
For Ph.D. (in Management Studies)
From the Academic Year 2021-2022
Applications are invited from the eligible (Mumbai University PET cleared candidates) candidates, for the admission to Doctoral Degree in Ph.D. (Management Studies) from the Academic Year 2021-2022.
**Eligibility Criteria :** As per revised VCD No. Exam./Theses/Uni./VCD/947 of 2018 dated 15/12/2018 and Circular No. DBOEE/ICD/18-19/680 dated 04/02/2019 of Mumbai University.
**Availability of Forms:** Application Form and Prospectus are available on Institute Website i.e. vesim.ves.ac.in.. Interested Applicants can download the Application Form; and filled in/duly completed Applications along with the copies of relevant certificates/marksheets should be sent via above mentioned Email on or **before the last date i.e. 31st May 2021**.
Applicant will have to pay Rs. 1416/- towards the Application and Admission Processing Fee through the online payment mode on the Bank details provided on website and in Prospectus.
**Last Date for Submission of Applications: 31st May 2021 up to 5.30 pm (through Email).**
Physically challenged applicants may also apply. They shall be considered for the admission as per the Mumbai University Rules of Reservation Policy. Incomplete Applications or Late Applications received after last date will be rejected without assigning any reason.
**Admission Procedure:** Student's selection and their admissions shall be as per the rules and procedure/above mentioned VCD - 947 dated 15/12/2018 laid down by Mumbai University.
**For the detail information in this regard, please visit, our Institute Website i.e. vesim.ves.ac.in.**
Date: 09/05/2021
Director VESIM

# पालिकेच्या प्रत्येक विभागात ‘ड्राईव्ह इन’ लसीकरण केंद्र

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** दादर येथील ड्राईव्ह इन लसीकरणाला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता ज्येष्ठ नागरिक आणि अपंगाना वाहनातच लस देण्याची सुविधा उपलब्ध करावी, अशी वाहनतळे मुंबईतील प्रत्येक विभागांमध्ये २४ तासांत सुरू करावीत, अशी सूचना पालिकेने दिली आहे. त्यामुळे आता सहा वाहनतळे लवकरच सुरू होणार आहेत.

दादरच्या कोहिनूर वाहनतळावर पालिकेने पहिले लसीकरण करणारे वाहनतळ सुरू केले. याला प्रतिसाद मिळत असून यामुळे गर्दीचे नियंत्रण केले जात असल्याने करोना प्रतिबंधात्मक उपायांचेही पालन केले जाते. त्यामुळे पालिकेने आता अशी आणखी वाहनतळे लसीकरणासाठी २४ तासांत कार्यान्वित करण्याचे आदेश दिले आहेत. अंधेरीतील क्रीडा संकुल, कुपरेज मैदान, शिवाजी स्टेडिअम, ओव्हल मैदान, एमआयजी, एमसीए मैदान, रिलायन्य जिओ उद्यान, मुलुंडचे शिवाजी उद्यान, चेंबूर सुभाष नगर आणि टिळक नगर मैदान, घाटकोपर पोलिस मैदान, चुनाभट्टी शिवाजी मैदान अशा मुंबईतील मोठ्या मैदानाचा यासाठी वापर करता येईल असेही पालिकेने यात सूचित केले आहे.

बाहेरून आत येणाऱ्या गाड्यांसाठी एकेरी रांग करून सर्व व्यवस्थ वाहनतळाच्या आत केली जावी. जेणेकरून वाहनतळाकडे येणाऱ्या रस्त्यांवरील वाहतूक व्यवस्थेत अडथळे निर्माण होणार नाहीत. वाहनतळावर तात्पुरडे शेड उभारून लसीकरण करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुविधा, कोणतेही दुष्परिणाम जाणवल्यास तातडीने सेवा देण्यासाठी व्यवस्था, रुग्णवाहिका इत्यादी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. पुरेसे मोबाईल शौचालये आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, असे या आदेशात नमूद केले आहे.

लसीकरणासाठी आलेल्या व्यक्तीसोबत वाहन चालविणाऱ्याबरोबरच आणखी एखादी व्यक्ती उपस्थित असणे बंधनकारक आहे. जेणेकरून लस दिल्यावर गाडीत कोणताही त्रास झाल्यास तातडीने व्यक्तीकडून संबंधितांना कळविले जाईल, असे या आदेशात म्हटले आहे.

## कोव्हिशिल्डची मात्रा

**या केंद्रावर नोंदणी करून वेळ घेतलेल्या ६० वर्षांवरील नागरिकांनाच कोव्हिशिल्ड लस दिली जाईल, असे या आदेशात स्पष्ट केले आहे.**

# राजावाडी रुग्णालयाच्या सुरक्षेचा आढावा

**मुंबई :** करोना लसीकरण केंद्रांवर सध्या लशीचा तुटवडा असल्याने अनेक ठिकाणी गोंधळ होत असल्याने मुंबई पोलीस आयुक्त सध्या विविध लसीकरण केंद्राना भेट देत आहेत. शनिवारी त्यांनी राजावाडी रुग्णालयाला भेट देऊन येथील सुरक्षेचा आढावा घेतला.

पूर्व उपनगरातील पालिकेचे सर्वात मोठे असे राजावाडी रुग्णालय असून याठिकाणी देखील रोज आठशे ते हजार जणांना ही मात्रा देण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी येथे मोठा गोंधळ झाल्याने पोलिसांनी नागरिकांना बाहेर काढले होते.

# सिनेछायाचित्रकार मुणगेकर यांचे निधन



**मुंबई :** सिने छायाचित्रकार सुधाकर मुणगेकर यांचे शनिवारी हृदयविकाराच्या धक्क्याने निवासस्थानी निधन झाले. ते ७३ वर्षांचे होते. दामोदर कामत यांनी स्थापन केलेल्या ‘कामत फोटो फ्लॅश’ या कंपनीमध्ये १९६६ साली वयाच्या १८व्या वर्षी ते छायाचित्रकार म्हणून रुजू झाले. आर. के. स्टुडीओची निर्मिती असलेल्या ‘मेरा नाम जोकर’, ‘बॉबी’, ‘सत्यम शिवम सुंदरम’, ‘प्रेम रोग’, ‘धरम करम’, ‘हिना’ तसेच राजश्री प्रॉडक्शन्सच्या ‘अखियोंके झरोखेसे’, ‘नादिया के पार’, ‘सारांश’, ‘उपहार’, ‘गीत गाता चल’, ‘चितचोर’, ‘मैने प्यार किया’, एन. चंद्रा यांच्या ‘नरसिंहा’ यांसह दीडशेहून अधिक हिंदी चित्रपटांचे स्थिर छायाचित्रण त्यांनी केले आहे. मराठीमध्ये दामू केंकरे दिग्दर्शित ‘सखी माझी’, कुमार सोहनी दिग्दर्शित ‘जोडीदार’, ‘तुझ्याचसाठी’ अशा अनेक चित्रपट, नाटक, दूरदर्शन मालिकांचे स्थिर छायाचित्रण त्यांनी केले आहे.

COMMERCIAL PREMISES FOR SALE @ THANE
Fully furnish Commercial Premises No. 405, Admeasuring Area 2028 Sq.ft. (Carpet) & 2840 Sq.ft. (Built Up), Plot No. 463, T.P.S. No. 1, Pokhran Road No.1, 4th floor, DEV CORPORA, Cadbury Junction, Thane (West) 400601
➢ Reception Area
➢ 2 Executive Cabins & 3 Manager Cabins
➢ 1 Big Conference Room
➢ 1 Small Conference Room
➢ Administrative area having seating capacity of 15 staff
➢ 1 Pantry
➢ 1 Basement Parking
Contact No.
9619662276

AUCTION Ashvin & Co. Auctioneers: Tel.: 09820739509/09820133274
बेस्ट
बी.ई.एस. अँण्ड टी. अंडरटेकिंग यांच्या वतीने आणि करिता ०३.०६.२०२१ रोजी ई-लिलाव अशोक लेलँण्ड एस.डी. सीएनजी बसेस, एस.डी. डिझेल व्हीकेजी एसएलएफ एमयूटीपी बसेस, डी. डी. डिझेल बसेस चार फ्रेम, एस.डी. व्हायकिंग अधिक सुपर डिझेल बसेस (बसेसचे अदमासे ४८२ विविध प्रकारचे), ॲल्युमिनियम/ कॅम्ब्रिक/ कम्युनिकेशन केबल, स्विचगीअर्स, ट्रान्सफॉर्मर्स, बॅटरीज, विविध प्रकारचे तेल, इ. सामग्रीची स. ०९.३० व दु. ०४.०० दरम्यान विक्री करण्यात येईल. नामंजूर झालेल्या आयटम्सचा पुनर्लिलावसुद्धा त्याच दिवशी सुरू होईल. बी.ई.एस. अँण्ड टी. अंडरटेकिंग यांच्या नावे डीडीद्वारा कॅटलॉगमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सीएमडी ई-लिलावामध्ये भाग घेणे सुकर होण्याकरिता भरावयाची आहे. टर्म्स इरठे ३३.३३% कामकाजाच्या पुढील दिवशी.
For Further Details, Terms & Conditions visit: www.ashvinauctioneers.com

# अशास्त्रीय करोना उपचारप्रकरणी डॉक्टरवर गुन्हा

लोकसत्ता प्रतिनिधी

**बदलापूर :** शासनाच्या करोना उपचार नियमावलीला झुगारून वांगणीत एका दवाखान्यात एका खासगी डॉक्टरने करोना रुग्णांवर मनमानी उपचार सुरू केले होते. या डॉक्टरची उपचार आणि रुग्ण बरे करण्याच्या दाव्यांची एक चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर जिल्हा आरोग्य यंत्रणेने त्या डॉक्टरविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. डॉ. उमाशंकर गुप्ता असे या डॉक्टरचे नाव असून तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय बनसोडे यांच्या तक्रारीवरून कुळगाव पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ. गुप्ता याने स्वयंघोषित उपचार करण्यासाठी जिल्हा प्रशासनाची कोणतीही परवानगी घेतली नव्हती. हा डॉक्टर रुग्णांना मुखपट्टी असल्यास प्रवेश देत नव्हता!

पश्चिम रेल्वे
दादर येथे फॅमिली मॉल विकसित करणे, देखभाल करणे आणि संचालन करणे
**ई-निविदा सूचना क्र. व दिनांक : CA11_Family_Mall_DDR. दिनांक : ०६.०५.२०२१. काम व स्थान :** ०५ (पाच) वर्षांच्या कालावधीसाठी मुंबई विभागाच्या दादर (डीडीआर) स्थानक येथे फॅमिली मॉल विकसित करणे, देखभाल करणे आणि संचालन करणे यासाठी निविदा. **कामाचा अंदाजे खर्च रु. :** पाच वर्षांसाठी रु. ११,०९,४४,८३३/- (कर इ. वगळता). **बयाणा रक्कम रु. :** २२,१८,९००/-. **निविदा प्रपत्र उपलब्ध असलेली वेबसाइट : www.ireps.gov.in ऑनलाइन सादरीकरण बंद होण्याचा दिनांक आणि वेळ :** ०७.०६.२०२१ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **ई-निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ :** ०७.०६.२०२१ रोजी १५.३० वाजता. **सूचना :** निविदा प्रपत्र, शुद्धिपत्रक व इतर तपशील डाऊनलोड करण्यासाठी आमच्या वेबसाइटला **www.ireps.gov.in** येथे भेट द्यावी. निविदा शुल्क आणि बयाणा रक्कम केवळ ऑनलाइन नेट बँकिंग किंवा ई-पेमेन्ट गेटवेच्या माध्यमातूनच स्वीकारण्यात येईल. बोलीदारांनी अद्ययावत माहितीसाठी नियमितपणे वेबसाइट पाहावी.
083
आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
संकेतन आणि दूरसंचार कार्य
**निविदा क्र.: एसजी २१७_२_२८५_डब्ल्यूए_ दिनांकित : ०६.०५.२०२१. कामाचे नाव :** पश्चिम रेल्वेच्या मुंबई उपनगर विभागामधील वांद्रे स्थानक येथे जुने एसी ट्रॅक सर्किट बदलून मल्टी सेक्शन डिजिटल ॲक्सल काऊंटरच्या तरतुदीच्या संदर्भात आऊटडोअर सिग्नलिंग साहित्याचा अंशतः पुरवठा, चर खणणे, संकेतन आणि दूरसंचार केबल टाकणे, बसविणे, तपासणे आणि कार्यान्वित करणे. **कामाचे अंदाजे मूल्य :** रु. ५७,१८,०९०.५. **कार्यालय तपशील जिथे ई-निविदा उघडेल :** वरिष्ठ विभागीय संकेत आणि दूरसंचार अभियंता (एस), २ रा मजला, विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांचे कार्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८. **इरठे :** बोली सुरक्षा घोषणापत्र आवश्यक. **ई-निविदा कागदपत्राच्या सादरीकरणासाठी समाप्तीचा दिनांक आणि वेळ :** ०४.०६.२०२१ रोजी १५.०० वा. **ई-निविदा कागदपत्र उघडण्याचा दिनांक आणि वेळ :** ०४.०६.२०२१ रोजी १५.३० वा.नंतर. निविदा **http://www.ireps.gov.in** वर पाहता येईल.
079
आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly

लोकसत्ता लोकमान्य लोकशक्ती
महाराष्ट्र गाथा
महाराष्ट्राच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त ‘लोकसत्ता’चा खास उपक्रम
वैचारिक क्षेत्रात महाराष्ट्राचे, देश आणि जागतिक पातळीवरील योगदान अतिशय मोलाचे. परस्परविरोधी विचारांचे आदानप्रदान आणि त्यावरील वादळी चर्चा हे येथील विचारवंतांचे संचित. महाराष्ट्राचा हा तर्कवाद समजून घेणे, प्रत्येक जिज्ञासूसाठी अतिशय महत्त्वाचे. त्यासाठी येत्या सोमवारी, दि. १० मे रोजी भेटू या, या विषयाचा विशेष अभ्यास आणि संशोधन करणारे ‘लोकसत्ता’चे संपादक **गिरीश कुबेर** यांना, **‘महाराष्ट्र गाथा’** या वेब व्याख्यानमालेत.
विषय : महाराष्ट्राचा तर्कवाद
वक्ते : गिरीश कुबेर
कधी : सोमवार, १० मे २०२१
वेळ : सायंकाळी ६ वाजता
MIDC प्रस्तुत
लोकसत्ता महाराष्ट्र गाथा व्याख्यानमाला
सहप्रायोजक
सारस्वत बँक सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
चितळे
पॉवर्ड बाय
मांडके हिअरिंग सर्व्हिसेस

पश्चिम रेल्वे
ई-प्रापण निविदा सूचना क्र. एस/ १७/ २०२१
दिनांक : ०५.०५.२०२१

| अ.क्र. | बाबींचे संक्षिप्त वर्णन | परिमाण | टी.ओ.डी. |
|---|---|---|---|
| ३३५ | डिस्चार्ज पाइप फ्लेंजसाठी फ्लेंज कव्हर | ४१४० नग | १९.०५.२०२१ |
| ३३६ | शॅकल लॉक | २००० नग | १९.०५.२०२१ |
| ३३७ | पे आऊट स्प्रिंग | ११७ नग | २०.०५.२०२१ |
| ३३८ | बीसीएनएचएल व्हॅगनसाठी कप्लर रॉड | १२० नग | २०.०५.२०२१ |
| ३३९ | एनहान्स्ड कॅपॅसिटी स्क्रू कपलिंग | ६१ नग | २१.०५.२०२१ |
| ३४० | लॉंजिट्युडनल बंप स्टॉपसाठी रबर पॅड | १९१२ नग | २१.०५.२०२१ |
| ३४१ | ट्रॅक्शन सेंटर | ६६ नग | २१.०५.२०२१ |
| ३४२ | प्रायमरी बंप स्टॉप | ४२७२ नग | २१.०५.२०२१ |
| ३४३ | सेकंडरी स्प्रिंग आउटर | ८५ नग | २१.०५.२०२१ |
| ३४४ | सेकंडरी स्प्रिंग इनर | १४२ नग | २१.०५.२०२१ |
| ३४५ | ब्रेक ब्लॉक | १०००० नग | २१.०५.२०२१ |
| ३४६ | १३ बाबी असलेले कोरोनरी ट्रे कन्सिस्ट | १ संच | २१.०५.२०२१ |
| ३४७ | नेफ्रोस्कोप | १ नग | २१.०५.२०२१ |
| ३४८ | बोलस्टर आउटर हेलिकल स्प्रिंग | १७० नग | २२.०५.२०२१ |
| ३४९ | डोअर चेक स्प्रिंग्ज | ११६४ नग | २२.०५.२०२१ |
| ३५० | प्रेशर गेज | ३२१ नग | २४.०५.२०२१ |
| ३५१ | सिंगल पीस एफआरपी लौवर शटर | १३३४ नग | २४.०५.२०२१ |
| ३५२ | बॉल जॉइंट ट्रॅक्शन लिवर | ३७०८ नग | २४.०५.२०२१ |
| ३५३ | बॉल जॉइंट रोल लिंक | १५०० नग | २४.०५.२०२१ |
| ३५४ | लॅटरल बंप स्टॉप | १७९० नग | २४.०५.२०२१ |
| ३५५ | स्टॅंडर्डाइज्ड ब्रेक डिस्क | १६० नग | २४.०५.२०२१ |
| ३५६ | वाइड जॉ ॲडोप्टर | १७९२ नग | २४.०५.२०२१ |
| ३५७ | प्रायमरी स्प्रिंग आउटर | ३७२ नग | २४.०५.२०२१ |
| ३५८ | साइड बेअरर अरेंजमेंटसाठी स्प्रिंग | १४५८ नग | २४.०५.२०२१ |
| ३५९ | अपग्रेडेड हायटेनसील सीबीसी | ५३२१ नग | २४.०५.२०२१ |
| ३६० | लिनरसह कास्ट स्टील बोल्स्टर | १४ नग | २४.०५.२०२१ |
| ३६१ | बीसीएन व्हॅगनसाठी साइड बेअरर टॉप | ६० नग | २४.०५.२०२१ |
| ३६२ | १०७ चौ.मी. कॅटेनरी वायर | ७८७५० मी. | २५.०५.२०२१ |
| ३६३ | फिल्टर एलिमेंट | ३८० नग | २५.०५.२०२१ |
| ३६४ | के टाइप हाय फ्रिक्शन कॉम्पोझिट ब्रेक ब्लॉक | ८६८४३ नग | २५.०५.२०२१ |
| ३६५ | ॲक्सल बॉक्स पिवोट बुश | ३५७१ नग | २५.०५.२०२१ |
| ३६६ | रबर स्प्रिंग | १२६४ नग | २५.०५.२०२१ |
| ३६७ | सेकंडरी व्हर्टिकल डॅम्पर | ६५३ नग | २५.०५.२०२१ |
| ३६८ | व्हील सेट अर्थिंग इक्विपमेंट | ८७० संच | २५.०५.२०२१ |
| ३६९ | ब्रांच पाइप २० एन. बी. | ३० नग | २५.०५.२०२१ |
| ३७० | ६५ चौ.मी. कॅटेनरी वायर | ९१२४० मी. | २६.०५.२०२१ |
| ३७१ | सेंट्रिंग डिस्क | ७६ नग | २६.०५.२०२१ |
| ३७२ | प्रायमरी सस्पेन्शनसाठी सेंट्रिंग डिस्क | १०० नग | २६.०५.२०२१ |
| ३७३ | बोल्स्टर आउटर हेलिकल स्प्रिंग | १३० नग | २६.०५.२०२१ |

इरठे, खरेदी बंधने आणि तपशीलवार निविदा अटी असलेल्या तपशीलवार सूचनेच्या संदर्भात कृपया www.ireps.gov.in आणि www.wr.indianrailways.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.
००७८
प्रमुख मुख्य साहित्य व्यवस्थापक
आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly


बृहन्मुंबई महानगरपालिका
कोविड-१९ बाबत माहिती, रुग्णशय्येची (बेड) आवश्यकता अथवा कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण केंद्रांची माहिती हवी असल्यास कृपया आपल्या विभागाच्या नियंत्रण कक्षाशी (वॉर्ड वॉर रुम) संपर्क साधावा.

| विभाग | प्रमुख परिसर | नियंत्रण कक्ष क्रमांक |
|---|---|---|
| ए | कुलाबा, फोर्ट, नेव्ही नगर, नरिमन पॉईंट | ०२२-२२७०००७ । ०२२-२२७०००२३ |
| बी | मोहम्मद अली रोड, डोंगरी, भेंडी बाजार | ०२२-२३७५९०२३ । ०२२-२३७५९०२५ |
| सी | भूलेश्वर, नेताजी सुभाष मार्ग (अंशतः), मुंबादेवी, लोहार चाळ | ०२२-२२१९७३३१ ९८१९७८२२८० |
| डी | ग्रँट रोड, वाळकेश्वर, मलबार हिल, गिरगांव | ०२२-२३८३५००४ । ८८७९७१३१३५ |
| ई | भायखळा, मदनपुरा, आग्रीपाडा, नागपाडा, डॉकयार्ड रोड, रे रोड, चिंचपोकळी | ०२२-२३७९७९०१ ९३२१२९६०३५ |
| एफ दक्षिण | परळ, लालबाग, हिंदमाता | ०२२-२४१७७५०७ । ८६५७७९२८०९ |
| एफ उत्तर | माटुंगा, शीव (सायन), वडाळा, हिंदू कॉलनी | ०२२-२४०११३८० । ८८७९१४८२०३ |
| जी दक्षिण | वरळी, प्रभादेवी, महालक्ष्मी, लोअर परळ, करी रोड | ०२२-२४२१९५१५ । ७२०८७६४३६० |
| जी उत्तर | धारावी, कोळीवाडा, माहिम, दादर, छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) | ०२२-२४२१०४४१ ८२९११६३७३९ |
| एच पूर्व | वांद्रे (पूर्व), खार (पूर्व), सांताक्रुझ (पूर्व) | ०२२-२६६३५४०० । ८८७९२०३९७८/७९ |
| एच पश्चिम | वांद्रे (पश्चिम), खार (पश्चिम), सांताक्रुझ (पश्चिम) | ०२२-२६४४०१२१ । ७३०४७५८११७ |
| के पश्चिम | अंधेरी (पश्चिम), जोगेश्वरी (पश्चिम), विलेपार्ले (पश्चिम) जुहू, वेसावे (वर्सोवा), लोखंडवाला संकुल | ०२२-२६२०८३८८ । ८९२८४४३६८७ ८५९१३७२४४९ । ८५९१३८८२४३ |

| विभाग | प्रमुख परिसर | नियंत्रण कक्ष क्रमांक |
|---|---|---|
| के पूर्व | अंधेरी (पूर्व), जोगेश्वरी (पूर्व), विलेपार्ले (पूर्व) | ०२२-२६८४७००० । ८६५७९३३६८१ |
| पी दक्षिण | गोरेगांव, आरे कॉलनी, प्रेम नगर, गोकुळधाम | ०२२-२८७८०००८ । ८८२८४७६०९८ ७३०४७७६०९८ |
| पी उत्तर | मालाड (पूर्व), मनोरीपाडा, मार्वे, अक्सा, मढ | ०२२-६९६००००० ०२२-६९६०००01/२/३/.../२४ |
| आर दक्षिण | कांदिवली, चारकोप | ०२२-२८०५४७८८ । ८८२८४९५७४० |
| आर उत्तर | दहिसर | ०२२-२८९४७३५० । ८३६९३२४८१० |
| आर मध्य | बोरिवली, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | ०२२-२८९४७३६० । ९९२००८९०९७ |
| एल | कुर्ला, साकीनाका, चांदिवली, असल्फा | ०२२-२६५०९९०१ । ७६७८०६१२७४ ७७१०८७०५१० । ७३०४८८३३५९ |
| एम पूर्व | मानखुर्द, अणुशक्ती नगर, देवनार | ०२२-२५५२६३०१ । ९००४९८४८८७ |
| एम पश्चिम | चेंबूर, सिंधी कॉलनी, छेडा नगर, टिळकनगर | ०२२-२५२८४००० । ८५९१३३२४२१ |
| एन | घाटकोपर, विद्याविहार, पंतनगर | ०२२-२१०१०२०१ । ७२०८५४३७१७ |
| एस | भांडूप, पवई, कांजूरमार्ग, विक्रोळी, नाहूर | ०२२-२५९५४००० । ९००४८६९८३० ९००४८६९६६८ । ९००४८६९७२४ |
| टी | मुलुंड | ०२२-२५६९४००० । ८५९१३३५८२२ |

मास्क नियमित व योग्यरीत्या वापरा
हात वारंवार स्वच्छ धुवा
२ मीटरचे सुरक्षित अंतर पाळा
@myBMC । बृहन्मुंबई महानगरपालिका कोविड हेल्पलाईन-१९१६ । भारत सरकार कोविड हेल्पलाईन-१०७५ । www.stopcoronavirus.mcgm.gov.in
PRO/134/ADV/2021-22

# मतविभाजन भाजपच्या पथ्यावर



हृषीकेश देशपांडे

**नुकत्याच निवडणूक** झालेल्या पाच विधानसभांपैकी, आसाममधील सत्ता राखण्याबाबत भाजपला खात्री होती. विधानसभा निवडणुकीचा निकालही मतदानोत्तर चाचण्यांनी वर्तवलेल्या भाकिताप्रमाणे भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (रालोआ) बाजूने लागला. काँग्रेसकडे राज्यात तरुण गोगोई यांच्या निधनानंतर नेतृत्वाचा अभाव होता. त्यामुळे भाजपला पर्याय देता येईल असा विश्वास जनतेच्या मनात निर्माण करण्यात काँगेस कमी पडली. काँग्रेसच्या प्रचारानेही शेवटच्या टप्प्यात गती पकडली. छत्तीसगढचे मुख्यमंत्री भूपेश बघेल आसामातच राहिले होते; पण काँग्रेसच्या तुलनेत भाजपची संघटना प्रभावी ठरली. मात्र या कारणांसोबत, विरोधातील मतांचे विभाजनही भाजपच्या पथ्यावर पडले. आसामातील १२६ पैकी रालोआला ७५ तर काँग्रेसप्रणीत आघाडीला ५० जागा मिळाल्या. जागांच्या गणितात हा फरक मोठा असला तरी मतांमध्ये टक्के जेमतेम एक टक्का अंतर आहे. मुस्लीमबहुल भागात काँग्रेस आणि अजमल यांचा 'एआययूडीएफ' (ऑल इंडिया युनायटेड डेमॉक्रॅटिक फ्रंट) हा पक्ष एकत्र असल्याने, त्यांनी जिंकलेल्या जागांवर मताधिक्य मोठे होते. राज्यात जवळपास ३७ मतदारसंघांत मुस्लिमांची मते निर्णायक ठरतात. त्यामुळे, विरोधी मतांचे विभाजन झाल्याखेरीज येथे फारशी संधी नाही हे ओळखून भाजपने उर्वरित मतदारसंघांवर भाजपने लक्ष केंद्रित केले होते.

**प्रादेशिक पक्षांचा फटका**

सुधारित नागरिकत्व कायद्याविरोधात वर्ष-दीड वर्षापूर्वी आसाम पेटले होते. नागरिकत्वाला मुकावे लागेल अशी धास्ती बांगलादेशातून स्थलांतरित झालेल्या अनेक हिंदूंनाही होती. पण निवडणुकीत या विषयाला बगल देण्यात भाजपला यश आले. त्यातच या कायद्याविरोधात आंदोलन करणारे निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यामुळे जनतेच्या मनात त्यांच्या हेतूंविषयी संभ्रम निर्माण करणे अन्य पक्षांना सोपे गेले. याच आंदोलनातून आसाम जातीय परिषद तसेच राजौर दल या पक्षांची निर्मिती झाली. राजौर दलाचे अध्यक्ष अखिल गोगोई कारागृहातून विजयी झाले. काँग्रेसने प्रयत्न करूनही हे पक्ष आघाडीत आले नाहीत. त्यामुळे मतांची फाटाफूट झाली. अप्पर आसाम भागातील १४ मतदारसंघांत अन्य पक्षांची एकत्रित मते भाजपपेक्षा जास्त आहेत. राज्यातील भाजपचे प्रभावी नेते हेमंतबिस्व सरमा यांचा या आंदोलकांना पाठबळ असल्याचा आरोप झाला. राज्याचे आरोग्य खाते सांभाळत असलेल्या सरमा यांनी आता करोना नियंत्रणास प्राधान्य, राजकीय भाष्य नको, असे सांगत विषय टाळला. याउलट, नागरिकत्व दुरुस्ती कायद्याविरोधात जे संघर्ष करत आहेत त्यांनी एकत्र यावे यासाठी आम्ही शेवटपर्यंत प्रयत्न केले- या पक्षांचा फटका बसेल याची आम्हाला भीती होतीच, असे आसाम काँग्रेसच्या माध्यमविभाग प्रमुख बबिता शर्मा यांनी सांगितले. तर, 'ध्येय निश्चित करून आम्ही लढलो, कुणाला मदत वा विरोधाचा प्रश्नच नाही' असे आसाम जातीय पक्षाचे प्रवक्ते झियाउर रेहमान यांनी सांगितले.

**अप्पर, लोअर, बराक...**

राज्याचे अप्पर आसाम, लोअर आसाम, बराक खोरे तसेच टेकडी प्रदेश (हिल) अशी ढोबळ विभागणी. काँग्रेसने ब्रदुद्दीन अजमल यांच्या पक्षाशी केलेली आघाडी आपल्याच पथ्यावर पाडण्यासाठी भाजपमार्फत, ''पुढचे मुख्यमंत्री हे अजमल असतील'' असा प्रचार झाल्यावर हिंदुबहुल अप्पर आसाम भाजपच्या मागे एकवटला. या भागतील ६६ पैकी ५० जागा जिंकल्याने भाजपचा सत्तामार्ग सुकर झाला. लोअर आसाम हा मुस्लीमबहुल भाग. येथील ४० पैकी बहुसंख्य जागा काँग्रेस व अजमल यांच्या आघाडीला मिळाल्या. बराक खोऱ्यातील १५ पैकी भाजप आघाडीला सहा जागा तर टेकडी प्रदेशातील सर्व पाचही जागा भाजपने जिंकल्या.

निवडणुकीत सत्ताधारी पक्षाला जनतेच्या नाराजीचा सामना करावा लागतो. सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करणे शक्य नसते. त्या दृष्टीने राज्यात मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्याबाबत विशेष नाराजी नव्हती. 'सोनोवाल यांच्यावर विरोधकांना व्यक्तिगत आरोप करतानाही विचार करावा लागतो' असे मत 'न्यूज १८'चे आसाममधील वरिष्ठ वार्ताहर नाबजित भगवती यांनी व्यक्त केले. केंद्राच्या सहकार्यामुळे पायाभूत सुविधांची कामे मोठ्या प्रमाणात झाली. बराक खोऱ्यात कित्येक वर्षांनंतर, रस्त्यांचे जाळे उभे राहिले.

**आघाड्यांची निर्मिती**

राज्याची भौगोलिक रचना, छोट्या वांशिक समुदायांची अस्मिता लक्षात घेऊन राज्यात भाजप तसेच प्रमुख विरोधी पक्ष असलेला काँग्रेस छोट्या पक्षांना बरोबर घेऊन आघाडी आणि जागावाटप कसे करते, यातूनच निम्मे चित्र स्पष्ट होणार होते. भाजपने जुना मित्र पक्ष असलेल्या आसाम गण परिषदेसह युनायटेड पीपल्स पार्टीला आघाडीत घेतले. स्वायत्त विकास परिषदेच्या निवडणुकीत बिनसल्याने बोडोलँड पीपल्स पक्ष काँग्रेसकडे गेला. पण, गेल्या निवडणुकीत स्वतंत्र लढलेल्या खासदार अजमल यांच्या 'एआययूडीएफ'ने काँग्रेसशी आघाडी केल्यानंतर निवडणुकीची दिशाच बदलली.दोन्ही बाजूने ध्रुवीकरण झाले. छोट्या वांशिक समुदायांची स्थानिक अस्मिता आणि हिंदुत्व यांच्या जोरावर ही मते भाजपच्या बाजूने वळली. एकेकाळी काँग्रेसची हुकमी मतपेढी असलेला चहामळा कामगार २०१४ पासून भाजपबरोबर राहिल्याचे दिसले.

> आसाममध्ये भाजपचा विजय अपेक्षित असला तरी तो प्रामुख्याने ध्रुवीकरण आणि अन्य पक्षांमधील मतविभागणी यांआधारे मिळाला आहे. त्यामुळे 'नागरिकत्व दुरुस्ती'वरून पेटलेल्या या राज्यात, यापुढची आव्हाने भाजपसाठी महत्त्वाची ठरतात...

**राज्यावलोकन**
आसाम

भाजपला जरी पुन्हा सत्ता मिळाली असली तरी विद्यमान मुख्यमंत्री सोनोवाल आणि मुख्यमंत्री पदाच्या आकांक्षेनेच भाजपमध्ये येऊन पाच वर्षे थांबलेले हेमंतबिस्व सरमा हे एकत्रित कसे काम करणार, यावर सरकारच्या कामाची दिशा अवलंबून आहे.

ईशान्येकडील राज्यांत विस्ताराचे भाजपचे धोरण आहे. ध्रुवीकरण आणि मतविभागणीतून मिळालेला विजय हा त्या रणनीतीचा भाग असला तरी, सर्व घटकांचा विश्वास संपादन केल्याविना 'सब का साथ, सब का विकास, सब का विश्वास' या २०१९ नंतरच्या घोषणेला अर्थ राहणार नाही. काँग्रेससाठीही अजमल यांच्याशी आघाडी करणे दीर्घकालीन राजकारण म्हणून बघता येणार नाही. तरुण गोगोई यांच्या कारकीर्दीत सलग तीनदा काँग्रेसने सत्ता प्राप्त केली. हिंदुत्वाच्या राजकारणाला उत्तर देताना काँग्रेसला सर्वसमावेशक धोरण आखून नवे नेतृत्व पुढे आणावे लागेल; अन्यथा राज्यातील प्रादेशिक पक्ष काँग्रेसची जागा घेऊ शकतील.

hrishikesh.deshpande@expressindia.com

# कल्याणकारी राज्याचे प्रवर्तक

शमा दलवाई

**अमेरिकेतील बायडेन** यांच्या सरकारला शंभर दिवस पुरे झाले. त्यानिमित्त त्यांनी अमेरिकन काँग्रेससमोर केलेल्या भाषणात सरकारचे लक्ष्य प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य व रोजगार या तीन गोष्टींवर असेल असे सांगितले. सर्व अमेरिकी बालकांना समान प्राथमिक शिक्षण आणि किमान समान आरोग्य सुविधा ही त्यांच्या सरकारची प्राथमिकता असून त्यासाठी निधी कसा उभारणार हे त्यांनी स्पष्ट केले. श्रीमंतांकडून अधिक करवसुली करून गरिबांना करसवलती देणे हा त्यांच्या कर आकारणीच्या धोरणाचा पाया असेल असे त्यांनी स्पष्ट केले. आर्थिक विकासाबरोबर वाढणारे उत्पन्न गरिबांपर्यंत आपोआप झिरपत जाईल हा आजपर्यंत गृहीत धरलेला सिद्धांत खरा ठरलेला नाही, हे बायडेन यांनी उदाहरणे आणि आकडेवारी देऊन स्पष्ट केले. जगातील महासत्ता ज्या उद्दिष्टांना आज महत्त्व देते, त्या उद्दिष्टांची महत्ता आपल्या देशात नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी गेल्या शतकाच्या सुरुवातीलाच सांगितली होती. आज गोखले यांच्या १९५५ व्या जन्मदिवशी त्यांची आठवण करताना त्यांनी १२० वर्षांपूर्वी मांडलेल्या 'कल्याणकारी' विचारांचे महत्त्व प्रकर्षाने जाणवते.

गोखले यांनी त्यांची 'कल्याणकारी राज्या'ची संकल्पना १९०२ ते १९०४ या कालखंडात ब्रिटिश इंडियाच्या कायदे मंडळात विस्ताराने मांडली. त्यापूर्वी युरोपातील आर्थिक विचारांमध्ये अशा प्रकारची मांडणी आढळत नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत अ‍ॅडम स्मिथ आणि रिकार्डो यांच्या आर्थिक धोरणांचा प्रभाव ब्रिटनमध्ये दिसून येतो. भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये व्यक्तिस्वातंत्र्य व अनिर्बंध स्पर्धा या दोन गोष्टींमुळे आर्थिक विकास होतो आणि 'जास्तीत जास्त माणसांना जास्तीत जास्त सुख' मिळू शकते. या अर्थव्यवस्थेत सरकारने कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप केल्यास या भांडवली अर्थव्यवस्थेचा डोलारा ढासळतो. त्यामुळे मुक्त अर्थव्यवस्था आणि कमीत कमी सरकारी हस्तक्षेप हे अर्थव्यवस्थेचे धोरण, विशेषतः प्रगत युरोपीय देशांनी स्वीकारले होते.

याला पहिला धक्का बसला तो १९३०च्या दशकातील जागतिक मंदीनंतर जॉन मेनार्ड केन्स यांच्या 'जनरल थिअरी' या पुस्तकातील विचारमांडणीमुळे! ''भांडवलशाही व्यवस्था सरकारी हस्तक्षेपाशिवाय स्वतःच्या बळावर तग धरू शकत नाही,'' हे केन्स यांनी सिद्ध केले. त्यानंतर लगेच सुरू झालेल्या दुसऱ्या महायुद्धामध्ये अर्थव्यवस्थेतील सरकारी हस्तक्षेपाचे धोरण युरोपातील राष्ट्रांना स्वीकारावेच लागले. कल्याणकारी राज्याची संकल्पना इंग्लंडमध्ये १९४२ च्या सुमारास ब्रिटिश अर्थतज्ज्ञ आणि राजकारणी विल्यम बिव्हरिज यांनी मांडली. महायुद्धानंतर त्याचे धोरणात रूपांतर झाले. ना. गोखले यांनी मात्र कल्याणकारी राज्याची संकल्पना गेल्या शतकाच्या सुरुवातीलाच मांडली होती, हे अधोरेखित करणे क्रमप्राप्त आहे.

**रिकार्डो विरुद्ध रानडे**

नामदार गोखले हे. न्या. महादेव गोविंद रानडे यांना आपले गुरू मानत असत. रानडे यांनी आपल्या 'आर्थिक राष्ट्रवादा'ची मांडणी करताना रिकार्डो यांच्या मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणाला आव्हान दिले. मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापारामुळेच जगातील सर्व देशांचा विकास होईल व सर्वांचे कल्याण होईल, असा रिकार्डो यांचा सिद्धांत होता. या सिद्धांताच्या आधारे तेव्हाच्या ब्रिटिश सरकारने भारतातील त्यांचे धोरण आखले होते. रानडे यांनी या धोरणाला आव्हान देऊन हे धोरण भारतासाठी योग्य नसल्याचे सांगितले. दोन समान पक्षांमध्येच निरंकुश स्पर्धा होऊ शकते. ब्रिटनमधील प्रबळ उद्योगांसमोर बाल्यावस्थेतील भारतीय उद्योग टिकू शकत नाही. त्यामुळे त्यांना सरकारच्या संरक्षणाची गरज असल्याचे रानडे यांनी आग्रहाने सांगितले. गोखले यांना रानडे यांचा हा विचार मनोमनी पटला होता. त्यामुळे त्यांनी तो संपूर्ण भारतीय समाजाला लागू केला.

ब्रिटिश अमदानीखाली भारतातील दारिद्र्य वाढत चालले होते. दादाभाई नौरोजी यांनी तर भारतातील वाढणाऱ्या दारिद्र्याचे कारण ब्रिटिशांनी केलेल्या लुटीत शोधले होते. गोखले यांनी त्यावर उपाय सुचविण्यावर लक्ष केंद्रित केले. रानडेंप्रमाणे देशातील औद्योगिकीकरण व शहरीकरण हे गोखले यांनाही महत्त्वाचे वाटत होते; परंतु येथील सर्वसामान्य जनता निरक्षर होती, दारिद्र्यात खितपत पडली होती. आलटूनपालटून दुष्काळ व साथीच्या रोगाने भरडली गेली होती. त्यात तंत्रशिक्षणाचा संपूर्ण अभाव होता. अशा परिस्थितीला तोंड देण्याचे बळ लोकांपाशी नव्हते आणि सामूहिकपणे प्रयत्न करूनदेखील ते आपोआप येऊ शकत नव्हते. त्यामुळे ब्रिटनप्रमाणे येथील आर्थिक विकासाबरोबर व्यक्ती व समाज यांचा विकास आपोआप घडेल अशी परिस्थिती नव्हती. जनतेला सरकारकडून मिळणाऱ्या सामाजिक सेवांची गरज होती. गोखलेंनी या जनतेला सरकारचे संरक्षण मिळाले पाहिजे अशी आग्रहपूर्वक मागणी अर्थसंकल्पावरील आपल्या भाषणांतून केली आणि 'गरिबकेंद्री विकास' अशी कल्पना मांडून, रानडे यांची विकास कल्पना विसाव्या शतकात आणून दोन्ही शतकांमधील विकास संकल्पनांची अतिशय चांगल्या रीतीने सांगड घातली.

**'कुणासाठी' रेल्वे-रस्ते?**

गोखले यांचा वैचारिक दृष्टिकोन हा त्या वेळच्या अर्थव्यवस्थेतील वास्तव व तिचा विकास याविषयी एकात्मिक मांडणी करणारा होता. आर्थिक विकास हे लोककल्याणाचे साधन आहे असे त्यांनी स्पष्टपणे मांडले. या तऱ्हेची आर्थिक विकासाची मांडणी आपल्या देशात प्रथमच केली गेली.



> 'कल्याणकारी राज्य' ही संकल्पना दोन महायुद्धांदरम्यान विकसित झाल्याचे मानले जाते. पण त्याहीआधीच- १९०२ ते १९०४ दरम्यान कायदेमंडळातील भाषणांतून- नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी ही संकल्पना मांडली होती! तिचे हे सविस्तर स्मरण १५५ व्या स्मृतिदिनानिमित्त; पण सध्याच्या संदर्भात...

ना. गोखले यांनी १९०२ साली केंद्रीय कायदे मंडळात अर्थसंकल्पावर पहिले भाषण केले. त्यात त्यांनी, भारताचे दरडोई उत्पन्न रुपये १८, २०, २७ वा ३० आहे, किंवा आणखी काही आहे हा महत्त्वाचा मुद्दा नसून विकास प्रक्रियेबरोबर जनतेचे दरडोई उत्पन्न घटत आहे ही गंभीर बाब आहे याकडे लक्ष वेधले. या देशात गरिबी तर आहेच; परंतु ती अधिकाधिक वाढत आहे असे त्यांनी दाखवून दिले.

ना. गोखले यांच्या विचारांचे वैशिष्ट्य म्हणजे विकासाच्या परिप्रेक्ष्यातून ते सामूहिक वित्त व्यवस्थेकडे पाहत होते. वित्त व्यवस्थेचे विश्लेषण करताना अर्थसंकल्प तुटीचे अथवा शिलकीचे हे न बघता, आर्थिक विकास आणि जनकल्याण हे उद्दिष्ट ठेवूनच त्याचे मूल्यमापन केले पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्या वेळच्या अर्थसंकल्पावर टीका करताना ते म्हणतात, 'ब्रिटिश सरकारने जमा केलेल्या करांतून थोडाही पैसा इथल्या लोकांच्या कल्याणासाठी खर्च केला जात नाही. रेल्वे, रस्ते विकास जरी केला तरी त्यांचा उपयोग परदेशी लोकांच्या उत्पन्न व नफा यात वाढ करण्यासाठी होतो, येथील रयतेला त्याचा क्वचितच फायदा होतो. तसेच भांडवल निर्मिती व उत्पादकता वाढूनही कररूपाने मिळणारा पैसा वाढताना दिसत नाही. याचा अर्थ कार्यक्षम करव्यवस्थेमध्ये आढळणारी लवचीकता ब्रिटिश सरकारच्या करव्यवस्थेत दिसत नाही.

**सामाजिक सेवा हव्या!**

१९०३ मध्ये पुन्हा एकदा दुसऱ्या वर्षाच्या अर्थसंकल्पावर केलेल्या भाषणात त्यांनी 'कल्याणकारी राज्य' ही संकल्पना स्पष्टपणे मांडली. सामान्य जनतेच्या कल्याणासाठी प्रयत्न करणे हे सरकारच्या कार्यक्रमाचा व कर्तव्याचा महत्त्वाचा भाग असला पाहिजे, अशी त्यांनी मागणी केली. ''या नव्या, विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच जनाधारित विकासाची सुरुवात होणे अगत्याचे आहे. एकोणिसाव्या शतकात औद्योगिक विकास एका टप्प्यापर्यंत झाला. ते शतक उलटताना समाजाचा सामूहिक व सर्वदूर विकास होणे आवश्यक आहे,'' हे त्यांनी निक्षून सांगितले. यामध्ये औद्योगिक व शैक्षणिक विकासाचा अंतर्भाव त्यांनी केला.

सरकारी खर्चाचा उद्देश व प्राथमिकता काय असाव्यात यावरील चर्चेत हस्तक्षेप करताना नामदार गोखले म्हणतात, ''आर्थिक पायाभूत सेवा व सामाजिक सेवा यात कुठेही सुसंगती आढळत नाही. रेल्वेबांधणी म्हणजेच सर्व काही आहे का? सर्वांना शिक्षण, पाणीपुरवठा, सुधारित मलनिस्सारण व स्वच्छता याला काहीच महत्त्व नाही का?'' त्यांनी रयतेच्या हलाखीकडे लक्ष वेधले. दारिद्र्य, अज्ञान आणि गलिच्छ परिसरातील वास्तव्य हे महत्त्वाचे मुद्दे त्यांनी मांडले.

अर्थसंकल्पातील शिल्लक वाढत असताना त्या पैशाचा उपयोग करून रयतेची परिस्थिती सुधारण्यासाठी कुठलाही कृतीकार्यक्रम सरकार घेत नाही, अशी टीका त्यांनी केली.

सार्वत्रिक शिक्षण, स्वच्छता (आरोग्य) व नशाबंदी या तीन प्रकारच्या प्राथमिक सेवांचा पुरस्कार ना. गोखले यांनी सातत्याने केला. शिक्षण हे आर्थिक आणि सामाजिक कल्याणाचे पायाभूत साधन आहे असे ते मानत. आपल्या समाजातील दहापैकी नऊ मुले अज्ञान आणि अंधकारात मोठी होतात. पाचपैकी चार गावकरी शाळेशिवाय जगतात, अशी इथली भयानक वस्तुस्थिती आहे. तरीदेखील गेली कित्येक वर्षे आपल्या शिक्षणावरील खर्चामधून सर्वांना शिक्षण देण्याची एखादी योजना कार्यान्वित करून पुढील २५-३० वर्षांत इथे वाखाणण्यासारखी प्रगती करता येऊ शकेल. (अर्थात आजपर्यंत आपण ही समस्या सोडवू शकलो नाही, हे विदारक सत्य आहे.) मुलग्यांना प्राथमिक शिक्षण अनिवार्य करावे आणि मुलामुलींना मोफत शिक्षण देण्यात यावे यासाठी गोखले यांनी आवाज उठवला. यासाठी म्युनिसिपालिटी आणि स्थानिक मंडळांना सरकारकडून अनुदान देण्यात यावे, असे त्यांनी सुचवले.

रेल्वेच्या विकासापेक्षा स्वच्छ पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण यांची गरज किती तरी पटीने अधिक महत्त्वाची आहे असे गोखल्यांनी सांगितले. रेल्वेवरील खर्च त्या वेळी ४०० कोटी रुपये होता, तर स्वच्छतेवर विशेष खर्च केला जात नसे. एवढे बोलून न थांबता त्यांनी केंद्रातील सरकारला अशी सूचना केली की, अर्थसंकल्पातील शिल्लक रक्कम अनुदान स्वरूपात प्रांतिक सरकारांना द्यावी आणि नगरपालिकांनी ती रक्कम स्वच्छतेवरील खर्चासाठीच वापरावी यासाठी त्यांना भाग पाडण्यात यावे.

१८८२ ते १९०४ या काळात लोकसंख्येतील वाढ १५ टक्के असली, तरी उत्पादनांवरील करातून मिळणारा महसूल १०० टक्क्यांनी वाढला. यातील काही हिस्सा करवाढीचा असला तरीही यातील मोठा हिस्सा दारूचा उपभोग वाढल्यामुळेच आहे, असे गोखले यांचे स्पष्ट मत होते. समाजातील दलित व गरीब वर्ग आणि आदिवासी जमाती यांच्या सर्वनाशाला आणि दुःखाला कारण असलेल्या दारू दुकानांवर व्यवस्थित नियंत्रण ठेवण्यावर त्यांचा भर होता. नशाबंदीसंबंधी गोखलेंच्या मुद्द्याचे महत्त्व लक्षात घेऊन गांधीजींनी त्याला आपल्या स्वातंत्र्यलढ्याच्या धोरणाचा एक महत्त्वपूर्ण भाग बनवले. दलित समाजामध्ये दारूचा प्रश्न तेव्हापासून आजतागायत जटिल आहे. गरीब आणि दलित माणसाला केंद्रस्थानी ठेवून आपल्या विचारांची मांडणी करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे त्याकडे फारसे लक्ष गेल्याचे दिसत नाही, याचे आश्चर्य वाटते.

''समाजकल्याणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तर्कशुद्ध तत्त्वांवर आधारलेली वित्त व्यवस्था व सरकारी अनुदान आवश्यक आहे,'' असे गोखले यांचे ठाम मत होते. ''करांच्या मार्गे श्रीमंतांकडून वसूल केलेला महसूल हा कल्याणकारी सेवांच्या रूपाने गरीब समाजाकडे वळवला पाहिजे. केंद्राकडे वसूल होणाऱ्या महसुलाचे वितरण प्रांतिक पातळीवरील कल्याणकारी गोष्टींसाठी पुरेशा प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे स्थानिक पातळीवरील खर्चाला कात्री बसते व कल्याणकारी योजना होतच नाहीत. महसुलाचा ८० टक्के हिस्सा अर्थसंकल्पान्वये केंद्र आपल्याकडे वळते करते व उरलेल्या २० टक्के महसुलातील अर्ध्यापेक्षा जास्त प्रांतिक सरकारे स्वतःच खर्च करतात. म्हणजे उरलेल्या हिश्शातील भाग स्थानिक संस्थेकडे जातो. हा निधी इतका अपुरा असतो की काही संकटांमध्ये म्हणजे दुष्काळ निवारण किंवा प्लेगसारख्या साथींमधला खर्च यासाठी वापरल्यावर स्थानिक कल्याणकारी योजनांवर खर्च करणे त्यांच्या मर्यादेबाहेर जाते,'' - असे त्यांचे म्हणणे.

स्थानिक संस्थांना कल्याणकारी योजनांवर खर्च करता यावा यासाठी गोखले यांनी बरेच पर्यायी मार्ग सुचवले. उदा. 'दरवर्षी दुष्काळ निवारणासाठी मिळणारे अनुदान त्या वर्षी खर्च न झाल्यास त्यातून राहिलेली रक्कम तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाला प्रोत्साहन मिळेल अशा रीतीने खर्च करण्यात यावी'; 'स्वच्छ पाणीपुरवठा व मलनिस्सारण यासाठी स्थानिक संस्थांनी बांधकामांवर खर्च करावा म्हणून अर्थसंकल्पातील शिलकीची रक्कम त्यांना विशेष बाब म्हणून देण्यात यावी.'

दुष्काळामध्ये मुख्य प्रश्न रोजगाराचा निर्माण होई. अशा वेळी रेल्वे व पाटबंधारे यांसारखी कामे काढून लोकांना काम दिले जाई. त्याचा फायदा होत नव्हता असे नाही. परंतु इतर काही योजनांचा विचारही दुष्काळापासून संरक्षण म्हणून झाला पाहिजे. उदा. शेतीचे शिक्षण व दुसरे म्हणजे बिगरशेती उद्योगांचा विकास. तसेच औद्योगिक शिक्षण घेण्यास मदत करणे आणि छोटे औद्योगिक व्यवसाय करण्यास प्रोत्साहन देणे. या गोष्टींमधून दुष्काळाला विरोध करण्याची शक्ती लोकांमध्ये तयार होईल आणि दुष्काळाच्या परिणामांपासून संरक्षण मिळेल, असे विचार ना. गोखले यांनी कायदेमंडळातील भाषणात मांडले.

भारतीय 'राजकीय अर्थव्यवस्थेला' गोखले यांनी एक महत्त्वपूर्ण योगदान दिले. लोकांच्या लोकशाही स्वातंत्र्यासाठी ग्रामीण स्वराज्य संस्थांवर त्यांनी भर दिला. त्याचबरोबर त्यांच्यातर्फे स्थानिक संसाधनांचा विकास होईल आणि ग्रामीण कल्याणाचे त्या साधन बनतील असेही त्यांना वाटत होते. 'पंचायत' हे गावातले पायाभूत राजकीय आणि आर्थिक केंद्र! हेच मुळी स्थानिक स्वराज्याचे केंद्र बनू शकते, असे त्यांचे प्रतिपादन होते. थोडक्यात, स्थानिक स्वराज्य संस्थांची संरचना नीटपणे तयार केल्यास त्या वित्त व्यवस्था लोककल्याणासाठी राबविण्याचे साधन बनतील, असा त्यांचा विश्वास होता.

(लेखिका अर्थशास्त्र विषयाच्या अभ्यासक आहेत.)

shamadvs@gmail.com

# पूजेपल्याडचा परमेश्वर...

हरिहर कुंभोजकर

**या वर्षी** १७ मे रोजी शंकराचार्य जयंती आहे. भारतीय पंचांगाप्रमाणे हा दिवस वैशाख शुद्ध पंचमी असतो. भारतातील एका श्रेष्ठ तत्त्वज्ञान्याचा तो जन्म दिवस. पण आदि-शंकराचार्य या नावाचा उल्लेख सुशिक्षित भारतीयांच्या वर्तुळात क्वचितच होताना आढळतो. पुरोगामी लोकांना शंकराचार्य हे उच्चवर्णीय हिंदूंच्या बुरसटलेल्या विचारसरणीचे प्रतीक वाटते, तर धार्मिक हिंदूंना आचार्य परलोकी मिळवायच्या मुक्तीचे मार्गदर्शक वाटतात. पण या लोकीच मुक्ती मिळवायचे मार्ग त्यांनी सांगितले आहेत, याकडे कुणाचेच लक्ष गेलेले नसते. त्यामुळे, त्यांच्या 'परापूजास्तोत्रा'कडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे.

परापूजास्तोत्रात कोणत्याही देवतेची स्तुती नाही. ते स्तोत्र अद्वैत तत्त्वज्ञानाचे काव्यमय प्रकटीकरण आहे. परापूजास्तोत्रात दहा श्लोक आहेत. पहिल्या श्लोकात आचार्य सच्चिदानंदस्वरूपाशी आपण तादात्म्य पावल्यावर पूजेचा विधी कोणता, असा प्रश्न उपस्थित करतात. पूजाविधीसाठी पूजा घेणारा आणि पूजा करणारा दोघे अस्तित्वात असावे लागतात. येथे तर दोघे एकत्व पावले आहेत. मग पूजा कोणी कोणाची करायची? नंतरच्या आठ श्लोकांत सगुण-साकार देवासाठी सांगितलेला रूढ पूजाविधी निर्गुण, निराकार अनंतासाठी कसा अशक्य आणि निरर्थक ठरतो हे ते स्पष्ट करतात. शेवटच्या श्लोकात काव्यमय कलाटणी देऊन, आपण स्वतः ही 'पूजा' कशी करतो हे ते सांगतात; तीच ही 'परापूजा'!

'परा' या शब्दाचा एक अर्थ 'पलीकडची' असा आहे; तर दुसरा अर्थ 'उत्कृष्ट किंवा अधिक वरच्या दर्जाची' असाही आहे. दोन्हीही अर्थ येथे योग्य आहेत. कारण आठ श्लोकांत वर्णन केलेले अनुभव आणि तर्क आपल्याला पूजेपलीकडच्या अवस्थेत घेऊन जातात. दहाव्या श्लोकात श्रेष्ठ पूजेचा मार्ग सांगितला जातो. त्यांनी सांगितलेली परापूजा आश्चर्य वाटेल इतकी धर्मातीत आहे.

मात्र आचार्यांच्या काव्याचे सौंदर्य अनुभवण्यासाठी सर्वसामान्य हिंदू माणूस ईश्वराची पूजा कशी करतो हे जाणून घेणे आवश्यक आहे. आणि या पूजाविधीचा अर्थ समजण्यासाठी परमेश्वराकडे पाहण्याचा हिंदू दृष्टिकोन कळणे गरजेचे आहे. हिंदू भक्त परमेश्वराला 'त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव' म्हणतो. भारतीय परंपरेने केवळ अतिथीलाच देव मानले नाही, तर देवालाही आपला आप्त अथवा पाहुणा मानले आहे. ज्ञानेश्वरांसाठी, पैलतीरी कोकत असणारा काऊ 'पाहुणे पंढरीराऊ' घरास येणार आहेत असा निरोप घेऊन येतो. श्रावण-भाद्रपदात खेडेगावात 'गौराई आमची बाळाई, सकरुबा आमचा जावई' हे लोकगीत आजही म्हटले जाते. श्रावणात येणारी गौर माहेरवाशीण असते, शंकर जावई असतो आणि या दाम्पत्याच्या मुलाला निरोप देताना सर्वसामान्य मराठी माणूस 'पुढच्या वर्षी लवकर या' असे कौतुकाने म्हणतो. हिंदू व्यक्तीच्या घरात मंगलकार्य असेल तर त्याची निमंत्रणपत्रिका प्रथम देवापुढे ठेवून देवाला कार्याला येण्याचे निमंत्रण दिले जाते. देवाला 'आवडता पाहुणा' मानल्यामुळे हिंदूंच्या पूजा-पद्धतीत आणि पाहुण्याचे स्वागत करण्याच्या चाली-रीतीत विलक्षण साम्य आढळते. षोडशोपचार पूजेत सोळा उपचार सांगितले आहेत. त्यातील प्रत्येक उपचार पाहुणचाराशी संबंधित आहे. उदाहरणादाखल हे उपचार पाहा : (१) आवाहन किंवा प्राणप्रतिष्ठा, म्हणजे पाहुण्यांचे स्वागत करणे (२) बसायला आसन देणे (३) अभिषेक म्हणजे स्नान घालणे, (४) नैवेद्य दाखवणे म्हणजे पाहुण्याला भोजन देणे, (५) विसर्जन करणे म्हणजे पाहुण्याला समारंभपूर्वक निरोप देणे.




पण शंकराचार्यांना यातले काहीच करता येत नाही. परापूजा स्तोत्रात शंकराचार्य पहिल्याच श्लोकात विचारतात :

*अखंडे सच्चिदानंदे निर्विकल्परूपिणे ।*
*स्थिते अद्वितीय भावेस्मिन कथं पूजा विधीयते ।।*

अनुवाद :

*अखंड सच्चिदानंदी पावता एकरूपता ।*
*लोपता भाव द्वैताचा पूजेचा विधि कोणता ।।१।।*

परब्रह्माशी एकरूप झाल्यावर पूजा करणाऱ्याला जर वेगळे अस्तित्वच उरले नाही, तर पूजेचा विधी कोणता असू शकतो? नंतरच्या आठ श्लोकांत पूजाविधीतला प्रत्येक उपचार कसा निरर्थक किंवा अशक्य आहे हे ते स्पष्ट करतात. मातीच्या मूर्तीत देव नसतो. मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केल्यावर त्यात देवत्व येते. त्यासाठी भक्त परमेश्वराला अमुक मूर्तीत ये असे आवाहन करतो. मग तो देव होतो. पण ब्रह्म सर्वव्यापी असल्याने ते सर्व ठिकाणी सर्वकाळी असतेच. म्हणजे ब्रह्माला 'अमुक जागी ये' हे आवाहन किंवा त्याची प्राणप्रतिष्ठा अशक्य आहे. तीच गोष्ट पूजेतील प्रत्येक उपचाराची होते.

जो विश्वाकार आहे त्याला वस्त्र कसे नेसवणार? जो तृप्त आहे त्याला नैवेद्य कशाचा दाखवणार? जो वेदांनाही कळला नाही त्याचे स्तवन कसे करणार? जो चराचरांत भरलेला आहे त्याचे विसर्जन कोठे करणार? अशा प्रकारे षोडशोपचार पूजेतील विधी एक तर अशक्य ठरतात, नाही तर निरर्थक तरी. त्यामुळे, परमेश्वर पूजेच्या पलीकडे आहे. अशा ईश्वराची पूजा कशी करायची? पण पूजेच्या पलीकडेही एक पूजा आहे. ती श्रेष्ठ पूजा आहे. ती ते दहाव्या श्लोकात सांगतात. ती आहे, प्रत्येक काम परमेश्वराची पूजा समजून करणे :

*सञ्चरः पदयोः प्रदक्षिणविधिः स्तोत्राणि सर्वा गिरो*
*यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ।।१०।।*

अनुवाद

*चालती पाउले तुझी प्रदक्षिणा।*
*सर्वदा स्तोत्रांना। वदे वाणी।।*
*जे मी करी ते ते तुझी आराधना*
*अन्य ना साधना। शंभू देवा।।१०।।*

आचार्यांनी येथे शंभूचा उल्लेख केला आहे, कारण परंपरेने ते शैव होते. पण बद्रिनाथाची मूर्ती शोधून तिची स्थापना त्यांनीच केली. बद्रिनाथला विष्णूची उपासना केली जाते. त्यांनी अनेक देवी-देवतांची स्तवने रचली. पंचायतनाची पूजा त्यांनीच सुरू केली. पंचायतनपूजेला आध्यात्मिक 'नज थिअरी' म्हटले पाहिजे. पंचायतनात केंद्रस्थानी 'इष्ट देवता' असते आणि तिच्या चारी बाजूला शिव, विष्णू, गणेश आणि सरस्वती असतात. हिंदूच्या बहुतेक तीर्थक्षेत्रांत स्थानदेवतेच्याच प्रांगणात अनेक अन्य देवांची छोटी देवळे असतात. 'तुमचा देव पूजा; पण अन्य देवांचीही बूज राखा' ही त्यामागची भावना असते. 'माझाच देव खरा' या एकेश्वरी धार्मिक उन्मादावर पंचायतन हा उतारा आहे. आचार्यांनी दोनदा भारतभर भ्रमण करून हे कार्य केले.

आज जर आचार्य असते, तर कदाचित, जगभर फिरून जगातील सर्व धर्मांना एकत्र आणणाऱ्या 'धर्मपंचायतना'ची स्थापना करण्याचा प्रयत्न त्यांनी केला असताः 'तुम्ही परंपरेने करत असलेली उपासना केंद्रस्थानी ठेवा; पण, त्याचबरोबर अन्य उपासना पद्धतीचा आदर राखा', अशी शिकवण दिली असती. अनेक उपास्य-देवतांना आणि उपासना-पद्धतींना एकत्र आणणे ही 'विश्वात्मक' देवाकडे जाण्याची एक पायरी असते. अंतिम पायरी परापूजा, पूजेच्या पलीकडे जाणे, आपले प्रत्येक काम ईश्वर-पूजाच आहे या भावनेने करणे

अशी परापूजा धर्माच्या व्यासपीठावरून अधिकारवाणीने सांगणाऱ्या संन्याशाची उणीव, आजच्या जागतिक परिस्थितीत, प्रकर्षाने जाणवते.

hvk_maths@yahoo.co.in

# ‘हक्का’चा दिलासा

सरकारी यंत्रणांचे असहकार्य किंवा त्यांच्यातच समन्वय नसणे, खासगी रुग्णालयांमधील अवाच्या सवा दर आणि नातेवाईकांना अंधारात ठेवून परस्पर कोणतेही उपचार करण्याचे प्रकार... या साऱ्याला आळा घालू पाहणाऱ्या शिफारशी ‘राष्ट्रीय मानव अधिकार आयोग’सारखी वैधानिक संस्था करते आहे! हे निर्देश प्रत्येकाने समजून घेतले तर त्यांची अंमलबजावणीही शक्य होईल...




डॉ. अभय शुक्ला

**देशभरातील कोविड** रुग्णांची विदारक परिस्थिती लक्षात घेता, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने (एनएचआरसी) नुकत्याच ४ मे रोजी काही अभिनंदनीय शिफारशी प्रस्तुत केल्या आहेत. विविध सरकारे त्यांच्या यंत्रणांचे व्यवस्थापन करण्यात व्यग्र असताना, ‘एनएचआरसी’ ही एकमात्र अधिकृत संस्था आहे जी कोविड परिस्थितीकडे, रुग्णांच्या हक्कांच्या दृष्टिकोनातून पाहते आहे. ‘एनएचआरसी’ने या नवीन शिफारशी केंद्र सरकार आणि सर्व राज्य सरकारांना पाठवताना, ‘‘यावर अंमलबजावणी करून, झालेल्या कृतीबद्दल ४ आठवड्यांत अहवाल द्यावा,’’ अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने निश्चितपणे आपली हक्काधारित भूमिका चांगल्या पद्धतीने निभावली आहे, या शिफारशी स्वागतार्ह आणि आवश्यकच आहेत. विविध सरकारांनी तातडीने सुनिश्चित करायच्या गोष्टींमध्ये खालील महत्त्वपूर्ण तरतुदी आहेत :

■ **सरकारी रुग्णालयाकडे बेड नसेल, तरी कोविड रुग्णाला बेड उपलब्ध करून देण्याची जबाबदारी व्यवस्थेची :** सध्या रुग्णासाठी बेड शोधायला, एका रुग्णालयातून दुसऱ्या रुग्णालयात धावाधाव करावी लागते. त्यांना होणारा हा त्रास टाळण्यासाठी ‘एनएचआरसी’ने शिफारस केली आहे की, जेव्हा कोविड-१९ ग्रस्त रुग्ण एखाद्या सार्वजनिक रुग्णालयात दाखल होण्यासाठी जाईल, तेव्हा आवश्यक बेड तिथे उपलब्ध नसल्यास दुसऱ्या सार्वजनिक अथवा खासगी रुग्णालयात- जिथे योग्य बेड व उपचार उपलब्ध आहे तिथपर्यंत - रुग्णाला पोहोचविण्याची जबाबदारी आरोग्य खात्याची असावी. जर रुग्णाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्याची गरज असेल, तर आवश्यक सुविधा असलेल्या रुग्णालयात दाखल होण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत सरकारी रुग्णालय आणि आरोग्य विभागाने केली पाहिजे.

रुग्ण आणि त्यांच्या काळजीवाहूंना मदत करण्यासाठी सर्व सार्वजनिक आणि खासगी रुग्णालयांत कार्यात्मक आणि प्रभावी मदत पथक (हेल्प डेस्क) स्थापन करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत, रुग्ण आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांना स्वतःहून बेड शोधण्यासाठी धावपळ करावी लागू नये, असे स्पष्ट निर्देश ‘एनएचआरसी’ने दिले आहेत.

■ **कोविड चाचणी अहवाल काहीही असला, कोविड लक्षणात्मक रुग्णाला उपचार नाकारू नये :** काही रुग्णांना गंभीर स्वरूपाची कोविड लक्षणे असतात, किंवा छातीचा एक्स-रे/सीटी स्कॅन आणि डॉक्टरांचे निदान कोविड दर्शविते; पण त्यांचा आरटी-पीसीआर चाचणी अहवाल प्रलंबित किंवा नकारात्मक असतो. तरी अशा रुग्णांना कोविड-१९ रुग्ण म्हणूनच उपचार करावेत. जर रुग्णाला कोविडची लक्षणे असली आणि तपासणाऱ्या डॉक्टरांना त्या रुग्णाला दाखल करून घेणे आवश्यक आहे असे वाटले, तर ओळखपत्र किंवा प्रमाणपत्र न मागता त्या रुग्णाला दाखल करावे.

■ **सर्व खासगी रुग्णालयांमध्ये उपचाराचे दर नियंत्रित, परवडणारे आणि पारदर्शक पाहिजेत :** कोविडच्या रुग्णांना परवडेल अशा, सरकारने ठरवून दिलेल्या दरानेच उपचार करण्याचे निर्देश संबंधित सरकारांनी खासगी रुग्णालयांना द्यावेत. रुग्णालयात उपलब्ध बेडपैकी कमीत कमी दोनतृतीयांश (६५ टक्के) बेडवर या वाजवी दरांचे बंधन असावे. कोविड रुग्णांना खासगी रुग्णालयात निर्देशित दरानेच उपचार मिळत आहेत अथवा नाही, हे सुनिश्चित करण्यासाठी सरकारने बिलांचे ऑडिट करण्यासाठी अधिकारी नेमले पाहिजेत. सर्व खासगी रुग्णालयांनी तपशीलवार बिले देणे बंधनकारक आहे. जास्त रकमेची बिले, उदाहरणार्थ १.५ लाखपेक्षा जास्त असलेल्या बिलांबद्दल अधिकाऱ्यांनी खोलात जाऊन ऑडिट करावे.

■ **आवश्यक औषधे आणि इतर गोष्टींच्या दरांवर कमाल मर्यादा, काळाबाजार थांबविणे :** कोविड उपचारासाठी आवश्यक औषधे, ऑक्सिजन सिलिंडर, रुग्णवाहिका सेवा इत्यादींच्या दरावरही रुग्णांचे शोषण टाळण्यासाठी कमाल निर्बंध असावेत. वैद्यकीय संसाधनांची साठेबाजी किंवा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई व कठोर शासन व्हायलाच पाहिजे. या संदर्भात तक्रार व्यवस्थापन यंत्रणा स्थापन केली पाहिजे आणि अशी तक्रार केली म्हणून कोणालाही त्रास दिला जाऊ नये.

■ **अनावश्यक व महागडे औषधोपचार थांबविण्यासाठी, ‘उपचार मार्गदर्शक तत्त्वां’ची अंमलबजावणी सुनिश्चित करणे :** कोविड उपचारासंबंधित काही औषधे, ज्यांचा मर्यादित उपयोग आहे आणि फक्त काही रुग्णांसाठीच ती उपयुक्त आहेत, (जसे की रेमडेसिविर, टोसिलिझुमाब), त्यांचा अति प्रमाणात वापर होत आहे. यामुळे या औषधांच्या मागणीपेक्षा पुरवठा कमी पडत आहे आणि भीतीदायक परिस्थितीदेखील आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन, ‘एम्स-आयसीएमआर टास्क फोर्स’ने प्रसृत केलेल्या ‘मानक उपचार मार्गदर्शक तत्त्वां’चे (ट्रीटमेंट प्रोटोकॉल) काटेकोरपणे पालन केले पाहिजे. यामुळे फक्त निवडक गरजू रुग्णांना ही औषधे दिली जातील आणि कृत्रिम तुटवडा व काळाबाजार कमी होईल.

■ **कोविड लशीची देशभर समान किंमत, सर्वांना मोफत लसीकरण :** देशातील कोविड लस विकत घेणाऱ्यांसाठी (केंद्र सरकार, राज्य सरकार, इ.) भेदभाव नसलेली समान किंमत असली पाहिजे. खासगी किंवा सार्वजनिक आरोग्यसंस्था सगळीकडेच प्रत्येकासाठी लसीकरण शक्यतो मोफत केले जावे. यापुढे लसीकरण गती वाढविण्यासाठी लसीकरण केंद्रांची संख्या वाढवावी. बेघर, कैदी, स्थलांतरित कामगार यांसारख्या असुरक्षित लोकांपर्यंत लसीकरण विशेषतः पोहोचले पाहिजे. आधार कार्ड किंवा इतर कागदपत्रे नसलेल्या लोकांच्या लसीकरणाची व्यवस्था केली पाहिजे.

■ **सर्व रुग्णालयांमध्ये ‘कोविड सनद’ आणि रुग्ण-हक्कांची यादी प्रदर्शित करणे :** कोविड रुग्णांवर उपचार करणाऱ्या सार्वजनिक किंवा खासगी प्रत्येक रुग्णालयाच्या स्वागतकक्षात, कोविड सनद अगदी ठळकपणे प्रदर्शित करणे आवश्यक आहे. या सनदीमध्ये कोविड चाचणीची उपलब्धता आणि दर, प्रत्येक प्रकारच्या कोविड बेडची संख्या, निःशुल्क किंवा नियंत्रित दरावरील उपचारांची उपलब्धता तसेच तक्रार निवारण अधिकाऱ्याचा मोबाइल नंबर इत्यादी सर्व माहिती असेल. या सनदेमध्ये रुग्णांच्या हक्क आणि जबाबदाऱ्यांचाही समावेश असावा, ज्या केंद्र सरकारने आधीच जारी केल्या आहेत. सर्व रुग्णालयांनी हे सर्व ठळकपणे प्रदर्शित करावे, जेणेकरून रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना रुग्णालयात त्यांच्या हक्कांबद्दल माहिती मिळेल.

■ **रुग्णांना द्यावयाची आवश्यक माहिती :** सुलभ भाषेत कोविड-१९ आणि त्याच्या उपचाराशी संबंधित माहितीचे माहितीपत्रक, सर्व कोविड रुग्ण आणि त्यांची काळजी घेणाऱ्यांना, कोविड पॉझिटिव्ह चाचणीचा अहवाल देताना उपलब्ध करून दिले पाहिजे. ज्या कोविड रुग्णांना घरातच विलगीकरणाचा सल्ला देण्यात आलाय त्यांना स्थानिक भाषेत कोविड-१९ साठी एक मानक रुग्णोपचार- मार्गदर्शक तत्त्वांची यादी (स्टँडर्ड पेशंट गायडन्स प्रोटोकॉल) प्रदान केली जाणे आवश्यक आहे. घरात विलगीकरणात असताना रुग्ण आणि त्याची काळजी घेणाऱ्यांनी काय विशेष काळजी घ्यावी याची सविस्तर माहिती त्यात असावी.

■ **स्वयंसेवकांची मदत संघटित करणे आणि समन्वय समित्यांच्या माध्यमाने सामाजिक सहभागाला प्रोत्साहन देणे :** कोविड केअर सेंटर (सीसीसी) मधील कर्मचाऱ्यांना मदत, आणि घरातच विलगीकरणात असलेल्या रुग्णांना आवश्यक ते सहकार्य मिळावे, यासाठी राज्य सरकारांनी जिल्हा/ उपजिल्हा पातळीवर स्वयंसेवकांना संघटित केले पाहिजे. ‘रुग्ण कल्याण समिती’सारख्या विद्यमान सहभागी समित्यांचा विस्तार करून, त्यात सामाजिक संघटनांना सक्रियपणे सामील करून घ्यावे, ज्यामुळे सरकार आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्यात प्रभावी समन्वय होऊ शकेल.

■ **तक्रार निवारण यंत्रणा :** जिथे आरोग्य हक्कांचे उल्लंघन झाले आहे, अशी प्रकरणे हाताळण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी विविध पातळ्यांवर, प्रभावी आणि सहज उपलब्ध असेल अशी आरोग्य तक्रार निवारण यंत्रणा स्थापित केली पाहिजे. या प्रणालीमध्ये आरोग्य संस्था स्तरावर तक्रार निवारण करणारी व्यक्ती, जिल्हा किंवा शहर पातळीवर तक्रार निवारण अधिकारी, आणि नागरी संघटनांचा समावेश असलेल्या समाज संस्थांसह सर्व घटकांचा समावेश असलेल्या तक्रार निवारण समित्यांची यंत्रणा असावी. ही प्रणाली राज्यस्तरीय २४७७ टोल-फ्री हेल्पलाइनशी जोडलेली असावी.

वरील दहा परिच्छेद हे ‘एनएचआरसी’ने जे ३६ निर्देश नुकतेच सरकारांना दिले, त्यांचा गोषवारा आहेत. हे निर्देश, रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांना मोठा आधार देऊ शकतात. आता राज्य सरकार तसेच नागरिकांनी या निर्देशांचा व्यापक प्रचार करणे आवश्यक आहे, जेणेकरून कोविड परिस्थितीत लोक या मूलभूत अधिकारांची मागणी करू शकतील.

याचे पहिले पाऊल म्हणून, पुढच्या वेळी आपल्यापैकी कोणी सार्वजनिक किंवा खासगी रुग्णालयाला भेट दिली तर ‘कोविड सनद’ (कोविड चार्टर) ठळकपणे प्रदर्शित झाली आहे की नाही, हेल्प डेस्क चालू आहे की नाही, हे आपण तपासले पाहिजे. नसेल तर आपण लगेचच त्याबद्दल व्यवस्थापनाला विचारायला हवे. अशा सोप्या कृतीमुळेही हजारो रुग्णांना आवश्यक माहिती आणि चांगले उपचार मिळू शकतील. त्याचप्रमाणे वर नमूद केलेल्या कोणत्याही उपाययोजनांची अंमलबजावणी होत नसल्यास, आपण शहर किंवा जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडे जाऊन त्यांना रुग्णांच्या हक्कांचे उल्लंघन थांबविण्यासाठी त्वरित कार्यवाही करण्याची मागणी करावी. जाणकार नागरिक म्हणून आपण स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधींशी संवाद साधला पाहिजे, आणि रुग्ण व नागरिकांच्या संरक्षणासाठी या सर्व उपाययोजना लवकरात लवकर राबविण्याची मागणी केली पाहिजे.

कोविड रुग्णांच्या हक्कांसाठी, राष्ट्रीय स्तरावरील एक अधिकृत संस्था उभी राहिली आहे. आता सर्वांनी आपले आरोग्य-हक्क समजून, ते मिळविण्यासाठी ठामपणे उभे राहण्याची वेळ आली आहे!

(लेखक सार्वजनिक आरोग्यतज्ज्ञ असून राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या आरोग्य समितीचे सदस्य आहेत.
abhayshukla1@gmail.com
मूळ इंग्रजी लिखाणाचा अनुवाद- गिरीश भावे)

---

# लसबाजार की लस-अधिकार?



करोना महासाथ हे जागतिक संकट, त्यामुळे लसीकरणाचा विचारही जागतिक पातळीवर होतोच आहे; पण त्या संस्था भारताच्या प्रचंड लोकसंख्येसाठी पुऱ्या पडणार नाहीत, हे लक्षात घेऊन भारत सरकारने योग्य धोरण आखायला हवे होते. लसकिमतींमधील ‘मूल्यभेद’ हा बाजाराकडे झुकणारा आहे; तर सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीतून भारतीयांचा लस-अधिकार अबाधित राहण्याची शक्यता निर्माण होते आहे. याविषयीच्या अनेक संदर्भांची छाननी करणारे दीर्घ टिपण...

शिशिर सिंदेकर

**कोविडच्या उपचारासाठी** लस वापरली गेली नाही तर जगाच्या एकंदर वार्षिक उत्पन्नाचे (सर्व देशांच्या ‘जीडीपी’चे मिळून) नुकसान ३.४ ट्रिलियन डॉलर म्हणजे सुमारे २५३ लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल, तसेच जर लसीचे वाटप (पर्यायाने लसीकरणही) श्रीमंत आणि गरीब देशांमध्ये असमान झाले तर हे नुकसान १.२ ट्रिलियन डॉलर इतके होईल असा अंदाज आहे. म्हणून, श्रीमंत देशांप्रमाणेच गरीब देशांनाही लस अल्प/कमी दरात मिळावी यासाठी जागतिक स्तरावर वेगवेगळ्या संस्था एकत्र आल्या आहेत. यामध्ये ग्लोबल अलायन्स फॉर व्हॅक्सिन अ‍ॅण्ड इम्युनायझेशन (गावी), कोअ‍ॅलिशन ऑफ एपिडेमिक प्रिपेर्डनेस इनोव्हेशन्स (सेपी), वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (डब्लूएचओ), युनायटेड नेशन्स चिल्ड्रन्स फंड (युनिसेफ), अ‍ॅक्ट



(अ‍ॅक्सेस टु कोविड टूल्स) अ‍ॅक्सिलरेटर, मेलिंडा गेट फाऊंडेशन, जागतिक बँक तसेच काही खासगी लोकसेवा संस्था आहेत. जेव्हा एखादे नवीन औषध, लस शोधली जाते, त्यासाठी संशोधन, श्रम, बुद्धिमत्ता यांचा कस लागतो, त्यासाठी प्रचंड खर्च गुंतवणूक म्हणून केला जातो, यात जोखीम मोठी असते. याच कारणासाठी नवीन संशोधित औषधाला/लसीला ‘पेटंट’चे संरक्षण दिले जाते. या कारणामुळे लस/औषधाची किंमत प्रचंड असते जी गरीब माणसांना, देशाला परवडू शकत नाही. अशा परिस्थितीत गावी, सेपी यांसारख्या संस्था एकत्र येऊन उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतात. सध्या या संस्था १९० देशांसोबत करार करून त्यांना कमी दरात लस उपलब्ध करून देत आहेत. जेव्हा एवढे देश एकत्र येतात तेव्हा एकूण लस खरेदी वाढते आणि लस उत्पादकांबरोबर सामूहिक सौदा शक्तीच्या जोरावर कमी किमतीत लस खरेदी करता येते. या संस्था लस उत्पादकांना उत्पादनापूर्वी विशिष्ट किमतीत लस खरेदीची हमी (अ‍ॅडव्हान्स मार्केट कमिटमेंट) देत असतात. गावी, सेपी या संस्थांचे कोविडसाठीचे कार्य मागच्या वर्षीच सुरू झाले आहे.

जीवनावश्यक औषधाचे/लसीचे मूल्य किती असावे हा अर्थशास्त्रातील अभ्यासाचा पण जनतेसाठी वादाचा विषय असतो. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी अशी जाहीर भूमिका घेतली होती की, औषधे हा नफेखोरीचा विषय असू नये. म्हणूनच त्यांच्या काळात ‘प्रोसेस पेटंट’चे महत्त्व होते. औषध बनविण्याच्या प्रक्रियेसाठी पेटंट दिले जात होते आणि परदेशातील औषध भारतात तयार करण्याच्या प्रक्रियेत बदल करून बनवता येत असे. त्यामुळे भारतीयांना नवीन औषधे स्वस्त मिळू शकत होती. (जागतिकीकरण स्वीकारल्यानंतर डंकेल प्रस्तावामुळे हा विषय संपला.) आज भारतात वापरल्या जाणाऱ्या कोविशिल्ड या लशीचे पेटंट अमेरिकेत ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञांच्या नावावर नोंदलेले आहे. पेटंट कायद्यानुसार २० वर्षे म्हणजे २०३२ पर्यंत ही लस अन्य कोणीही बनवू शकत नाही. याविरुद्ध, ‘करोना हे जागतिक अरिष्ट आहे’ या आधारावर फक्त भारत आणि साऊथ आफ्रिका या दोन देशांनी मागील वर्षी जागतिक आरोग्य संघटनेकडे एक फेरविचार अर्ज दाखल केला आहे. ही लस जेनेरिक स्वरूपात- पेटंटचे संरक्षण काढून- तयार करण्याची परवानगी मिळावी, म्हणजे ती गरीब, मध्यम उत्पन्न गटांना स्वस्तात उपलब्ध होईल, अशी विनंती हा अर्ज करतो. या संदर्भातला निर्णय जूनमध्ये अपेक्षित आहे, अर्थात श्रीमंत देश आणि उत्पादक त्याला विरोध करतील. नफ्याच्या उद्देशाने मोठ्या कंपन्या प्रचंड गुंतवणूक करणार, किंमत ठरवणार आणि नफा मिळवणार हे गृहीत आहेच; पण या उद्योगात जोखीम प्रचंड आहे हेही लक्षात घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. भारताच्या पथ्यावर पडणारी बाब अशी की, सीरम ही भारतीय कंपनी लस भारतात उत्पादन करणार आहे आणि तिचे प्रमुख (सीईओ) अदर पूनावाला यांनी सुरुवातीलाच हे जाहीर केले आहे की, प्रचंड नफा कमावणे हा माझा कधीच उद्देश नव्हता आणि नसेल.

सेपी, गावी या संस्थांनी मागच्याच वर्षी १०० कोटी लसमात्रा इतकी मागणी सीरम/अ‍ॅस्ट्राझेन्का यांच्याकडे नोंदवली होती. यासाठी ७५ कोटी डॉलर्स अशी किंमत आणि त्यापैकी ४० कोटी लसमात्रा डिसेंबर २०२० पर्यंत मिळतील असा करार केला होता. या सर्व लसमात्रा गरीब आणि मध्यम उत्पन्न असलेल्या ९२ देशांसाठी होत्या, त्यात एक भारत आहे. या संस्थांनी सप्टेंबर २०२० मध्येच लस वितरणाचे पूर्ण नियोजन केले होते. त्यांच्या लस वितरणाच्या प्राधान्यक्रमात आरोग्य क्षेत्रातील कार्यरत (डॉक्टर्स, फार्मासिस्ट इ.) मंडळींना प्राथमिकता असेल, हेही ठरले होते. भारतात या गटातील ६६,४६,६४८ व्यक्ती आहेत, असे नेमके अंदाज या संस्थांनी मांडलेले आहेत. भारताची लोकसंख्या त्यांनी १३९ कोटी ३३ लाख अशी गृहीत धरली आहे. त्यात ५० पेक्षा कमी वयाचे १११ कोटी १८ लाख असतील, असा त्यांचा अंदाज आहे.

### हा प्रश्न ६०००० कोटी रुपयांचा!

१ मेपासून १८ वर्षांवरील सर्वांना लसीकरणाची योजना सुरू झाली आहे. भारताची लोकसंख्या जर १३३ कोटी इतकीच समजली तरी साधारण ८४ कोटी जनतेला ही लस द्यावी लागेल. यापूर्वी प्राधान्यक्षेत्रातील लोकांना, तसेच ६० पेक्षा अधिक वयाच्या लोकांचे लसीकरण सुरू होते, त्या खर्चाची जबाबदारी केंद्र सरकारने घेतली होती. भारत सरकारच्या निर्देशांचे पालन करीत सीरम इन्स्टिट्यूटने २१ एप्रिल रोजी असे जाहीर केले की उत्पादन होणाऱ्या लशींपैकी ५० टक्के केंद्र सरकारला दिल्या जातील तर ५० टक्के राज्य सरकार आणि खासगी रुग्णालयांना दिल्या जातील. लशींची किंमत केंद्र सरकारसाठी १५० रुपये; पण राज्य सरकारांसाठी रु. ३००/- आणि खासगी रुग्णालयांसाठी रु. ५००/- इतकी असेल. खासगी कंपन्या वा खासगी रुग्णालयांनी सध्या राज्य सरकारी यंत्रणेतून लस-खरेदी करावी; पुढे चार ते पाच महिन्यांनंतर खुल्या बाजारात (रिटेल) लसविक्री सुरू होईल, असे सीरमतर्फे सांगण्यात येते. तसेच कोव्हॅक्सिन तयार करणाऱ्या भारत बायोटेक कंपनीने केंद्र सरकार रु. १५०/-, राज्य सरकारे रु. ४००/-, तर खासगी रु. १२००/- अशा किमती जाहीर केल्या आहेत.

प्रत्यक्षात लस घेताना किंमत वेगळी असेल, कारण त्यात कर, वाहतूक, थंड वातावरणात साठवणूक, लस देणाऱ्या डॉक्टरचा मोबदला, वाया जाणारी लसमात्रा यांसारखे खर्च मिळवले जातील. २०२०-२१ या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने रु. ३५,००० कोटी कोविड लसीकरणासाठी दर्शविले होते. म्हणजे रु. १५०/-दराने साधारण २३० लाख डोस खरेदी केले जाऊ शकतात. अनधिकृत अंदाजानुसार आतापर्यंत केंद्र सरकारने सुमारे रु. ३४,००० कोटी खर्च करून २०५ लाख डोस खरेदी केले आहेत (अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याने हा अंदाज खरा मानावा लागतो). आता १६८ कोटी डोस देण्यासाठी अगदी १५०/- रुपयांच्या दरानेसुद्धा रु. २५,००० कोटी रुपयांची, किमान १२० कोटी लसमात्रांसाठी १८,००० कोटी रुपयांची गरज केंद्र सरकारला भासणारच. म्हणजे लसीकरणाचा एकूण प्रश्न ६०,००० कोटी रुपयांचा दिसतो.

राज्य सरकारे तरी हा भार (तोही किमान ३०० रुपये एका मात्रेसाठी मोजून) कसा उचलू शकतील हाच खरा महत्त्वाचा प्रश्न असेल.

### भारताची प्रचंड लस-मागणी

भारत सरकारच्या रु. ३००० कोटी गुंतवणूक साह्यानंतर सीरम इन्स्टिट्यूट १० कोटी लसमात्रांचा पुरवठा मे २०२१ पासून दर महिन्याला करू शकेल असे सांगण्यात येत आहे. तर भारत बायोटेकमध्ये सरकारने १५६५ कोटी रुपयांच्या केलेल्या गुंतवणुकीनंतर मे महिन्यात तीन कोटी मात्रा उत्पादन करेल आणि ऑगस्ट २०२१ पासून दर महिन्याला सात कोटी मात्रांचे उत्पादन करेल असे सांगण्यात येत आहे. दोन्ही कंपन्यांना १५ टक्के निर्यात करणे गावी, सेपीच्या करारांनुसार बंधनकारक आहे. सर्वांचे लसीकरण होण्यासाठी सुमारे २२ कोटी लसमात्रांचे उत्पादन दर महिन्याला अपेक्षित आहे. सध्या भारत सरकारची इतर कंपन्यांशी बोलणी चालू आहेत, पण या लशी देशात येण्यास काही काळ लागेल असे दिसते.

भारताच्या सुमारे १३८ कोटी लोकसंख्येपैकी अंदाजे ९७ कोटी लोकसंख्या १८ वर्षे वयावरील असेल आणि त्यापैकी ६० टक्के लोकांना लस द्यायची असेल तर १०० ते १२० कोटी लसमात्रांची गरज भासेल. म्हणजे लस उत्पादन आणि लसीकरण हा कार्यक्रम आणखी एक ते दीड वर्ष चालेल. आता यापैकी फार तर १० टक्केच लस खासगी क्षेत्रात विकली गेली तरीही ती रक्कम रु. ५००० कोटी इतकी प्रचंड असेल. लशीचा परिणाम एक-दीड वर्ष टिकणार असेल तर पुन्हा दर वर्षी रु. ५००० कोटी रुपये मिळू शकतात. उरलेल्या ९० टक्क्यांपैकी ५० टक्के लस राज्य सरकारने आणि ५० टक्के केंद्र सरकारने विकत घेतली तर रु. ७,५०० कोटी केंद्र सरकार खर्च करेल व राज्य सरकार रु. १५,००० कोटी खर्च करेल. एका वर्षात एकूण लस खरेदीवर होणारा खर्च रु. २७,५०० कोटी इतका असू शकतो.

या डोळे फिरवणाऱ्या रकमा पाहिल्यास कोविड लसीकरण हा लस उत्पादक व खासगी गुंतवणूकदार यांच्यासाठी लाभाचा; पण राज्यकर्ते, करदाते आणि सामान्य जनता यांच्यासाठी चिंतेचा विषय का आहे, हे लक्षात यावे.

### ‘जीवनावश्यक’ नियंत्रण

कोविड राष्ट्रीय आपत्ती असेल तर त्यावरील लस ही ‘जीवनावश्यक सार्वजनिक वस्तू’ ठरते. (सर्वोच्च न्यायालयाने याला ‘मूल्यवान सार्वजनिक वस्तू’ असे म्हटलेले आहे) ही लस मिळणे हा ‘मूलभूत मानवी हक्क’ ठरू शकतो, म्हणूनच लस पुरविण्याची जबाबदारी सरकारची ठरू शकते. ही जबाबदारी केंद्राची अथवा राज्याची अथवा स्थानीय सरकारची हा वेगळा मुद्दा. पण ‘लस किंमत नियंत्रण’ हा खरा कळीचा मुद्दा या लस-अर्थशास्त्रातला आहे. भारतात जीवनावश्यक वस्तू कायदा व औषध (किंमत) नियंत्रण कायदा यांनी सरकारला किंमत-नियंत्रणाचे अधिकार दिले असले, तरी ज्या औषधांना पेटंटचे संरक्षण प्राप्त आहे, त्यांच्या किमती सरकार ठरवू शकत नाही. म्हणूनच, सध्या रेमडेसिविर आणि लस यांच्या किमतींवर सरकार पूर्ण नियंत्रण ठेवू शकत नाही. जगभर पसरत असलेल्या या साथीच्या रोगाचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकार पेटंट मालकाची परवानगी घेऊन किंवा न घेतादेखील अपवादात्मक परिस्थितीत ‘परवानासक्ती’ (कम्पल्सरी लायसन्सिंग) अंतर्गत देशातील अन्य कंपन्यांकरवी लस उत्पादन करू शकते. तसेच, कोविड महामारीच्या काळात साथरोग नियंत्रण कायदा, आपत्ती नियंत्रण कायदा आणि राजकीय इच्छाशक्ती असल्यास ‘विशेष अधिकारा’चा वापर करून लस किंमत, उत्पादन, पुरवठा, आयात यावर नियंत्रण आणू शकेल.

### लस आणि खासगी गुंतवणूक

अर्थातच, काही मोजक्या औषधनिर्मिती कंपन्यांवर नियंत्रण आणून हा प्रश्न दीर्घकाळासाठी सोडविता येणार नाही. म्हणजे संशोधक, उद्योजक यांचे खच्चीकरण होऊ नये आणि त्याचबरोबर गरिबांना ते संशोधन कमी किमतीत उपलब्ध व्हावे; यासाठी काय करायचे, हा प्रश्न आहे.

ऑक्सफर्ड विद्यापीठाने संशोधकाच्या पेटंटसाठी एक स्वतंत्र कंपनी निर्माण केली आहे, तिने सुमारे ४००० पेटंट नोंदवलेले आहेत. हे संशोधन विद्यापीठाची ती कंपनीच इतरांना उत्पादनासाठी उपलब्ध करते. त्या बदल्यात मिळणाऱ्या स्वामित्वधनाचा (रॉयल्टीचा) काही भाग, संशोधक, तर काही हिस्सा विद्यापीठ आणि गुंतवणूकदार कंपन्यांना मिळतो. यामुळेच आपण ‘पूनावालांची कोविशिल्ड’ म्हणत असलो तरी, तिच्या संशोधनाच्या स्वामित्वधनाचे वाटेकरी प्रा. सारा गिल्बर्ट, प्रा. एड्रियन हिल, ऑक्सफर्ड विद्यापीठ, जेनेर इन्स्टिट्यूट, व्हॅसिटेक आणि गूगल व्हेंचर्ससारखे काही गुंतवणूकदार आहेत.

### सेपी, गावी आणि सीरम

२०१७ मध्येच इबोलाच्या, सार्सच्या पार्श्वभूमीवर नॉर्वेच्या पुढाकाराने आणि भारताच्या सहभागाने ‘सेपी’ या संस्थेची स्थापना झाली होती. गरीब, मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना अल्पदरात लस मिळवून देणे, हे ‘सेपी’चे उद्दिष्ट. विषाणूची रचना जाहीर झाल्यानंतर केवळ १३ दिवसांत (२३ जानेवारी २०२०) ‘सेपी’ने आपले काम सुरू केले. २ फेब्रुवारीपासून भांडवल उभारणीसाठी बहुराष्ट्रीय कंपन्या, बहुदेशीय बिगरसरकारी संस्था (एनजीओ) यांच्याशी ‘सेपी’ने करार केले. लस उत्पादन, अमेरिकेतील अन्न-औषध कायदे आणि इतर देशांमधील कायदे यांमध्ये समन्वय साधणे यांसाठी ‘सेपी’चे प्रयत्न सुरू झाले. प्रत्यक्षात लस किंमत आणि पुरवठा हे अधिकार ‘ग्लोबल अलायन्स फॉर व्हॅक्सिन अँड इम्युनायझेशन (गावी)’ या संस्थेकडे आहेत. ना नफा ना तोटा तत्त्वावर ‘सेपी’ व ‘गावी’ काम करतात. सेपीकडे कोणतेही पेटंट नाही; पण उत्पादक, विकासक यांच्याशी झालेल्या करारांनुसार इतर देशांमध्ये विश्वासू सहभागी कंपनीला उत्पादनाचे तंत्रज्ञान देऊन (ट्रान्स्फर ऑफ टेक्नॉलॉजी) मोठ्या प्रमाणावर लस उत्पादन केले जाईल असे निश्चित झाले. आजघडीला १३ कंपन्यांशी ‘सेपी’ने करार केलेले आहेत. यापैकी सर्वाधिक उत्पादन क्षमता ‘सीरम इन्स्टिट्यूट’कडेच (भारतात!) आहे.

‘गावी’ संस्थेने ९२ देशांशी करार करून, २० टक्के लोकसंख्येसाठी प्रति लसमात्रा १.६६ डॉलर




(सुमारे १२२ रुपये) अशी किंमत निश्चित केलेली आहे. यात असे गृहीत धरले आहे की २०२१ मध्ये ९२ देशांतल्या ५५ कोटी लोकांना लस दिली जाईल. प्रत्यक्षात केवळ भारतातच २०२१ मध्ये किमान ५० ते ६० कोटी लोकांना लस द्यावी लागणार आहे.

म्हणजेच आता भारतासाठी, उत्पादन वाढवणे आणि भारतातील लसकिमती आटोक्यात राखणे याकामी आंतरराष्ट्रीय संस्थांवर किती अवलंबून राहायचे याच्या मर्यादा स्पष्ट झालेल्या आहेत. त्यामुळे यापुढे भारत सरकारने उत्पादक कंपन्यांशी करार करून उत्पादन वाढविण्यासाठी गुंतवणूक करणे आणि विशिष्ट किमतीत लस खरेदीची हमी देणे आवश्यक ठरते.

लसीकरणातील त्रुटींसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने स्वाधिकारात दाखल करून घेतलेली याचिका, ही खरे तर लस-व्यवस्थापन सुधारण्यासाठी केंद्र सरकारला मिळालेली उत्तम संधी आहे! कोविड-१९ राष्ट्रीय आपत्ती म्हणून जाहीर झाल्यानंतर केंद्र सरकारला अनेक अधिकार प्राप्त झाले. तरीदेखील केंद्र सरकारचे धोरण असे की, १८ ते ४४ या वयोगटाच्या लसीकरणासाठी राज्य सरकार आणि खासगी रुग्णालयांनी उत्पादकांकडून लस विकत घ्यावी (हे धोरण लस-उत्पादकांचे बाजारस्वातंत्र्य अबाधित राखणारे असले तरी त्याचे परिणाम म्हणजे राज्य-राज्यांमध्ये भांडण लागणार आणि राज्ये उत्पादकांवर दबाव आणणार! इथे खरी ‘वित्त आयोगा’प्रमाणे लस आयोगाची गरज दिसते).

सर्वोच्च न्यायालयाला धोरणातल्या अनेक चुका, त्रुटी जाणवू लागल्या, त्यासंदर्भात त्यांनी प्रश्नही विचारले आहेत. त्या प्रश्नांवरील केंद्र सरकारची उत्तरे कदाचित १० मे रोजीच्या सुनावणीत मिळू शकतात. त्याआधी सर्वोच्च न्यायालयाने सुचवले आहे की, पेटंट कायद्याच्या कलम ९२, १०० तसेच १०२ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून खासगी संस्थांना मदत करून लस-उत्पादन वाढवावे. राष्ट्रीय आपत्तीकाळ लक्षात घेऊन केंद्र सरकारने आपले विशेष अधिकार वापरावेत. पेटंटसंदर्भात रॉयल्टीसाठी संबंधितांशी चर्चा सुरू करावी. त्या संदर्भात योग्य निर्णय होऊ शकत नसेल तर सर्वोच्च न्यायालयही हस्तक्षेप करील.

सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान असेही मत व्यक्त झाले की, राज्य सरकारांनी जर उत्पादकांशी परस्पर संपर्क केला तर प्रचंड गोंधळ व अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होईल. लशीच्या वेगवेगळ्या किमती हे राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ने दिलेल्या जगण्याच्या अधिकाराशी विसंगत धोरण ठरते, म्हणून या धोरणाचा पुनर्विचार करावा. लस विकत घेताना केंद्रीकरण असावे तर वाटप करताना विकेंद्रीकरण करावे. अशा अनेक उपयुक्त सूचना सर्वोच्च न्यायालयाने केल्या आहेत. आता चेंडू केंद्र सरकारच्या कोर्टात आहे.

### पैशाचे सोंग? नव्हे, ‘एस्केप क्लॉज’!

लसीकरणासाठी जर ६०,००० कोटी रुपये लागणार, तर एवढी मोठी रक्कम कुठून उभारायची? पैशाचे सोंग सरकार तरी कसे आणणार? आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) यावर विचार करून ‘एस्केप क्लॉज’ (सुटका खंड) वापरण्याची तरतूद ठेवली आहे. ‘राष्ट्रीय आपत्ती’ असल्याने वित्तीय तूट व सार्वजनिक कर्जे यांमध्ये ‘वित्तीय जबाबदारी व्यवस्थापन कायद्या’ने (एफआरबीएम) निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त वाढ करता येते. मात्र यात पारदर्शकता असणे महत्त्वाचे असते. थोडक्यात, भारत सरकार सार्वजनिक कर्ज उभारून हा प्रश्न सोडवू शकते.

केवळ मोठ्या प्रमाणावर लस उत्पादन, योग्य व न्याय्यरीत्या लसवाटप/लसीकरण, मोठ्या प्रमाणावर योग्य दरात आरोग्य सुविधांची उपलब्धता... आदींनी ‘दुसऱ्या लाटे’चा वा ‘तिसऱ्या लाटे’चा प्रश्न तात्पुरता सुटेल; पण दीर्घकाळात औषधे शोधणे, त्यासाठी शिक्षण-संशोधन यावर विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढविणे, खासगी क्षेत्रातील फार्मा कंपन्यांना उत्तेजन देणे आणि सामान्यांमध्ये जबाबदार वागणुकीची जाणीव निर्माण करणे अत्यावश्यक ठरेल.

*(संदर्भ : ‘मेडिसिन लॉ अँड पॉलिसी’ संकेतस्थळावरील ख्रिस्तोफर गॅरिसन यांचे लेख, तसेच डब्ल्यूएचओ, गावी, युनिसेफ, सेपी, आयएमएफ यांची संकेतस्थळे)*

## लोकविज्ञान चळवळीच्या अग्रणी प्रेरणा राणे यांचे निधन

**मुंबई :** सर्वसामान्य, अर्धशिक्षित समाज आणि कामगारांमध्ये विज्ञान प्रसार करून ते लोकाभिमुख करणाऱ्या आणि श्रमिकांच्या लढ्याला विज्ञानाची जोड देणाऱ्या



लोकविज्ञान चळवळीच्या अग्रणी प्रेरणा राणे यांचे शुक्रवारी कणकवली येथे करोनाने निधन झाले. त्या ६५ वर्षांच्या होत्या. केरळप्रमाणे महाराष्ट्रातही 'लोकविज्ञान चळवळ' सुरू करण्यासाठी ज्यांनी पुढाकार घेतला त्यापैकी प्रेरणा राणे एक होत्या. कामगार-श्रमिकांच्या चाळी-वस्त्या, झोपडपट्ट्या आणि राज्याच्या ग्रामीण भागात पायपीट करून त्यांनी तेथील तरुणांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचे कार्य लोकविज्ञान चळवळीमार्फत केले. मॅकेनिकल अभियांत्रिकीची पदवी घेतल्यानंतर त्यांनी काही काळ राज्यातील एका नामांकित कंपनीत नोकरी केली. तेथे त्यांनी स्त्री-पुरुषांच्या वेतनातील तफावतीविरोधात आवाज उठवला. अखेर नोकरीचा राजीनामा देऊन त्यांनी श्रमिकांच्या मुक्ती लढ्यात आणि विज्ञान प्रसाराच्या कार्याला वाहून घेतले. काही काळ त्यांनी 'व्हीजेटीआय'मध्ये अध्यापन केले. विज्ञानाच्या प्रसारातून अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले.

## कोयना परिसरात भूकंपाचे सौम्य धक्के

**कराड :** कोयना धरण व परिसराला शनिवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास भूकंपाचे दोन सौम्य धक्के बसले. भूकंपाच्या धक्क्यांची तीव्रता २.९ व ३.०० रिश्टर स्केल अशी नोंदली गेली. पहिला धक्का २.५५ मिनिटांनी तर, लगेचच ३ ते ४ मिनिटांच्या अंतराने भूकंपाचा आणखी एक सौम्य धक्का जाणवला. सुदैवाने कोणतीही हानी झाली नाही. भूकंपाच्या धक्क्याचे केंद्रबिंदू वारणा खोऱ्यात जावळे गावाच्या वायव्येला ८ किमी अंतरावर तसेच कोयना धरणापासून १३.६ किमी अंतरावर होते.

## दिनदर्शिका

**रविवार, ९ मे २०२१**
भारतीय सौर १९ वैशाख शके १९४३. मिती चैत्र कृष्ण पक्ष - त्रयोदशी : १९:३१ पर्यंत
नक्षत्र : रेवती : १७:२९ पर्यंत.
चंद्र - मीन : १७:२९ पर्यंत.
**मेष** : मतभेद टाळा.
**वृषभ** : प्रशंसा होईल.
**मिथुन** : हिशोबाची नोंद ठेवा.
**कर्क** : प्रगती साधू शकाल.
**सिंह** : आक्रमकपणा टाळा.
**कन्या** : जोडीदाराशी मनोरंजन.
**तूळ** : अतिरेक टाळा.
**वृश्चिक** : नवे प्रशिक्षण मिळेल.
**धनू** : वरिष्ठांची मदत घ्या.
**मकर** : सुलभता येईल.
**कुंभ** : आवक वाढेल.
**मीन** : आरामदायक दिन.
**शुभ राशी : मकर, कुंभ.**

## नेटक्लिप्स

लो : लोकसत्ता.COM

- शरद पवारांना बारचालकच दिसले - आचार्य तुषार भोसले
- 'कलर कोड कुपन सिस्टम'नुसार होणार ठाणेकरांचे लसीकरण

हे व्हिडीओ बघण्यासाठी खालील क्यूआर कोड स्कॅन करा..

## सर्वाधिक वाचकपसंती

- अग्रलेख - तिची वाट अडवणारे...
- ओळखपत्र, आरटी- पीसीआर रिपोर्ट नसला, तरी कोविड संशयित रुग्णांना दाखल करून घ्यावं लागणार
- दिलासादायक! 'या' औषधामुळे करोना रुग्णांना मिळणार संजीवनी


## 'लोकसत्ता' आयोजित 'महाराष्ट्र गाथा' वेब व्याख्यानमाला

# 'महाराष्ट्राचा तर्कवाद' या विषयावर उद्या व्याख्यान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** देशातील अन्य अनेक राज्यांच्या जडणघडणीत महाराष्ट्राचे वेगळेपण दिसते, ते येथील विचारवंतांच्या योगदानामुळे. नवनवीन संकल्पनांना वाट करून देणाऱ्या अनेक मराठी विचारवंतांनी महाराष्ट्राचा खास विशेष असलेला तर्कवाद जोपासला आणि त्याची मशागतही केली. या तर्कवादाचे स्वरूप समजून घेण्यासाठी आणि त्याचे आजच्या काळातील महत्त्व समजण्यासाठी उद्या, सोमवारी, १० मे रोजी 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांचे 'महाराष्ट्राचा तर्कवाद' या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या ६१ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून 'लोकसत्ता'ने 'गाथा महाराष्ट्राची' या वेब व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. कुबेर यांचे या व्याख्यानमालेतील हे भाषण विचारवंतांचे योगदान लक्षात येण्यासाठी महत्त्वाचे ठरेल. महाराष्ट्राला आधुनिकतेकडे नेणाऱ्या लोकहितवादी, महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा फुले, गोपाळ कृष्ण गोखले, प्रबोधनकार ठाकरे, नरहर कुरुंदकर यांच्यासारख्या विचारवंतांनी प्रत्येक संकल्पना तर्कवादाच्या कसोटीवर जोखली. त्या निमित्ताने महाराष्ट्रात तात्त्विक वादांचीही परंपरा निर्माण झाली. वैचारिक सहिष्णुतेमुळे या राज्यातील ही वैचारिक परंपरा अधिक उठून दिसणारी ठरली. या परंपरेतून नेमके काय हाती लागले, त्याचा येथील समाजजीवनावर कोणता परिणाम झाला, या व अशा प्रश्नांची उकल या व्याख्यानातून होईल. या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी पुढील लिंकवर नावनोंदणी करावी.





**प्रस्तुती :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)
**सहप्रायोजक :** सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. आणि मे. बी. जी. चितळे डेअरी
**पॉवर्ड बाय :** मांडके हिअरिंग सर्व्हिसेस, पुणे

http://tiny.cc/LS_Maharashtra_Gaatha येथे नोंदणी आवश्यक.

# मराठा समाजाच्या प्रलंबित नोकरभरती प्रक्रियेचा आढावा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** मराठा समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक मागास (एसईबीसी) प्रवर्गाच्या प्रलंबित नोकरभरती प्रक्रियेचा येत्या सोमवारपासून संबंधित विभागाच्या सचिवांकडून आढावा घेण्यात येणार असून, त्यानंतर या उमेदवांना न्याय देण्याबाबतचा निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष आणि सार्वजनिक बांधकाममंत्री अशोक चव्हाण यांनी शनिवारी दिली. तसेच मराठा आरक्षण रद्द करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची समीक्षा करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात येणार आहे.


अशोक चव्हाण

मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. त्यावेळी चव्हाण यांनी ही माहिती दिली. सर्वोच्च न्यायालयाने ९ सप्टेंबर २०२० पर्यंत झालेल्या नियुक्त्यांना संरक्षित केले आहे, परंतु नोकरभरती प्रक्रियेत निवड आणि नियुक्ती अशा दोन बाबी आहेत. या पार्श्वभूमीवर पूर्ण झालेल्या व अपूर्ण अशा दोन्ही भरती प्रक्रियांचा आढावा घेण्यासाठी मुख्य सचिव संबंधित विभागांच्या सचिवांसमवेत तातडीने बैठकी घेणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगितीमुळे प्रभावित झालेल्या उमेदवारांना न्याय देण्याबाबत राज्य शासन अनुकूल आहे. मुख्य सचिवांच्या अहवालानंतर पुढील निर्णय घेतले जातील, असेही चव्हाण यांनी सांगितले.

नोकरभरती प्रक्रियेसंदर्भात अडचणी मांडण्यासाठी राज्यभरातील एसईबीसी(मराठा) उमेदवारांचे रोज अनेक दूरध्वनी येत आहेत.

या उमेदवारांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी सर्व जिल्ह्यांतील अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाईल. एसईबीसी उमेदवारांनी या अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे अडचणी मांडाव्यात. जिल्ह्याच्या स्तरावर त्याचे निराकरण न झाल्यास संबंधित प्रकरण मुख्य सचिवांकडे मागवून त्यावर निर्णय घेतले जातील, असा निर्णयही झाल्याचे चव्हाण यांनी सांगितले.

### भडक वक्तव्ये करू नका- गृहमंत्री

मराठा आरक्षण हा महत्त्वाचा विषय आहे. यामध्ये कोणीही भडक वक्तव्ये करून समाजामध्ये विद्वेष निर्माण करू नये. राज्यात करोनाची परिस्थिती गंभीर असून, पोलीस त्यामध्ये व्यग्र आहेत. त्यांचा ताण वाढेल, असे कृत्य करू नका. आरक्षणाच्या संदर्भात भावना कितीही तीव्र असल्या तरी रस्त्यावर उतरून अशांतता निर्माण करू नका, असे आवाहन गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले.

# रुग्ण वाढणाऱ्या जिल्ह्यांत कठोर निर्बंध -टोपे

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** करोनाची राज्यातील लाट थोपविण्यासाठी सर्वप्रकारचे प्रयत्न करूनही दोनतृतीयांश भागात बाधितांची संख्या वाढत आहे. केवळ १३ जिल्ह्यांत करोना बाधितांचे प्रमाण काहीप्रमाणात कमी होताना दिसत आहे. त्यामुळे अशीच परिस्थिती राहिली तर ज्या जिल्ह्यात रुग्णवाढ होईल तेथे संपूर्ण टाळेबंदी करावीच लागेल. तसेच राज्यात पुन्हा टाळेबंदी लागू करायची की सध्याचे निर्बंध कमी करायचे याबाबतचा निर्णय १५ तारखेपूर्वी घेतला जाणार असल्याची माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी शनिवारी दिली.


राजेश टोपे

करोनाची साखळी तोडण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून राज्यभर कठोर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे दररोज वाढत जाणाऱ्या करोनाबाधितांच्या आकडेवारीला काही प्रमाणात लगाम लावण्यात सरकारला यश आले आहे. तरीही राज्यात आजमितीस ५५ हजारच्या पुढे दररोज नवीन रुग्ण सापडत आहेत. त्यामुळे अनेक जिल्ह्यात टाळेबंदी सुरू करण्यात आली असून राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, अन्न नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनीही राज्यातील करोना स्थिती सुधारण्यासाठी राज्यभर कठोर टाळेबंदी लागू करण्याची मागणी केली आहे. याबाबत टोपे यांनीही संपूर्ण राज्यात टाळेबंदीचे संकेत दिले आहेत. कठोर निर्बंध आणि सर्वप्रकारच्या उपाययोजना, वैद्यकीय व्यवस्था करूनही राज्यातील बाधितांची संख्यावाढ कायम आहे.

राज्याच्या एकतृतीयांश भागात म्हणजेच मुंबई, ठाण्यासह १३ जिल्ह्यांत करोना रुग्णवाढीला लगाम लागला असून दररोजच्या नव्या बाधितांचे प्रमाणही कमी होत आहे. ही सरकारसाठी दिलासादायक बाब असली तरी उर्वरित दोनतृतीयांश भागात म्हणजेच उर्वरित २२ जिल्ह्यांतील करोना स्थिती चिंताजनक आहे.

# करोनाविरोधातील राज्याच्या लढ्याचे पंतप्रधानांकडून कौतुक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**


नरेंद्र मोदी


उद्धव ठाकरे

**मुंबई :** राज्यातील करोना परिस्थिती, रेमडेसिविर, प्राणवायू आणि लसींच्या तुटपुंज्या पुरवठ्यावरून एकीकडे राज्य सरकारकडून सातत्याने केंद्रावर टीका केली जात असतानाच दुसरीकडे राज्याच्या करोनाविरोधातील लढ्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी तोंडभरून कौतुक केले. तर राज्यात लसीकरण वाढविण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. मात्र लसीकरणासाठी स्वतंत्र अॅप तयार करण्याची परवानगी देण्याची विनंती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सकाळी मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरून संवाद साधत राज्यातील करोना स्थितीची माहिती घेतली. करोनाच्या दुसऱ्या लाटेशी मुकाबला करताना महाराष्ट्र चांगली लढाई लढतो आहे अशा शब्दांत मोदी यांनी राज्याच्या यंत्रणेचे कौतुक केले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी देखील विशेषतः प्राणवायूच्या बाबतीत राज्यालाअधिक बळ मिळावे अशी विनंती मोदी यांना केली. तसेच करोनाच्या तिसऱ्या लाटेचा मुकाबला करण्यासाठी सरकार करीत असलेल्या तयारीची माहितीही ठाकरे यांनी दिली. पंतप्रधान आणि केंद्र सरकार हे करोना लढ्यात राज्याला प्रथमपासून मार्गदर्शन करीत असून त्याचा चांगला उपयोग राज्य सरकारला होतो आहे, राज्याच्या काही सूचना केंद्राने मान्यही केल्या याविषयीही मुख्यमंत्र्यांनी मोदींचे आभार मानले.

**स्वतंत्र अॅपला मान्यता द्या**

राज्यात १८ ते ४४ वयोगटातील लोकांच्या लसीकरणासाठी राज्याला स्वतंत्र अॅप तयार करण्याची परवानगी देण्याची मागणी मुख्यमंत्र्यांनी पत्राद्वारे मोदींकडे केली आहे.

### फडणवीस यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई : मुंबईतील करोना मृत्यूंची अचूक आकडेवारी न देता चाचण्यांबाबतही तडजोडी करून करोनाचा संसर्ग दर कमी होत असल्याचे आभासी चित्र उभे करण्यात येत आहे, असा आरोप विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लिहिलेल्या पत्रात केला आहे. हे प्रकार तातडीने थांबवून प्रसिद्धी यंत्रणांमार्फत जनतेची दिशाभूल करण्यात येऊ नये, अशी मागणी फडणवीस यांनी केली आहे.

# बेस्टमध्ये वेतन संकट

**मुंबई :** गेल्या वर्षभरात करोनाचे संकट असतानाही मुंबई व महानगरात सेवा देणाऱ्या बेस्ट उपक्रमाची आर्थिक स्थिती बिकटच झाली आहे. प्रवासी व उत्पन्न घटल्याने कर्मचाऱ्यांना यापुढे वेतन न मिळण्याचे संकटच कोसळले आहे. त्यामुळे बेस्टसाठी मंजूर झालेले अनुदान नियमितपणे व तातडीने देण्याची मागणी बेस्ट उपक्रमाने मुंबई पालिकेकडे केली आहे.

वर्षभरात नियमित सेवा देताना १०६ कर्मचाऱ्यांचा करोनामुळे मृत्यू झाला. कर्मचाऱ्यांना मार्च ते जूनपर्यंतचा ३०० रुपये करोना भत्ता मिळाला. त्यानंतर डिसेंबर २०२० पर्यंतचा करोना भत्ता उपक्रमाकडून अद्यापही मिळालेला नाही.

गेल्या वर्षभरात केवळ ३९८ कोटी २६ लाख रुपये उत्पन्न मिळाले असून खर्च २ हजार २५७ कोटी ७५ लाख रुपये झाला आहे. बेस्टला १ हजार ८५९ कोटी ४९ लाख रुपये नुकसानीला सामोरे जावे लागले आहे.

## शिवसेना, मनसेचा विरोध

# बदलापुरात राजकीय कुरघोडीतून टाळेबंदी?

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**बदलापूर:** बदलापूर शहरात गेल्या महिनाभरात करोना रुग्णांची निम्म्यावर आलेली संख्या, एक टक्क्यावर आलेला मृत्युदर आणि शहरातील रुग्णालयातील रिकाम्या असलेल्या खाटांच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी उशिरा जाहीर झालेली कडक टाळेबंदी राजकीय प्रतिष्ठेपायी लावण्यात आल्याच्या चर्चा सध्या शहरात रंगल्या आहेत. शिवसेना, मनसेच्या वतीने शनिवारी टाळेबंदीच्या प्रस्तावावरून अधिकाऱ्यांना धारेवर धरण्यात आले, तर टाळेबंदीच्या निर्णयावर नागरिकांमधूनही संताप व्यक्त होत होता.

बदलापूर शहरात एप्रिल महिन्यात करोनाचा उद्रेक पहायला मिळाला असला तरी गेल्या काही दिवसांपासून शहरातील रुग्णसंख्या झपाट्याने कमी झाली आहे. असे असतानाही शनिवारपासून बदलापूर शहरात कडक टाळेबंदीची घोषणा ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी केली. त्यापूर्वी गुरुवारीच आमदार किसन कथोरे यांनी शहरात शनिवारपासून टाळेबंदी लागू करणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र टाळेबंदीच्या या घोषणेवर शुक्रवारी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मनसेच्या वतीने टीका करण्यात आली होती. टाळेबंदीच्या चर्चांनी शुक्रवारी शहरातल्या बाजारपेठेत गर्दी होती. त्यामुळे या गर्दीचे खापर शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांनी कुळगाव बदलापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी दीपक पुजारी आणि अप्रत्यक्षपणे भाजप आमदार किसन कथोरे यांच्यावर फोडले.

# दहावीच्या मूल्यमापनाबाबत संदिग्धता

*(पान १ वरून)*

सूत्र जाहीर करून त्याची शाळांनी अंमलबजावणीही सुरू केली. राज्यात मात्र, निर्णय जाहीर करण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन कसे करणार याबाबत विचार करण्यात आला नाही. आता निर्णय जाहीर होऊन पंधरा दिवस झाले तरीही शिक्षण विभाग अद्याप विद्यार्थ्यांचे मूल्यमापन आणि पुढील प्रवेश प्रक्रिया कशी करावी याचा निर्णय जाहीर करू शकलेला नाही. परीक्षा रद्द केल्यानंतर मूल्यमापन कसे करावे याबाबतच्या उपायांची चाचपणी करणारा अद्यापही निष्कर्षाप्रत पोहोचलेला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचा गोंधळ वाढलेलाच आहे. परंतु पुढील शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक यंदाही कोलमडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**विभागातील तांत्रिक अडचण**

पूर्वी माध्यमिक वर्गांचे म्हणजे नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम आराखड्यापासून मूल्यमापनपर्यंतची जबाबदारी राज्यमंडळाकडे होती. मात्र, ती महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेकडे सोपवण्यात आली. त्यामुळे आता मूल्यमापनाबाबत निर्णय कुणी घ्यावा याबाबत विभागात मतभेद असल्याचे कळते आहे.

### प्रवेश परीक्षेचा पेच

अकरावीचे प्रवेश हे शालेय शिक्षण विभागाच्या आखत्यारितच होत असले तरी त्याशिवाय अभियांत्रिकी पदविका (पॉलिटेक्निक), तंत्रनिकेतन (आयटीआय) यांची प्रवेश प्रक्रिया तंत्रशिक्षण, कौशल्य विकास विभागांच्या आखत्यारित होते. या दोन्ही अभ्यासक्रमांना मिळून जवळपास साडेतीन ते चार लाख विद्यार्थी प्रवेश घेतात. दहावीच्या मूल्यमापनाचा आराखडा



जाहीर झाल्याशिवाय या विभागांच्या प्रवेश प्रक्रियांचाही निर्णय रखडणार आहे. परिणामी पुढील शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक कोलमडणार असल्याचे दिसत आहे.

**पर्यायांची चाचपणी...** यंदा दहावीला असलेल्या विद्यार्थ्यांच्या गेल्यावर्षी म्हणजे नववीत दोन चाचण्या आणि सहामाही अशा तीन परीक्षा झालेल्या असणे अपेक्षित आहे. त्याचा आधार घेऊन शिक्षकांनी मूल्यमापन करावे या पर्यायाचीही चाचपणी करण्यात आली. मात्र, प्रत्येक शाळेने त्यांच्यास्तरावर केलेल्या मूल्यांकनाच्या आधारे अकरावीच्या प्रवेशासाठी स्पर्धा होणे कितपत योग्य असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# करोना रुग्णांना आपलेपणा देणारे उपचारकेंद्र

*(पान १ वरून)*

आहे. समर्थ भारत योजनेद्वारे महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेमध्ये गुढीपाडव्यापासून करोना काळजी केंद्र सुरू करण्यात आले आहे. त्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीने पुढाकार घेतला आहे. यातील वैद्यकीय भाग सह्याद्री हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी स्वीकारला आहे. आठ डॉक्टर आणि तीन पाळ्यांमध्ये काम करणारे २५ स्वयंसेवक कार्यकर्ते रुग्णांना वैद्यकीय आणि आवश्यक सुविधा देत आहेत. आवश्यकता भासल्यास रुग्णांना पुढे रुग्णालयामध्ये दाखल करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्राचे समन्वयक महेश पोहनेरकर यांनी दिली.

पुणे महापालिका, विवेक व्यासपीठ, पीपीसीआर (पुणे प्लॅटफॉर्म फॉर कोविड रिस्पॉन्स), सह्याद्री हॉस्पिटल, लोहिया परिवाराचे श्री मुकुंद भवन ट्रस्ट, लक्ष्मीनारायण देवस्थान ट्रस्ट, परिमल आणि प्रमोद चौधरी फाऊंडेशन या संस्थांचे सहकार्य करोना काळजी केंद्राला लाभले आहे.

**दिनचर्या...**

करोना काळजी केंद्रामध्ये दाखल झालेल्या रुग्णांचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य राखण्यासाठी दिनचर्या तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये सकाळचा चहा, न्याहरी, दोन्ही वेळचे जेवण, औषधे, प्राणायाम या गोष्टींचा समावेश आहे.

**उपयुक्तता...**

कर्वेनगर येथील बाया कर्वे वसतिगृहामध्ये सुरू करण्यात आलेल्या केंद्रामध्ये साडेचारशे खाटांची सुविधा करण्यात आली आहे. सुरक्षित अंतराच्या निकषांचे पालन करण्याच्या उद्देशातून एका खोलीत तीन रुग्णांची व्यवस्था आहे. कोणतीही लक्षणे नसलेल्या, पण करोना झालेल्या आणि घरात सुविधा नसलेल्या, पण विलगीकरण आवश्यक आहे अशा रुग्णांसाठी हे केंद्र उपयुक्त ठरत आहे.

### या केंद्राची वैशिष्ट्ये

- सह्याद्री हॉस्पिटलचे डॉक्टर रुग्णांच्या तब्येतीची काळजी घेण्यास सजग आहेत.
- केंद्रामध्ये संपूर्ण स्वयंसेवी पद्धतीने स्वयंसेवक कार्यरत आहेत. त्यांना त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- आठ दिवस काम केल्यानंतर स्वयंसेवकांना आठ दिवस विलगीकरणात ठेवण्यात येत आहे.

# मोदी सरकारला आत्मसंतुष्टता भोवली!

*(पान १ वरून)* संकट असेल.

ज्या कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात करोनाचा प्रादुर्भाव होऊ शकतो अशा धार्मिक कार्यक्रमांना सरकारने परवानगी दिली (उदा. कुंभमेळा). देशातून लाखो लोक या कार्यक्रमासाठी आले. याशिवाय चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात मोठ्या प्रमाणावर निवडणूक प्रचारसभा घेण्यात आल्या. त्यांत करोना प्रतिबंधक नियमांचे पालन करण्यात आले नाही, असेही 'दी लॅन्सेट'च्या संपादकीयामध्ये नमूद केले आहे. भारतातील आरोग्य यंत्रणा करोना संकटात कशी ढासळत गेली हे दाखवून देताना या नियतकालिकाने, ''सरकारने साथीचा मुकाबला करण्यात आत्मसंतुष्टता मानली,'' अशी टीका केली आहे.

भारतात करोना रुग्णांना ज्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या त्या समजण्यापलीकडच्या होत्या. रुग्णालये भरलेली आहेत, कर्मचारी काम करून थकलेले आहेत. समाजमाध्यमातून डॉक्टर्स आणि नागरिक प्राणवायू, खाटा आणि इतर सुविधांची मागणी करताना दिसत आहेत, असे चित्रही 'दी लॅन्सेट'च्या संपादकीय लेखात मांडले आहे.




- सरकारने सदोष लसीकरण कार्यक्रमाचे सुसूत्रीकरण करावे.
- लसीकरणाचा वेगही वाढवायला हवा, लशींचा पुरवठा (अगदी परदेशी लशीही) वाढवावा.
- लशींचे वितरण शहरी आणि ग्रामीण भागात समान पद्धतीने करावे.
- सरकारने वेळोवेळी अचूक माहिती जाहीर करावी.
- दर १५ दिवसांनी लोकांना जे काही घडते आहे त्याची माहिती द्यावी.
- करोनाचा चढता आलेख खाली आणण्यासाठी देशव्यापी टाळेबंदीची गरज भासू शकते.

**आरोग्यमंत्र्यांची वक्तव्ये बेजबाबदार!**

केंद्रीय आरोग्यमंत्री हर्षवर्धन यांच्या बेजबाबदार वर्तनाचाही 'लॅन्सेट'ने समाचार घेतला आहे. ''दुसरी लाट येण्याआधी आरोग्यमंत्री हर्षवर्धन यांनी भारतात करोनाची लाट संपल्यात जमा आहे, अशा आविर्भावात वक्तव्ये केली होती, पण दुसरीकडे दुसऱ्या लाटेच्या शक्यता वर्तवल्या जात होत्या. विषाणूचा नवा उपप्रकार आल्याची धोक्याची घंटा वाजत होती. काही प्रारूपांमध्ये भारतात सामूहिक प्रतिकारशक्ती निर्माण झाल्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे आता आपण निर्धोक आहोत, अशा तोऱ्यात सरकार वावरत होते, त्यामुळे दुसऱ्या लाटेला तोंड देण्याची पुरेशी तयारी नव्हती,'' अशी टीकाही संपादकीयामध्ये केली आहे.

### लसीकरण मोहीमही फसली!

करोना साथ संपली या भ्रमात राहून भारताने उशिरा लसीकरण सुरू केले. त्यामुळे केवळ दोन टक्के लोकसंख्येचे लसीकरण सुरुवातीला होऊ शकले. राज्यस्तरीय पातळीवर लसीकरण कार्यक्रम फसला होता. सरकारने राज्यांशी चर्चा न करताच धोरणात बदल केले. नंतर १८ वर्षांपासूनच्या नागरिकांचे लसीकरण सुरू केले. तोवर लशींसाठी बाजारपेठेत स्पर्धाही सुरू झाली होती, अशा शब्दांत भारताच्या लसीकरण कार्यक्रमावरही 'लॅन्सेट'ने टीका केली आहे.

**केरळ, ओडिशाचे कौतुक**

रुग्णसंख्येत वाढ होताच वैद्यकीय मदतीचा पुरवठा सुरू करण्यात आला, पण तोपर्यंत करोना साथ हाताळण्याविषयी गोंधळ माजला होता. हा पेचप्रसंग उत्तर प्रदेश, महाराष्ट्र यांसारख्या पूर्वतयारी नसलेल्या राज्यांत जास्त निर्माण झाला होता. तेथे प्राणवायूची कमतरता होती, रुग्णालयात खाटा मिळत नव्हत्या, अंत्यविधीला जागा पुरत नव्हती. केरळ आणि ओडिशा यांची पूर्वतयारी चांगली होती. त्यांच्याकडे पुरेसा प्राणवायू होता. त्यांनी इतर राज्यांनाही तो पुरवला, असेही 'लॅन्सेट'ने म्हटले आहे.

**धडा घेण्यासाठी चुका मान्य करा!**

भारताने आता या पेचप्रसंगातून धडा घेण्याची गरज असून त्यासाठी सरकारला आपल्या चुका आधी मान्य कराव्या लागतील. देशाला एक जबाबदार नेतृत्व असायला हवे. पारदर्शकता आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या प्रतिसादात पारदर्शकता असायला हवी, असे 'लॅन्सेट'ने म्हटले आहे.

**८० कोटी ग्रामीण भारतीयांसाठी...**

भारतातील ६५ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात, याचा अर्थ ८० कोटी लोक ग्रामीण भागात राहतात. त्यांना सार्वजनिक आरोग्य आणि प्राथमिक आरोग्य सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. सरकारने स्थानिक आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे उभारावीत, जेथे तिथल्या लोकांची माहिती असलेले कर्मचारी काम करीत असतील. लशीचे समान वितरणही आवश्यक आहे.

# अंत्यसंस्कारासाठी 'हरित स्मशानभूमी'चा पर्याय

*(पान १ वरून)*

मोक्षकाष्ठ तयार करण्याची प्रक्रियादेखील लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

**थोडी माहिती...**

एका माणसाच्या मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठी सुमारे तीनशे किलो लाकडांसोबत, राळ, केरोसीन आणि तूप एवढे साहित्य लागते. त्यासाठी सुमारे साडेपाच हजार रुपयांचा खर्च येतो. मात्र त्याहीपेक्षा या तीनशे किलो लाकडांसाठी १५ वर्षे वयाच्या तीन झाडांचा बळी जातो.

शेतकरी पीककापणीनंतर जो कचरा जाळून टाकतात तो जाळण्याऐवजी बायोमासनिर्मितीकरिता विकत घेतला जातो. यातून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळते आणि त्याचसोबत ते निर्मिती करताना अनेकांना रोजगार उपलब्ध होतो.

**– प्रणय चौधरी,** व्यवसाय सल्लागार

अंत्यसंस्कारासाठी हा पर्याय स्वीकारल्यास सुमारे दोन हजार रुपयांचा खर्च येतो. करोनाकाळात अंत्यसंस्काराचा भार सरकारवर पडत आहे. अशा वेळी हरित स्मशानभूमीचा पर्याय वापरून सरकार खर्चात कपात करू शकते.

**– अनिल चौक,** मालक, विदर्भ सेल्स

स्वाती केतकर – पंडित

**सिनेमा ही पाहण्यासोबतच ऐकण्याचीही गोष्ट असते, आणि म्हणूनच ध्वनीचा स्वतंत्र विचार गरजेचा आहे, सांगतायेत राष्ट्रीय पुरस्कार विजेते ध्वनी संयोजक, ध्वनी अभियंते मंदार कमलापूरकर. ‘त्रिज्या’ या सिनेमासाठी त्यांना नुकताच ध्वनी संयोजनसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे.**



# सिनेमा ऐकण्याची गोष्ट!

■ ध्वनी संयोजक व्हावे असे का वाटले?

**अभियांत्रिकीचे** शिक्षण घेत असताना सत्यजित केळकर, अनमोल भावे या मित्रांमुळे चित्रपटाच्या ध्वनी विभागाविषयी एक कुतूहल निर्माण झाले. त्याविषयी आणखी माहिती घेत गेलो तेव्हा आणखी रस निर्माण झाला आणि यातच आपले करिअर घडवायचे हा निर्धार झाला. पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमधून मी ध्वनी अभियांत्रिकीचे शिक्षणही घेतले. सुरुवातीला अनमोल भावे, रसूल पुकुट्टी, सुभाष साहू, निहार सामल, प्रमोद थॉमस, विनोद सुब्रमण्यन यांच्यासारख्या ध्वनी क्षेत्रातील तज्ज्ञांकडे साहाय्यक म्हणून काम केले. अनुभव घेतला आणि स्वतंत्र वाटचाल सुरू केली.

■ तुम्हाला ‘त्रिज्या’साठी२०२१मध्ये राष्ट्रीय पुरस्कार तर २०१९मध्ये ‘पुष्पक विमान’ या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट ध्वनी संयोजनाचा राज्य पुरस्कार मिळाला होता. दोन्हीचा अनुभव कसा होता? या प्रकल्पांसाठी पुरस्कार मिळेल अशी अपेक्षा होती का?

**खरे सांगायचे** तर काम करताना पुरस्काराचा विचारही डोक्यात नव्हता! आपले काम मात्र चांगले होते आहे, याची पोचपावती नक्कीच मिळाली होती. कारण दोन्ही चित्रपटांचे दिग्दर्शक त्यातील ध्वनीच्या कामगिरीवर समाधानी होते. चित्रपट हे दृक्-श्राव्य माध्यम आहे. आणि श्राव्य म्हणजे केवळ संवाद आणि गाणी नव्हेत तर ध्वनीचे इतरही महत्त्वाचे घटक आहेत. खरे तर संपूर्ण चित्रपटाचा प्रभाव पोहोचवणारे ध्वनी हे एक प्रभावी माध्यम असते. हे काम करताना नक्कीच वेगळा विचार केला होता त्याचे चीज झाल्याची भावना पुरस्काराने दिली. राष्ट्रीय पुरस्कार हा देशपातळीवरचा सर्वोच्च पुरस्कार असल्याने त्याचा आनंद मोठा आहेच.

■ ‘त्रिज्या’ काहीसा गंभीर धाटणीचा सिनेमा, तर त्याउलट ‘पुष्पक विमान’. भरपूर गाणी, संवाद आणि विनोदाची पखरण असलेला सिनेमा. मग दोन्हीसाठी काम करताना ध्वनीचे काय वेगळेपण जाणवले?

**‘त्रिज्या’ ही** एक इंडिपेंडंट फिल्म आहे. स्वतःच्या शोधात निघालेल्या एका माणसाच्या शोधाची त्रिज्या कशी विस्तारत जाते, हे सांगणारा हा एक वेगळा सिनेमा आहे. त्रिज्यामध्ये घटना, संवाद कमी आहेत. पार्श्वसंगीत तर नाही. त्याऐवजी आम्ही ॲम्बियन्ट म्युझिक वापरले आहे. म्हणजे आपल्या रोजच्या जगण्यात आजूबाजूला आपल्या कानावर पडणारे संगीत. यात शास्त्रीय संगीत, लोकसंगीत, सिनेसंगीताचे तुकडे आहेत, जॅझ आहे. आपण जगात वावरताना ऐकू येणारे आवाज... साधे रेल्वेचे आवाजही आम्ही वेगळ्या पद्धतीने प्रोसेस करून वापरले आहेत. दिग्दर्शक अक्षय इंडिकरच्या अपेक्षेपेक्षा अधिक चांगल्या, वेगळ्या प्रकारचे काम झाले. ‘हॉलीवूड



रिपोर्टर’सारख्या प्रतिष्ठित मासिकात त्याचे परीक्षण छापून आले आणि तिथेही सिनेमाच्या ध्वनीचा आवर्जून उलेख झाला. राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यावर त्यावर शिक्कामोर्तबच झाले.

‘पुष्पक विमान’मध्ये गाणी आहेत. विनोदी सिनेमा असल्याने संवादांचा ठसका असणार होताच. तो न झाकोळताही ध्वनी संयोजन करून त्याचा प्रभाव वाढवायचा होता. पण दिग्दर्शक वैभव चिंचाळकरसह खूप छान ट्युनिंग असल्याने साध्या साध्या बाबतीतही वेगळा ध्वनीपरिणाम साधता आला. सिनेमाच्या नावातच विमान आहे. आकाशातून जाणाऱ्या विमानाचे आवाज त्यात येणार होते. ते करताना तो सीन जिथे चित्रित झाला आहे, अशा ठिकाणी जाऊन आम्ही नवे आवाज रेकॉर्ड केले. स्टॉक साऊंड वापरायचे टाळले. कोणते पात्र नेमके कोणत्या वेळी, कोणत्या दिशेने तो आवाज ऐकते आहे... याचा नेमका कानोसा घेऊन तो आवाज सिनेमात जोडता आला. त्यामुळे त्यातला खरेपणा अधिक स्पर्शून गेला. गावातल्या मंदिरातल्या भजनाला आम्ही लोकलमध्ये होणाऱ्या भजनाचा आवाज जोडला. गावातला निवांतपणा आणि मुंबईची धावपळ या जोडणीतून छान मांडता आली. सिनेमातील एका प्रसंगात लाइट जातात. पडद्यावर अंधार होतोच, पण त्याचवेळी त्या सीनच्या बाहेर खेळणाऱ्या मुलांच्या वैतागाच्या सुस्काऱ्यांमधून तो ‘दृक्श्राव्य परिणाम’ थेट पोहोचवता आला. दिग्दर्शकाचे पूर्ण सहकार्य असल्याने असे लहान प्रसंगही ध्वनीच्या माध्यमातूनही छान फुलवता आले.

■ मनोरंजनाच्या नव्या साधनांसह सिनेमाच्या तांत्रिक बाजूंकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो आहे का?

**नक्कीच बदलतो** आहे. जगभरचे सिनेमे-सीरिज घरबसल्या बघायला मिळाल्याने चित्रपटकर्ते आणि प्रेक्षक दोघांचाही आवाका वाढतोय. अनेक उत्तम दिग्दर्शक ध्वनी संयोजनाकडे विशेष लक्ष देताना दिसतायेत. वेळ देतायेत. त्यामुळे काम करायलाही मजा येते आहे. दिग्दर्शक अमित दत्ता यांच्यासोबत मी ‘सेव्हंथ वॉक’ नावाची फिल्म केली. या ७० मिनिटांच्या सिनेमात एकही संवाद नाही. केवळ आवाज आहेत. या कामाची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली. ‘नदी वाहते’ हा दिग्दर्शक संदीप सावंत यांचा असाच वेगळा सिनेमा. त्यात नदीच्या भावना, तिचे मूड्स, त्यातील पात्रांचे नदीशी बोलणे अशा अनेक निराळ्या संकल्पना होत्या. त्यात प्रत्यक्ष लोकेशनवर रेकॉर्ड केलेले अस्सल आवाजाच वापरले. सिनेमाचा एक समुच्चित प्रभाव पडण्यात त्याचा नक्कीच वाटा आहे.

ओटीटीच्या येण्याने जगभरातल्या सिनेमाचे दालन खुले झाले आहे. चित्रपट, वेबमालिका, लघुपट, माहितीपट असे अनेक प्रकल्प वाढल्याने संधी भरपूर आहेत, पण स्पर्धाही तितकीच आहे. त्यात टिकून राहण्यासाठी प्रत्येक तंत्रज्ञ आपले काम अधिक उत्तम करण्याचा प्रयत्न करतो आहे. याचा फायदा भारतीय सिनेसृष्टीला नक्कीच होणार आहे.

# शालेय रंगभूमीचे पाईक

महेंद्र पवार

**शालेय रंगभूमीच्या** क्षेत्रात फार महत्त्वाचे योगदान करणारे शिक्षक ज्योतिराम कदम यांचे नुकतेच निधन झाले. शालेय रंगभूमी ही प्रामुख्याने शिक्षकांची रंगभूमी असते. म्हणजे तिचे कर्ताकरविता शिक्षकच असतात. ते अपवादात्मक नाट्यअभासक असतात. शाळेतल्या मुलांचे नाटक बसवणे ही त्यांच्यावर बऱ्याचदा सक्तीची जबाबदारी असते. त्यामुळे त्यांची शालेय नाटकाची व्याख्या ही क्रमिक पुस्तकातील एखाद्या धड्याचं संवादरूपात परिवर्तन यापलीकडे जात नाही. अनेकदा त्यातले संवाद हे मूळ धड्यातलेच असतात. त्याला कथन व निवेदनाची जोड देऊन नाटक तयार केले जाते.





८०-९०च्या दशकांत सुधा करमरकरांची ‘लिट्ल थिएटर’, अरविंद वैद्य यांची ‘कुमार कला केंद्र’, ‘बालकनजी बारी’ या आणि अशा शालेय नाट्यस्पर्धा होत असत. त्यात बालमोहन विद्यामंदिरच्या विद्याताई पटवर्धन, पार्ले टिळक विद्यालयाच्या मृण्मयी बारपांडे, छबिलदासचे विलास जोशी, नवभारत विद्यालयाचे कड सर, शिरोडकर हायस्कूलचे तानाजी परब, गिरगावातील चिकित्सक समूहाच्या शिरोळकर हायस्कूलचे नामजोशी सर असे नाट्यप्रेमी शिक्षक या स्पर्धांमध्ये सहभागी होत असत. त्यात आणखी एक नाव गोवले गेले ते परळच्या शिरोडकर हायस्कूलमधील ज्योतिराम कदम सरांचे!

ज्योतिराम कदम सरांनी स्पर्धेसाठी बसवलेलं ‘सतरा रत्नाचा वग’ हे पहिलंच नाटक. आणि त्यांना पदार्पणात यशही मिळालं. यानंतर त्यांनी स्वतः बालनाट्य लिहायला सुरुवात केली. त्यांचं पहिलं बालनाट्य होतं- ‘काखेत कळसा गावाला वळसा.’ या वगनाट्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके प्राप्त झाली. त्यात मुकुंद माडेकर, श्याम भोर, दत्तात्रय उदास, सुनीता वाडे आणि सुनील गुप्ते हे कलाकार होते. यापैकी सुनील गुप्ते पुढे डॉक्टरेट करून अमेरिकेत स्थायिक झाला आणि तिथेही सरांनी दिलेला नाट्यवारसा पुढे नेण्यासाठी तो प्रयत्नशील राहिला. ‘महाराष्ट्र विश्व’ या मराठीभाषिकांच्या मंडळातर्फे ‘अलीबाबाची गुहा’ हे नाटक त्याने सादर केलं; ज्याचे भारतातही त्याने प्रयोग केले.

नगर जिल्ह्याातील कर्जत तालुक्यातल्या दगडी बारड या दुष्काळी गावात जन्मलेल्या ज्योतिराम कदम यांचे वडील मुंबईत हमालाची नोकरी करीत. त्यांचे वास्तव्य भायखळ्याला होते. तिथल्या महापालिका शाळेत आणि पुढे परळच्या डॉ. शिरोडकर हायस्कूलमध्ये ज्योतिराम कदमांनी अकरावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. आपले शालेय शिक्षण त्यांनी शिकवण्या व मोलमजुरी करूनच केले. नगरला ते हिंदी विषय घेऊन प्रथम श्रेणीत पदवीधर झाले. त्यानंतर सहज एकदा ते आपल्या जुन्या शाळेतील शिक्षकांना भेटायला मुंबईत आले असताना त्यावेळचे शाळेचे मुख्याध्यापक बेरी यांनी त्यांना आमच्या शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करणार का, असं विचारलं आणि ते लगेच ‘हो’ म्हणाले. तेव्हापासून कदम सर शिरोडकर हायस्कूलमध्ये नोकरी करू लागले. त्यांचे मामा भजनी बुवा होते. त्यांना लोककलेची आवड होती. मामांबरोबर राहत असल्याने त्यांना लोककलेची आवड निर्माण झाली. शाळेतील सर्व सांस्कृतिक कार्यक्रमांत कदम सर आघाडीवर असत. शाळेच्या बालनाट्याची जबाबदारीही त्यांच्यावर सोपवण्यात आली. शाळेचे मोठे व्यासपीठ उपलब्ध झाल्याने ते विविध कार्यक्रम सादर करीत. शाहीर खामकर मंडळीच्या कलापथकातही ते काम करत असत. त्यांना विनोदाची चांगली समज होती. त्यामुळे ते कलापथकात अल्पावधीतच प्रसिद्ध झाले.

नाट्यनिर्मितीसाठी आवश्यक सर्व अंगांची माहिती ज्योतिराम कदम यांना होती. त्यांच्या नाटकांतून ते प्रकर्षाने जाणवे. त्यांची ‘केल्याने होत आहे रे!’, ‘आम्ही आपले रंगरंगीले’, ‘खोट्याच्या कपाळी गोटा’, ‘नारद झाला गारद’, ‘जनसेवा हीच ईश्वरसेवा’, ‘माझं पाखरू’ ,‘एकरूप होऊ सगळे’ यासारखी अनेक बालनाट्ये त्यांनी सादर केली.

नाटकाचा विषय मुलांच्या शालेय जीवनाशी संबंधित हवा हे तर खरंच; पण त्याचबरोबर शाळा मुलांवर ज्या प्रकारचे संस्कार करू इच्छिते त्याला तो पूरकही असायला हवा. नाटकाची भाषा, संवादांतील ठसका, पात्रांचे स्वभावरेखाटन ही भाषिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये मुलांना उलगडून दाखवणे शिक्षकांना नित्याच्या चौकटीत शक्य नसते. मात्र, ज्योतिराम कदम याला अपवाद होते. त्यांची बालनाट्ये शालेय रंगमंचापुरतीच सीमित न राहता सर्व तऱ्हेच्या प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत.

त्यांच्या ‘केल्याने होत आहे रे!’ या बालनाट्यासाठी १९८२ साली मुंबई आकाशवाणी केंद्राला सर्वोत्कृष्ट बालनाट्याचा पुरस्कार प्राप्त झाला. राष्ट्रीय स्तरावर आकाशवाणीला पहिल्यांदाच हे असे यश मिळाले होते. विशेष म्हणजे आकाशवाणीच्या सर्वभाषिक केंद्रांतून हे बालनाट्य सर्वोत्कृष्ट ठरले होते. कारण ते ज्योतिराम कदम यांनी अनेक वर्षं मुलांच्या सहवासात राहून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्या व्यथा त्यांच्याच भाषेत मांडल्या होत्या. या बालनाट्याचं अतिशय प्रयोगशील सादरीकरण त्यांनी केलं होतं. तेही लोककलेच्या माध्यमातून!

ज्योतिराम कदम त्यांनी बालनाट्यांचा एक वेगळा बाज रंगभूमीला दिला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे तसेच चित्रपती व्ही. शांताराम यांनीही त्यांचं कौतुक केलं होतं. बाळासाहेबांनी तर या बालनाट्याचे प्रयोग सगळ्या शिवसेना शाखांमधून करावेत असा आदेशच दिला होता. शाळेमध्ये १४ वर्षं सेवा करून ते पुण्याच्या बालभारतीत निर्माता म्हणून गेले. तिथे त्यांनी सुमारे साडेपाचशेहून अधिक चित्रफिती तयार करून वेगवेगळे विषय हाताळले. तिथेही त्यांनी आपला ठसा उमटवला. तिथून निवृत्त झाल्यानंतरही त्यांची रंगभूमीची सेवा सुरूच होती. त्यांच्या मागदर्शनाखाली घडलेल्यांमध्ये विकास कदम, दीपाली शेलार-विचारे, देवेंद्र शेलार, संजय खापरे या रंगकर्मीची नावे घेता येतील. गावागावांत जाऊन बालरंगभूमीबद्दल मुलांना माहिती देणे आणि त्यांच्या कार्यशाळा घेण्याचे त्यांचे काम निरंतर चालूच होते. त्यांनी गरीब मुलांसाठी स्वतःच्या खिशातले पैसे खर्च करून अभिनय कार्यशाळा घेतल्या. शासनाने त्यांची साहित्य संस्कृती मंडळ व पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचे सदस्य म्हणून नियुक्ती करून त्यांचा सन्मान केला होता. गेली ३५ वर्षे बालनाट्य स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या ‘रविकिरण मंडळा’चे ते एक आधारस्तंभ होते. असा हा रंगकर्मी! प्रसिद्धीपासून सदैव दूर राहिलेल्या आणि केवळ शालेय रंगभूमीशी एकनिष्ठ असलेल्या ज्योतिराम कदम यांचे योगदान म्हणूनच महत्त्वाचे ठरते.

# राशिभविष्य

● ९ ते १५ मे २०२१ ● स्मिता अतुल गायकवाड

## मेष : अनुकूलतेची चाहूल

अमावास्या तुमच्याच राशीतून होत आहे. मागील अनुभवातून शिकलेल्या गोष्टी विसरून चालणार नाही. इतर कोणाच्या निर्णयावर स्वतःचे मत ठरवणे योग्य राहणार नाही. विचारपूर्वक कृतीतून यश मिळेल. नोकरदार वर्गाची स्थिती ताकसुद्धा फुंकून प्यावे अशी होती. सध्या या अवस्थेतून बाहेर पडाल. चलबिचलता कमी होईल. कामात मन गुंतेल. उद्योगधंद्यात मात्र अनुकूलतेची चाहूल लागेल. व्यवसायात जोम आणि उत्साह टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहाल. आतुरतेने वाट पाहत असलेली संधी चालून येईल. आर्थिकदृष्ट्या शुभ पडघम वाजू लागतील. सामाजिक क्षेत्रात सामोपचाराने तोडगा काढला जाईल. शेजारी धर्माशी हितसंबंध चांगले राहतील याची काळजी घ्या. मानसिक कणखरपणा कायम टिकवून ठेवा. आरोग्याचा त्रास कमी होईल.

शुभ दिनांक : १३, १४

महिलांसाठी : मन प्रसन्न ठेवा.

## वृषभ : नियोजनाप्रमाणे चाला

अमावास्या व्ययस्थानातून होत आहे. बोलण्यातून गैरसमज वाढणार नाही, याची काळजी घ्या. कायदा क्षेत्रासाठी एक पाऊल मागे आलेले चांगले. सप्ताहात कोणाला जामीनदार होण्यासाठी शब्द देऊ नका. न जमणाऱ्या गोष्टींसाठी आश्वासन देणे योग्य होणार नाही. नोकरदार वर्गाने नियोजनाप्रमाणे चाला. वरिष्ठांनी ठरवून दिलेल्या कामामध्ये परवानगीशिवाय बदल करू नका. व्यावसायिकदृष्ट्या अनेकांशी संवाद साधावा लागेल. व्यापारी क्षेत्रात पुढे जाण्याचा मार्ग मोकळा होऊ लागेल. त्यातूनच एखादी संधी मिळेल. खर्चाची बाजू योग्य पद्धतीने हाताळल्यास आर्थिक प्रकरणात मनासारखी दिशा मिळेल. सार्वजनिक ठिकाणी जुन्या ओळखीचा उपयोग होईल. सहकाऱ्यांच्या माध्यमातून स्वतःचे स्वप्न पूर्ण करू शकाल. कौटुंबिकदृष्ट्या समाधानाचे वारे वाहू लागेल. आहारावर योग्य ते नियंत्रण ठेवा.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : आपल्या यशस्वी कामातून आपली ओळख होईल.

## मिथुन : स्वतःला सिद्ध कराल

अमावास्या लाभस्थानातून होत आहे. नवे मार्ग मिळायला सुरुवात होईल. ओळखीचा उपयोग करून घ्याल. रखडलेल्या योजनांना मार्ग मिळेल. चारी बाजूने असणारी जबाबदारी योग्यरीत्या पार पाडाल. नोकरदार वर्गाला सामुदायिक कामांमध्ये थोडी उसंत मिळेल. काही व्यक्तींना तुमच्या मार्गदर्शनाची गरज भासेल. लहान-मोठ्या संधीतून वेगळी उपलब्धता निर्माण करता येईल. भागीदारी व्यवसायात कोणालाही न दुखावता व्यवहाराचे गणित अचूक करा. नवीन व मोठ्या गुंतवणुकीचे पर्याय स्वीकारू नका. व्यवसायामधील उत्पादनाची गरज लक्षात घ्या. त्यानुसारच पावले उचला. आर्थिकदृष्ट्या भावनिक गोष्टींना थारा देऊ नका. मित्रांविषयी वाटणारी काळजी कमी होईल. मुलांच्या आरोग्याचा प्रश्न सुटेल मिटेल. कौटुंबिकदृष्ट्या स्वतःला सिद्ध कराल. आरोग्य उत्तम राहील.

शुभ दिनांक : ९, १२

महिलांसाठी : खर्चावर नियंत्रण ठेवा.

## कर्क : यश लाभेल

चंद्रग्रहाचे भ्रमण भाग्यस्थानातून लाभस्थानाकडे होत आहे. अगदी आखून ठेवल्याप्रमाणे कामाचे व्यवस्थापन घडत आहे, याचा अनुभव सप्ताहात येईल. किचकट गोष्टींचा सामना कमी होत गेल्याने, एक उत्साहाचे वातावरण निर्माण होईल. अमावास्या दशमस्थानातून होत आहे.

नोकरीमध्ये आगामी काळाचे अपेक्षित फळ मिळेल. पत्रव्यवहारातून होणारा नवा बदल सकारात्मक विचार वाढवणारा असेल. व्यापारी वृद्धीच्या प्रयत्नांना यश मिळेल. नवीन व्यवसायासाठी व्यक्तिगत महत्त्वाचे निर्णय मात्र उशिरा घेतलेले चांगले. वैद्यकीय क्षेत्रातील वर्गाला यश येईल. संशोधनात्मक गोष्टींमध्ये मोठे कौतुक होईल. पैशांची कामे होत राहतील. सामाजिक क्षेत्रात होत असणारी मदत योग्य कारणी लावताना समाधान वाटेल. कौटुंबिक जीवनात स्वतःच्या मर्यादा पाळल्यास आनंददायी घटना अनुभवाल. प्रकृती स्वास्थ्य ठणठणीत राहील.

शुभ दिनांक : ९, १३

महिलांसाठी : नवे काही शिकण्याचा छंद जोपासाल.

## सिंह : प्रगतीचा मार्ग मिळेल

अमावास्या भाग्यस्थानातून होत आहे. या कालावधीत आध्यात्मिक गोष्टींमध्ये मन रमेल. ग्रहांचा शुभ परिणाम पाहावयास मिळेल. नोकरदार वर्गाची त्रासातून मुक्तता होईल. पोलीस, लष्करी ,अग्निशामक खात्यातील व्यक्तींचा प्रतिकूल काळ कमी होईल. वरिष्ठांचे सहकार्य उत्तम मिळेल. भागीदारी व्यवसायात परिवर्तन घडेल. नव्याने एकत्रित भांडवल गुंतवताना व्यवहाराला महत्त्व द्या. उत्पन्नाचा काही भाग स्वतःच्या गुंतवणुकीत करा. व्यापारी क्षेत्रातील आशादायक काळ लवकरच भरारी घेईल. आर्थिकदृष्ट्या लाभदायक प्रगतीचा मार्ग मिळेल.

राजकीय क्षेत्रात विरोधकांची बौद्धिक क्षेत्रातील मक्तेदारी मोडून काढण्यात यशस्वी व्हाल. मुलांच्या गैरव्यवहाराला वेळीच आवर घाला. वैवाहिक जीवनात जुन्या आठवणी जाग्या होतील. नातेवाईकांकडून सुवार्ता समजतील. किरकोळ वाटणारे शारीरिक त्रास कमी होतील.

शुभ दिनांक : १४, १५

महिलांसाठी : पळापळ कमी होईल.

## कन्या : स्वकर्तृत्वावर विश्वास

अमावास्या अष्टमस्थानातून होत आहे. मनाची मानसिक दुविधा कमी करा. कोणतेही निर्णय घेण्यापूर्वी विचार करा. शांतपणे अंमलबजावणी करा. नोकरदार वर्गाने कामाची सांगड घालताना वरिष्ठांशी वाद होणार नाहीत, याची काळजी घ्या. आळस झटकून कामाला लागा. व्यापारी क्षेत्रात इतरांना दिलेली आश्वासने पूर्ण कराल. मार्गस्थ झालेल्या गोष्टींमध्ये यश मिळेल. अनेक सुविधा वेळेवर उपलब्ध होतील. पैशांचे व्यवहार करताना लोभी व धूर्त लोकांपासून लांब राहा. राजकीय क्षेत्रात वादाच्या मुद्द्याला हात घालू नका. जोडीदाराची साथ संगत चांगली राहील. भावंडांना असणारी अडचण कमी करण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिकदृष्ट्या स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवा. अध्यात्मिक गोष्टीत मन रमेल. सकस आहार व शारीरिक व्यायाम करा.

शुभ दिनांक : १३,१४

महिलांसाठी : रागावर नियंत्रण ठेवा.

## तूळ : कामावर पकड ठेवा

चंद्र ग्रहाचे भ्रमण षष्ठस्थानातून अष्टमस्थानाकडे होत आहे. अमावस्या सप्तमस्थानातून होत आहे. अफवांवर विश्वास ठेवून गैरसमज वाढवून घेऊ नका. बोलण्यातून इतरांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्या. ज्या गोष्टीचा अंदाज तुम्हाला नाही त्याविषयी वाच्यता करू नका. नोकरदार वर्गाने मनाची चलबिचलता कमी करा. कामावर लक्ष केंद्रित करा. सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेत काळजी न करता पुढे जा. व्यावसायिकदृष्ट्या धैर्य बाळगा.

ठरवलेले कामकाज पुन्हा विकसित करण्यासाठी वेळ पाहावी लागत असली तरी ती पूर्ण करण्याचे ध्येय मात्र सोडू नका. कामावर पकड ठेवा. उशिरा का होईना त्याचे फळ मिळेल. आर्थिक सतर्कता बाळगणे हिताचे राहील. राजकीय क्षेत्रात वरिष्ठांशी नम्रतेने बोला. घरगुती गोष्टी चव्हाट्यावर आणू नका. प्रकृतीची काळजी घ्या.

शुभ दिनांक : १४, १५

महिलांसाठी : घाईगडबडीने कोणतेही काम करू नका.

## वृश्चिक : नियम पाळा

अमावस्या षष्ठस्थानातून होत असताना मानसिक मनोबल वाढवा. विस्कळीत घडी रुळावर येण्यासाठी प्रयत्नशील राहा. ग्रहस्थिती सरळ मार्गे नसली तरी अवघडही नाही. आत्मविश्वास ठाम ठेवून कार्य करा. नोकरदार वर्गाला कामाची व्याप्ती वाढलेली असेल. मात्र मर्यादा लक्षात घ्या. नियमांच्या चौकटीत राहून कामे करा. कोणत्याही कृतीची अंमलबजावणी करताना सत्यता पडताळून पाहा. व्यापारी क्षेत्रात दुसऱ्याला शब्द देताना व्यवहार जपून करा.

प्रसंगात घाईगडबड करणे टाळा. अति धाडस करू नका. खर्च कमी करून आर्थिक बचत वाढवण्याकडे लक्ष द्या. सामाजिक क्षेत्रात संतुलन राखा. कौटुंबिकदृष्ट्या तणाव वाढणार नाही यासाठी प्रयत्नशील राहा. मानसिक ताणतणाव टाळा. आरोग्याचे तंत्र बिघडू देऊ नका.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : वडीलधाऱ्या व्यक्तींची काळजी घ्या.

## धनू : सूत्रसंचालन करा

अमावस्या पंचमस्थानातून होत आहे. अनोळखी व्यक्तींपासून येणारा प्रस्ताव स्वीकारणे योग्य ठरणार नाही. काही बाबतीत विलंब गृहीत धरलेला चांगला असेल. स्वतःची शिस्त व नियम मोडू नका. नोकरदार व्यक्तींनी वास्तवतेला महत्त्व देत अंमलबजावणी करा. मागे केलेल्या कामांमधील चुका दुरुस्त होतील, त्यामुळे कामावरचा ताण हलका होईल. उद्योगधंद्यात बदल करायची घाई करू नका.

सध्या शांत राहणे पथ्यावर पडेल. भागीदारी व्यवसायात होणाऱ्या निर्णयात प्रत्यक्ष सहभागी व्हा. व्यापारी क्षेत्रात योग्य व्यक्तींच्या माध्यमातून अपेक्षित कामे पूर्ण करू शकाल. आर्थिक गुंतवणूक करताना लांबचा विचार करावा लागेल. राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करताना योग्य असे सूत्रसंचालन करा. कोणतेही निर्णय घेताना घरातील सगळ्यांचे एकमत करण्यावर भर द्या. आरोग्य जपा.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : धार्मिक कृत्यांमध्ये मन रमेल.

## मकर : परिवर्तन घडेल

अमावस्या चतुर्थ स्थानातून होत आहे. अमावस्या कालावधीत घरातील ज्येष्ठांशी बोलताना सकारात्मकता ठेवा. ग्रहमान संमिश्र स्वरूपाचे असेल. नोकरदारांना कामाचे परीक्षण करून आढावा घ्यावा लागेल. कामात शिथिलता ठेवून चालणार नाही.

अनपेक्षित असे परिवर्तन घडून येईल. व्यापारी क्षेत्रात सुलभता येईल. उद्योगधंद्यांना होणारा तोटा कमी होईल. कारखानदारीचे प्रश्न मार्गी लागण्याचे संकेत दिसू लागतील. नियम व अटींचे पालन करावे लागेल. यशाचे प्रमाण वाढलेले असेल. वित्तहानी कमी होईल.

आर्थिक गुंतवणूक वाढेल. सामाजिक क्षेत्रात सामोपचाराने तोडगा निघेल. मुलांसोबत करमणूक कराल. भावंडांविषयी असलेली चिंता मिटेल. आध्यात्मिकदृष्ट्या मनोबल वाढवा. जुन्या व्याधींचा त्रास कमी होईल.

शुभ दिनांक : १४, १५

महिलांसाठी : पुढील गोष्टींचे आधीच नियोजन करा.

## कुंभ : कामांना गती मिळेल

अमावस्या पराक्रम स्थानातून होत आहे. इतरांशी संवाद कौशल्य जपून करा. नोकरदार वर्गाला वेळेनुसार कामकाज करणे चांगले जमेल. कामातील चिवटपणा स्थिर राहण्यास मदत होईल. अनेक गोष्टींचे तर्कवितर्क करणे सोपे जाईल. वरिष्ठांचे वर्चस्व चांगले राहील. व्यावसायिकदृष्ट्या रचनात्मक बदल होतील. अवघड गोष्टी सोप्या होऊ लागतील. पुढील नियोजन ठरवणे आता अडचणीचे वाटणार नाही. आखलेल्या योजना प्रत्यक्षात दिसू लागतील. प्रलंबित कामांना गती मिळेल. आर्थिक गोष्टींचा त्रास कमी होईल. धनाचे मार्ग मोकळे होतील. राजकीय घडामोडींचा आढावा घेताना, सतर्कता बाळगल्याने प्रत्येक गोष्ट पद्धतशीरपणे हाताळाल. कौटुंबिकदृष्ट्या अनुकूल वातावरण असेल. जोडीदाराशी असलेले मतभेद कमी होतील. प्रकृती ठणठणीत ठेवण्याचा प्रयत्न कराल.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : निरीक्षणशक्ती उत्तम राहील.

## मीन : प्रशंसा होईल

अमावस्या धनस्थानातून होत आहे. व्यक्तिगत उलाढाली वाढवण्यासाठी समयसूचकता ठेवा. संयम सोडून चालणार नाही. बोलताना शब्दातील धार कमी करा. नोकरदार वर्गाची कामातील दगदग कमी होईल. महत्त्वाचे करार करण्यास योग्य वेळ आहे. या संधीचा फायदा घेऊन वरिष्ठांशी बोलून घ्या. कालांतराने बदलणारे स्वरूप यशाचा प्रकाश देणारे ठरेल. व्यापारी वर्गाने स्वतःला मोबदला कसा मिळेल, याकडे लक्ष द्या. इतरांशी स्पर्धा करणे टाळा. हिशोबाचे ताळतंत्र चुकणार नाही याची दक्षता घ्या. फायद्याचे प्रमाण वाढावे म्हणून लोभ वाढवू नका. व्यावहारिक गोष्टींना महत्त्व द्या. आर्थिक चक्र सुरळीत चालू होईल. सामाजिक क्षेत्रात थोरामोठ्यांचा सल्ला घ्या. शेजारधर्म व भाऊबंदकी यांच्याकडून तुमच्या कामाबद्दल प्रशंसा होईल. जोडीदाराच्या भावनांचा आदर कराल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील.


शुभ दिनांक: ९, १४

महिलांसाठी : अधिक पाठपुरावा करणे टाळा.

gsmita332@gmail.com

epaper.loksatta.com





## शाहरूख आणि भन्साळी पुन्हा एकत्र काम करणार

प्रतिनिधी

**दोन दशकांपूर्वी** 'देवदास' या सुपरहिट चित्रपटाच्या निमित्ताने अभिनेता शाहरूख खान आणि दिग्दर्शक संजय लीला भन्साळी ही जोडगोळी एकत्र आली होती. मात्र त्या चित्रपटानंतर भन्साळींना शाहरूखबरोबर पुन्हा काम करायची इच्छा असूनही ही जोडी कधी एकत्र आली नाही. आता इतक्या वर्षांनी भन्साळींनी शाहरूखसमोर एका चित्रपटाचा प्रस्ताव ठेवला असल्याचे समजते. 'इजहार' असे या चित्रपटाचे नाव असून भन्साळींनी शाहरूखसाठी पुन्हा एकदा या चित्रपटाच्या पटकथेवर काम सुरू केले आहे. 'देवदास'नंतर शाहरूखबरोबर काम करण्यासाठी भन्साळींनी अनेकदा प्रयत्न केले. त्यांनी 'बाजीराव मस्तानी' आणि 'पद्मावत' चित्रपटासाठी त्याला विचारणा केली होती. दोन्ही वेळा त्यांची बोलणी फिस्कटली आणि रणवीर सिंगला घेऊन भन्साळींनी दोन्ही चित्रपट केले. सलमान आणि शाहरूख खानला एकत्र आणत 'हम दिल दे चुके सनम'च्या सिक्वलचाही त्यांनी घाट घातला होता, मात्र तोही कधी फळाला आला नाही. त्यानंतर सुप्रसिद्ध गीतकार साहिर लुधियानवी यांच्यावर चरित्रपट करायचा विचार भन्साळींच्या मनात होता, त्याची चरित्रपटासाठी शाहरूख हीच त्यांची पसंती होती. तोही प्रकल्प बारगळला आणि ही जोडी पुन्हा एकत्र येऊ शकली नाही. इतक्या वर्षांनंतर मात्र भन्साळींनी शाहरूखबरोबर काम करायचंच असा चंग बांधला आहे. सध्या भन्साळी 'हीरा मंडी' या वेबमालिकेच्या निर्मितीत व्यग्र आहेत. अभिनेत्री सोनाक्षी सिन्हाची यात मुख्य भूमिका आहे. या वेबमालिकेनंतर भन्साळी यांच्या मनात राहून गेलेल्या आणखी एका प्रेमकथेवर ते काम सुरू करणार आहेत. 'इजहार' नावाने त्यांनी ही प्रेमकथा काही वर्षांपूर्वी शाहरूखसाठीच लिहिली होती. एका भारतीय तरुणाच्या वास्तव प्रेमकथेवर हा चित्रपट आधारित असल्याचे समजते. नॉर्वेत राहणाऱ्या आपल्या प्रेयसीला भेटण्यासाठी कित्येक मैल सायकलवरून प्रवास केलेल्या तरुणाची ही कथा आहे. आता भन्साळींनी पुन्हा एकदा या चित्रपटाच्या पटकथेवर काम सुरू केले आहे. शाहरूखला ही पटकथा पसंत पडली तर लवकरच या चित्रपटाच्या चित्रीकरणाची तयारी सुरू होईल.

# कलाकारांचा कृतिपट

**करोना संसर्गाच्या दुसऱ्या लाटेची तीव्रता वाढत असूनही अद्याप लोकांमध्ये नियमांचे पालन करण्याबाबत गांभीर्य दिसत नसल्याने आता कलाकार जनजागृतीसाठी पुढे आले आहेत. घराबाहेर पडू नका, सकारात्मकता बाळगा असा संदेश कलाकार समाजमाध्यमांच्या आधारे देत आहेत. काही कलाकारांनी स्वतः रक्तदान करून लोकांना त्यासाठी आवाहन केले आहे. आपल्या चित्रपटांच्या प्रसिद्धीपासून ते समुद्रकिनाऱ्यावर सुट्टी घालवत काढलेल्या छायाचित्रांपर्यंतची सगळी माहिती देण्यात आपली समाजमाध्यमे खर्ची घालवणाऱ्या बॉलीवूड कलाकारांनीही सध्या त्याचा वापर करोनाकाळात नागरिकांच्या मदतीसाठी सुरू केला आहे. केवळ जनजागृती करून कलाकार थांबलेले नाहीत तर आर्थिक मदत उभी करण्यापासून प्राणवायू सिलेंडर्स उपलब्ध करणे, कोव्हिड सेंटर उभारणीसाठी मदत करणे अशा मदतकार्यातही ते मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले आहेत.**







लोकसत्ता प्रतिनिधी

**गेल्या वर्षी** मार्च-एप्रिल महिन्यात करोनाचा संसर्ग वाढत असताना कलाकारांनी एक पाऊल पुढे टाकत प्रतिबंधात्मक नियमांबाबत नागरिकांना आवाहन केले, चित्रफिती निर्माण केल्या, शक्य तिथे मदतीसाठी ते स्वतः उभे राहिले. आताही करोना संसर्गाचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याने नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी, मदतीसाठी कलाकार पुन्हा एकदा सरसावले आहेत. मराठी नाट्य कलाकार संघाने चित्रफितीच्या माध्यमातून 'गरज नसेल तर कशाला?' असा प्रश्न विचारला आहे. कारणाविना लोक घराबाहेर पडत असल्याने त्याला आळा बसावा म्हणून हे आवाहन करण्यात आले आहे. या चित्रफितीत ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, ज्येष्ठ अभिनेते शशिकांत गंधे, अभिनेते विवेक लागू, शरद पोंक्षे, विजय पाटकर, मयुरेश पेम, दिग्दर्शक राजेश देशपांडे आणि कलाकार संघाचे अध्यक्ष प्रदीप कबरे यांचा सहभाग आहे. याशिवाय भरत जाधव, केदार शिंदे, दीपक राज्याध्यक्ष, सारंग साठ्ये आणि इतर रंगकर्मीही जनजागृती करून लोकांमध्ये सकारात्मकता निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

'आपण आपल्यापर्यंत संसर्ग येऊ दिला नाही तर तो इतरांपर्यंत पोहोचणार नाही. ज्यामुळे आपल्याला देशातील संसर्गावर नियंत्रण मिळवता येईल. आठ दिवसांच्या भाज्या एकदाच आणा, सोसायटीच्या आवारातच व्यायाम करा, बाहेर न पडता पोलीस प्रशासनाला सहकार्य करा,' असे आवाहन अभिनेते सुबोध भावे यांनी केले आहे.

अभिनेता स्वप्निल जोशी यानेही समाजमाध्यमांचा वापर केवळ करोनाविषयी जनजागृती करण्यासाठी करणार असल्याचे म्हटले आहे. 'करोनाचे युद्ध जिंकण्यासाठी समाजमाध्यम उपयोगी ठरू शकते. याद्वारे सकारात्मक माहिती लोकांपर्यंत पोहोचवून एकमेकांना आधार देण्याचे काम करू या. समाजमाध्यमांद्वारे मनोरंजनात्मक मजकूर पोहोचवण्याऐवजी लोकांच्या मदतीसाठी त्याचा वापर करू या,' असा संदेश त्याने दिला.

### बॉलीवूडही सक्रिय

आत्तापर्यंत घराणेशाहीवरून होणाऱ्या टीकेला तोंड देण्यातच व्यग्र असलेल्या धर्मा प्रॉडक्शन आणि यशराज प्रॉडक्शन या दोन मोठ्या चित्रपट निर्मिती संस्थांनी आपापल्या परीने मदतकार्यात उडी घेतली आहे. धर्मा प्रॉडक्शनची समाजमाध्यमे यापुढे केवळ करोना जनजागृतीसाठीच कार्यरत राहणार असल्याचे निर्मिती संस्थेने इन्स्टाग्रामवर जाहीर केले आहे. 'युवा' या संस्थेच्या सहकार्याने करोनासंदर्भातील आवश्यक माहिती, औषधे-इंजेक्शन यांची उपलब्धता या साऱ्या संदर्भातील माहिती लोकांपर्यंत धर्मा प्रॉडक्शनच्या समाजमाध्यमांवरून पोहोचवण्यात येणार आहे.

■ यशराज प्रॉडक्शनने याआधी रोजंदारीवर असलेल्या चित्रपट कर्मचारी आणि तंत्रज्ञांसाठी मदतकार्य सुरू केले होते. आता त्यांनी 'द यश चोप्रा फाऊंडेशन्स साथी इनिशिएटिव्ह' हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत चित्रपटसृष्टीतील वयोवृद्ध कलाकार-तंत्रज्ञ आणि महिला कर्मचाऱ्यांना ५ हजार रुपये दिले जाणार आहेत. शिवाय, रोजंदारीवर असणाऱ्या कलाकारांना महिनाभर त्यांच्या चारजणांच्या कुटुंबाला पुरेल एवढा किराणा वाटपही करण्यात येणार आहे. 'युथ फीड इंडिया' या सामाजिक संस्थेबरोबर ते हा उपक्रम राबवणार आहेत.

■ सलमान खाननेही रोजंदारीवर काम करणाऱ्या कलाकारांना आर्थिक मदत देऊ केली आहे. त्याने याआधी पोलीस अधिकारी आणि इतरांसाठी तयार अन्नाची पाकिटे उपलब्ध करून दिली आहेत. रोजच्या रोज पाच हजार अन्नाची पाकिटे, पाण्याच्या बाटल्या तो देतो आहे. शिवाय, रोजंदारीवर काम करणारे तंत्रज्ञ, स्टंट्समन, ज्युनिअर कलाकार अशा २५ हजार जणांना प्रत्येकी दीड हजार रुपये मदत म्हणून त्याच्याकडून देण्यात येणार आहेत.

■ अभिनेता अजय देवगण याने दादर येथे अतिदक्षता विभाग असलेले करोना रुग्णालय उभारण्यासाठी मदत केली असून बृहन्मुंबई महापालिकेच्या मदतीने करोनासंदर्भातील आवश्यक वैद्यकीय सोयीसुविधा पुरवण्यासाठीही तो काम करतो आहे. त्याच्या 'एनवाय' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातूनही मदतकार्य सुरू आहे. अभिनेता सोनू सूदनेही अशाच प्रकारे प्राणवायू सिलेंडर्स, इंजेक्शन्स, जीवरक्षक प्रणाली असलेल्या खाटांची उपलब्धता करून देण्यासाठी मदतकार्य सुरू केले आहे.

■ दिल्लीतील रुग्णालयात प्राणवायूचा साठा कमी पडतो आहे, याची माहिती मिळाल्यानंतर अभिनेत्री सुश्मिता सेनने धावाधाव सुरू केली. आपल्याकडे पुरेसे प्राणवायूचे सिलेंडर्स उपलब्ध आहेत, पण ते दिल्लीपर्यंत पोहोचवायचे कसे, असा प्रश्न विचारत सुश्मिताने समाजमाध्यमांवरून नागरिकांना आवाहन केले. त्यानंतर मुंबईपासून दिल्लीपर्यंत कुठे कुठे प्राणवायूच्या सिलेंडर्सची गरज आहे? विविध ठिकाणची अतिदक्षता आणि जीवरक्षक प्रणाली खाटा उपलब्ध असलेल्या रुग्णालयांची नावे इत्यादी माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कलाकारांनी आपल्या समाजमाध्यमांचा वापर सुरू केला आहे.

■ करोनाची बाधा झाल्यानंतर विलगीकरणात असलेल्या भूमी पेडणेकरने प्लाझ्मा दान करण्यासाठी लोकांना आवाहन केले आहे. अभिनेता अक्षय कुमारने क्रिकेटपटू गौतम गंभीर याच्या दिल्लीतील सामाजिक संस्थेला करोना रुग्णांच्या मदतकार्यासाठी १ कोटी रुपये दिले आहेत, तर त्याची पत्नी ट्विंकलनेही प्राणवायू सिलेंडर उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

■ अभिनेता गुरमीत चौधरीने लखनऊ आणि पाटणा येथे हजार खाटांचे रुग्णालय उभारण्याचा संकल्प जाहीर केला आहे. अभिनेता आयुषमान खुराणा आणि त्याची पत्नी ताहिरा यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री साहाय्यता निधीला मदत दिली. शाहीद आणि मीरा कपूर, तापसी पन्नू, कतरिना कैफ, दिया मिर्झा, अभिनेता ताहिर भसीनसह अनेक टीव्ही कलाकारांनीही करोना संबंधित उपयुक्त माहिती समाजमाध्यमांवरून देण्यास सुरुवात केली आहे. प्रियांका जोन्स, अनुष्का शर्मा-विराट कोहली, लारा दत्तासारख्या काही सेलिब्रिटींनी आर्थिक मदत देऊ केली आहे. तर अनेक सेलिब्रिटी आर्थिक मदत उभी करून देण्यासाठीही कार्यरत झाले आहेत. सध्या मनोरंजनाची मात्रा कमी करून प्रत्यक्ष समाजाला मदत करण्याच्या भूमिकेतून ते पुन्हा एकदा लोकांशी नव्याने जोडले जात आहेत.





अभिनेत्री तेजस्विनी पंडित हिने रक्तदान करून, 'आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, याची जाण मला कलाकार म्हणून आहे. कलाकार हा संवेदनशीलच असतो. माझ्या रक्तदानातून एकाला जरी प्रेरणा मिळाली तर त्याचे समाधान असेल,' असा संदेश लोकांना दिला आहे. अभिनेता संदीप पाठक यानेही मंगळवारी रक्तदान करून इतरांना रक्तदानासाठी आवाहन केले. तर अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि अभिनेता आरोह वेलणकर यांनीही प्लाझ्मा दानासंदर्भात संदेश दिला आहे.

## रणबीर कपूरची छायाचित्रकारांना तंबी

प्रतिनिधी



करोना असो, टाळेबंदी असो, परिस्थिती कुठलीही असो... कलाकारांना कॅमेऱ्यापासून दूर राहणे शक्यच होत नाही. बॉलीवूड कलाकारांना तर विमानतळापासून रुग्णालयापर्यंत सगळीकडे कॅमेऱ्याचा सामना करावा लागतो. एरव्ही कलाकार आणि छायाचित्रकारांचे संबंध हे तसे मैत्रीपूर्णच असतात, मात्र कधी कधी कॅमेऱ्याचा हा ससेमिरा कलाकारांना नकोसा होतो. आवरता आवरेना अशी कलाकारांची स्थिती असते, तर आहे त्या परिस्थितीत चांगल्यातले चांगले छायाचित्र काढून ते लोकांपर्यंत पोहोचवण्याशिवाय छायाचित्रकारांसमोरही पर्याय नसतो. कधीतरी या मैत्रीत वादाची ठिणगीही पडते, सलमान खान आणि छायाचित्रकारांमध्ये झालेला वाद आणि बराच काळचा अबोला सगळ्यांनाच लक्षात असेल. सलमानसारखा राग नाही, मात्र छायाचित्रकारांना तंबी देण्याचे काम नुकतेच रणबीर कपूरने केले आहे.

काही दिवसांपूर्वी रणबीरला करोनाची बाधा झाली होती, त्यातून बरा झाल्यानंतर आईबरोबर क्लिनिकमध्ये जाण्यासाठी बाहेर पडलेल्या रणबीरची छायाचित्रकारांशी गाठ पडली होती. अर्थात, त्या वेळी राज्यात संचारबंदी सुरू होती. अशा परिस्थितीत समोर इतक्या छायाचित्रकारांना पाहून 'आप का लॉकडाऊन नही है क्या?' असा प्रश्न रणबीरने त्यांना विचारला होता. त्यावर छायाचित्रकारांनी आपलं काम सुरू असल्याचं त्याला सांगितलं होतं. रणबीर तेव्हाही नाराज होता, त्याने यामागचं कारणही त्यांना विचारलं, अखेरीस अंतरनियम पाळण्याचे आवाहन करत त्याने सुरक्षित अंतरावरून आपली छायाचित्रे काढू दिली. मात्र गमती गमतीत छायाचित्रकारांना प्रश्न विचारणाऱ्या रणबीरच्या चेहऱ्यावरील नाराजी तेव्हाही लपली नव्हती. या घटनेला काही दिवस होतात न होतात पुन्हा एकदा आपल्या मागे लागलेल्या छायाचित्रकारांना तंबी देण्याचा प्रसंग त्याच्यावर ओढवला. अभिनेता ऋषी कपूर यांना जाऊन एक वर्ष झाले, त्यानिमित्ताने अभिनेत्री नीतू कपूर यांनी आपल्या घरी श्रद्धांजलीचा कार्यक्रम ठेवला होता. या कार्यक्रमासाठी रणबीर आणि त्याची प्रेयसी अभिनेत्री अलिया भट्ट दोघेही हजर झाले होते. अशा प्रसंगात खरंतर कॅमेऱ्याचाच काय बाहेरच्या कोणाचीही भेट होणं कोणालाच न रुचणारं... मात्र इथे इमारतीच्या प्रवेशद्वारावरच छायाचित्रकारांना पाहून आरके वैतागला. या वेळी मात्र त्याने आपली नाराजी बोलून दाखवली. 'तुम्ही हे योग्य करत नाही आहात', असे त्याने सुनावले. इतकेच नाही तर आपल्यामागे कोणीही इमारतीत प्रवेश करू नका, असेही त्याने सुनावले. अखेर उपस्थित छायाचित्रकारांनीही त्याच्याकडे दिलगिरी व्यक्त करत प्रसंग सावरण्याचा प्रयत्न केला.



**काळानुरूप समाजाच्याच विचारांचं प्रतिबिंब आजच्या चित्रपटांतून पडतं आहे. समाज बदलत जातो तसे त्यांचे बदलत जाणारे विषयच आपल्यासमोर येत असतात. आपण जे नवनवे विषय येत आहेत म्हणतो ते दुसरं काय असतं? 'फोटो प्रेम' चित्रपटाचंही तेच आहे. आजकाल लोकांमध्ये फोटोचं किती वेड आहे. आपण सतत सेल्फी घेत असतो, पण असाही एक काळ होऊन गेला आहे जेव्हा एक फोटो काढणं हाही सोहळा असायचा. अशा वातावरणात वाढलेल्या बाईला आजच्या या आधुनिक काळात आपल्या फोटोतून आपली ओळख जपावीशी वाटणं, आपली ओळख पुढच्या पिढीला होईल असा एकही चांगला फोटो आपल्याकडे नाही याचीही भीती तिला वाटते आणि फोटो काढून घ्यायचीही भीती वाटते. सेल्फीच्या या जगात आपला एक फोटो काढून घेण्यासाठी धडपडणाऱ्या माईची गोष्ट ही एक प्रकारे समाजाचेच प्रतिबिंब आहे.**

नीना कुलकर्णी

# 'समाजबदलातून कलाकृती घडतात'

रेश्मा राईकवार

**रंगभूमी ते ओटीटी** माध्यमांवरील वेबमालिका-वेबपटांपर्यंतचा पल्ला गाठणाऱ्या मराठी कलाकारांपैकी अग्रणी म्हणून अभिनेत्री नीना कुलकर्णी यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांची अभिनय क्षेत्रातील सुरुवात पंडित सत्यदेव दुबे, विजयाबाई मेहतांसारख्या गुरूंच्या हाताखाली झाली आणि आजही नवनवीन माध्यमांची आव्हाने पेलत त्या समर्थपणे या क्षेत्रात वावरत आहेत. नीना कुलकर्णी यांची मुख्य भूमिका असलेला 'फोटो प्रेम' हा चित्रपट ॲमेझॉन प्राइमवर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने गप्पा मारत असताना आमची कलाकारांची पिढीच भाग्यवान आहे, असं त्या म्हणतात.

'आमच्याच काळात वेगवेगळी माध्यमे आली आणि विकसित होत गेली. आम्ही रंगभूमीवर वावरलो. त्यानंतर दूरचित्रवाणीसारखे माध्यम आले, चित्रपट आले, लघुपट आले, ओटीटी माध्यमे आली. प्रत्येक माध्यमात आम्हाला काम करण्याची संधी मिळाली. नाही तर आमच्यापेक्षाही थोर कलाकार होऊन गेले आहेत, पण त्यांना रंगभूमी सोडून दुसरे कोणतेच माध्यम उपलब्ध झाले नाहीत,' असं त्या सांगतात. अर्थात नव्या माध्यमांची आव्हाने आपल्या पिढीने सहज पेलली यामागचं कारण सांगताना त्या म्हणतात, आमच्या सगळ्यांच्या अभिनयाचा पाया पक्का आहे. आम्हाला चांगल्या गुरूंकडून अभिनयाचे धडे मिळाले. त्यामुळे माध्यम कोणतेही असले तरी आम्हाला फरक पडला नाही. आमच्या वेळचे आम्ही सगळे कलाकार आजही त्याच उत्साहाने काम करतो आहोत. उलट नवनवीन भूमिका करण्यात आम्हाला फार रस वाटतो. वयानुसार नवनवीन तंत्रज्ञान, विषय आम्ही आत्मसात करत आहोत. मी १९८९ मध्ये 'हमीदाबाईची कोठी' हे नाटक केलं होतं, त्या वेळी मी त्यात शब्बोची मध्यवर्ती भूमिका केली होती. तब्बल २१ वर्षांनी मी हेच नाटक केलं तेव्हा त्यात हमीदाबाईंची मध्यवर्ती भूमिका केली. हे वयाचे वेगवेगळे टप्पे आहेत, असं नाही म्हणणार. हा एक प्रवास आहे आणि तो करायला आवडतो म्हणून मी आजही आवडीने तो करते आहे, असं त्या म्हणतात.



'फोटो प्रेम' हा आदित्य राठी आणि गायत्री पाटील या दोन तरुण दिग्दर्शकांचा चित्रपट आहे. यात नीना कुलकर्णी यांनी माई ही मध्यवर्ती भूमिका साकारली आहे. अत्यंत वेगळ्या विषयावरचा हा चित्रपट मी करू शकेन, असा त्यांना विश्वास वाटला हीच माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे, असं त्या म्हणतात. गेल्या काही वर्षांत तरुण दिग्दर्शकांनी कथा-दिग्दर्शन सगळ्याच बाबतीत एक वैविध्य आणलं आहे. पन्नास वर्षांपूर्वी असा विषय कोणाला सुचला असता असं मला वाटत नाही, असं म्हणणाऱ्या नीना कुलकर्णींनी कलाकार आणि दिग्दर्शक हे नातं वेगवेगळ्या टप्प्यावर कसं अनुभवलं याविषयीही सविस्तर अनुभव सांगितला. 'मी सुरुवात केली तेव्हा आमचे दिग्दर्शक आमच्यापेक्षा मोठे गुरुतुल्य असे होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही काम करत गेलो. नंतरच्या काळात समवयस्क दिग्दर्शक आले. त्या वेळी एक कलाकार-दिग्दर्शक असं मैत्रीचं नातं अनुभवता आलं आणि त्यानंतर मग माझ्यापेक्षा लहान वयाच्या तरुण दिग्दर्शकांशी गाठ पडली. आत्ताच्या पिढीचे दिग्दर्शक हुशार आहेत, त्यांच्याकडे तंत्रज्ञान आहे आणि ते चित्रपट क्षेत्राकडे करिअर म्हणून पाहतात. पूर्वी असं नव्हतं. चित्रपट फक्त त्यांची आवड नाही, ते त्यांचे ध्येय आहे. ते त्या ध्यासाने झपाटून जाऊन काम करतात. 'फोटो प्रेम'चंच उदाहरण घ्यायचं तर या गोष्टीतली भावना मोठी आहे, पण तो एक भावनिक क्षण त्यांनी संपूर्ण लांबीच्या चित्रपटकथेत सुंदररीत्या गुंफला आहे, असं त्यांनी सांगितलं.

काळानुरूप समाजाच्याच विचारांचं प्रतिबिंब आजच्या चित्रपटांतून पडतं आहे, असं ठाम मत त्या व्यक्त करतात. 'समाज बदलत जातो तसे त्यांचे बदलत जाणारे विषयच आपल्यासमोर येत असतात. आपण जे नवनवे विषय येत आहेत म्हणतो ते दुसरं काय असतं? 'फोटो प्रेम'च्याच बाबतीत बोलायचं तर हा विषय तुम्हाला कसा सुचला? असा प्रश्न मी आदित्य आणि गायत्रीला विचारला होता. तेव्हा ते म्हणाले, आजकाल लोकांमध्ये फोटोचं किती वेड आहे. आपण सतत सेल्फी घेत असतो, पण असाही एक काळ होऊन गेला आहे जेव्हा एक फोटो काढणं हाही सोहळा असायचा. अशा वातावरणात वाढलेल्या बाईला आजच्या या आधुनिक काळात आपल्या फोटोतून आपली ओळख जपावीशी वाटणं, आपली ओळख पुढच्या पिढीला होईल असा एकही चांगला फोटो आपल्याकडे नाही याचीही भीती तिला वाटते आणि फोटो काढून घ्यायचीही भीती वाटते. सेल्फीच्या या जगात आपला एक फोटो काढून घेण्यासाठी धडपडणाऱ्या माईची गोष्ट ही एक प्रकारे समाजाचेच प्रतिबिंब आहे. समाजात होणाऱ्या बदलांमधूनच कलाकृती घडत जाते असं मला वाटतं आणि हे काही आज नाही. पिढ्यान्‌पिढ्या कलाकृती अशाच घडत आल्या आहेत.'

हिंदी-मराठी मालिकांबरोबरच फ्रेंच चित्रपटही त्यांनी केला आहे. त्याविषयी बोलताना, फ्रेंच भाषेतील पदवीधर असल्याने फ्रेंच भाषेतील एक मालिका करण्याची संधी मिळाली. नंतर मग मी 'नोसेस' नावाचा फ्रेंच चित्रपट प्रत्यक्ष तिथे जाऊन केला. 'द बेस्ट एक्झॉटिक मॅरीगोल्ड हॉटेल' हा हॉलीवूडपट केला. हे अनुभव खूप काही देऊन जातात. माझी जडणघडण पाश्चात्त्य वळणाने झाली आहे. माझे आईवडील डॉक्टर, शिक्षण कॉन्व्हेंटमधून झालेलं... त्यामुळे मला अप्रूप काही वाटत नव्हतं. फ्रेंच माणसं झपाटून जाऊन काम करतात. त्यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभव खूपच सुंदर होता. त्यानिमित्ताने तिथल्या काही लोकांशी माझी खूप छान मैत्री झाली, नवी नाती तयार झाली, असं त्यांनी सांगितलं.

'शेवरी' या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटाची निर्मिती त्यांनी केली होती. माझा नवरा दिलीप याला चित्रपटनिर्मितीत खूप रस होता, तो जगला असता तर त्याने चित्रपटनिर्मिती नक्कीच केली असती. त्याची ती इच्छा पूर्ण करावी या उद्देशाने मी हा एकच चित्रपट केला, असं त्यांनी स्पष्ट केलं. सध्या त्या उमरगावमध्ये 'स्वराज्यजननी जिजामाता' मालिकेचं चित्रीकरण करत आहेत. जिजाऊ ही एक मोठी हस्ती होती, त्यांच्या नखाचीही सर आपल्या कोणाला येणं शक्य नाही; पण त्यांची भूमिका मला करायला मिळते आहे यासारखा दुसरा आनंद नाही. अतिशय जिद्दीने आणि मनस्वीपणे मी ती भूमिका करते आहे आणि ते लोकांपर्यंत पोहोचतं आहे हे त्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून लक्षात येतं, असं त्यांनी सांगितलं. या मालिकेचे नवीन भाग लोकांपर्यंत पोहोचलेच पाहिजेत आणि त्यासाठी सगळे जण नियम पाळून चित्रीकरण करत आहेत, असंही त्या म्हणाल्या.

'फोटो प्रेम' हा चित्रपट ॲमेझॉन प्राइमवर प्रदर्शित होत असल्याने तो खूप लोकांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ओटीटीवर भाषेचा काही प्रश्न येत नाही. तुम्ही सबटायटल्सच्या माध्यमातून वेगवेगळ्या भाषांतील चित्रपट पाहू शकता. त्यामुळे चित्रपटगृह बंद असताना जास्तीत जास्त लोकांपर्यंत चित्रपट पोहोचवण्यासाठी ओटीटी हे महत्त्वाचं माध्यम ठरलं असल्याचं त्या सांगतात.



# कलाकारांचा कृतिपट

करोना संसर्गाच्या दुसऱ्या लाटेची तीव्रता वाढत असूनही अद्याप लोकांमध्ये नियमांचे पालन करण्याबाबत गांभीर्य दिसत नसल्याने आता कलाकार जनजागृतीसाठी पुढे आले आहेत. घराबाहेर पडू नका, सकारात्मकता बाळगा असा संदेश कलाकार समाजमाध्यमांच्या आधारे देत आहेत. काही कलाकारांनी स्वतः रक्तदान करून लोकांना त्यासाठी आवाहन केले आहे. आपल्या चित्रपटांच्या प्रसिद्धीपासून ते समुद्रकिनाऱ्यावर सुट्टी घालवत काढलेल्या छायाचित्रांपर्यंतची सगळी माहिती देण्यात आपली समाजमाध्यमे खर्ची घालवणाऱ्या बॉलीवूड कलाकारांनीही सध्या त्याचा वापर करोनाकाळात नागरिकांच्या मदतीसाठी सुरू केला आहे. केवळ जनजागृती करून कलाकार थांबलेले नाहीत तर आर्थिक मदत उभी करण्यापासून प्राणवायू सिलेंडर्स उपलब्ध करणे, कोव्हिड सेंटर उभारणीसाठी मदत करणे अशा मदतकार्यातही ते मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले आहेत.







**लोकसत्ता प्रतिनिधी**

**गेल्या वर्षी** मार्च-एप्रिल महिन्यात करोनाचा संसर्ग वाढत असताना कलाकारांनी एक पाऊल पुढे टाकत प्रतिबंधात्मक नियमांबाबत नागरिकांना आवाहन केले, चित्रफिती निर्माण केल्या, शक्य तिथे मदतीसाठी ते स्वतः उभे राहिले. आताही करोना संसर्गाचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याने नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी, मदतीसाठी कलाकार पुन्हा एकदा सरसावले आहेत. मराठी नाट्य कलाकार संघाने चित्रफितीच्या माध्यमातून 'गरज नसेल तर कशाला?' असा प्रश्न विचारला आहे. कारणाविना लोक घराबाहेर पडत असल्याने त्याला आळा बसावा म्हणून हे आवाहन करण्यात आले आहे. या चित्रफितीत ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, ज्येष्ठ अभिनेते शशिकांत गंधे, अभिनेते विवेक लागू, शरद पोंक्षे, विजय पाटकर, मयुरेश पेम, दिग्दर्शक राजेश देशपांडे आणि कलाकार संघाचे अध्यक्ष प्रदीप कबरे यांचा सहभाग आहे. याशिवाय भरत जाधव, केदार शिंदे, दीपक राज्याध्यक्ष, सारंग साठ्ये आणि इतर रंगकर्मीही जनजागृती करून लोकांमध्ये सकारात्मकता निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

'आपण आपल्यापर्यंत संसर्ग येऊ दिला नाही तर तो इतरांपर्यंत पोहोचणार नाही. ज्यामुळे आपल्याला देशातील संसर्गावर नियंत्रण मिळवता येईल. आठ दिवसांच्या भाज्या एकदाच आणा, सोसायटीच्या आवारातच व्यायाम करा, बाहेर न पडता पोलीस प्रशासनाला सहकार्य करा,' असे आवाहन अभिनेते सुबोध भावे यांनी केले आहे.

अभिनेता स्वप्निल जोशी यानेही समाजमाध्यमांचा वापर केवळ करोनाविषयी जनजागृती करण्यासाठी करणार असल्याचे म्हटले आहे. 'करोनाचे युद्ध जिंकण्यासाठी समाजमाध्यम उपयोगी ठरू शकते. याद्वारे सकारात्मक माहिती लोकांपर्यंत पोहोचवून एकमेकांना आधार देण्याचे काम करू या. समाजमाध्यमांद्वारे मनोरंजनात्मक मजकूर पोहोचवण्याऐवजी लोकांच्या मदतीसाठी त्याचा वापर करू या,' असा संदेश त्याने दिला.

## बॉलीवूडही सक्रिय

आत्तापर्यंत घराणेशाहीवरून होणाऱ्या टीकेला तोंड देण्यातच व्यग्र असलेल्या धर्मा प्रॉडक्शन आणि यशराज प्रॉडक्शन या दोन मोठ्या चित्रपट निर्मिती संस्थांनी आपापल्या परीने मदतकार्यात उडी घेतली आहे. धर्मा प्रॉडक्शनची समाजमाध्यमे यापुढे केवळ करोना जनजागृतीसाठीच कार्यरत राहणार असल्याचे निर्मिती संस्थेने इन्स्टाग्रामवर जाहीर केले आहे. 'युवा' या संस्थेच्या सहकार्याने करोनासंदर्भातील आवश्यक माहिती, औषधे-इंजेक्शन यांची उपलब्धता या साऱ्या संदर्भातील माहिती लोकांपर्यंत धर्मा प्रॉडक्शनच्या समाजमाध्यमांवरून पोहोचवण्यात येणार आहे.

■ यशराज प्रॉडक्शनने याआधी रोजंदारीवर असलेल्या चित्रपट कर्मचारी आणि तंत्रज्ञांसाठी मदतकार्य सुरू केले होते. आता त्यांनी 'द यश चोप्रा फाऊंडेशन्स साथी इनिशिएटिव्ह' हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत चित्रपटसृष्टीतील वयोवृद्ध कलाकार-तंत्रज्ञ आणि महिला कर्मचाऱ्यांना ५ हजार रुपये दिले जाणार आहेत. शिवाय, रोजंदारीवर असणाऱ्या कलाकारांना महिनाभर त्यांच्या चारजणांच्या कुटुंबाला पुरेल एवढा किराणा वाटपही करण्यात येणार आहे. 'युथ फीड इंडिया' या सामाजिक संस्थेबरोबर ते हा उपक्रम राबवणार आहेत.

■ सलमान खाननेही रोजंदारीवर काम करणाऱ्या कलाकारांना आर्थिक मदत देऊ केली आहे. त्याने याआधी पोलीस अधिकारी आणि इतरांसाठी तयार अन्नाची पाकिटे उपलब्ध करून दिली आहेत. रोजच्या रोज पाच हजार अन्नाची पाकिटे, पाण्याच्या बाटल्या तो देतो आहे. शिवाय, रोजंदारीवर काम करणारे तंत्रज्ञ, स्टंट्समन, ज्युनिअर कलाकार अशा २५ हजार जणांना प्रत्येकी दीड हजार रुपये मदत म्हणून त्याच्याकडून देण्यात येणार आहेत.

■ अभिनेता अजय देवगण याने दादर येथे अतिदक्षता विभाग असलेले करोना रुग्णालय उभारण्यासाठी मदत केली असून बृहन्मुंबई महापालिकेच्या मदतीने करोनासंदर्भातील आवश्यक वैद्यकीय सोयीसुविधा पुरवण्यासाठीही तो काम करतो आहे. त्याच्या 'एनवाय' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातूनही मदतकार्य सुरू आहे. अभिनेता सोनू सूदनेही अशाच प्रकारे प्राणवायू सिलेंडर्स, इंजेक्शन्स, जीवरक्षक प्रणाली असलेल्या खाटांची उपलब्धता करून देण्यासाठी मदतकार्य सुरू केले आहे.

■ करोनाची बाधा झाल्यानंतर विलगीकरणात असलेल्या भूमी पेडणेकरने प्लाझ्मा दान करण्यासाठी लोकांना आवाहन केले आहे. अभिनेता अक्षय कुमारने क्रिकेटपटू गौतम गंभीर याच्या दिल्लीतील सामाजिक संस्थेला करोना रुग्णांच्या मदतकार्यासाठी १ कोटी रुपये दिले आहेत, तर त्याची पत्नी ट्विंकलनेही प्राणवायू सिलेंडर उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

■ अभिनेता गुरमीत चौधरीने लखनऊ आणि पाटणा येथे हजार खाटांचे रुग्णालय उभारण्याचा संकल्प जाहीर केला आहे. अभिनेता आयुषमान खुराणा आणि त्याची पत्नी ताहिरा यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री साहाय्यता निधीला मदत दिली. शाहीद आणि मीरा कपूर, तापसी पन्नू, कतरिना कैफ, दिया मिर्झा, अभिनेता ताहिर भसीनसह अनेक टीव्ही कलाकारांनीही करोना संबंधित उपयुक्त माहिती समाजमाध्यमांवरून देण्यास सुरुवात केली आहे. प्रियांका जोन्स, अनुष्का शर्मा-विराट कोहली, लारा दत्तासारख्या काही सेलिब्रिटींनी आर्थिक मदत देऊ केली आहे. तर अनेक सेलिब्रिटी आर्थिक मदत उभी करून देण्यासाठीही कार्यरत झाले आहेत. सध्या मनोरंजनाची मात्रा कमी करून प्रत्यक्ष समाजाला मदत करण्याच्या भूमिकेतून ते पुन्हा एकदा लोकांशी नव्याने जोडले जात आहेत.





अभिनेत्री तेजस्विनी पंडित हिने रक्तदान करून, 'आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, याची जाण मला कलाकार म्हणून आहे. कलाकार हा संवेदनशीलच असतो. माझ्या रक्तदानातून एकाला जरी प्रेरणा मिळाली तर त्याचे समाधान असेल,' असा संदेश लोकांना दिला आहे. अभिनेता संदीप पाठक यानेही मंगळवारी रक्तदान करून इतरांना रक्तदानासाठी आवाहन केले. तर अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि अभिनेता आरोह वेलणकर यांनीही प्लाझ्मा दानासंदर्भात संदेश दिला आहे.

# रणबीर कपूरची छायाचित्रकारांना तंबी



**प्रतिनिधी**

**करोना असो,** टाळेबंदी असो, परिस्थिती कुठलीही असो... कलाकारांना कॅमेऱ्यापासून दूर राहणे शक्यच होत नाही. बॉलीवूड कलाकारांना तर विमानतळापासून रुग्णालयापर्यंत सगळीकडे कॅमेऱ्याचा सामना करावा लागतो. एरव्ही कलाकार आणि छायाचित्रकारांचे संबंध हे तसे मैत्रीपूर्णच असतात, मात्र कधी कधी कॅमेऱ्याचा हा ससेमिरा कलाकारांना नकोसा होतो. आवरता आवरेना अशी कलाकारांची स्थिती असते, तर आहे त्या परिस्थितीत चांगल्यातले चांगले छायाचित्र काढून ते लोकांपर्यंत पोहोचवण्याशिवाय छायाचित्रकारांसमोरही पर्याय नसतो. कधीतरी या मैत्रीत वादाची ठिणगीही पडते, सलमान खान आणि छायाचित्रकारांमध्ये झालेला वाद आणि बराच काळचा अबोला सगळ्यांनाच लक्षात असेल. सलमानसारखा राग नाही, मात्र छायाचित्रकारांना तंबी देण्याचे काम नुकतेच रणबीर कपूरने केले आहे.

काही दिवसांपूर्वी रणबीरला करोनाची बाधा झाली होती, त्यातून बरा झाल्यानंतर आईबरोबर क्लिनिकमध्ये जाण्यासाठी बाहेर पडलेल्या रणबीरची छायाचित्रकारांशी गाठ पडली होती. अर्थात, त्या वेळी राज्यात संचारबंदी सुरू होती. अशा परिस्थितीत समोर इतक्या छायाचित्रकारांना पाहून 'आप का लॉकडाऊन नही है क्या?' असा प्रश्न रणबीरने त्यांना विचारला होता. त्यावर छायाचित्रकारांनी आपलं काम सुरू असल्याचं त्याला सांगितलं होतं. रणबीर तेव्हाही नाराज होता, त्याने यामागचं कारणही त्यांना विचारलं, अखेरीस अंतरनियम पाळण्याचे आवाहन करत त्याने सुरक्षित अंतरावरून आपली छायाचित्रे काढू दिली. मात्र गमती गमतीत छायाचित्रकारांना प्रश्न विचारणाऱ्या रणबीरच्या चेहऱ्यावरील नाराजी तेव्हाही लपली नव्हती. या घटनेला काही दिवस होतात न होतात पुन्हा एकदा आपल्या मागे लागलेल्या छायाचित्रकारांना तंबी देण्याचा प्रसंग त्याच्यावर ओढवला.

अभिनेता ऋषी कपूर यांना जाऊन एक वर्ष झाले, त्यानिमित्ताने अभिनेत्री नीतू कपूर यांनी आपल्या घरी श्रद्धांजलीचा कार्यक्रम ठेवला होता. या कार्यक्रमासाठी रणबीर आणि त्याची प्रेयसी अभिनेत्री अलिया भट्ट दोघेही हजर झाले होते. अशा प्रसंगात खरंतर कॅमेऱ्याचाच काय बाहेरच्या कोणाचीही भेट होणं कोणालाच न रुचणारं... मात्र इथे इमारतीच्या प्रवेशद्वारावरच छायाचित्रकारांना पाहून आरके वैतागला. या वेळी मात्र त्याने आपली नाराजी बोलून दाखवली. 'तुम्ही हे योग्य करत नाही आहात', असे त्याने सुनावले. इतकेच नाही तर आपल्यामागे कोणीही इमारतीत प्रवेश करू नका, असेही त्याने सुनावले. अखेर उपस्थित छायाचित्रकारांनीही त्याच्याकडे दिलगिरी व्यक्त करत प्रसंग सावरण्याचा प्रयत्न केला.

# राशिभविष्य

• ९ ते १५ मे २०२१ • स्मिता अतुल गायकवाड

## मेष : अनुकूलतेची चाहूल

अमावास्या तुमच्याच राशीतून होत आहे. मागील अनुभवातून शिकलेल्या गोष्टी विसरून चालणार नाही. इतर कोणाच्या निर्णयावर स्वतःचे मत ठरवणे योग्य राहणार नाही. विचारपूर्वक कृतीतून यश मिळेल. नोकरदार वर्गांची स्थिती ताकसुद्धा फुंकून प्यावे अशी होती. सध्या या अवस्थेतून बाहेर पडाल. चलबिचलता कमी होईल. कामात मन गुंतेल. उद्योगधंद्यात मात्र अनुकूलतेची चाहूल लागेल. व्यवसायात जोम आणि उत्साह टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहाल. आतुरतेने वाट पाहत असलेली संधी चालून येईल. आर्थिकदृष्ट्या शुभ पडघम वाजू लागतील. सामाजिक क्षेत्रात सामोपचाराने तोडगा काढला जाईल. शेजारी धर्माशी हितसंबंध चांगले राहतील याची काळजी घ्या. मानसिक कणखरपणा कायम टिकवून ठेवा. आरोग्याचा त्रास कमी होईल.

शुभ दिनांक : १३, १४

महिलांसाठी : मन प्रसन्न ठेवा.

## वृषभ : नियोजनाप्रमाणे चाला

अमावास्या व्ययस्थानातून होत आहे. बोलण्यातून गैरसमज वाढणार नाही, याची काळजी घ्या. कायदा क्षेत्रासाठी एक पाऊल मागे आलेले चांगले. सप्ताहात कोणाला जामीनदार होण्यासाठी शब्द देऊ नका. न जमणाऱ्या गोष्टींसाठी आश्वासन देणे योग्य होणार नाही. नोकरदार वर्गाने नियोजनाप्रमाणे चाला. वरिष्ठांनी ठरवून दिलेल्या कामामध्ये परवानगीशिवाय बदल करू नका. व्यावसायिकदृष्ट्या अनेकांशी संवाद साधावा लागेल. व्यापारी क्षेत्रात पुढे जाण्याचा मार्ग मोकळा होऊ लागेल. त्यातूनच एखादी संधी मिळेल. खर्चाची बाजू योग्य पद्धतीने हाताळल्यास आर्थिक प्रकरणात मनासारखी दिशा मिळेल. सार्वजनिक ठिकाणी जुन्या ओळखीचा उपयोग होईल. सहकाऱ्यांच्या माध्यमातून स्वतःचे स्वप्न पूर्ण करू शकाल. कौटुंबिकदृष्ट्या समाधानाचे वारे वाहू लागेल. आहारावर योग्य ते नियंत्रण ठेवा.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : आपल्या यशस्वी कामातून आपली ओळख होईल.

## मिथुन : स्वतःला सिद्ध कराल

अमावास्या लाभस्थानातून होत आहे. नवे मार्ग मिळायला सुरुवात होईल. ओळखीचा उपयोग करून घ्याल. रखडलेल्या योजनांना मार्ग मिळेल. चारी बाजूने असणारी जबाबदारी योग्यरीत्या पार पाडाल. नोकरदार वर्गाला सामुदायिक कामांमध्ये थोडी उसंत मिळेल. काही व्यक्तींना तुमच्या मार्गदर्शनाची गरज भासेल. लहान-मोठ्या संधीतून वेगळी उपलब्धता निर्माण करता येईल. भागीदारी व्यवसायात कोणालाही न दुखावता व्यवहाराचे गणित अचूक करा. नवीन व मोठ्या गुंतवणुकीचे पर्याय स्वीकारू नका. व्यवसायामधील उत्पादनाची गरज लक्षात घ्या. त्यानुसारच पावले उचला. आर्थिकदृष्ट्या भावनिक गोष्टींना थारा देऊ नका. मित्रांविषयी वाटणारी काळजी कमी होईल. मुलांच्या आरोग्याचा प्रश्न सुटेल मिटेल. कौटुंबिकदृष्ट्या स्वतःला सिद्ध कराल. आरोग्य उत्तम राहील.

शुभ दिनांक : ९, १२

महिलांसाठी : खर्चावर नियंत्रण ठेवा.

## कर्क : यश लाभेल

चंद्रग्रहाचे भ्रमण भाग्यस्थानातून लाभस्थानाकडे होत आहे. अगदी आखून ठेवल्याप्रमाणे कामाचे व्यवस्थापन घडत आहे, याचा अनुभव सप्ताहात येईल. किचकट गोष्टींचा सामना कमी होत गेल्याने, एक उत्साहाचे वातावरण निर्माण होईल. अमावास्या दशमस्थानातून होत आहे.

नोकरीमध्ये आगामी काळाचे अपेक्षित फळ मिळेल. पत्रव्यवहारातून होणारा नवा बदल सकारात्मक विचार वाढवणारा असेल. व्यापारी वृद्धीच्या प्रयत्नांना यश मिळेल. नवीन व्यवसायासाठी व्यक्तिगत महत्त्वाचे निर्णय मात्र उशिरा घेतलेले चांगले. वैद्यकीय क्षेत्रातील वर्गाला यश येईल. संशोधनात्मक गोष्टींमध्ये मोठे कौतुक होईल. पैशांची कामे होत राहतील. सामाजिक क्षेत्रात होत असणारी मदत योग्य कारणी लावताना समाधान वाटेल. कौटुंबिक जीवनात स्वतःच्या मर्यादा पाळल्यास आनंददायी घटना अनुभवाल. प्रकृती स्वास्थ्य ठणठणीत राहील.

शुभ दिनांक : ९, १३

महिलांसाठी : नवे काही शिकण्याचा छंद जोपासाल.

## सिंह : प्रगतीचा मार्ग मिळेल

अमावास्या भाग्यस्थानातून होत आहे. या कालावधीत आध्यात्मिक गोष्टींमध्ये मन रमेल. ग्रहांचा शुभ परिणाम पाहावयास मिळेल. नोकरदार वर्गाची त्रासातून मुक्तता होईल. पोलीस, लष्करी ,अग्निशामक खात्यातील व्यक्तींचा प्रतिकूल काळ कमी होईल. वरिष्ठांचे सहकार्य उत्तम मिळेल. भागीदारी व्यवसायात परिवर्तन घडेल. नव्याने एकत्रित भांडवल गुंतवताना व्यवहाराला महत्त्व द्या. उत्पन्नाचा काही भाग स्वतःच्या गुंतवणुकीत करा. व्यापारी क्षेत्रातील आशादायक काळ लवकरच भरारी घेईल. आर्थिकदृष्ट्या लाभदायक प्रगतीचा मार्ग मिळेल.

राजकीय क्षेत्रात विरोधकांची बौद्धिक क्षेत्रातील मक्तेदारी मोडून काढण्यात यशस्वी व्हाल. मुलांच्या गैरव्यवहाराला वेळीच आवर घाला. वैवाहिक जीवनात जुन्या आठवणी जाग्या होतील. नातेवाईकांकडून सुवार्ता समजतील. किरकोळ वाटणारे शारीरिक त्रास कमी होतील.

शुभ दिनांक : १४, १५

महिलांसाठी : पळापळ कमी होईल.

## कन्या : स्वकर्तृत्वावर विश्वास

अमावास्या अष्टमस्थानातून होत आहे. मनाची मानसिक दुविधा कमी करा. कोणतेही निर्णय घेण्यापूर्वी विचार करा. शांतपणे अंमलबजावणी करा. नोकरदार वर्गाने कामाची सांगड घालताना वरिष्ठांशी वाद होणार नाहीत, याची काळजी घ्या. आळस झटकून कामाला लागा. व्यापारी क्षेत्रात इतरांना दिलेली आश्वासने पूर्ण कराल. मार्गस्थ झालेल्या गोष्टींमध्ये यश मिळेल. अनेक सुविधा वेळेवर उपलब्ध होतील. पैशांचे व्यवहार करताना लोभी व धूर्त लोकांपासून लांब राहा. राजकीय क्षेत्रात वादाच्या मुद्द्याला हात घालू नका. जोडीदाराची साथ संगत चांगली राहील. भावंडांना असणारी अडचण कमी करण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिकदृष्ट्या स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवा. अध्यात्मिक गोष्टीत मन रमेल. सकस आहार व शारीरिक व्यायाम करा.

शुभ दिनांक : १३,१४

महिलांसाठी : रागावर नियंत्रण ठेवा.

## तूळ : कामावर पकड ठेवा

चंद्र ग्रहाचे भ्रमण षष्ठस्थानातून अष्टमस्थानाकडे होत आहे. अमावस्या सप्तमस्थानातून होत आहे. अफवांवर विश्वास ठेवून गैरसमज वाढवून घेऊ नका. बोलण्यातून इतरांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्या. ज्या गोष्टीचा अंदाज तुम्हाला नाही त्याविषयी वाच्यता करू नका. नोकरदार वर्गाने मनाची चलबिचलता कमी करा. कामावर लक्ष केंद्रित करा. सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेत काळजी न करता पुढे जा. व्यावसायिकदृष्ट्या धैर्य बाळगा.

ठरवलेले कामकाज पुन्हा विकसित करण्यासाठी वेळ पाहावी लागत असली तरी ती पूर्ण करण्याचे ध्येय मात्र सोडू नका. कामावर पकड ठेवा. उशिरा का होईना त्याचे फळ मिळेल. आर्थिक सतर्कता बाळगणे हिताचे राहील. राजकीय क्षेत्रात वरिष्ठांशी नम्रतेने बोला. घरगुती गोष्टी चव्हाट्यावर आणू नका. प्रकृतीची काळजी घ्या.

शुभ दिनांक : १४, १५

महिलांसाठी : घाईगडबडीने कोणतेही काम करू नका.

## वृश्चिक : नियम पाळा

अमावस्या षष्ठस्थानातून होत असताना मानसिक मनोबल वाढवा. विस्कळीत घडी रुळावर येण्यासाठी प्रयत्नशील राहा. ग्रहस्थिती सरळ मार्गे नसली तरी अवघडही नाही. आत्मविश्वास ठाम ठेवून कार्य करा. नोकरदार वर्गाला कामाची व्याप्ती वाढलेली असेल. मात्र मर्यादा लक्षात घ्या. नियमांच्या चौकटीत राहून कामे करा. कोणत्याही कृतीची अंमलबजावणी करताना सत्यता पडताळून पाहा. व्यापारी क्षेत्रात दुसऱ्याला शब्द देताना व्यवहार जपून करा.

प्रसंगात घाईगडबड करणे टाळा. अति धाडस करू नका. खर्च कमी करून आर्थिक बचत वाढवण्याकडे लक्ष द्या. सामाजिक क्षेत्रात संतुलन राखा. कौटुंबिकदृष्ट्या तणाव वाढणार नाही यासाठी प्रयत्नशील राहा. मानसिक ताणतणाव टाळा. आरोग्याचे तंत्र बिघडू देऊ नका.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : वडीलधाऱ्या व्यक्तींची काळजी घ्या.

## धनू : सूत्रसंचालन करा

अमावस्या पंचमस्थानातून होत आहे. अनोळखी व्यक्तींपासून येणारा प्रस्ताव स्वीकारणे योग्य ठरणार नाही. काही बाबतीत विलंब गृहीत धरलेला चांगला असेल. स्वतःची शिस्त व नियम मोडू नका. नोकरदार व्यक्तींनी वास्तवतेला महत्त्व देत अंमलबजावणी करा. मागे केलेल्या कामांमधील चुका दुरुस्त होतील, त्यामुळे कामावरचा ताण हलका होईल. उद्योगधंद्यात बदल करायची घाई करू नका.

सध्या शांत राहणे पथ्यावर पडेल. भागीदारी व्यवसायात होणाऱ्या निर्णयात प्रत्यक्ष सहभागी व्हा. व्यापारी क्षेत्रात योग्य व्यक्तींच्या माध्यमातून अपेक्षित कामे पूर्ण करू शकाल. आर्थिक गुंतवणूक करताना लांबचा विचार करावा लागेल. राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करताना योग्य असे सूत्रसंचालन करा. कोणतेही निर्णय घेताना घरातील सगळ्यांचे एकमत करण्यावर भर द्या. आरोग्य जपा.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : धार्मिक कृत्यांमध्ये मन रमेल.

## मकर : परिवर्तन घडेल

अमावस्या चतुर्थ स्थानातून होत आहे. अमावस्या कालावधीत घरातील ज्येष्ठांशी बोलताना सकारात्मकता ठेवा. ग्रहमान संमिश्र स्वरूपाचे असेल. नोकरदारांना कामाचे परीक्षण करून आढावा घ्यावा लागेल. कामात शिथिलता ठेवून चालणार नाही.

अनपेक्षित असे परिवर्तन घडून येईल. व्यापारी क्षेत्रात सुलभता येईल. उद्योगधंद्यांना होणारा तोटा कमी होईल. कारखानदारीचे प्रश्न मार्गी लागण्याचे संकेत दिसू लागतील. नियम व अटींचे पालन करावे लागेल. यशाचे प्रमाण वाढलेले असेल. वित्तहानी कमी होईल.

आर्थिक गुंतवणूक वाढेल. सामाजिक क्षेत्रात सामोपचाराने तोडगा निघेल. मुलांसोबत करमणूक कराल. भावंडांविषयी असलेली चिंता मिटेल. आध्यात्मिकदृष्ट्या मनोबल वाढवा. जुन्या व्याधींचा त्रास कमी होईल.

शुभ दिनांक : १४, १५

महिलांसाठी : पुढील गोष्टींचे आधीच नियोजन करा.

## कुंभ : कामांना गती मिळेल

अमावस्या पराक्रम स्थानातून होत आहे. इतरांशी संवाद कौशल्य जपून करा. नोकरदार वर्गाला वेळेनुसार कामकाज करणे चांगले जमेल. कामातील चिवटपणा स्थिर राहण्यास मदत होईल. अनेक गोष्टींचे तर्कवितर्क करणे सोपे जाईल. वरिष्ठांचे वर्चस्व चांगले राहील. व्यावसायिकदृष्ट्या रचनात्मक बदल होतील. अवघड गोष्टी सोप्या होऊ लागतील. पुढील नियोजन ठरवणे आता अडचणीचे वाटणार नाही. आखलेल्या योजना प्रत्यक्षात दिसू लागतील. प्रलंबित कामांना गती मिळेल. आर्थिक गोष्टींचा त्रास कमी होईल. धनाचे मार्ग मोकळे होतील. राजकीय घडामोडींचा आढावा घेताना, सतर्कता बाळगल्याने प्रत्येक गोष्ट पद्धतशीरपणे हाताळाल. कौटुंबिकदृष्ट्या अनुकूल वातावरण असेल. जोडीदाराशी असलेले मतभेद कमी होतील. प्रकृती ठणठणीत ठेवण्याचा प्रयत्न कराल.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : निरीक्षणशक्ती उत्तम राहील.

## मीन : प्रशंसा होईल

अमावस्या धनस्थानातून होत आहे. व्यक्तिगत उलाढाली वाढवण्यासाठी समयसूचकता ठेवा. संयम सोडून चालणार नाही. बोलताना शब्दातील धार कमी करा. नोकरदार वर्गांची कामातील दगदग कमी होईल. महत्त्वाचे करार करण्यास योग्य वेळ आहे. या संधीचा फायदा घेऊन वरिष्ठांशी बोलून घ्या. कालांतराने बदलणारे स्वरूप यशाचा प्रकाश देणारे ठरेल. व्यापारी वर्गाने स्वतःला मोबदला कसा मिळेल, याकडे लक्ष द्या. इतरांशी स्पर्धा करणे टाळा. हिशोबाचे ताळतंत्र चुकणार नाही याची दक्षता घ्या. फायद्याचे प्रमाण वाढावे म्हणून लोभ वाढवू नका. व्यावहारिक गोष्टींना महत्त्व द्या. आर्थिक चक्र सुरळीत चालू होईल. सामाजिक क्षेत्रात थोरामोठ्यांचा सल्ला घ्या. शेजारधर्म व भाऊबंदकी यांच्याकडून तुमच्या कामाबद्दल प्रशंसा होईल. जोडीदाराच्या भावनांचा आदर कराल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील.

शुभ दिनांक: ९, १४

महिलांसाठी : अधिक पाठपुरावा करणे टाळा.

gsmita332@gmail.com

epaper.loksatta.com



# जागतिक मातृदिन विशेष

An initiative by RED* Read. Engage. Deliver.



ADVERTORIAL

# ‘आईपणा’च्या शोधात...

**आई ही व्यक्ती असली तरी आईपण ही वृत्ती आहे, भावना आहे. ती भावना जेवढी व्यापक होत जाईल तितकं तिच्यामध्ये प्रेम, शांतता, बंधुत्व, सहृदयता, एकोपा सामावत राहील..पण आज त्याचीच वानवा आहे. बाजारीकरण झालेल्या ‘मदर्स डे’चा निषेध त्याची जन्मदात्री ॲना जार्विसनंही केला होता. काय आहे ‘मदर्स डे’चा जगव्यापी अर्थ.. जागतिक मातृदिनानिमित्ताने...**

प्रतिनिधी

‘‘**सॉरी, खरंच** सॉरी, मला पश्चात्ताप होतोय, मी का हा ‘मदर्स डे’ सुरू केला. मला अपेक्षित ‘मदर्स डे’ हा नाही. हा एका आईचा नाही तर आईपणाचा उत्सव असायला हवा. मातृत्वाच्या भावनेचा सोहळा असायला हवा, पण त्याचा आज जो काही धंदा झाला आहे तो पाहता त्यातलं पावित्र्य नष्ट झालंय. आईला फक्त शुभेच्छा कार्ड, कॅन्डीज् आणि फुलं पाठवून तो नाही साजरा करता येत. त्याच्यापलीकडे जाता आलं पाहिजे. हा दिवस खरंच रद्द झाला पाहिजे.’’

‘मदर्स डे’ची आई असणाऱ्या ॲना जार्विसचं (१८०४–१९४८) हे म्हणणं आजही अगदी तंतोतंत लागू पडतं. प्रत्येक गोष्टीचं बाजारीकरण करणाऱ्या भावनांचंही भांडवल करणाऱ्या आजच्या व्यवहारी जगात मातृत्वातल्या व्यापक भावनेला जपणं कमी होत चाललेलं आहेच. उरलाय तो व्यक्तीकेंद्री स्वार्थ, म्हणूनच की काय आपल्या देशात किंवा अगदी जगभर हिंसाचाराचं थैमान सुरू आहे. त्यासाठीच मातृदिनामागची खरी प्रेरणा जाणून घेण्याची गरज निर्माण झाली आहे. तो सोहळा खऱ्या अर्थाने सुरू करण्याची गरज निर्माण झाली आहे.

ॲनाने आपल्या आईच्या, ॲनच्या स्मृतिप्रीत्यर्थ ‘मदर्स डे’ सुरू करण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले खरे, पण त्याची रुजवात तिच्या आईनेच करून ठेवली होती. एकोणिसाव्या शतकात अमेरिकेत जन्माला आलेल्या ॲना रीव्हज् जार्विसचं (१८३२–१९०५)आयुष्य तसं सरळ सुरू होतं. मात्र पुढच्या राजकीय, सामाजिक उलथापालथीने तिच्या आयुष्याला वेगळ्या वाटेवर आणून सोडलं. अकरा मुलांना जन्म देणाऱ्या ॲनला सात मुलांचा मृत्यू बघावा लागला. तिचं मातृहृदय विव्हळलं खरं, पण जेव्हा मातृहृदय परपीडा जाणत वैयक्तिक दुःखाच्या पलीकडे जात विशाल होत जातं तेव्हा हातून खूप काही मोठं घडतं. तिच्याबाबतीत तेच घडलं. आजूबाजूची परिस्थिती चिंता निर्माण करणारीच होती. ॲनने परिसरातील सगळ्याच समदुःखी आईंसाठी काम सुरू केलं. मुलं अल्पवयात दगावू नयेत, त्यांची योग्य देखभाल व्हावी यासाठी संघटना तयार केली आणि त्याला नाव दिलं, ‘मदर्स फ्रेंडशिप क्लब’.

दरम्यान, अमेरिकेतील नागरी युद्धाने (१८६१–१८६५) जोर धरला. कोणतंही युद्ध जीवितहानी करणारच, पुन्हा एकदा तिच्यातल्या मातृहृदयाने अनेकांना साद घातली. तिला प्रतिसाद देत तिच्या क्लबने सैनिक कोणत्याही बाजूचा असो, निष्पक्षपणे सेवा करत अनेकांचे प्राण वाचवले. पण तेवढं पुरेसं नव्हतंच. युद्ध संपल्यावर त्यांचे प्रयत्न सुरू झाले ते प्रेमाचे, मैत्रीचे बंध निर्माण करणारे. युद्धामुळे विभागल्या गेलेल्या कुटुंबीयांना एकत्र आणण्याचे प्रयत्न! तिने त्या दिवसाला नाव दिलं, ‘मदर्स फ्रेंडशिप डे’. कुटुंबाला बांधून ठेवणारी आईच असते. भावंडांमधला दुवा तीच असते, हीच भावना जागती ठेवत सर्व आईंना एकत्र करणं, बंधुत्व निर्माण करणं आणि पुढे जात या आईपणाचा गौरव करणं तिने आपलं जीवितकार्य ठरवलं. युद्धापेक्षा ती प्रेमाचा, शांततेचा पुरस्कार करत राहिली. आईपण म्हणजे काय याचा वस्तुपाठच तिनं घालून दिला त्या काळात.

तिच्या निधनानंतर आईचं हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी झटली ती ॲना. जगात शांतता, सलोखा, अनुकंपा आणायची असेल तर आईचा, आईपणाचा सन्मान, आदर व्हायलाच पाहिजे, ही तिची भावना. त्याला व्यापकत्व द्यायचं तर आईपणाचा गौरव करण्यासाठी ‘मदर्स डे’ मोठ्या प्रमाणावर साजरा करायची कल्पना तिने मांडली आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी हर तऱ्हेचे प्रयत्न सुरू केले. तिच्या आणि तिच्या समर्थकांच्या प्रयत्नांना यश आलं आणि १९१४ मध्ये तत्कालीन राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांनी त्याला मान्यता दिली ती, आई– देशाची शक्ती आणि स्फूर्तीचा महत्त्वपूर्ण स्रोत असते, अशा गौरवास्पद शब्दांत! दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी (ॲनच्या स्मृतीदिनानिमित्ताने) राष्ट्रीय रजा देऊन तो साजरा करायचं ठरलं, अनेक देशांमध्ये ‘मदर्स डे’ साजरा होऊ लागला, पण याचा वेगळाच अर्थ लावला गेला. ‘आईपणा’च्या गौरवापेक्षा आईचा, तिच्या त्यागाचा, कुटुंबावरील प्रेमाचा सन्मान अशा व्याख्येत ‘मदर्स डे’चं व्यापकत्व वैयक्तिक होत संकुचित झालं. साहजिकच त्याला व्यावसायिक रूप येऊ लागलं. एका कार्यक्रमाला तिला जाता आलं नाही म्हणून तिने उपस्थित आईंना वाटण्यासाठी तिच्या आईला आवडणारी, शांततेची निदर्शक पांढरी कार्नेशनची फुले तिने पाठवून दिली. तिच्या मते, कार्नेशनची फुले पाकळ्या गाळत नाहीत, ते कोमेजतं, पण शेवटपर्यंत सगळ्या पाकळ्या धरून ठेवतं, जे आई करत असते, म्हणून हे फूल. पण पुढे ‘मदर्स डे’ म्हणजे कार्नेशनची फुलं, असं समीकरण झालं आणि या फुलाचा बाजार सुरू झाला. ‘मदर्स डे’ आला की या फुलांच्या किमती नको तितक्या वाढू लागल्या.




त्याच्या रंगांना अर्थ आले. अनेकांनी या दिवसाचा वापर वेगवेगळ्या कारणांसाठी फंड गोळा करण्यासाठी सुरू केला. गिफ्टस, शुभेच्छा कार्डस् यांच्या धंद्याला बरकत आली. (आज जगभरात या दिवशी १६ कोटी शुभेच्छा कार्ड विकली जातात म्हणे.) भावनेचा असा मांडला गेलेला बाजार ॲनाला सहन होईना. तिच्या म्हणण्यानुसार तो असा वैयक्तिक साजरा करायचा तर आईला नुसत्या कॅन्डीज, कार्ड पाठवून प्रेम दाखवण्यापेक्षा तिला मोठी पत्र लिहा, तिला जाऊन भेटा, तिच्या सहवासात राहा, पण ते होत नव्हतं. अखेर तिने त्या विरोधात आवाज उठवायला सुरुवात केली. इतका की एका मोठ्या कार्यक्रमात शांतता भंग केला म्हणून तिला अटकही करण्यात आली. शेवटचा प्रयत्न म्हणून तिने हा दिवस रद्द करावा म्हणून कोर्टात धाव घेतली. (१९२३) तरीही दरवर्षी मातृदिनाचा एकदिवसीय सोहळा रंगू लागला आणि कोट्यवधींची उलाढाल होत संपूही लागला. त्यामागचं पावित्र्य, आदर, कुटुंबांमधला स्नेह, माणसामाणसांतील प्रेम, बंधुत्व, सगळ्यांचं एकत्र येणं सारं सारं पैशांच्या वावटळीत उडून गेलं.

स्वतः कधीही आई न बनू शकलेली ॲना ‘मदर्स डे’ची आई झाली खरी, पण अखेर एकटी पडली. कफल्लक झालेल्या आजारी अवस्थेतल्या ॲनाला आधार मिळाला तो तिथल्या आरोग्याश्रमाचा. असं म्हणतात की ‘मदर्स डे’मुळे श्रीमंत झालेल्या फुलांच्या व्यापाऱ्यांनीच तिच्या तिथल्या सगळ्या खर्चाची जबाबदारी उचलली. पैशांचा झगमगाटात एका सच्च्या भावनेचा अस्त झाला. पण हेच आजचं वास्तव नाही का? पैशांच्या, सत्तेचा माज इतका वाढतो आहे की माणूस माणसाला ओळखायला विसरतोय, तिथे ही मातृत्वाची साद कोण ऐकणार? युद्ध असो की रोजच्या जगण्यातला माणसामाणसांमधला संघर्ष, तो नुकसानच करत असतो. एकमेकांविषयी तिरस्कार, अपरिहार्यपणे दुखं, वेदना आणि ऱ्हासच जन्माला घालतो. तो दूर करायचा असेल तर प्रत्येकाने आपल्यातलं आईपण जपलं पाहिजे. आईपणातल्या मातृत्वाला, सहृदयतेला जपलं पाहिजे तरच आजूबाजूला स्वार्थासाठी चाललेली, सत्तेसाठी चाललेली, जाती–धर्माच्या नावाखाली आपल्याच माणसांची हत्या थांबवू शकू. आज आईपणामागचा व्यापक अर्थ नव्याने जाणून घेण्याची वेळ आली आहे. कारण जगात शांतता, बंधुत्व, एकोपा नांदणं ही काळाची गरज आहे.

आई ही व्यक्ती असली तरी आईपण ही वृत्ती आहे, भावना आहे. ती भावना जेवढी व्यापक होत जाईल तितकं तिच्यामध्ये प्रेम, शांतता, बंधुत्व, सहृदयता, एकोपा सामावत राहील. आजच्या मातृदिनाचा तरी तोच सांगावा आहे.

## प्रसूतितज्ज्ञ आणि प्रसूतिगृह कसे निवडावे?



मातृत्व हे स्त्रीच्या आयुष्यातले सर्वात मोठे वरदान समजले जाते. प्रत्येक जोडप्याला वाटत असते की आपल्या बाळाला जगात आणण्याचा अनुभव आनंददायी आणि सुरक्षित असावा. हा प्रत्येक स्त्रीचा आणि तिच्या नवजात बालकाचा अधिकारच आहे.

परंतु अनेक वेळा पहिल्यांदाच मातापिता होणारी जोडपी अनुभव नसल्यामुळे हॉस्पिटल आणि डॉक्टर कसे निवडावे याबद्दल अनभिज्ञ किंवा साशंक असतात.

म्हणूनच आज आपण पाहू की योग्य स्त्रीरोगतज्ज्ञ किंवा प्रसूतितज्ज्ञ आणि योग्य हॉस्पिटल कोणत्या निकषांवर निवडावे.

**प्राथमिक माहिती**

आजचं युग हे माहिती तंत्रज्ञान आणि स्मार्ट मोबाईल फोन याचं आहे. आपल्याला जी माहिती हवी असते ती आपण एका क्षणात मिळवू शकतो. माहितीचा महापूर आलेला आहे. सगळ्यातून आपल्याला गरजेची व योग्य माहिती मिळणे खूप आवश्यक आहे. त्यासाठी काही मार्गदर्शक मुद्दे पाहूयात. आपण ज्या भागात राहतो त्या भागात किती व कोणती इस्पितळे आहेत हे आपल्याला इंटरनेटच्या माध्यमातून समजू शकते. गुगल किंवा जस्ट डायल / प्रॅक्टो किंवा तत्सम वेबसाईट वापरून तुम्ही ही प्राथमिक माहिती मिळवू शकता. या पर्यायचा फायदा म्हणजे काही क्षणांत तुम्हाला हवी असलेली माहिती तुम्हाला मिळू शकते, आणि त्यामध्ये गुणवत्तेनुसार वर्गीकरण केलेले दिसते परंतु तोटा असा की मिळालेली माहिती विश्वसनीय असेलच याची खात्री नाही. कारण ही माध्यमे डॉक्टरकडून सर्व्हिस चार्ज घेऊन माहिती देत असतात. त्यामुळे जर तुम्ही इंटरनेटच्या माध्यमातून माहिती मिळवत असाल तर रिव्ह्यू नक्की वाचा. अनेकांनी आपल्याला आलेले अनुभव प्रामाणिकपणे नोंदवलेले असतात, त्याचा तुम्हाला फायदा नक्की होईल. परंतु काही वेळेस अती चांगले रिव्ह्यू किंवा अती वाईट रिव्ह्यू शंकास्पद असू शकतात. शिवाय एखाद्या साईटवर हॉस्पिटलचा दूरध्वनी क्रमांक मिळाल्यास, प्रत्यक्ष बोलून किंवा प्रत्यक्ष भेट देऊन खात्री करून घ्या.

तुमच्या शंका आणि प्रश्न विचारण्यास संकोच करू नका. मिळणाऱ्या उत्तरांची नीट पडताळणी करा, डोळे मिटून विश्वास ठेवू नका. आपल्या माहितीतील व्यक्तीने ज्याने स्वत: हॉस्पिटल आणि डॉक्टर यांचा अनुभव घेतला आहे आणि त्याने जर माहिती दिली असेल तर ती सर्वात विश्वसनीय असते.

**इस्पितळांचे प्रकार**

प्रसूतितज्ज्ञ आणि संबंधित सुविधा उपलब्ध असणाऱ्या इस्पितळांना नर्सिंग होम किंवा मॅटर्निटी हॉस्पिटल म्हणतात. नर्सिंग होम दोन प्रकारचे आहेत. जी हॉस्पिटल्स प्रसूतितज्ज्ञाच्या मालकीची आहेत आणि दुसरी ज्या ठिकाणी प्रसूतितज्ज्ञ पॅनल डॉक्टर म्हणून असतात. त्याचप्रमाणे कॉर्पोरेट हॉस्पिटल्स आणि शासकीय रुग्णालयांमध्येसुद्धा या सुविधा तुम्हाला सहजपणे मिळतात. शासकीय रुग्णालयात प्रसूती करण्याचा तुमचा विचार असेल तर शासकीय सुविधा आणि योजनांचा नीट अभ्यास करून त्यांचा निश्चितच लाभ घ्या. तसेच आपत्कालीन परिस्थितीत अशा हॉस्पिटलमध्ये कसे जायचे आणि आपत्कालीन नोंदणी व्यवस्था उपलब्ध आहेत हे आवर्जून पाहायला विसरू नका.

**मार्गदर्शक मुद्दे**

तुमचा तज्ज्ञ डॉक्टर कोण आहे हे सर्वात महत्त्वाचे. जे इस्पितळ निवडाल त्या इस्पितळात स्त्रीरोगतज्ज्ञ, प्रसूतितज्ज्ञ कोण आहेत याची माहिती घ्या. काही इस्पितळांमध्ये ठरावीक डॉक्टर ठरावीक वेळेपुरते उपलब्ध असतात. जर तसे असेल तर पर्यायी डॉक्टर्स कोणते आणि कोणत्या वेळी उपलब्ध आहेत याचीसुद्धा पूर्ण माहिती घ्या. खासगी मॅटर्निटी हॉस्पिटलमध्ये शक्यतो डॉक्टर्स पूर्णवेळ उपलब्ध असतात किंवा गरज पडल्यास कोणत्याही वेळी उपलब्ध होऊ शकतील, अशी सुविधा असते. मात्र याचीही प्रत्यक्ष बोलून खात्री करून घ्या.

शक्यतो असे इस्पितळ निवडा ज्यात बालरोगतज्ज्ञसुद्धा उपलब्ध असेल. बाळाच्या जन्मानंतर त्याची तपासणी, गरज पडल्यास तातडीचे उपचार, यासाठी इस्पितळात कोणत्या प्रकारच्या सुविधा आहेत हे नक्की पाहा. खास नवजात बालकांसाठी असणारी फोटो थेरपीची सुविधा, NICU (बालकांसाठी असणारा अतिदक्षता विभाग) हे सर्व असेल तर उत्तमच, मात्र जर नसेल तर किमान गरज पडल्यास दुसऱ्या इस्पितळात नेण्याची सोय असायलाच हवी. तसे करायचे झाल्यास वाहतुकीसाठी लागणारा वेळ आणि वाहनसुविधा यांचासुद्धा विचार करून ठेवा.

तुम्ही निवडलेल्या डॉक्टरची पदवी कोणती, ती त्याने कुठून मिळवली, त्याचा या कामातील अनुभव किती आणि कोणत्या ठिकाणी, त्याचे वैशिष्ट्य या सगळ्याची माहिती घेण्याचा तुम्हाला पूर्ण अधिकार आहे. साधारणपणे ज्या डॉक्टरांचं प्रशिक्षण शासकीय रुग्णालयामध्ये झालं आहे ते जास्त निष्णात असतात. अगदी कॉर्पोरेट हॉस्पिटल निवडणार असाल तरी तिथे सेवा देणाऱ्या डॉक्टर्सची पूर्ण माहिती घ्या.

हॉस्पिटलच्या पायाभूत सुविधा तपासून घ्या. इस्पितळ शक्यतो तुमच्या निवासस्थानापासून जवळ असावे किंवा तिथे पोहोचण्यासाठीची सोय कोणत्याही वेळी उपलब्ध असावी. आजकाल अनेक आरोग्यविमा संस्था प्रसूती आणि इतर संलग्न समस्यांसाठी विमा सुविधा देतात. जर तुम्ही या सुविधा घेणार असाल तर निवडलेले इस्पितळ या सुविधा पुरविण्यास किती तत्पर आहेत याची आधीच पूर्ण कल्पना असणे चांगले.

उपचारांचा खर्च किती असेल याची माहिती तुमच्या डॉक्टरकडून घ्या. डॉक्टर किंवा जबाबदार व्यक्ती ही माहिती किती पारदर्शकपणे देतो हे तपासा. प्रत्येक सेवेचे शुल्क इस्पितळात सूचना स्वरूपात उपलब्ध असेल तर नीट वाचून योग्य त्या गोष्टींची नोंद करून ठेवा. शक्यतो रक्त व इतर तपासण्या होऊ शकतील यासाठी तपासणी केंद्र इस्पितळात, आवारात किंवा जवळच्या भागात असेल तर उत्तम. शिवाय औषधे सहज उपलब्ध होण्यासाठी हॉस्पिटलची स्वत:ची फार्मसी असेल तर खूपच छान, परंतु तसे नसेल तर किमान फार्मसी इस्पितळापासून जवळ असावी. शिवाय हॉस्पिटलचे वॉर्ड, बेडच्या सुविधा हे सर्वसुद्धा पाहून ठेवा.

काही महिलांना एखाद्या महिला स्त्रीरोगतज्ज्ञाकडे जास्त सुरक्षित वाटू शकते, त्यामुळे डॉक्टर स्त्री आहे की पुरुष आहे हा मुद्दासुद्धा काही जणींसाठी महत्त्वाचा असू शकतो. परंतु उपचाराच्या दृष्टीने पुरुष किंवा स्त्री डॉक्टर हा मुद्दा गौण आहे. कोणकोणत्या केसेसमध्ये पेशंटला दुसऱ्या ठिकाणी रेफर केले जाते हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. शिवाय गरज पडल्यास भूलतज्ज्ञ कोण आहेत, इस्पितळात वेदनाविरहित प्रसूतीचा पर्याय मिळू शकतो का हेसुद्धा तपासून पाहायला हवे. बाळंतपणाच्या कळा सोसल्या नाहीत तर सर्जरीचा टोकाचा पर्याय निवडण्यापेक्षा वेदनाविरहित प्रसूतीचा मार्ग जास्त योग्य ठरतो.

अनेक इस्पितळे किंवा डॉक्टर्स काही पॅथॉलॉजी लॅबशी व्यावसायिक संबंध ठेवून असतात. त्याची पडताळणी नक्की करा. ठरावीकच लॅबमधून तपासण्या करायला हव्यात असा आग्रह नसायला हवा. हॉस्पिटलची स्वत:ची पॅथॉलॉजी लॅब असेल तर तपासण्याचे दर आणि मुख्य म्हणजे पॅथॉलॉजिस्टची पदवी यांची माहिती नक्की घ्या. कारण आजकाल बोगस पॅथॉलॉजी लॅबसचा सुळसुळाट झाला आहे. नऊ महिन्यांत एकदा पॅथॉलॉजिस्ट डॉक्टर यांना भेट द्यावी आणि आपल्या रक्त चाचण्यांची खातरजमा करून घ्यावी.

प्रसूतीच्या वेळेस बालरोगतज्ज्ञ उपलब्ध असणे खूप महत्त्वाचे आहे. बाळ आणि आई हॉस्पिटलमधून घरी येण्याअगोदर लसीकरण होणे गरजेचे आहे आणि ही पद्धत हॉस्पिटल अंगीकार करत किंवा नाही याची माहिती घ्या. पहिल्या लसीकरणानंतरचे इतरही सर्व लसीकरण एकाच छताखाली होत असेल तर तुम्हाला सोयीस्कर असेल.

नर्सिंग होम स्वत:च्या मालकीचे असणारे डॉक्टर्स (स्त्रीरोगतज्ज्ञ वगळता इतर) सध्या खूप आहेत. याचे फायदे कोणते आणि तोटे कोणते हेही आता पाहू. स्वत:च्या मालकीचे नर्सिंग होम नसणाऱ्या डॉक्टरच्या उपचारांची फी कमी असू शकते. मात्र हा एक फायदा पाहताना इतर तोटेही लक्षात घ्यायला हवेत. असे डॉक्टर्स त्या हॉस्पिटलमध्ये ठरावीक वेळेपुरते उपलब्ध असतात, शिवाय ते तुमची पूर्ण जबाबदारी उचलण्यास तयार नसतात. बऱ्याच गोष्टी तुम्हाला बाहेरून मॅनेज कराव्या लागू शकतात. फार सहकार्य मिळण्याची शक्यता पुसट असते. अशा ठिकाणी समन्वयाची शक्यतासुद्धा थोडी कमी असते, कारण सर्व जबाबदारी त्या डॉक्टरवर किंवा हॉस्पिटलवर नसते.

डॉक्टरचे स्वत:चे नर्सिंग होम असल्यास तो डॉक्टर तुम्हाला गरजेला कोणत्याही वेळी उपलब्ध होतो. शिवाय अत:पासून इतिपर्यंत सर्व जबाबदारी त्या नर्सिंग होमची असते, तुम्हाला सर्व आवश्यक सुविधा एका छताखाली मिळतात. एकच व्यक्ती सर्व पातळ्यांवर यंत्रणा पाहत असल्यामुळे समन्वय आणि सुसूत्रता जास्त असते. मात्र नर्सिंग होम लहान असेल तर मात्र एकाच छताखाली सर्व सुविधा देणे कधी कधी शक्य होत नाही. बालदक्षता विभाग किंवा इतर काही सुविधांसाठी तुम्हाला इतर हॉस्पिटलवर अवलंबून राहावे लागू शकते.

कॉर्पोरेट हॉस्पिटल्स आजकाल शहरांमध्ये आपली मुळे पसरवू लागली आहेत. त्यांचेही फायदे-तोटे पाहू. अशा हॉस्पिटलमध्ये पायाभूत सुविधा अत्यंत उच्च दर्जाच्या असतात त्यामुळे सर्वच प्रकारच्या सुविधा एकाच छताखाली मिळणं १००% शक्य असते. मात्र अशा हॉस्पिटलमध्ये अनेक डॉक्टर्स संलग्नपणे काम करत असल्यामुळे जबाबदाऱ्या विभागल्या जातात आणि काही प्रमाणात सुसूत्रता कमी होऊ शकते. अशा हॉस्पिटलचा खर्च सर्वसामान्यांच्या खिशाला भलंमोठं भगदाड पाडतो. आरोग्यविमा नसेल तर तुम्ही हा खर्च सोसू शकत नाही. आरोग्यविमा असेल तर तुमच्या विम्याची लिमिट संपण्याची शक्यता आहे व तुम्हाला इतर चार्जेसच्या नावाखाली काही रक्कम भरावी लागू शकते.

**सारांश-** कोणत्याही प्रकारची सेवा घेण्यासाठी तुमची खर्च करण्याची ऐपतच शेवटी महत्त्वाची असते हे प्रांजळपणे स्वीकारले तर तीन प्रकारे वर्गीकरण करता येईल. गरिबांसाठी शासकीय रुग्णालय नक्कीच सोयीचे असते. अत्यंत कमी किंवा नगण्य म्हणता येईल अशा खर्चात आवश्यक त्या सर्व सुविधा इथे तुम्हाला मिळतात, फक्त काही बाबतीत गैरसोय होते जी आपल्या सर्वांनाच माहीत आहे! मध्यमवर्गीय जोडप्यांसाठी खासगी नर्सिंग होम (स्त्रीरोगतज्ज्ञ यांच्या मालकीची) जी तुमच्या निवासस्थानापासून जवळ असतील ती निवडावी. उच्चवर्गीय जोडप्यांना कॉर्पोरेट हॉस्पिटलचा खर्चसुद्धा परवडू शकतो. अशा हॉस्पिटलमध्ये हॉस्पिटल आणि हॉटेलची एकत्र सुविधा तुम्हाला मिळू शकते.

शेवटी एक मुद्दा लक्षात घ्या की कोणत्याही डॉक्टरला त्याचा रुग्ण आनंदी आणि समाधानी असावा हेच हवे असते! प्रसूतीचा अनुभव सुखदायी असावा हाच त्यांचा उद्देश असतो. हॉस्पिटल किती भव्यदिव्य आहे यापेक्षा तुम्हाला त्या ठिकाणी आणि त्या डॉक्टरकडे किती सुरक्षित वाटते हा मुद्दा सर्वात जास्त महत्त्वाचा आहे. तुमच्या सोयीप्रमाणे कोणतेही हॉस्पिटल किंवा डॉक्टर निवडा, मात्र त्यावर विश्वास नक्की ठेवा. कारण विश्वास वाढण्यासाठी तो अगोदर ठेवावा लागतो ...

Matoshree Multi Speciality Hospital


**डॉ. गणेश वाकचौरे** (MBBS MS FMAS PGDMLS)
**स्त्रीरोग व दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रियातज्ज्ञ,** सर जे. जे. रुग्णालय व के. ई. एम. रुग्णालय मुंबई.
मातोश्री हॉस्पिटल, सेक्टर २० कामोठे. मातोश्री हॉस्पिटल, ओरियोन मॉलसमोर, पनवेल, ८४२२९९२५०७.

तुमचा स्कोर किती आहे?

करा कोरोना चा सामना रद्द
अचूक आणि विश्वासार्ह HRCT चाचणी सह

कोरोना इन्फेक्शन मुळे फुफुसांतील ऑक्सिजन शोषणाऱ्या पिशव्यांना सूज येऊन त्यांत कफ भरतो. छातीचा स्कॅन करतांना फुफुसाचे २५ भाग करून त्या पैकी किती भाग इन्फेक्टेड आहेत हे पाहून त्याचा स्कोअर काढतात. अर्थात, जितका को - रॅड्स स्कोअर जास्त तितका ऑक्सिजन ध्यायला त्रास जास्त. आणि रक्तातील ऑक्सिजन पातळी कमी म्हणजेच आरोग्यास धोक्याची शक्यता अधिक!

HRCT स्कोअर स्तर
० - ८ : सौम्य (Mild Infection)
८ - १५ : मध्यम (Moderate Infection)
१५ - २५ : तीव्र (Severe Infection)






OUR SERVICES
2D/4D Sonography | PFT | X-Ray | 2D Echo | TMT | Pathology | EEG | ECG | OPG | CT Scan | Color Doppler

Horizon™ CT SCAN CENTRE IN NEW PANVEL

Prem Niwas, Plot no 17, Sector -19, Vijay marg, New Panvel East, Opposite Shreeyash Hospital.
OUR CENTRES Kamothe • New Panvel • Kalamboli • Kharghar • Seawoods • Karanjade
82912 95875 | 77383 84508

# राशिभविष्य

• ९ ते १५ मे २०२१ • स्मिता अतुल गायकवाड

## मेष : अनुकूलतेची चाहूल

अमावास्या तुमच्याच राशीतून होत आहे. मागील अनुभवातून शिकलेल्या गोष्टी विसरून चालणार नाही. इतर कोणाच्या निर्णयावर स्वतःचे मत ठरवणे योग्य राहणार नाही. विचारपूर्वक कृतीतून यश मिळेल. नोकरदार वर्गांची स्थिती ताकसुद्धा फुंकून प्यावे अशी होती. सध्या या अवस्थेतून बाहेर पडाल. चलबिचलता कमी होईल. कामात मन गुंतेल. उद्योगधंद्यात मात्र अनुकूलतेची चाहूल लागेल. व्यवसायात जोम आणि उत्साह टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहाल. आतुरतेने वाट पाहत असलेली संधी चालून येईल. आर्थिकदृष्ट्या शुभ पडघम वाजू लागतील. सामाजिक क्षेत्रात सामोपचाराने तोडगा काढला जाईल. शेजारी धर्माशी हितसंबंध चांगले राहतील याची काळजी घ्या. मानसिक कणखरपणा कायम टिकवून ठेवा. आरोग्याचा त्रास कमी होईल.

शुभ दिनांक : १३, १४

महिलांसाठी : मन प्रसन्न ठेवा.

## वृषभ : नियोजनाप्रमाणे चाला

अमावास्या व्ययस्थानातून होत आहे. बोलण्यातून गैरसमज वाढणार नाही, याची काळजी घ्या. कायदा क्षेत्रासाठी एक पाऊल मागे आलेले चांगले. सप्ताहात कोणाला जामीनदार होण्यासाठी शब्द देऊ नका. न जमणाऱ्या गोष्टींसाठी आश्वासन देणे योग्य होणार नाही. नोकरदार वर्गाने नियोजनाप्रमाणे चाला. वरिष्ठांनी ठरवून दिलेल्या कामामध्ये परवानगीशिवाय बदल करू नका. व्यावसायिकदृष्ट्या अनेकांशी संवाद साधावा लागेल. व्यापारी क्षेत्रात पुढे जाण्याचा मार्ग मोकळा होऊ लागेल. त्यातूनच एखादी संधी मिळेल. खर्चाची बाजू योग्य पद्धतीने हाताळल्यास आर्थिक प्रकरणात मनासारखी दिशा मिळेल. सार्वजनिक ठिकाणी जुन्या ओळखीचा उपयोग होईल. सहकाऱ्यांच्या माध्यमातून स्वतःचे स्वप्न पूर्ण करू शकाल. कौटुंबिकदृष्ट्या समाधानाचे वारे वाहू लागेल. आहारावर योग्य ते नियंत्रण ठेवा.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : आपल्या यशस्वी कामातून आपली ओळख होईल.

## मिथुन : स्वतःला सिद्ध कराल

अमावास्या लाभस्थानातून होत आहे. नवे मार्ग मिळायला सुरुवात होईल. ओळखीचा उपयोग करून घ्याल. रखडलेल्या योजनांना मार्ग मिळेल. चारी बाजूने असणारी जबाबदारी योग्यरीत्या पार पाडाल. नोकरदार वर्गाला सामुदायिक कामांमध्ये थोडी उसंत मिळेल. काही व्यक्तींना तुमच्या मार्गदर्शनाची गरज भासेल. लहान-मोठ्या संधीतून वेगळी उपलब्धता निर्माण करता येईल. भागीदारी व्यवसायात कोणालाही न दुखावता व्यवहाराचे गणित अचूक करा. नवीन व मोठ्या गुंतवणुकीचे पर्याय स्वीकारू नका. व्यवसायामधील उत्पादनाची गरज लक्षात घ्या. त्यानुसारच पावले उचला. आर्थिकदृष्ट्या भावनिक गोष्टींना थारा देऊ नका. मित्रांविषयी वाटणारी काळजी कमी होईल. मुलांच्या आरोग्याचा प्रश्न सुटेल मिटेल. कौटुंबिकदृष्ट्या स्वतःला सिद्ध कराल. आरोग्य उत्तम राहील.

शुभ दिनांक : ९, १२

महिलांसाठी : खर्चावर नियंत्रण ठेवा.

## कर्क : यश लाभेल

चंद्रग्रहाचे भ्रमण भाग्यस्थानातून लाभस्थानाकडे होत आहे. अगदी आखून ठेवल्याप्रमाणे कामाचे व्यवस्थापन घडत आहे, याचा अनुभव सप्ताहात येईल. किचकट गोष्टींचा सामना कमी होत गेल्याने, एक उत्साहाचे वातावरण निर्माण होईल. अमावास्या दशमस्थानातून होत आहे.

नोकरीमध्ये आगामी काळाचे अपेक्षित फळ मिळेल. पत्रव्यवहारातून होणारा नवा बदल सकारात्मक विचार वाढवणारा असेल. व्यापारी वृद्धीच्या प्रयत्नांना यश मिळेल. नवीन व्यवसायासाठी व्यक्तिगत महत्त्वाचे निर्णय मात्र उशिरा घेतलेले चांगले. वैद्यकीय क्षेत्रातील वर्गाला यश येईल. संशोधनात्मक गोष्टींमध्ये मोठे कौतुक होईल. पैशांची कामे होत राहतील. सामाजिक क्षेत्रात होत असणारी मदत योग्य कारणी लावताना समाधान वाटेल. कौटुंबिक जीवनात स्वतःच्या मर्यादा पाळल्यास आनंददायी घटना अनुभवाल. प्रकृती स्वास्थ्य ठणठणीत राहील.

शुभ दिनांक : ९, १३

महिलांसाठी : नवे काही शिकण्याचा छंद जोपासाल.

## सिंह : प्रगतीचा मार्ग मिळेल

अमावास्या भाग्यस्थानातून होत आहे. या कालावधीत आध्यात्मिक गोष्टींमध्ये मन रमेल. ग्रहांचा शुभ परिणाम पाहावयास मिळेल. नोकरदार वर्गाची त्रासातून मुक्तता होईल. पोलीस, लष्करी ,अग्निशामक खात्यातील व्यक्तींचा प्रतिकूल काळ कमी होईल. वरिष्ठांचे सहकार्य उत्तम मिळेल. भागीदारी व्यवसायात परिवर्तन घडेल. नव्याने एकत्रित भांडवल गुंतवताना व्यवहाराला महत्त्व द्या. उत्पन्नाचा काही भाग स्वतःच्या गुंतवणुकीत करा. व्यापारी क्षेत्रातील आशादायक काळ लवकरच भरारी घेईल. आर्थिकदृष्ट्या लाभदायक प्रगतीचा मार्ग मिळेल.

राजकीय क्षेत्रात विरोधकांची बौद्धिक क्षेत्रातील मक्तेदारी मोडून काढण्यात यशस्वी व्हाल. मुलांच्या गैरव्यवहाराला वेळीच आवर घाला. वैवाहिक जीवनात जुन्या आठवणी जाग्या होतील. नातेवाईकांकडून सुवार्ता समजतील. किरकोळ वाटणारे शारीरिक त्रास कमी होतील.

शुभ दिनांक : १४, १५

महिलांसाठी : पळापळ कमी होईल.

## कन्या : स्वकर्तृत्वावर विश्वास

अमावास्या अष्टमस्थानातून होत आहे. मनाची मानसिक दुविधा कमी करा. कोणतेही निर्णय घेण्यापूर्वी विचार करा. शांतपणे अंमलबजावणी करा. नोकरदार वर्गाने कामाची सांगड घालताना वरिष्ठांशी वाद होणार नाहीत, याची काळजी घ्या. आळस झटकून कामाला लागा. व्यापारी क्षेत्रात इतरांना दिलेली आश्वासने पूर्ण कराल. मार्गस्थ झालेल्या गोष्टींमध्ये यश मिळेल. अनेक सुविधा वेळेवर उपलब्ध होतील. पैशांचे व्यवहार करताना लोभी व धूर्त लोकांपासून लांब राहा. राजकीय क्षेत्रात वादाच्या मुद्द्याला हात घालू नका. जोडीदाराची साथ संगत चांगली राहील. भावंडांना असणारी अडचण कमी करण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिकदृष्ट्या स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवा. अध्यात्मिक गोष्टीत मन रमेल. सकस आहार व शारीरिक व्यायाम करा.

शुभ दिनांक : १३,१४

महिलांसाठी : रागावर नियंत्रण ठेवा.

## तूळ : कामावर पकड ठेवा

चंद्र ग्रहाचे भ्रमण षष्ठस्थानातून अष्टमस्थानाकडे होत आहे. अमावस्या सप्तमस्थानातून होत आहे. अफवांवर विश्वास ठेवून गैरसमज वाढवून घेऊ नका. बोलण्यातून इतरांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्या. ज्या गोष्टीचा अंदाज तुम्हाला नाही त्याविषयी वाच्यता करू नका. नोकरदार वर्गाने मनाची चलबिचलता कमी करा. कामावर लक्ष केंद्रित करा. सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेत काळजी न करता पुढे जा. व्यावसायिकदृष्ट्या धैर्य बाळगा.

ठरवलेले कामकाज पुन्हा विकसित करण्यासाठी वेळ पाहावी लागत असली तरी ती पूर्ण करण्याचे ध्येय मात्र सोडू नका. कामावर पकड ठेवा. उशिरा का होईना त्याचे फळ मिळेल. आर्थिक सतर्कता बाळगणे हिताचे राहील. राजकीय क्षेत्रात वरिष्ठांशी नम्रतेने बोला. घरगुती गोष्टी चव्हाट्यावर आणू नका. प्रकृतीची काळजी घ्या.

शुभ दिनांक : १४, १५

महिलांसाठी : घाईगडबडीने कोणतेही काम करू नका.

## वृश्चिक : नियम पाळा

अमावस्या षष्ठस्थानातून होत असताना मानसिक मनोबल वाढवा. विस्कळीत घडी रुळावर येण्यासाठी प्रयत्नशील राहा. ग्रहस्थिती सरळ मार्गे नसली तरी अवघडही नाही. आत्मविश्वास ठाम ठेवून कार्य करा. नोकरदार वर्गाला कामाची व्याप्ती वाढलेली असेल. मात्र मर्यादा लक्षात घ्या. नियमांच्या चौकटीत राहून कामे करा. कोणत्याही कृतीची अंमलबजावणी करताना सत्यता पडताळून पाहा. व्यापारी क्षेत्रात दुसऱ्याला शब्द देताना व्यवहार जपून करा.

प्रसंगात घाईगडबड करणे टाळा. अति धाडस करू नका. खर्च कमी करून आर्थिक बचत वाढवण्याकडे लक्ष द्या. सामाजिक क्षेत्रात संतुलन राखा. कौटुंबिकदृष्ट्या तणाव वाढणार नाही यासाठी प्रयत्नशील राहा. मानसिक ताणतणाव टाळा. आरोग्याचे तंत्र बिघडू देऊ नका.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : वडीलधाऱ्या व्यक्तींची काळजी घ्या.

## धनू : सूत्रसंचालन करा

अमावस्या पंचमस्थानातून होत आहे. अनोळखी व्यक्तींपासून येणारा प्रस्ताव स्वीकारणे योग्य ठरणार नाही. काही बाबतीत विलंब गृहीत धरलेला चांगला असेल. स्वतःची शिस्त व नियम मोडू नका. नोकरदार व्यक्तींनी वास्तवतेला महत्त्व देत अंमलबजावणी करा. मागे केलेल्या कामांमधील चुका दुरुस्त होतील, त्यामुळे कामावरचा ताण हलका होईल. उद्योगधंद्यात बदल करायची घाई करू नका.

सध्या शांत राहणे पथ्यावर पडेल. भागीदारी व्यवसायात होणाऱ्या निर्णयात प्रत्यक्ष सहभागी व्हा. व्यापारी क्षेत्रात योग्य व्यक्तींच्या माध्यमातून अपेक्षित कामे पूर्ण करू शकाल. आर्थिक गुंतवणूक करताना लांबचा विचार करावा लागेल. राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करताना योग्य असे सूत्रसंचालन करा. कोणतेही निर्णय घेताना घरातील सगळ्यांचे एकमत करण्यावर भर द्या. आरोग्य जपा.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : धार्मिक कृत्यांमध्ये मन रमेल.

## मकर : परिवर्तन घडेल

अमावस्या चतुर्थ स्थानातून होत आहे. अमावस्या कालावधीत घरातील ज्येष्ठांशी बोलताना सकारात्मकता ठेवा. ग्रहमान संमिश्र स्वरूपाचे असेल. नोकरदारांना कामाचे परीक्षण करून आढावा घ्यावा लागेल. कामात शिथिलता ठेवून चालणार नाही.

अनपेक्षित असे परिवर्तन घडून येईल. व्यापारी क्षेत्रात सुलभता येईल. उद्योगधंद्यांना होणारा तोटा कमी होईल. कारखानदारीचे प्रश्न मार्गी लागण्याचे संकेत दिसू लागतील. नियम व अटींचे पालन करावे लागेल. यशाचे प्रमाण वाढलेले असेल. वित्तहानी कमी होईल.

आर्थिक गुंतवणूक वाढेल. सामाजिक क्षेत्रात सामोपचाराने तोडगा निघेल. मुलांसोबत करमणूक कराल. भावंडांविषयी असलेली चिंता मिटेल. आध्यात्मिकदृष्ट्या मनोबल वाढवा. जुन्या व्याधींचा त्रास कमी होईल.

शुभ दिनांक : १४, १५

महिलांसाठी : पुढील गोष्टींचे आधीच नियोजन करा.

## कुंभ : कामांना गती मिळेल

अमावस्या पराक्रम स्थानातून होत आहे. इतरांशी संवाद कौशल्य जपून करा. नोकरदार वर्गाला वेळेनुसार कामकाज करणे चांगले जमेल. कामातील चिवटपणा स्थिर राहण्यास मदत होईल. अनेक गोष्टींचे तर्कवितर्क करणे सोपे जाईल. वरिष्ठांचे वर्चस्व चांगले राहील. व्यावसायिकदृष्ट्या रचनात्मक बदल होतील. अवघड गोष्टी सोप्या होऊ लागतील. पुढील नियोजन ठरवणे आता अडचणीचे वाटणार नाही. आखलेल्या योजना प्रत्यक्षात दिसू लागतील. प्रलंबित कामांना गती मिळेल. आर्थिक गोष्टींचा त्रास कमी होईल. धनाचे मार्ग मोकळे होतील. राजकीय घडामोडींचा आढावा घेताना, सतर्कता बाळगल्याने प्रत्येक गोष्ट पद्धतशीरपणे हाताळाल. कौटुंबिकदृष्ट्या अनुकूल वातावरण असेल. जोडीदाराशी असलेले मतभेद कमी होतील. प्रकृती ठणठणीत ठेवण्याचा प्रयत्न कराल.

शुभ दिनांक : ९, १५

महिलांसाठी : निरीक्षणशक्ती उत्तम राहील.

## मीन : प्रशंसा होईल

अमावस्या धनस्थानातून होत आहे. व्यक्तिगत उलाढाली वाढवण्यासाठी समयसूचकता ठेवा. संयम सोडून चालणार नाही. बोलताना शब्दातील धार कमी करा. नोकरदार वर्गांची कामातील दगदग कमी होईल. महत्त्वाचे करार करण्यास योग्य वेळ आहे. या संधीचा फायदा घेऊन वरिष्ठांशी बोलून घ्या. कालांतराने बदलणारे स्वरूप यशाचा प्रकाश देणारे ठरेल. व्यापारी वर्गाने स्वतःला मोबदला कसा मिळेल, याकडे लक्ष द्या. इतरांशी स्पर्धा करणे टाळा. हिशोबाचे ताळतंत्र चुकणार नाही याची दक्षता घ्या. फायद्याचे प्रमाण वाढावे म्हणून लोभ वाढवू नका. व्यावहारिक गोष्टींना महत्त्व द्या. आर्थिक चक्र सुरळीत चालू होईल. सामाजिक क्षेत्रात थोरामोठ्यांचा सल्ला घ्या. शेजारधर्म व भाऊबंदकी यांच्याकडून तुमच्या कामाबद्दल प्रशंसा होईल. जोडीदाराच्या भावनांचा आदर कराल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील.

शुभ दिनांक: ९, १४

महिलांसाठी : अधिक पाठपुरावा करणे टाळा.

gsmita332@gmail.com

ADVERTORIAL

An initiative by RED* Read. Engage. Deliver.

# जागतिक मातृदिन विशेष

**आई ही व्यक्ती असली तरी आईपण ही वृत्ती आहे, भावना आहे. ती भावना जेवढी व्यापक होत जाईल तितकं तिच्यामध्ये प्रेम, शांतता, बंधुत्व, सहृदयता, एकोपा सामावत राहील..पण आज त्याचीच वानवा आहे. बाजारीकरण झालेल्या 'मदर्स डे'चा निषेध त्याची जन्मदात्री ॲना जार्विसनंही केला होता. काय आहे 'मदर्स डे'चा जगव्यापी अर्थ.. जागतिक मातृदिनानिमित्ताने...**

## 'आईपणा'च्या शोधात...

**प्रतिनिधी**

''**सॉरी, खरंच** सॉरी, मला पश्चत्ताप होतोय, मी का हा 'मदर्स डे' सुरू केला. मला अपेक्षित 'मदर्स डे' हा नाही. हा एका आईचा नाही तर आईपणाचा उत्सव असायला हवा. मातृत्वाच्या भावनेचा सोहळा असायला हवा, पण त्याचा आज जो काही धंदा झाला आहे तो पाहता त्यातलं पावित्र्य नष्ट झालंय. आईला फक्त शुभेच्छा कार्ड, कॅन्डीज् आणि फुलं पाठवून तो नाही साजरा करता येत. त्याच्यापलीकडे जाता आलं पाहिजे.''

'मदर्स डे'ची आई असणाऱ्या ॲना जार्विसचं (१८०४–१९४८) हे म्हणणं आजही अगदी तंतोतंत लागू पडतं. प्रत्येक गोष्टीचं बाजारीकरण करणाऱ्या भावनांचंही भांडवल करणाऱ्या आजच्या व्यवहारी जगात मातृत्वातल्या व्यापक भावनेला जपणं कमी होत चाललेलं आहेच. त्यासाठीच मातृदिनामागची खरी प्रेरणा जाणून घेण्याची गरज निर्माण झाली आहे.


ॲनाने आपल्या आईच्या, ॲनच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'मदर्स डे' सुरू करण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले खरे, पण त्याची रुजवात तिच्या आईनेच करून ठेवली होती. एकोणिसाव्या शतकात अमेरिकेत जन्माला आलेल्या ॲना रीव्हज् जार्विसचं (१८३२–१९०५)आयुष्य तसं सरळ सुरू होतं. मात्र पुढच्या राजकीय, सामाजिक उलथापालथीने तिच्या आयुष्याला वेगळ्या वाटेवर आणून सोडलं. अकरा मुलांना जन्म देणाऱ्या ॲनला सात मुलांचा मृत्यू बघावा लागला. तिचं मातृहृदय विव्हळलं खरं, पण जेव्हा मातृहृदय परपीडा जाणत वैयक्तिक दुःखाच्या पलीकडे जात विशाल होत जातं तेव्हा हातून खूप काही मोठं घडतं. तिच्याबाबतीत तेच घडलं. आजूबाजूची परिस्थिती चिंता निर्माण करणारीच होती. ॲनने परिसरातील सगळ्याच समदुःखी आईंसाठी काम सुरू केलं. मुलं अल्पवयात दगावू नयेत, त्यांची योग्य देखभाल व्हावी यासाठी संघटना तयार केली आणि त्याला नाव दिलं, 'मदर्स फ्रेंडशिप क्लब'. दरम्यान, अमेरिकेतील नागरी युद्धाने (१८६१–१८६५) जोर धरला. कोणतंही युद्ध जीवितहानी करणारच, पुन्हा एकदा तिच्यातल्या मातृहृदयाने अनेकांना साद घातली. तिला प्रतिसाद देत तिच्या क्लबने सैनिक कोणत्याही बाजूचा असो, निष्पक्षपणे सेवा करत अनेकांचे प्राण वाचवले. पण तेवढं पुरेसं नव्हतंच. युद्ध संपल्यावर त्यांचे प्रयत्न सुरू झाले ते प्रेमाचे, मैत्रीचे बंध निर्माण करणारे. युद्धामुळे विभागल्या गेलेल्या कुटुंबीयांना एकत्र आणण्याचे प्रयत्न! तिने त्या दिवसाला नाव दिलं, 'मदर्स फ्रेंडशिप डे'. कुटुंबाला बांधून ठेवणारी आईच असते. भावंडांमधला दुवा तीच असते, हीच भावना जागती ठेवत सर्व आईंना एकत्र करणं, बंधुत्व निर्माण करणं आणि पुढे जात या आईपणाचा गौरव करणं तिने आपलं जीवितकार्य ठरवलं.

तिच्या निधनानंतर आईचं हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी झटली ती ॲना. जगात शांतता, सलोखा, अनुकंपा आणायची असेल तर आईचा, आईपणाचा सन्मान, आदर व्हायलाच पाहिजे, ही तिची भावना. त्याला व्यापकत्व द्यायचं तर आईपणाचा गौरव करण्यासाठी 'मदर्स डे' मोठ्या प्रमाणावर साजरा करायची कल्पना तिने मांडली आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी हर तऱ्हेचे प्रयत्न सुरू केले. तिच्या आणि तिच्या समर्थकांच्या प्रयत्नांना यश आलं आणि १९१४ मध्ये तत्कालीन राष्ट्राध्यक्ष व्रुडो विल्सन यांनी त्याला मान्यता दिली ती, आई– देशाची शक्ती आणि स्फूर्तीचा महत्त्वपूर्ण स्रोत असते, अशा गौरवास्पद शब्दांत! दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी (ॲनच्या स्मृतीदिनानिमित्ताने) राष्ट्रीय रजा देऊन तो साजरा करायचं ठरलं, अनेक देशांमध्ये 'मदर्स डे' साजरा होऊ लागला, पण याचा वेगळाच अर्थ लावला गेला. 'आईपणा'च्या गौरवापेक्षा आईचा, तिच्या त्यागाचा, कुटुंबावरील प्रेमाचा सन्मान अशा व्याख्येत 'मदर्स डे'चं व्यापकत्व वैयक्तिक होत संकुचित झालं. साहजिकच त्याला व्यावसायिक रूप येऊ लागलं. एका कार्यक्रमाला तिला जाता आलं नाही म्हणून तिने उपस्थित आईंना वाटण्यासाठी तिच्या आईला आवडणारी, शांततेची निदर्शक पांढरी कार्नेशनची फुले तिने पाठवून दिली. तिच्या मते, कार्नेशनची फुले पाकळ्या गाळत नाहीत, ते कोमेजतं, पण शेवटपर्यंत सगळ्या पाकळ्या धरून ठेवतं, जे आई करत असते, म्हणून हे फूल. पण पुढे 'मदर्स डे' म्हणजे कार्नेशनची फुलं, असं समीकरण झालं आणि या फुलाचा बाजार सुरू झाला. अनेकांनी या दिवसाचा वापर वेगवेगळ्या कारणांसाठी फंड गोळा करण्यासाठी सुरू केला. गिफ्टस, शुभेच्छा कार्डस् यांच्या धंद्याला बरकत आली. भावनेचा असा मांडला गेलेला बाजार ॲनाला सहन होईना. तिच्या म्हणण्यानुसार तो असा वैयक्तिक साजरा करायचा तर आईला नुसत्या कॅन्डीज, कार्ड पाठवून प्रेम दाखवण्यापेक्षा तिला मोठी पत्र लिहा, तिला जाऊन भेटा, तिच्या सहवासात राहा, पण ते होत नव्हतं. अखेर तिने त्या विरोधात आवाज उठवायला सुरुवात केली. इतका की एका मोठ्या कार्यक्रमात शांतता भंग केला म्हणून तिला अटकही करण्यात आली. शेवटचा प्रयत्न म्हणून तिने हा दिवस रद्द करावा म्हणून कोर्टात धाव घेतली. (१९२३) तरीही दरवर्षी मातृदिनाचा एकदिवसीय सोहळा रंगू लागला आणि कोट्यवधींची उलाढाल होत संपूही लागला. त्यामागचं पावित्र्य, आदर, कुटुंबांमधला स्नेह, माणसामाणसांतील प्रेम, बंधुत्व, सगळ्यांचं एकत्र येणं सारं सारं पैशांच्या वावटळीत उडून गेलं.

आई ही व्यक्ती असली तरी आईपण ही वृत्ती आहे, भावना आहे. ती भावना जेवढी व्यापक होत जाईल तितकं तिच्यामध्ये प्रेम, शांतता, बंधुत्व, सहृदयता, एकोपा सामावत राहील. आजच्या मातृदिनाचा तरी तोच सांगावा आहे.











# शाहरूख - भन्साळी पुन्हा एकत्र काम करणार



**प्रतिनिधी**

**दोन दशकांपूर्वी** 'देवदास' या सुपरहिट चित्रपटाच्या निमित्ताने अभिनेता शाहरूख खान आणि दिग्दर्शक संजय लीला भन्साळी ही जोडगोळी एकत्र आली होती. मात्र त्या चित्रपटानंतर भन्साळींना शाहरूखबरोबर पुन्हा काम करायची इच्छा असूनही ही जोडी कधी एकत्र आली नाही. आता इतक्या वर्षांनी भन्साळींनी शाहरूखसमोर एका चित्रपटाचा प्रस्ताव ठेवला असल्याचे समजते. 'इजहार' असे या चित्रपटाचे नाव असून भन्साळींनी शाहरूखसाठी पुन्हा एकदा या चित्रपटाच्या पटकथेवर काम सुरू केले आहे. 'देवदास'नंतर शाहरूखबरोबर काम करण्यासाठी भन्साळींनी अनेकदा प्रयत्न केले. त्यांनी 'बाजीराव मस्तानी' आणि 'पद्मावत' चित्रपटासाठी त्याला विचारणा केली होती. दोन्ही वेळा त्यांची बोलणी फिस्कटली आणि रणवीर सिंगला घेऊन भन्साळींनी दोन्ही चित्रपट केले. सलमान आणि शाहरूख खानला एकत्र आणत 'हम दिल दे चुके सनम'च्या सिक्वलचाही त्यांनी घाट घातला होता, मात्र तोही कधी फळाला आला नाही. त्यानंतर सुप्रसिद्ध गीतकार साहिर लुधियानवी यांच्यावर चरित्रपट करायचा विचार भन्साळींच्या मनात होता, त्याची चरित्रपटासाठी शाहरूख हीच त्यांची पसंती होती. तोही प्रकल्प बारगळला आणि ही जोडी पुन्हा एकत्र येऊ शकली नाही. इतक्या वर्षांनंतर मात्र भन्साळींनी शाहरूखबरोबर काम करायचंच असा चंग बांधला आहे. सध्या भन्साळी 'हीरा मंडी' या वेबमालिकेच्या निर्मितीत व्यग्र आहेत. अभिनेत्री सोनाक्षी सिन्हाची यात मुख्य भूमिका आहे. या वेबमालिकेनंतर भन्साळी यांच्या मनात राहून गेलेल्या आणखी एका प्रेमकथेवर ते काम सुरू करणार आहेत. 'इजहार' नावाने त्यांनी ही प्रेमकथा काही वर्षांपूर्वी शाहरूखसाठीच लिहिली होती. एका भारतीय तरुणाच्या वास्तव प्रेमकथेवर हा चित्रपट आधारित असल्याचे समजते. नॉर्वेत राहणाऱ्या आपल्या प्रेयसीला भेटण्यासाठी कित्येक मैल सायकलवरून प्रवास केलेल्या तरुणाची ही कथा आहे. आता भन्साळींनी पुन्हा एकदा या चित्रपटाच्या पटकथेवर काम सुरू केले आहे. शाहरूखला ही पटकथा पसंत पडली तर लवकरच या चित्रपटाच्या चित्रीकरणाची तयारी सुरू होईल.

# रणबीर कपूरची छायाचित्रकारांना तंबी

**प्रतिनिधी**



**करोना असो,** टाळेबंदी असो, परिस्थिती कुठलीही असो... कलाकारांना कॅमेऱ्यापासून दूर राहणे शक्यच होत नाही. बॉलीवूड कलाकारांना तर विमानतळापासून रुग्णालयापर्यंत सगळीकडे कॅमेऱ्याचा सामना करावा लागतो. एरव्ही कलाकार आणि छायाचित्रकारांचे संबंध हे तसे मैत्रीपूर्णच असतात, मात्र कधी कधी कॅमेऱ्याचा हा ससेमिरा कलाकारांना नकोसा होतो. आवरता आवरेना अशी कलाकारांची स्थिती असते, तर आहे त्या परिस्थितीत चांगल्यातले चांगले छायाचित्र काढून ते लोकांपर्यंत पोहोचवण्याशिवाय छायाचित्रकारांसमोरही पर्याय नसतो. कधीतरी या मैत्रीत वादाची ठिणगीही पडते, सलमान खान आणि छायाचित्रकारांमध्ये झालेला वाद आणि बराच काळचा अबोला सगळ्यांनाच लक्षात असेल. सलमानसारखा राग नाही, मात्र छायाचित्रकारांना तंबी देण्याचे काम नुकतेच रणबीर कपूरने केले आहे. काही दिवसांपूर्वी रणबीरला करोनाची बाधा झाली होती, त्यातून बरा झाल्यानंतर आईबरोबर क्लिनिकमध्ये जाण्यासाठी बाहेर पडलेल्या रणबीरची छायाचित्रकारांशी गाठ पडली होती. अर्थात, त्या वेळी राज्यात संचारबंदी सुरू होती. अशा परिस्थितीत समोर इतक्या छायाचित्रकारांना पाहून 'आप का लॉकडाऊन नही है क्या?' असा प्रश्न रणबीरने त्यांना विचारला होता. त्यावर छायाचित्रकारांनी आपलं काम सुरू असल्याचं त्याला सांगितलं होतं. रणबीर तेव्हाही नाराज होता, त्याने यामागचं कारणही त्यांना विचारलं, अखेरीस अंतरनियम पाळण्याचे आवाहन करत त्याने सुरक्षित अंतरावरून आपली छायाचित्रे काढू दिली. मात्र गमती गमतीत छायाचित्रकारांना प्रश्न विचारणाऱ्या रणबीरच्या चेहऱ्यावरील नाराजी तेव्हाही लपली नव्हती. या घटनेला काही दिवस होतात न होतात पुन्हा एकदा आपल्या मागे लागलेल्या छायाचित्रकारांना तंबी देण्याचा प्रसंग त्याच्यावर ओढवला. अभिनेता ऋषी कपूर यांना जाऊन एक वर्ष झाले, त्यानिमित्ताने अभिनेत्री नीतू कपूर यांनी आपल्या घरी श्रद्धांजलीचा कार्यक्रम ठेवला होता. या कार्यक्रमासाठी रणबीर आणि त्याची प्रेयसी अभिनेत्री अलिया भट्ट दोघेही हजर झाले होते. अशा प्रसंगात खरंतर कॅमेऱ्याचाच काय बाहेरच्या कोणाचीही भेट होणं कोणालाच न रुचणारं... मात्र इथे इमारतीच्या प्रवेशद्वारावरच छायाचित्रकारांना पाहून आरके वैतागला. या वेळी मात्र त्याने आपली नाराजी बोलून दाखवली. 'तुम्ही हे योग्य करत नाही आहात', असे त्याने सुनावले. इतकेच नाही तर आपल्यामागे कोणीही इमारतीत प्रवेश करू नका, असेही त्याने सुनावले. अखेर उपस्थित छायाचित्रकारांनीही त्याच्याकडे दिलगिरी व्यक्त करत प्रसंग सावरण्याचा प्रयत्न केला.

ADVERTORIAL

कॅन्सर – मंत्र : मे २०२१

## कॅन्सर मंत्र : डॉ. कॅन्सर पुन्हा कसा होतो ?

प्रश्न : डॉक्टर, कॅन्सर पुन्हा कसा होते? त्यासाठी काय करता येईल?

कॅन्सर हा जनुकीय बदलांमुळे होणारा आजार असल्याने, कॅन्सरच्या गाठी व्यतिरिक्त अन्य पेंशींमध्ये तसेच बदल घडून आल्याने, उपचारानंतरही तो उद्भवू शकतो. ह्यास ''फील्ड कॅन्सररायझेशन'' म्हणतात. उदा. तंबाखूमुळे तोंड व घशात होणारे कॅन्सर !




कॅन्सरचे निदान पुर्वी न झाले असल्यास अपूर्ण शस्त्रक्रियेमुळे तो पुन्हा उद्भवू शकतो. त्याचप्रमाणे कॅन्सरसारखे [precancerous] बदल गाठीच्या आजूबाजूस झालेले असल्यास, त्यातही पुन्हा कॅन्सर होऊ शकतो.

हे टाळण्यास प्रथमच कॅन्सर सर्जनकरवी तपासणी आणि बायोप्सी करवून त्यानुसार पूर्ण उपयार योग्य सल्ल्याने करावेत.

कॅन्सर शस्त्रक्रियेत मुख्य दोन भाग असतात. ज्या अवयावत कॅन्सर आहे आणि त्याचा फैलाव ज्या लिम्फ नोड मध्ये होतो, असे दोन्ही भाग काढणे. ह्यात कोठेही अपूर्णता असेल तर आजार परत येऊ शकतो.

कॅन्सर हा एका अवयवात तयार होऊन इतस्तत: पसरू शकणारा आजार असल्याने, वरील प्रमाणे शस्त्रक्रिया झाल्यानंतरही सुक्ष्म-स्वरूपात कॅन्सर पेशी शिल्लक असू शकतात. नंतर त्या वाढून कॅन्सर पुन्हा बळावू शकतो. म्हणून आजाराच्या विशिष्ट स्टेजसाठी किमोथेरपी आणि रेडिओथेरेपी अत्यावश्यक आहे.

ह्या तीन उपचार पद्धतीचा योग्य क्रमाने समावेश सर्वात महत्वाचे असते. त्यामुळे ऑन्कोलॉजिस्ट टीमने मिळून उपचाराचा आराखडा बनविणे सर्वात संयुक्तीक आहे.

बऱ्याच कॅन्सर पेशी हार्मोन थेरपीच्या योग्य उपचाराने दीर्घकाळ नियंत्रित ठेवता येतात, उदा. प्रोस्टेट, स्तनाचा कॅन्सर इत्यादी. हार्मोन्स प्रमाणे ह्या पेशींवर नव्यानं उपलब्ध टार्गेटेड आणि इम्युनोथेरपीचे खुप चांगले परिणाम दिसून येतात.

मात्र सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या ऑकॉलॉजीस्टकडे नियमीत व दीर्घकाळ तपासणी सुरु ठेवणे, कॅन्सर जितक्या कमी प्रमाणात लवकर निदानास येईल तितके जीवनमान अधिक व चांगले असेल हे ध्यानी असावे.

**डॉ. हितेंद्र पाटील,** कॅन्सर सर्जन

**डॉ. अमोल आखाडे,**
मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट

**सुयोग कॅन्सर क्लिनिक**
लाइफलाइन हॉस्पिटलचे वर, खोपट बस डेपो जवळ, ठाणे पश्चिम

**अधिक माहिती व अपॉइंटमेंट साठी**
९८१९०७३७८१


**देवधर क्लासेस**
**IIT-JEE / NEET / KVPY / MH-CET**

**प्रत्येक बॅचमध्ये फक्त 8 विद्यार्थी**

**इयत्ता 11 वी साठी नवीन बॅचेस**
**10 मे 2021 पासून सुरु होत आहेत**

- IITian शिक्षकांकडून उत्कृष्ट कोचिंग
- वैयक्तीक मार्गदर्शन आणि शंका निरसन
- ठाणे / मुंबई विभागातील सर्वोत्कृष्ट निकाल

**Our JEE MAINS 2021 Rankers**




संपर्क: 93222 69084 / 98203 14634 / 98216 00996.

**ठाणे शाखा :** पारसनाथ दर्शन, 2 रा मजला, बँक ऑफ बरोडा च्या बाजूला, राम मारुती रोड, ठाणे (प.)
**डोंबिवली शाखा :** पहिला मजला, बेडेकर सदन, अभिनव बँकेशेजारी, केळकर रोड, डोंबिवली (पू.)

**Website : www.deodharclasses.com**

ADVERTORIAL

# मातृत्वाचे स्वप्न साकारणारे ठाण्यातील...
# ओव्हा फर्टिलिटी आणि वुमन केअर

आज जागतिक मातृदिन... सर्वांना मातृदिनाच्या हार्दिक शुभेच्छा... "आईपण"-"मातृत्व" हे प्रत्येक स्त्रीचे स्वप्न असते. आजच्या काळामध्ये १५ ते २०% स्त्रियांना हे स्वप्न साकार करण्यासाठी झगडावे लागते आहे.

ज्याला "इनफर्टिलिटी" किंवा "व्यंध्यत्व" असे संबोधले जाते. योग्य वेळी आणि योग्य मार्गदर्शन मिळाले तर ही समस्या लवकरात लवकर सुटू शकते.

मातृदिना निमित्त याबाबतीत ओव्हा फर्टिलिटी आणि वुमन केअरच्या फर्टिलिटी स्पेशालिस्ट डॉ. स्नेहल ढोबळे - कोहळे यांच्याशी चर्चा झाली.



**आजकाल व्यंध्यत्वाची समस्या वाढते आहे हे खरे आहे काय? कशामुळे?**

आजकालची बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव, आहारामधील बदल, वाढता ताण तणाव यामुळे व्यंध्यत्वाची समस्या वाढते आहे.

**यासाठी तज्ञ डॉक्टरांकडे जाणे खरोखर आवश्यक आहे का?**

ज्या वेळी तुम्ही आई - बाबा होण्याचा निर्णय घेता त्याच वेळी तज्ञ डॉक्टरांचा (फर्टिलिटी स्पेशालिस्टचा) सल्ला आणि मार्गदर्शन घेणे गरजेचे आहे. डॉक्टरांकडे येणे याचा अर्थ व्यंध्यत्व समस्या आहे असा नव्हे तर सुरूवातीचे हे समुपदेशन पुढील समस्या रोखण्यास उपयोगी ठरते.

**स्त्रियांच्या वाढत्या वयाचा काही परिणाम होऊ शकतो का?**

आजच्या प्रगतशील जीवनशैलीमध्ये, स्त्रीचे मातृत्वामध्ये पदार्पण करण्याचे वय पुढे जात आहे. जसे जसे स्त्रीचे वय वाढत जाते तसे स्त्री बिजांची संख्या कमी होणे, स्त्री बिजाचीं कमजोरी येणे ह्या समस्या येऊन गर्भधारणेसाठी उशीर होऊ शकतो किंवा गर्भ खराब होऊ शकतो.

**प्रत्येक स्त्रीचे मातृत्वाचे स्वप्न साकार करण्यासाठी तुम्ही काय सल्ला द्याल?**

१) जीवनशैलीमध्ये खालील चतु:सुत्री प्रयत्नपूर्वक अमलात आणावी - समतोल आहार, नियमित व्यायाम, ताण-तणावा पासून मुक्तता आणि सकारात्मक दृष्टिकोन

२) योग्य वेळी, होणाऱ्या आई-बाबांनी एकत्रितपणे तज्ञांकडून मार्गदर्शन आणि तपासणी करून घ्यावी

३) तज्ञांच्या सल्ल्यानुसार योग्य त्यावेळी उपचार करावेत

**सुविधा:**

- टेस्ट ट्युब बेबी (आय. व्ही. एफ.)
- आय. यु. आय.
- स्त्री बीज व शुक्रजंतु संवर्धन (फ्रिझींग) (कर्करोग पिडीत रुग्णांसाठी देखील)
- सर्व प्रकारच्या प्रसूती सुविधा
- मातांसाठी सुसज्ज अतिदक्षता विभाग
- सर्व प्रकारच्या दुर्बिण शस्त्रक्रिया
- नवजात बालकांसाठीच्या सुविधा



"ज्या वेळी तुम्ही आई - बाबा होण्याचा निर्णय घेता त्याच वेळी तज्ञ डॉक्टरांचा (फर्टिलिटी स्पेशालिस्टचा) सल्ला आणि मार्गदर्शन घेणे गरजेचे आहे."

**डॉ. स्नेहल ढोबळे - कोहळे**
फर्टिलिटी स्पेशालिस्ट

आजकालच्या पुढारलेल्या आणि नवीन तंत्रज्ञानामुळे कितीही अडथळे आले तरी मातृत्वाचे स्वप्न साकार होऊ शकते. शिक्षण, नोकरी अशी उंच उंच यशाची शिखरे गाठताना स्त्रीयांना आता मातृत्वापासून वंचित राहण्याची गरज नाही. आयव्हीएफ (IVF) ह्या तंत्रज्ञानामुळे योग्य वेळी स्त्री बीज संवर्धित (EGG FREEZING) करून काही वर्षांनंतर गर्भधारणा करणे आता शक्य आहे.


संर्पक:- ७५०६६४४३३० / ७०३५८०११११
पत्ता:- ओव्हा फर्टिलिटी आणि वुमन केअर
पहिला मजला, वेदांत हॉस्पिटल, कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे (पश्चिम).
वेबसाईट: www.theovacare.com

# ...तरीही दोघांना करोनाची बाधा

## ‘आयपीएल’ स्थगितीनंतर कोलकाताचे कृष्णा, सेइफर्ट विलगीकरणात

पीटीआय, बेंगळूरु

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटचा १४वा हंगाम स्थगित करून एक आठवडा पूर्ण होण्यास आला, तरीही खेळाडूंवरील करोनाचा धोका पूर्णपणे टळलेला नाही. ‘आयपीएल’मध्ये कोलकाता नाइट रायडर्सकडून खेळणारा भारताचा वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णा आणि न्यूझीलंडचा टिम सेइफर्ट यांना करोनाची लागण झाल्याचे शनिवारी उघडकीस आले.


प्रसिध कृष्णा


टिम सेइफर्ट

सध्या २५ वर्षीय कृष्णा बेंगळूरु येथे राहत्या घरीच विलगीकरणात आहे. कृष्णाची आगामी जागतिक कसोटी अजिंक्यपदाची अंतिम फेरी आणि इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी भारतीय संघात राखीव खेळाडू म्हणून निवड करण्यात आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूत्रांनी कृष्णाच्या प्रकृतीविषयी माहिती दिली.

‘‘३ मे रोजी केलेल्या दोन करोना चाचण्यांचा अहवाल नकारात्मक आल्यानंतर कृष्णा बेंगळूरुला आला. परंतु येथे आल्यानंतर केलेल्या चाचणीदरम्यान त्याला करोना झाल्याचे निष्पन्न झाले,’’ असे ‘बीसीसीआय’ने स्पष्ट केले. कोलकाताच्या आतापर्यंत चार खेळाडूंना करोनाची बाधा झाली असून यामध्ये वरुण चक्रवर्ती, संदीप वॉरिअर यांचाही समावेश आहे. ४ मे रोजी ‘आयपीएल’ स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

जागतिक अजिंक्यपदाच्या अंतिम फेरीसाठी इंग्लंडला रवाना होण्यापूर्वी २५ मेपासून भारतीय खेळाडूंना जैव-सुरक्षित वातावरणात ठेवण्यात येणार आहे. त्यापूर्वी कृष्णा पूर्णपणे तंदुरुस्त होईल, अशी आशा आहे.

दुसरीकडे सेइफर्टला यंदाच्या हंगामात एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. परंतु तो कोलकाताच्या जैव-सुरक्षा परिघाचा भाग होता. न्यूझीलंडचे काही खेळाडू शुक्रवारी मालदीवला रवाना झाले. परंतु सेइफर्टला सध्या अहमदाबाद येथेच विलगीकरण करावे लागणार आहे. काही दिवसांनी चेन्नईतील रुग्णालयात सेइफर्टला दाखल करण्यात येणार आहे.



(ग्राफिक्स : सुहास सावंत)

प्रशांत केणी

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेट लीगचा १४ वा हंगाम अर्ध्यावरती स्थगित करण्याची नामुष्की भारतीय क्रिकेट नियामक मंडळावर (बीसीसीआय) ओढवली. देशात करोनाबाधितांची संख्या वेगाने वाढत असताना ‘आयपीएल’चे मनोरंजन कशाला, असा प्रश्न उपस्थित करणाऱ्या मंडळींच्या विरोधामुळे स्पर्धा थांबवण्याचा निर्णय घेतलेला नाही. पण जैव-सुरक्षित परीघ भेदून चार संघांना करोनाची लागण झाल्यामुळे तूर्तास ‘आयपीएल’ स्थगित करण्याशिवाय पर्यायच नव्हता, ही वस्तुस्थिती सर्वप्रथम स्वीकारण्याची आवश्यकता आहे.

रविवार विशेष

गतवर्षी करोनाच्या साथीमुळे मैदानांवरील सामने स्थगित झाले असताना जैव-सुरक्षित परिघाचे सूत्र वापरल्याने क्रीडाक्षेत्राला संजीवनी मिळाली. जर्मनीत बंडेसलीगा यशस्वीपणे मैदानावर परतल्यानंतर फुटबॉलमधील जवळपास सर्वच स्पर्धा सुरू झाल्या. काही महिन्यांतच हे लोण क्रिकेटमध्ये पसरले. वेस्ट इंडिजचा इंग्लंड दौरा हे जैव-सुरक्षित परिघामधील पहिले आव्हान यशस्वीपणे पेलल्यानंतर अन्य देशांमध्येही दबक्या पावलांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट सुरू झाले. इतकेच नव्हे, तर संयुक्त अरब अमिरातीमध्ये ५३ दिवसांत ६० सामन्यांचा ‘आयपीएल’च्या १३व्या हंगामाचा थरार सफल संपूर्ण पार पडला. त्यानंतर ‘आयपीएल’चे १४ वे पर्व भारतात खेळवण्याचा अट्टहास धोक्याचा ठरला. ‘आयपीएल’चा आणखी एक हंगाम अमिरातीत खेळवता येऊ शकला असता, असे काही जणांचे म्हणणे आहे. परंतु भारतात मुश्ताक अली ट्वेन्टी-२० आणि विजय हजारे एकदिवसीय क्रिकेट स्पर्धा यशस्वीपणे झाल्या. नंतर इंग्लंडने तिन्ही प्रकारच्या क्रिकेटचा प्रदीर्घ भारत दौराही पूर्ण केला. त्यामुळे ‘बीसीसीआय’ला ‘आयपीएल’ होऊ शकेल, हा विश्वास वाटणे स्वाभाविक होते. करोनाच्या काळात ताणतणाव वाढले असताना दररोज सायंकाळचे काही तासांचे क्रिकेट मनोरंजन नागरिकांना दिलासादायी वाटत होते. स्पर्धेला स्वल्पविराम मिळण्यापूर्वी २४ दिवस २९ सामन्यांचा थरार क्रिकेटचाहत्यांनी अनुभवला. गतवर्षी ‘बीसीसीआय’ने करोनाच्या पार्श्वभूमीवर ५१ कोटी रुपयांची मदत केली होती. परंतु आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेल्या या संघटनेने आणखी पैसे द्यावेत, या हेतूने काही जणांनी ‘आयपीएल’ थांबवावे, अशी मागणी सुरू केली. कारण ‘आयपीएल’ ही स्पर्धा म्हणजे आदर्श महसूल प्रतिकृती आहे, हे मात्र त्यांना मान्य आहे.

करोना रुग्णसंख्या वेगाने वाढल्यामुळे अनेक देशांनी भारतासाठी हवाई निर्बंध कडक केले, तर ‘आयपीएल’मध्ये समावेश असलेल्या काही खेळाडू-सामनाधिकाऱ्यांच्या नातलगांना करोनाची लागण झाली. त्यामुळे जैव-सुरक्षित परिघातही अस्वस्थतेचे वातावरण पसरले. काही खेळाडू आणि सामनाधिकाऱ्यांनी माघार घेतली. पण चार संघांमधील खेळाडूंना करोनाची लागण झाल्यामुळे परिस्थिती अधिक बिकट झाली आणि ‘आयपीएल’ स्थगित करावे लागले. सहा ठिकाणी स्पर्धेच्या आयोजनामुळे हवाई प्रवास करावा लागला, म्हणून जैव-सुरक्षित परीघ भेदले गेल्याचे आता स्पष्ट होत आहे. हीच स्पर्धा अनेक मैदानांची उपलब्धता असलेल्या मुंबई या एकाच शहरात आयोजित केली असती, तर सुरक्षितपणे होऊ शकली असती. काही महिन्यांपूर्वी इंडियन सुपर लीग (आयएसएल) फुटबॉलसुद्धा गोव्यात म्हणजे एकाच शहरात उत्तमपणे पार पडली. चार महिन्यांत ११ संघांमध्ये ११५ सामने झाले.

ब्रिटनमधील ‘रेस्ट्राटा’ या व्यावसायिक कंपनीने अमिरातीत जैव-सुरक्षित परिघाची जबाबदारी घेतली होती. यंदा देशांतर्गत कंपनीकडे ही जबाबदारी सोपवण्यात आली. त्यामुळे दोन हजार कोटी रुपयांच्या तोट्याचा ताळेबंद मांडताना हासुद्धा मुद्दा चर्चेत आला आहे. ‘आयपीएल’च्या स्थगितीनंतर आता उर्वरित हंगाम कुठे आणि कधी खेळवावा, हा प्रश्न जसा ऐरणीवर आहे. तसाच ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचे भारतामधील भवितव्य अधांतरी दिसत आहे. त्यामुळे हे दोन प्रश्न सोडवण्याचे आव्हान ‘बीसीसीआय’पुढे असेल.

prashant.keni@expressindia.com



“भारतामध्ये ‘आयपीएल’ खेळवणे, ही संयोजकांची पहिली चूक आहे. अमिरातीत मागील वर्षीप्रमाणेच ही स्पर्धा सुरळीतपणे पार पडली असती. बऱ्याच शहरांत स्पर्धा खेळवण्याऐवजी एकाच शहरांत किंवा दोन गटांत संघविभागणी करून दोन शहरांत स्पर्धा खेळवणे आवश्यक होते. पण अनेक संघटनांना खूश करण्याचा संयोजकांचा प्रयत्न हानीकारक ठरला. करोनाच्या कठीण काळात ऑक्सिजन, व्हेंटिलेटर, बेड्स आणि लसीकरण या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे देशात नागरिकांचा उद्रेक झाला आहे. पण त्याला क्रिकेट जबाबदार मुळीच नाही. प्रेक्षकांविना जैव-सुरक्षित परिघात हे सामने सुरु होते. आपण जसे तीन तासांचा चित्रपट पाहतो, तसेच लोक ‘आयपीएल’ क्रिकेट सामन्यांचा आनंद लुटत होते.

-दिलीप वेंगसरकर, भारताचे माजी कर्णधार

### इंग्लंडमध्ये ‘आयपीएल’ खेळवावी -पीटरसन

● लंडन : स्थगित करण्यात आलेल्या ‘आयपीएल’च्या १४व्या हंगामाचे उर्वरित सामने सप्टेंबर महिन्यात इंग्लंड येथे खेळवावेत, असे इंग्लंडचा माजी क्रिकेटपटू केव्हिन पीटरसनने सुचवले आहे. ‘‘भारताचा इंग्लंड दौरा संपल्यानंतर सप्टेंबरमध्ये मोकळा अवधी आहे. यादरम्यान इंग्लंडमध्येच ‘आयपीएल’चे आयोजन करणे ‘बीसीसीआय’ला सोपे ठरेल,’’ असे पीटरसन म्हणाला.

### श्रीलंका ‘आयपीएल’च्या आयोजनासाठी उत्सुक

● नवी दिल्ली : ‘आयपीएल’च्या उर्वरित लढती खेळवण्यासाठी श्रीलंका क्रिकेट मंडळानेही उत्सुकता दर्शवली आहे. ‘‘सप्टेंबरपर्यंत श्रीलंकेतील मैदानांच्या डागडुजीचे कार्य १०० टक्के पूर्ण होईल. त्याशिवाय भारतीय खेळाडूंना येथील वातावरणात खेळताना फारशी अडचण जाणवणार नाही. त्यामुळे ‘बीसीसीआय’ने नक्कीच या पर्यायाचा विचार करावा,’’ असे श्रीलंका क्रिकेट मंडळाच्या व्यवस्थापकीय समितीचे मुख्य अर्जुन डी सिल्व्हा म्हणाले.

### भारतीय संघ २ जून रोजी इंग्लंडला रवाना

● नवी दिल्ली : भारतीय संघ जागतिक कसोटी स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी २ जूनला इंग्लंडला रवाना होणार आहे, अशी माहिती ‘बीसीसीआय’ने दिली. इंग्लंडला रवाना होण्यापूर्वी भारतीय खेळाडूंना २५ मेपासून मायदेशातच जैव-सुरक्षित परिघात आठ दिवस राहावे लागणार आहे. त्यानंतर इंग्लंडमध्ये दाखल झाल्यानंतरही त्यांना १० दिवसांचे विलगीकरण करावे लागेल.

## दडपणाखाली कामगिरी बहरते!

### राही सरनोबतला खात्री

नवी दिल्ली : दडपणाखाली माझी कामगिरी आणखी उत्तम होते, अशी खात्री कारकीर्दीतील दुसऱ्या ऑलिम्पिकसाठी सज्ज होणाऱ्या नेमबाज राही सरनोबतने व्यक्त केला.



‘‘जबाबदारी आणि अपेक्षा यांची जाणीव मला आहे. त्यामुळे दडपणाखाली माझी कामगिरी सुधारते.’’ असे राहीने सांगितले.

‘‘मी माझ्या जर्मनीच्या प्रशिक्षकांसमवेत ऑलिम्पिकची तयारी करीत होते. परंतु त्यांच्याशी करार गतवर्षी ऑलिम्पिकच्या पूर्वतारखांपर्यंत मर्यादित होता. ऑलिम्पिक पुढे ढकलल्यामुळे मी आता समरेश जंग यांच्याकडून मार्गदर्शन घेत आहे,’’ असे राहीने सांगितले.

## सीमाला सुवर्णपदक

पीटीआय, सोफिआ (बल्गेरिया)

### ऑलिम्पिक पात्रता कुस्ती स्पर्धा

टोक्यो ऑलिम्पिकसाठी पात्र ठरलेली भारताची कुस्तीपटू सीमा बिस्लाने शनिवारी जागतिक ऑलिम्पिक पात्रता कुस्ती स्पर्धेत महिलांच्या ५० किलो वजनी गटात सुवर्णपदकावर नाव कोरले.



इक्वाडोरच्या लुसिया गुझमनने दुखापतीमुळे अंतिम फेरीतून माघार घेतल्याने २९ वर्षीय सीमाला विजयी घोषित करण्यात आले. २०१९मध्ये सीमाने यासार दोगू स्पर्धेत अखेरचे सुवर्णपदक जिंकले होते.

### ग्रीको-रोमनमध्ये भारताची पाटी कोरी

जागतिक ऑलिम्पिक पात्रता कुस्ती स्पर्धेमधील ग्रीको-रोमन प्रकारात शनिवारी भारताची पाटी कोरी राहिली. त्यामुळे एकाही मल्लाला टोक्यो ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी स्थान निश्चित करता आली नाही. भारताला गुरप्रीत सिंगकडून मोठ्या अपेक्षा होत्या. परंतु ७७ किलो वजनी गटाच्या उपउपांत्यपूर्व सामन्यात त्याचे आव्हान संपुष्टात आले. युरोपियन विजेत्या रफिग हुसेयनोव्हने (अझरबैजान) त्याचा ४८ सेकंदांत पराभव केला. हुसेयनोव्हने सुरुवातीलाच चार गुण मिळवले. त्यानंतर गुरप्रीत सावरण्याच्या आताच त्याने आणखी चार गुणांची कमाई करीत पहिल्याच सत्रात सामना जिंकला. गेल्या महिन्यात आशियाई पात्रता कुस्ती स्पर्धेत कांस्यपद मिळवणाऱ्या गुरप्रीतला पहिल्याच लढतीत पुढे चाल देण्यात आली होती.

## माजी हॉकीपटू-प्रशिक्षक कौशिक यांचे करोनामुळे निधन

नवी दिल्ली : भारताचे माजी हॉकीपटू आणि प्रशिक्षक एम. के. कौशिक (६६ वर्षे) यांचे शनिवारी करोनामुळे निधन झाले. गेले तीन आठवडे त्यांची करोनाशी झुंज सुरू होती. त्यांच्या पश्चात मुलगा आणि पत्नी असा परिवार आहे.



१९८०मधील मॉस्को ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघाचे कौशिक सदस्य होते. १७ एप्रिलला करोनाची लागण झाल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रकृती ढासळल्याने शनिवारी सकाळी कौशिक यांना कृत्रिम श्वसनयंत्रणेवर ठेवण्यात आले. परंतु सायंकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.

कौशिक यांनी भारताच्या दोन्ही वरिष्ठ संघाचे प्रशिक्षकपद भूषवले. भारताच्या पुरुष संघाने कौशिक यांच्या मार्गदर्शनाखाली १९९८च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक कमावले होते. तसेच महिला संघाने २००६मध्ये आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक मिळवले. कौशिक यांनी १९९८मध्ये अर्जुन, तर २००२मध्ये द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त केला.

## माजी हॉकीपटू रविंदर पाल सिंग कालवश

नवी दिल्ली : मॉस्को येथे १९८०मध्ये ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकण्याची किमया साधणाऱ्या भारतीय संघाचे हॉकीपटू रविंदर पाल सिंग (६० वर्षे) यांचे शनिवारी सकाळी करोनामुळे निधन झाले. २४ एप्रिलला रविंदर यांना लखनौ येथील विवेकानंद हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. शुक्रवारी त्यांची प्रकृती गंभीर झाली व शनिवारी त्यांची प्राणज्योत मालवली, अशी माहिती पुतणी प्रज्ञा यादव यांनी दिली. १९७९ ते १९८४ या कालखंडात ‘सेंटर-हाफ’ म्हणून त्यांचा नावलौकिक होता.



## संक्षिप्त

### बोपण्णा-शापोव्हालोव्ह जोडी पराभूत

माद्रिद : जर्मनीच्या अ‍ॅलेक्झांडर झ्वेरेव्ह आणि टिम पुएर्झ जोडीविरुद्ध कडवी लढत देऊनही भारताचा रोहन बोपण्णा आणि कॅनडाचा डॅनिस शापोव्हालोव्ह जोडीचे माद्रिद खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीमधील आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले. झ्वेरेव्ह-पुएर्झ जोडीने बिगरमानांकित बोपण्णा-शापोव्हालोव्ह जोडीला ६-४, ३-६, १०-५ असे तीन सेटमध्ये झुंजवत नामोहरम केले. बोपण्णा-शापोव्हालोव्ह जोडीने या सामन्यात पाच दुहेरी चुका केल्या.

### चॅम्पियन्स लीगची अंतिम फेरी इंग्लंडला?

लंडन : चॅम्पियन्स लीग फुटबॉलची २९ मे रोजी होणारी अंतिम फेरी टर्कीऐवजी इंग्लंडमध्ये खेळवण्यात येण्याची शक्यता बळावली आहे. मँचेस्टर सिटी आणि चेल्सी या इंग्लंडच्याच दोन्ही क्लब्जनी अंतिम फेरी गाठली असून इंस्ताबूल (टर्की) येथील अतातुर्क ऑलिम्पिक स्टेडियमवर ही लढत खेळली जाणार आहे. परंतु टर्कीत गेल्या काही आठवड्यांपासून करोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने इंग्लंडने तेथील प्रवासावर निर्बंध टाकले आहेत. त्यामुळे सिटी आणि चेल्सी संघांच्या प्रवासावरही बंधने येण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत इंग्लिश फुटबॉल संघटना आणि युरोपियन फुटबॉल संघटना (युएफा) यांच्यात अंतिम फेरीतील ठिकाणात बदल करण्याविषयी चर्चा सुरू आहे.


### गॉर्डिओला यांचा भारतीयांसाठी संदेश

लंडन : मँचेस्टर सिटी फुटबॉल संघाचे प्रशिक्षक पेप गॉर्डिओला यांनी शनिवारी भारतीय नागरिकांसाठी भावनिक संदेश दिला. ‘‘देशातील आव्हानात्मक परिस्थितीला धैर्याने सामोरे जाणाऱ्या भारतातील सर्व चाहते, मित्र आणि कुटुंबियांना माझा सलाम! आम्ही तुमच्यासाठी मैदानावर लढत आहोत. तुम्ही घरी बसून करोनाविरुद्ध लढा द्या,’’ असे गॉर्डिओला म्हणाले.

### क्रिकेट : अबिदचे दमदार द्विशतक

हरारे : सलामीवीर अबिद अलीने (नाबाद २१५ धावा) साकारलेल्या कारकीर्दीतील पहिल्या द्विशतकाच्या बळावर पाकिस्तानने झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीतील पहिला डाव ८ बाद ५१० धावांवर घोषित केला. प्रत्युत्तरात दुसऱ्या दिवसअखेर झिम्बाब्वेची ४ बाद ५२ धावा अशी अवस्था झाली असून ते अद्यापही ४५८ धावांनी पिछाडीवर आहेत. २९ चौकार लगावणाऱ्या आबिदने नौमान अलीसह (९७) आठव्या गड्यासाठी १६९ धावांची भागीदारी रचली.


लोकप्रभा ऑनलाइन वाचण्यासाठी क्लिक करा...
epaper.lokprabha.com




आहे ते सांभाळा... तृप्ती राणे
कोविडविरोधातील विमाकवच भक्ती रसाळ
साथकाळातील गुंतवणूक कौस्तुभ जोशी
नवीन करस्रचनेचा विकल्प प्रवीण देशपांडे
निर्धास्त गुंतवणूक अजय वाळिंबे
आपली जबाबदारी! उदय तारदाळकर
पन्नाशीनंतर सेवानिवृत्ती किरण हाके
आलेख उंच का? संदीप सिंग
युलिप... डॉ. ऊर्मिला अजय
आभासी नव्हे, तंत्रस्नेही चलन वीरेंद्र तळेगावकर

लोकप्रभा
facebook.com/Lokprabha
twitter.com/Lokprabha
lokprabha.com



## पश्चिम रेल्वे मुंबई सेन्ट्रल - मंडूअधी दादर विशेष गाडी आणि फेऱ्यांचा विस्तार आणि मुंबई सेन्ट्रल - गोरखपूर, वांद्रे टर्मिनस - गाझिपूर सिटी - वलसाड आणि सुरत - भागलपूर - रतलामदरम्यान विशेष गाड्या चालविणार आहे

| गाडी नं. | सुरुवातीचे स्थानक आणि गन्तव्य | सेवांचे दिवस | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०९०३५ | मुंबई सेन्ट्रल - मंडूअधी सुपरफास्ट स्पेशल गाडी | १४.०५.२०२१ | २२.३० वा. (शुक्र.) | ०८.०० वा. (रवि.) |
| ०९०३६ | मंडूअधी - दादर सुपरफास्ट स्पेशल गाडी | १६.०५.२०२१ | १७.०० वा. (रवि.) | ०४.४५ वा. (मंगळ.) |

**थांबे :** बोरिवली, वापी, सुरत, वडोदरा, रतलाम जं., सवाई माधोपूर जं., भारतपूर जं., अछनेरा जं., मथुरा जं., कानपूर सेन्ट्रल, लखनौ चारबाग, रायबरेली जं., अमेठी, प्रतापगड जं., जन्घाई जं. आणि भदोही स्थानके दोन्ही बाजूंनी.
**गाडी क्र. ०९०३६ दादर येथे समाप्त होईल.**

**रचना :** एसी-२ टियर, एसी-३ टियर आणि शयनयान वर्ग डबे.

| गाडी नं. | सुरुवातीचे स्थानक आणि गन्तव्य | सेवांचे दिवस | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०९१९३ | मुंबई सेन्ट्रल - गोरखपूर सुपरफास्ट स्पेशल गाडी | १०.०५.२०२१ आणि १३.०५.२०२१ | २३.०० वा. (सोम. आणि गुरु.) | ०९.०५ वा. (बुध. आणि शनि.) |
| ०९१९४ | गोरखपूर - मुंबई सेन्ट्रल सुपरफास्ट स्पेशल गाडी | १२.०५.२०२१ आणि १५.०५.२०२१ | १४.०० वा. (बुध. आणि शनि.) | २३.२० वा. (गुरु. आणि रवि.) |

**थांबे :** बोरिवली, वापी, सुरत, वडोदरा, रतलाम, कोटा, सवाई माधोपूर, भारतपूर, अछनेरा, मथुरा जं., कासगंज, फरुकाबाद, कानपूर सेन्ट्रल, ऐशबाग, बाराबंकी जं., गोंडा जं. आणि बस्ती स्थानके दोन्ही बाजूंनी.

**रचना :** १ एसी, एसी-२ टियर, एसी-३ टियर आणि शयनयान वर्ग डबे.

| गाडी नं. | सुरुवातीचे स्थानक आणि गन्तव्य | सेवांचे दिवस | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०९१३३ | वांद्रे टर्मिनस - गाझिपूर सिटी सुपरफास्ट स्पेशल गाडी | १२.०५.२०२१ | ११.१५ वा. (बुध.) | २२.०० वा. (गुरु.) |
| ०९१३४ | गाझिपूर सिटी - वलसाड सुपरफास्ट स्पेशल गाडी | १४.०५.२०२१ | ०१.२० वा. (शुक्र.) | ०८.२० वा. (शनि.) |

**थांबे :** वापी, सुरत, वडोदरा, रतलाम, कोटा, सवाई माधोपूर, भारतपूर, अछनेरा, मथुरा, कासगंज, फरुकाबाद, कानपूर सेन्ट्रल, लखनौ, सुलतानपूर, जौनपूर सिटी, वाराणसी आणि औनरीहर जं. स्थानके दोन्ही बांजूनी.
**गाडी क्र. ०९१३३ ला बोरिवली येथे अतिरिक्त थांबा देण्यात आला आहे. गाडी क्र. ०९१३४ वलसाड येथे समाप्त होईल.**

| गाडी नं. | सुरुवातीचे स्थानक आणि गन्तव्य | सेवांचे दिवस | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०९१३५ | सुरत - भागलपूर सुपरफास्ट स्पेशल गाडी | १२.०५.२०२१ | ०६.३० वा. (बुध.) | २०.३० वा. (गुरु.) |
| ०९१३६ | भागलपूर - रतलाम सुपरफास्ट स्पेशल गाडी | १३.०५.२०२१ | २३.३० वा. (गुरु.) | ०७.४५ वा. (शनि.) |

**थांबे :** रतलाम, कोटा, सवाई माधोपूर, भारतपूर, अछनेरा, मथुरा जं., कासगंज, कानपूर, लखनौ, सुलतानपूर जं., जौनपूर सिटी, वाराणसी जं., बक्सर, अरा, दानापूर, पाटणा जं., फतुहा आणि किऊल जं. स्थानके दोन्ही बाजूंनी.
**गाडी क्र. ०९१३५ ला वडोदरा येथे अतिरिक्त थांबा देण्यात आला आहे. गाडी क्र. ०९१३६ रतलाम येथे समाप्त होईल.**

**रचना :** एसी-२ टियर, एसी-३ टियर आणि शयनयान वर्ग डबे.

विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या संदर्भात वेळेच्या तपशिलासाठी प्रवाशांनी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्यावी.

केवळ निश्चित तिकिटे असलेल्या प्रवाशांनाच विशेष गाडी पकडण्याची परवानगी देण्यात आली आहे.

गाडी क्र. ०९१९३ करिता आरक्षण ०९.०५.२०२१, गाडी क्र. ०९१३३ आणि ०९१३५ करिता ११.०५.२०२१ आणि गाडी क्र. ०९०३५ करिता १२.०५.२०२१ पासून सर्व निर्धारित पीआरएस काऊन्टर्स आणि आयआरसीटीसी संकेतस्थळावर सुरू करण्यात आले आहे. वरील गाड्या विशेष दरांनी पूर्ण आरक्षित विशेष गाड्या म्हणून चालविण्यात येतील.

प्रवाशांना सल्ला देण्यात येत आहे की, चढताना, प्रवास आणि गन्तव्य ठिकाणी कोविड-१९ संबंधी निर्देश आणि एसओपीचे पालन करावे.

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly
आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

कृपया सर्व आरक्षित तिकिटांसाठी वैध ओळखपत्र सोबत ठेवा.



हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. लोकसत्ता कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. पुणे कार्यालय : एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. नागपूर कार्यालय : प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर * (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. MAHMAR/2006/19943

© द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रूपये.
epaper.loksatta.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती
# लोकरंग
आपल्या प्रतिक्रिया व सूचना देण्यासाठी lokrang@expressindia.com
रविवार, ९ मे २०२१







**केंद्र आणि राज्यांत एकाच पक्षाची सरकारे असल्यास विकास वेगवान होतो हे प्रचारातले मिथक, तर डाव्यांना पश्चिम बंगालात भाजपने नेस्तनाबूत केले, किंवा मुस्लीम मतपेढ्यांमुळेच तृणमूल आदी पक्ष निवडून आले ही निकालांनंतरच्या विश्लेषणामधील मिथके आकड्यांच्या कसोटीवर घासून पाहिली असता निराळे चित्र दिसते. हे चित्र पक्षीय चष्म्यांतून बेरंगी दिसेल, पण लोकशाहीचे हे असे दर्शन विलोभनीयच...**



# तुझी गोधडी चांगली...

गिरीश कुबेर

प्रत्येक निवडणुकीचे किमान दोन अर्थ असतात. एक निवडणूक निकालांतून सहज दिसतो तो. जय-पराजयाच्या वाटणीतून हा अर्थ सहज कळतो. त्याला वृत्तमूल्य असते. निवडणुकीत जिंकणाऱ्याचे डिंडिम पिटले जातच असतात. आणि अनेकांना जय-पराजयाच्या समीकरणापुरताच रस असल्यामुळे हा अर्थ ठसठशीतपणे समोर मिरवला जातो. पण त्याचमुळे निवडणुकांच्या दुसऱ्या अर्थाकडे दुर्लक्ष होते. हा दुसरा अर्थ जय-पराजय, रोषणाई, मिरवणुका अशा झगमगाटाच्या मागच्या अंधारात दडलेला असतो. निवडणुकोत्तर विजय सोहोळ्यांचा झगमगाट, दावे-प्रतिदाव्यांचा कलकलाट शांत झाला की या दुसऱ्या अर्थाला भिडणे सोपे जाते.

पहिल्याच्या तुलनेत हा दुसरा अर्थ थेट असतो. कोणाला काही 'वाटले', 'समज झाला' वगैरे भोंगळ विधानांचा आधार या दुसऱ्या अर्थास समजून घेताना लागत नाही. कारण तो निःसंदिग्ध तपशिलाच्या आधारे स्वतःच्या पायावर उभा राहिलेला असतो. आकडेवारीचा काटक कणा त्यास असतो आणि त्यामुळे त्याला कोणी आपल्या सोयीने 'वापरू' शकत नाहीत. यामुळे हा पहिल्याच्या तुलनेत तसा दुर्लक्षित राहतो. तर अशा या दुसऱ्या अर्थाकडे लक्ष वेधण्यासाठी हा प्रपंच. प्रचार, प्रचलित, करून दिलेले आणि करून घेतलेले समज वगैरे दूर होण्यास या दुसऱ्या अर्थामुळे मदत होईल.

पहिला मुद्दा केंद्राकडून निवडणुकीच्या काळात दाखविण्यात आलेल्या आमिषाचा. विकासाचे 'डबल इंजिन' असे ते आमिष. म्हणजे केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असल्यास विकासाची गाडी विनाअडथळा जोमाने धावेल... असा दावा. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ या राज्यांतील मतदारांनी त्यास केराची टोपली दाखवली. खरे तर संघराज्य व्यवस्थेत मुळात असा दावा करणे हीच चूक. कारण लोकशाही संघराज्य आणि एकचालकानुवर्तीतता यांतील फरकच यामुळे नाहीसा होतो. म्हणून केंद्रात ज्यांच्या हाती सत्ता आहे त्यांच्याच हाती राज्यशकट दिल्यास तुमचा विकास वेगात होईल असे आमिष दाखवणे अयोग्य. ते अलीकडच्या काळात वारंवार दाखवले गेले. पण आनंदाची बाब अशी की तितक्याच वारंवार मतदारांनी ते फेटाळले. कदाचित केंद्रात ज्या पक्षाच्या हाती सत्ता आहे त्याच पक्षाची राज्य सरकारे काय दिवे लावत आहेत हे समोर असल्यामुळे मतदार या प्रलोभनास अजिबात भुलत नसावेत. आणि दुसरे असे की, असे आमिष दाखवणे म्हणजे मतदारांच्या सामूहिक आकलनाचा अपमानच! खरे तर लोकसभेच्या आणि स्थानिक विधानसभेच्या निवडणुकांतील फरक समजण्याइतके आपले मतदार निश्चितच सुज्ञ आहेत. एकाच वेळी झाल्या तरी ते विधानसभा आणि लोकसभा यासाठी वेगवेगळे मतदान करतात, हे याआधीही अनेकदा सिद्ध झालेले आहे. तरीही आपले 'राष्ट्रीय' म्हणवून घेणारे पक्ष तीच चूक वारंवार करतात.

म्हणजेच केंद्रपातळीवरील नेत्यांनी राज्य विधानसभांच्या निवडणुकांत एका मर्यादेपलीकडे उतरू नये. मतदार त्यांची पत्रास ठेवत नाहीत. एखाद्या केंद्रीय नेत्याने कथित स्वबळावर राज्य विधानसभेत पक्षास निवडून आणण्याचा काळ कधीच मागे सरला. हे अजूनही ज्यांना कळले नसेल त्यांनी पश्चिम बंगालच्या निवडणुकांची आकडेवारी तपासावी. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आदी इरेस पेटून या वंगसत्तेच्या चळवळीत उतरले. भाजपच्या केंद्रीय नेत्यांनी या राज्यात तीन डझनांहून अधिक सभा घेतल्या. दस्तुरखुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभांची संख्या १८ भरते. मतदारांच्या शहाणिवेचा भाग असा की, यापैकी १० ठिकाणी पंतप्रधानांच्या पक्षाचे उमेदवार पराभूत झाले. याचा अर्थ पुरेसा स्पष्ट आहे. अलीकडेपर्यंत राहुल गांधी यांच्याबाबत असे होत होते. त्यांच्या सभा ज्या मतदारसंघात होत, तेथे काँग्रेस उमेदवाराचा पराभव हमखास ठरलेला. सर्वच बाबतीत काँग्रेसचे अनुकरण करणाऱ्या भाजपबाबत ही स्थिती येण्याचा क्षण फार दूर नसावा हे या तपशिलावरून कळेल. 'लोकनीती-सीएसडीएस' यांच्या विविध चाचण्यांतूनदेखील ही बाब स्पष्ट दिसून आली. केरळ, प. बंगाल आणि तामिळनाडू या राज्यांतील मतदारांनी संपूर्णपणे स्थानिकांच्या बाजूनेच कौल दिला. आसामामधील भाजपचे यश आहे ते- तो पक्ष लक्षणीय स्थानिक नेतृत्व समोर आणू शकला, यात.

एक मुद्दा तामिळनाडूबाबत... कारण या राज्यातच स्थानिक पक्षांनी राष्ट्रीय पक्षांना कडेवर घेऊन निवडणुका लढवल्या. द्रमुकची हातमिळवणी काँग्रेसशी होती, तर सत्ताधारी अण्णा-द्रमुकच्या हाती भाजपचे कमळ होते. गतसाली बिहार विधानसभा निवडणुकीतील चूक यावेळी काँग्रेसने तामिळनाडूत सुधारली. तर काँग्रेसच्या त्या चुकीची पुनरावृत्ती भाजपबाबत अण्णा-द्रमुकने केली. ही चूक म्हणजे राष्ट्रीय पक्षास अवास्तव महत्त्व देणे. बिहारात तसे ते दिल्यामुळे लालुप्रसाद यादव यांच्या 'राजद'चा विजय आकसला. कारण त्या निवडणुकीत काँग्रेसची कामगिरी अपेक्षेपेक्षा वाईट झाली. आता तामिळनाडूत याचेच प्रतिबिंब अण्णा-द्रमुक-भाजप युतीत पडले. या निवडणुकीत अण्णा-द्रमुकचा आलेख भाजपच्या वजनामुळे बसल्याचे दिसते. अण्णा-द्रमुकच्या अनेक मतदारांनी त्या पक्षास यावेळी मतदान केले नाही यामागील एक प्रमुख कारण म्हणजे या पक्षाने भाजपशी केलेली हातमिळवणी. अण्णा-द्रमुककडे भाजपमुळे पाठ फिरवणाऱ्यांत केवळ अल्पसंख्यांक नाहीत, तर दलित आदी मागास 'हिंदू'देखील आहेत. याचाही अर्थ पुन्हा तोच! केंद्रातील प्रभावळ राज्यस्तरावर उपयोगी ठरतेच असे नाही. किंबहुना ती अडगळच ठरते. भाजपच्या दबावास यावेळी अण्णा-द्रमुक बळी पडला. कदाचित जयललितांच्या निधनानंतरची पहिलीच निवडणूक असल्यामुळे असे झाले असेल. पण ते त्या पक्षाच्या पारंपरिक मतदारांना रुचलेले नाही, हे विविध पाहण्यांतील आकडेवारीवरून सुस्पष्टपणे दिसते. अण्णा- द्रमुकचे मतदार प्राधान्याने हिंदूच. द्रमुक हा त्या तुलनेत पाखंडी आणि नास्तिक-समर्थक. त्यामुळे त्यांचे मतदार भाजपच्या वाऱ्यास उभे न राहिल्यास आश्चर्य नाही. पण अण्णा-द्रमुकचे तसे नाही. तरीही त्या पक्षाच्या मतदारांस भाजप-सौहार्द आवडलेले नाही, ही बाब सूचक. धर्मप्रेमींतील हा भेदभाव लक्षात घ्यायला हवा.

या निवडणुका जरी पाच राज्यांमध्ये झालेल्या असल्या तरी सर्वांचे लक्ष होते ते पश्चिम बंगालवर. याचे कारण एखाद्या निवडणुकीत जितके काही वाईट असू शकते ते या राज्यात घडले. हिंसाचार, असभ्यता, स्त्रीदाक्षिण्याचा अभाव, धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रयत्न आणि याच्या जोडीला साधनसंपत्तीची (म्हणजे पैसा) बेफाम उधळपट्टी. या साऱ्यामुळे पश्चिम बंगालची निवडणूक अकारण प्रतिष्ठेची बनली. क्रिकेटच्या सामन्यात सर्व ११ फलंदाज बाद होण्यास सारखेच महत्त्व असले तरी काहींचे बाद होणे अधिक मूल्यवान असते. त्याप्रमाणे ममता बॅनर्जी यांचा 'बळी' महत्त्वाचा होता. म्हणून त्यांना बाद करण्यास केंद्राने आपली सारी शक्ती पणाला लावली. यातून जे काही झाले ते नव्याने सांगण्याची गरज नाही. पण या राज्याच्या एकंदर निकालातील न सांगितले गेलेले अथवा जाणूनबुजून चुकीचे सांगितले गेलेले काही मुद्दे मात्र निश्चितपणे समोर आणायला हवेत.

अल्पसंख्याकांचा पाठिंबा हा यातील मुद्दा क्रमांक एक. पश्चिम बंगालात अल्पसंख्य, त्यातही मुसलमान, लक्षणीय आहेत. ममता बॅनर्जी यांच्या तृणमूलने त्यांचे तुष्टीकरण केले आणि म्हणून त्यांची मते त्या पक्षाकडे गेली, हा एक वारंवार केला जाणारा युक्तिवाद. यातून न सांगितला जाणारा, पण ध्वनित अर्थ असा की, हिंदूंपेक्षा मुसलमानांनी पाठिंबा दिल्यामुळे ममता यांचा पक्ष विजयी ठरला.

याच्याइतके धादांत असत्य काही नाही. याच असत्य धारणेमुळे भाजपने हिंदू मतांवर लक्ष केंद्रित केले आणि जास्तीत जास्त हिंदू आपल्या बाजूला वळवण्याचा प्रयत्न केला.

प्रत्यक्षात घडले ते उलटेच. म्हणजे भाजपच्या इच्छेनुसार मुसलमान मतदार तर तृणमूलकडे गेलेच, पण त्याहीपेक्षा अधिक हिंदू मोठ्या संख्येने गेले. इतके, की त्यामुळे २०१९ च्या लोकसभा निवडणुकांच्या तुलनेत भाजपच्या हिंदू मतदारांच्या संख्येत प्रत्यक्षात घटच झाली. म्हणजे मुसलमान तर भाजपकडे आले नाहीतच; ते यावेत अशी भाजपची इच्छा आणि प्रयत्नही नव्हते. पण उलट भाजपकडे होते ते हिंदू मतदारही यावेळी कमी झाले. दोन वर्षांपूर्वी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला ५७ टक्के हिंदू मतदारांचा पाठिंबा मिळाला. या निवडणुकीत तो ५० टक्क्यांवर घसरला. ही घसरण लक्षणीय आणि निर्णायकदेखील. याचेच थेट प्रतिबिंब तृणमूलच्या मताधिक्यात दिसते. त्या पक्षाला २०१९ साली ३२ टक्के हिंदूंची मते मिळाली. या निवडणुकीत हे प्रमाण ३७ टक्क्यांवर गेले. याचा थेट अर्थ असा की धार्मिक विद्वेष वाढवण्यासाठी भाजपने जंग जंग पछाडूनही त्या राज्यातील हिंदू मतदार वाहवत गेले नाहीत. ममता बॅनर्जी समोर आल्या की 'जय श्री राम'चे हाकारे देत त्या जणू हिंदूविरोधी असल्याचे सुचवण्याचे भाजपचे क्षुद्र उद्योग त्याच पक्षाच्या अंगाशी आले.

दुसरे सत्य असे की, या निवडणुकीत २९२ पैकी २११ मतदारसंघांत भाजपचे मताधिक्य घटले. आणि यातील १०१ मतदारसंघ तर असे आहेत की त्यात भाजपपासून दूर गेलेल्या मतांचे प्रमाण पाच टक्के वा अधिक आहे. याचा परिणाम असा की, २०१९ च्या तुलनेत भाजपला यावेळी मिळालेली मते उलट कमी आहेत. त्यावेळी भाजपच्या पाठीशी सुमारे ४३ टक्के मतदार उभे राहिले होते. यावेळी हे प्रमाण साधारण ३८ टक्के इतकेच आहे. इतक्या अल्प मतसंख्येवर हा पक्ष सत्ता मिळवण्याचा दावा करत होता, हे जनसामान्यांच्या अज्ञानावर विश्वास असल्याखेरीज अशक्यच. या तुलनेत तृणमूलला पडलेली मते ही भाजपपेक्षा दहा टक्क्यांनी अधिक आहेत. यातही आवर्जून लक्षात घ्यावी, दोन-दोनदा अधोरेखित करून समजून घ्यावी अशी बाब म्हणजे ज्या मतदारसंघांत मुसलमानांचे प्रमाण दहा टक्के इतकेदेखील नाही त्या मतदारसंघांतही तृणमूलला लक्षणीय मताधिक्य मिळालेले आहे. याचाच अर्थ तृणमूलचे यश हे केवळ अल्पसंख्याकधारित नाही. तसे म्हणणे हा शुद्ध प्रचाराचा भाग; आणि तो तृणमूलच्याच नव्हे, तर मतदारांच्याही समंजसपणास कमी लेखणारा ठरतो. ज्या मतदारसंघांत मुसलमान हे दहा टक्क्यांपेक्षाही कमी आहेत अशा मतदारसंघांत तृणमूलच्या विजयाचे प्रमाण ६३ टक्के इतके प्रचंड आहे, ही बाब त्या पक्षाचे व्यापक यश आणि तितकेच व्यापक भाजपचे अपयश समजावून सांगते. हे सत्य समजून घ्यायचे नसेल तर गोष्ट वेगळी!

दुसरी 'लोकनीती'ची पाहणी एक नवीनच सत्य दाखवून देते. ते असे की- भाजपच्या या कर्कश्श हिंदू प्रचाराचा परिणाम म्हणून अल्पसंख्य तर तृणमूलच्या कळपात गेलेच; पण जे उदारमतवादी हिंदू २०१९ च्या निवडणुकीत विकासाच्या मुद्द्यावर भाजपच्या मागे उभे राहिले होते, त्यांनादेखील या कर्कश्शपणामुळे भाजप यावेळी नकोसा झाला. परिणामी यावेळी तृणमूलच्या यशात हिंदू मतांचा टक्का लक्षणीयरीत्या वाढला. जवळपास ५७ टक्के हिंदू आणि ४२ टक्के मुसलमानांनी तृणमूलच्या मागे

(पान ४ वर)

# प्रखर बुद्धिवादाचा महामेरू

न्या. धनंजय चंद्रचूड

सोली सोराबजी यांचे निधन झाल्याची बातमी मन विदीर्ण करणारी आहे. त्यांच्या मृत्यूच्या बातमीने मला व्यक्तिशः दुःख होते आहे.

गेली सात दशके सोली सोराबजी घटनात्मक न्यायशास्त्रातील (ज्युरिसप्रुडन्स) बदलांचे साक्षीदार राहिलेले आहेत. हाच कालखंड त्यांच्या एक वकील, विचारवंत आणि 'ओपिनियन मेकर' म्हणून झालेल्या वाटचालीशीही संबंधित आहे. या कालावधीत भारताने स्वातंत्र्य व समानता यांच्या औपचारिक ते खऱ्याखुऱ्या कल्पनांच्या योग्य व तर्कसंगत अभिव्यक्तीकडे वाटचाल केली आहे. देशातील काही महनीय वकिलांच्या कायदेविषयक जाणकारीमुळे समकालीन समाजाला आकार देणाऱ्या बदलांशी एकरूप होणे आपल्या न्यायप्रणालीला शक्य झाले आहे. काही तात्त्विक भूमिकांच्या उत्क्रांतीमध्ये वकिलांचे जे योगदान होते, त्यात सोली सोराबजी यांच्या अंतर्मनाचा स्वर आणि त्यांची विद्वत्ता व व्यासंग यांनी त्यांना आघाडीचे स्थान मिळवून दिले. मानवाधिकारांच्या निकषांना स्वतंत्र आशय मिळवून देण्यात आणि प्रशासनिक संरचनांना घटनात्मक मूल्यांबद्दल उत्तरदायी बनवण्यात सोली सोराबजी हे मते व कल्पना यांचा प्रभावी स्रोत राहिले. कायदा आणि समाज संवेदनशील प्रश्नांशी झगडत असताना सोराबजी यांच्या लेखनाने यासंदर्भात यथार्थ आणि सखोल दृष्टिकोन मांडणारे योगदान दिले आहे.

'सतवंत सिंग सहानी' (१९६७)पासून 'आर. आर. कोएलों' (२००७)पर्यंत अनेक कठीण प्रकरणांत सोराबजी यांची कुशाग्र बुद्धी, तसेच त्यांची निर्भय अभिव्यक्ती यांचे प्रतिबिंब अनेक 'लॉ रिपोर्ट्स'मध्ये पडलेले आहे. अशाच निर्भयपणे त्यांनी आणीबाणीच्या विरोधात मोहीम उघडली होती. केशवानंद भारती, मनेका गांधी, सुनील बत्रा, डी. सी. वाधवा आणि एस. आर. बोम्मई अशी नानाविध प्रकरणे हाताळत आपली कायदेविषयक कारकीर्द घडविणाऱ्या सोली यांनी कायद्याच्या शिकवणीत एकवाक्यता आणि स्थैर्य आणण्याचे सतत प्रयत्न केले.

माझ्या तरुण वयात ज्युनियर म्हणून सोली यांच्याशी विचारविनिमय करणे हा खरोखरच अनोखा अनुभव होता. त्यांचे प्रश्न संक्षिप्त आणि नेमके असत. टिपणांच्या अखेरीस विशिष्ट अशा हस्ताक्षरातील नोट्स या त्यांच्या बुद्धीला साजेलशा विश्लेषणात्मक आणि मुद्देसूद असत. औपचारिक चर्चा किंवा मतांचे आदानप्रदान ते थोडक्यात आटोपत असत. त्यामध्ये त्यांच्या उपरोधिक विनोदबुद्धीची पखरण असे. आपल्या ज्युनियरने तयारी न करता येणे सोली खपवून घेत नसत. 'ब्रीफिंग कॉन्सेल' असो की कुणी वजनदार अशील असो- त्याला सर्दी-खोकला असेल तर त्याला परत पाठवण्यास ते मागेपुढे पाहत नसत. गंभीर स्वरूपाची चर्चा करताना मानवी संपर्कातून विषाणूंचा प्रसार होऊ शकतो याची त्यांना कायम जाणीव असे. त्यांच्या ज्युनिअर्सचाही याबाबतीत अपवाद केला जात नसे.

*प्रख्यात विधिज्ञ सोली सोराबजी हे तत्त्वनिष्ठ, अत्यंत प्रामाणिक आणि नि:पक्ष कायदेतज्ज्ञ होते. त्यांनी देशातील अनेक महत्त्वाच्या खटल्यांत आपल्या प्रखर बुद्धिवादाच्या जोरावर न्यायाची बाजू घेत इतिहास घडवला. त्यांच्या जाण्याने विधी क्षेत्राचा एक सच्चा आधारस्तंभ कोसळला आहे.*



डी. सी. वाधवा खटल्यात एक घटनापीठापुढे मी त्यांचा ज्युनियर होतो. जमीन वहिवाटीबाबत संशोधन करणाऱ्या गोखले इन्स्टिट्यूटमधील एका अर्थशास्त्रज्ञाला बिहारमध्ये अनेक वर्षे या मुद्द्यावर अध्यादेश प्रसृत होण्याचा आणि मुदत संपल्यानंतर पुन्हा प्रसृत होण्याचा एक 'पॅटर्न' असल्याचे लक्षात आले, तेव्हा त्याचे या विषयाबाबतचे कुतूहल वाढले. या संशोधनाने नंतर पुस्तकाचे रूप घेतले आणि तोच पुढे सर्वोच्च न्यायालयापुढील एका याचिकेचा आधारही ठरला. वैयक्तिकरीत्या माझ्या बाबतीत सांगायचे तर या याचिकेच्या संबंधात सकाळी ६ वाजता सोलींसोबत विचारविनिमयासाठी बसणे हे माझ्याकरता आयुष्यभरासाठी पुरणारे अध्ययन होते. यावेळी ते घटनात्मक विचारसरणीची शिकवण अगदी सहजतेने स्पष्ट करून सांगत असत. या चर्चांनी आपल्या 'सीनियर'च्या श्रवणभक्तीचे आणि ते त्यांच्या घटनात्मक पदाचा कसा विकास करत आहेत ते ऐकत राहण्याचे रूप घेतले. त्यांच्या विचारांची स्पष्टता आणि भाषिक संरचनेसह वाक्पटुता या गोष्टी अतुलनीय होत्या.

१९९८ च्या मध्यात मला सोली यांचा दूरध्वनी आला.

(पान ४ वर)



लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM




रेखाचित्र : अन्वर हुसेन

सुभाष अवचट




चित्रपट दिग्दर्शक रबीन्द्र धर्मराज आणि त्याची बायको पापीया माझ्याकडे पुण्यात राहायला आले होते. त्याचा 'चक्र' सिनेमा नुकताच गाजला होता. तो जयवंत दळवींच्या कादंबरीवर होता. स्मिता पाटीलची त्यात भूमिका होती. ते दोघे दुसऱ्या दिवशी मुंबईला गेले. ते पोहोचले की नाही हे विचारायला मी रात्री फोन केला. तेव्हा समजले, रबीन्द्र हे जग अचानक, वाटेतच सोडून गेला. मी सुन्न झालो. त्याच्या अंत्यविधीला मी चर्चमध्ये पोहोचलो. तो विधी अंगावर काटा आणणारा होता. मला रबीन्द्रचा चेहरा बघवत नव्हता. त्यानंतर आता काय करावे? कोठे जायचे? स्क्रिप्ट रायटर, कॅमेरामन आम्ही एकमेकांशी न बोलता संध्याकाळच्या सुमारास गाडीने भटकत चौपाटीवरच्या कोपऱ्यावरच्या रेस्टॉरंटमध्ये बसलो. विचित्र मनःस्थिती होती. रबीन्द्रच्या मृत्यूची छाया होती. त्यावेळी मी स्क्रिप्ट रायटर मित्राकडून पॅड घेऊन त्यावर काही ओळी लिहिल्या. त्या ओळींच्या आजतागायत आठवणी अजून माझ्यापाशी आहेत.

*'बुलडोझरने रस्त्यावर दडपलेला असतो*
*दिवसाचा जखमी पारा*
*कोपऱ्यावरच्या रेस्तराँमध्ये व्हिस्कीच्या ग्लासात*
*उगवतो सायंकाळचा धुरकट तारा...*
*अशावेळी संगमरवरी गोल टेबलावर हे शहर*
*कोपरा टेकते आणि इराणी खुर्चीत दिवेलागणीला*
*सुरुवात होते*
*हळूहळू शहरावर जमत येते पोरकी काजळी*
*मनात मुंग्यांची रांगोळी*
*सरकत राहतात वाहनांचे पाठोपाठ दिवे*
*रेंगाळत आवाजही पुसट होत जातात दूरदूर*
*व्हिस्कीच्या ग्लासात एकाग्र वितळू लागतो*
*बर्फात अडकतो माझाच चेहरा...*

या चेहऱ्याचे वैश्विक, न थांबणारे, जन्म-मृत्यूच्या यात्रेतले गोल फिरणारे पाळणे आहेत. काही फेसलेस असतात, ते नट होतात. कधी मॅकबेथ, ऑथेल्लो, नाही तर 'नटसम्राट'मधले अप्पा बेलवलकर बनतात. हुकमी चेहरे बदलायचे वरदान त्यांना असते. या चेहऱ्याचे मला का कुणास ठाऊक आकर्षण आहे. फेसलेस ॲक्टर्सवर माझी पेंटिंग सीरिजही मी केली. त्यातले एक पेंटिंग डॉ. लागू या फेसलेस नटाच्या 'लमाण' पुस्तकावर आहे. हजारो वर्षं माणसं दृष्टीआड होतात. त्यांच्या आठवणी, चेहऱ्यांचे, कालखंडाचे खंडहर होतात. मातीच्या, दगडांच्या खोल खाली दफन होतात. उत्खनन केल्यामुळे काही अवशेष सापडतात. पूर्वजांच्या रूट्सचा शोध घेणे किंवा आपले वास्तुपुरुष कोण होते याचे संदर्भ सारे जग शोधते. पण त्या काळाचा चेहरा दिसत नाही. अपूर्ण पुरावे बघून तहान भागत नाही. मानवजातीच्या मेंदूचा अंदाज अजूनही कोणी बांधू शकलेला नाही. तो उद्ध्वस्त करतो आणि परत ते उकरून गौरवही प्राप्त करतो. आणि मग या गत आठवणींना चेहरे देण्याची युक्ती सुरू झाली.

पहिली जनावरांची चित्रे गुहेत आली. ती प्रगत झाली. मग पुतळे आले. आणि काही काळानंतर त्यांची पोर्ट्रेट्स आणि फोटोग्राफी आली. त्या चित्रांमधून बखरही लिहिली गेलीच; पण ती चित्रांमधून साक्ष देणारी झाली.

अनेक म्युझियम्समध्ये फिरताना ही ऐतिहासिक चित्रमय सफर त्या काळाची पाने जवळून उलगडून दाखवतात. अनेक संस्कृती आल्या, लपल्या. मी कापाडोसियामध्ये होतो. हे शहर म्हणजे लाव्हाने बनवलेली जादू आहे. हजारो वर्षांपूर्वी तो उफाळून बाहेर आला. पृथ्वी इकडची तिकडे केली. समुद्र, डोंगरतुकडे सरकत खंड बनवले. त्यांना आकार मिळाला. चेहरे मिळाले. आणि पुढची अनेक वर्षे तो धगधगत राहिला. या निसर्गाच्या पोटात अनाकलनीय रहस्यं आणि शक्ती आहे. तो शांत झाला. त्याच्यातून तप्त राहिलेली राख उडत टर्कीमध्ये जाऊन वाऱ्याबरोबर गिरक्या घेत स्थिरावली आणि थंड झाली. तेथे स्कायस्क्रेपरसारखे उंच सुळके तयार झाले. शिल्पकाराच्याही कल्पनेपलीकडे जाऊन गोल, त्रिकोणी आकार बनले. उंच सुळक्यावर अलगद मोठा गोल चेंडू ठेवलेला दिसतो. आपल्याकडे मुलांच्या चित्रांत त्रिकोणी डोंगर आणि त्यावर उगवलेला सूर्य दिसतो. कापाडोसियामधील मुलांच्या चित्रात ॲबस्ट्रॅक्ट डोंगर दिसतात. हीच तर निसर्गाची किमया आहे. त्या उंच सुळक्यामध्ये राख उकरायला सोपी होती. त्यामुळे लोकांनी ती उकरत तेथे अपार्टमेंट तयार केले. न्यू यॉर्कमधील एखाद्या स्कायस्क्रेपरसारखेच. तळाशी चर्चेस, मार्केटस्, सेमिट्रिज् तयार करण्यात आल्या.

कापाडोसिया हे अद्भुत शहर आहे. या शहराच्या खाली- जमिनीखाली दुसरे शहर आहे. आमचा गाईड हिस्टोरियन होता. त्यामुळे तो आम्हा चित्रकार मंडळींवर खूश होता. एका सकाळी तो म्हणाला, 'तुम्हाला आज सरप्राइज देणार आहे.' आमची बस शहरातल्या एका गल्लीत थांबली. आम्ही उतरलो. आसपास इमारती होत्या. मध्ये एक छोटे मैदान. तेथे एक पत्र्याची शेड होती. आम्ही त्याच्यापाठोपाठ तेथे गेलो. पाहतो तर तिथे जमिनीत उतरलेल्या पायऱ्या होत्या; आणि मुख्य म्हणजे त्या शहरातून झिरपत येणारा सूर्यप्रकाश होता. आम्ही त्या पायऱ्या उतरत खाली पोहोचलो. समोर एक मोठी खोली होती. त्याच्या दरवाजावर कोरलेली लिपी आणि एक-दोन अस्पष्ट चेहऱ्यांची शिल्पे होती. गाईडची कॉमेन्ट्री सुरू झाली... 'हे एका श्रीमंत व्यापाऱ्याचे थडगे आहे. हे पंधरा दिवसांपूर्वीच सापडले. शहरात फिरणाऱ्या एका बग्गीच्या घोड्याचा पाय कशात तरी अडकला. तो सोडवताना थोडे खणले तर हे थडगेच सापडले. अधिक खणत गेले तेव्हा एक शहरच जमिनीखाली लपले आहे असे दिसले. शोध घेताना त्या तिथल्या मुख्य खोलीत त्या व्यापाराचे शव थडग्यात आणले गेले असावे, तेथे दरवाजावर त्याचे नाव आहे. तो, त्याची बायको आता दिसत नाही, पण त्यांचे वर्णन आहे व त्यांचे चेहरे आहेत. इथली त्याकाळची प्रथा होती. त्या खोलीचे दरवाजे रात्रभर उघडे ठेवीत असत. शेजारच्या डायनिंग हॉलमध्ये त्याचे मित्र, नातेवाईक रात्री भोजन करीत व त्याच्या आठवणी रात्रभर काढीत. आम्ही डोकावून बघितले. खरोखरीच पलीकडच्या हॉलमध्ये लांबलचक दगडी टेबल होते. सकाळी त्या मालकाचा दरवाजा बंद करून सारे निघून जात. जिवंत असतानाच श्रीमंत माणसं मृत्यूनंतर अशा त्यांच्या मालकीच्या जागा सुरक्षित ठेवत. एवढेच नाही तर त्यापलीकडे अनेक कोनाडे होते. त्या मालकाचे घोडे, कुत्री, नातेवाईकांच्या अस्थी असे सारे तेथे ठेवले जाई. त्यातल्या काही अस्थी आम्ही तेथे पाहिल्या. कोनाड्यावर दगडात त्यांची नावे, हुद्दा कोरलेला होता. जवळजवळ किलोमीटरभर त्या खोल्या पसरलेल्या होत्या. फक्त मुख्य कर्त्या मालकाच्या खोलीवरच त्याचा चेहरा कोरलेला होता. वर सारे शहर उभे होते आणि आम्ही त्याच्या खाली जमिनीत इतिहासाच्या पाऊलखुणा बघत होतो. हीच प्रथा पिरॅमिडमध्येही दिसते. मृत्यू कोणालाही नकोसा असतो. पुनर्जन्मानंतर सारे व्यवस्थित असावे हा अट्टहास त्यात होता. तरुण असतानाच या कबरी बांधण्याचे काम सुरू व्हायचे. आयुष्यभर मृत्यूचेच आकर्षण राहणे, शरीर या छायेत जगणे... हे फारच झाले.

पोर्ट्रेट! तेही स्वतःचे असावे; यामागची भूमिका हीच असावी की दृष्टीआड झाल्यावर लोकांच्या आपण स्मरणात राहावे. खरं तर पोर्ट्रेट्सचा इतिहास पाच हजार वर्षांचा आहे. फोटोग्राफीचा शोध लागण्याआधीचा. यामागे एकच उद्देश असावा, तो म्हणजे रेकॉर्ड ठेवण्याचा. त्याचा मार्ग म्हणजे चित्र व पुतळे करणे हा होय. त्याचे मूळ इजिप्तमध्ये सुरू झाले आणि सर्वदूर पसरले. चित्रकलेतील ती एक शाखाच तयार झाली. त्या काळातल्या या पोर्ट्रेट्सनी अनेक म्युझियम्स, कोर्ट्स, पार्लमेंट्स, जुन्या वास्तू तुडुंब भरल्या आहेत. राजेरजवाड्यांच्या या पेंटिंग्जमध्ये त्यांची एकूण शक्ती, त्यांचे महत्त्व, सौंदर्य, संपत्ती, त्यांची अभिरुची दाखवली गेली. पॅरिसमधले लूव्र म्युझियम पाहताना याचा अंदाज येतो. युद्ध जिंकून आलेल्या सैनिकांचे घोडदळ, पोर्ट्रेट्समधील व्यक्तींच्या पायाशी बसलेली कुत्री, अन्य प्राणी, व्यक्तींचे ड्रेसेस, दागिने, त्यांची गोंडस मुले, पिंजऱ्यातील पक्षी, त्यांच्या राण्या, हातात फुले घेऊन मागे उभ्या असलेल्या दासी, झुंबरे, त्यांची हत्यारे, इ. प्रामुख्याने चित्रित केले गेले. यात कित्येक चित्रकारांचे योगदान झाले. त्यांचे कसब, निरीक्षणशक्ती या चित्रांत उतरलेली दिसते. त्यातील चित्रकारांची नावेही काळाच्या पडद्याआड गेली.

काळ बदलला. रेनेसान्स काळात आणि मध्ययुगीन काळात कलेत नवीन आकृतिबंध आले. सतराव्या-अठराव्या व एकोणिसाव्या शतकात औद्योगिक क्रांती झाली आणि साऱ्यांना धक्का देणारा अगदी वेगळा असा बदल झाला. यादरम्यान जगाला व्हॅन गॉग, मातीस, गोगँ, पिकासो मिळाले. विसाव्या शतकामध्ये या पोर्ट्रेट्सचा अर्थ बदलला. इतर आविष्काराला महत्त्व आले. वेगळ्या रंगांमध्ये आणि आकृतिबंधांमध्ये नवीन पिढी काम करू लागली आणि कलेचा तोंडवळा बदलला. कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला, अधिक व्यक्तिगत झाला. व्यावसायिक पोर्ट्रेट्स ही आता इतिहासातला एक इतिहास झाली. ती आता हेरिटेज प्रॉपर्टी आहे.

शेवटी चेहरा काय असतो? पुतळे बनवताना शिल्पकार समोरच्या मॉडेलचा- मग तो किंवा ती कोणीही असो; त्या चेहऱ्याच्या आत लपलेल्या कवटीचा आकार बनवतो. पृष्ठवंशीय प्राण्यांमधील मेंदू, काही ज्ञानेंद्रिये सुरक्षित ठेवण्यासाठी अनेक कुर्च्या, हाडे यांचा तो संग्रह असतो. ही कवटी डोक्याला व चेहऱ्याला आकार देते. आणि ती पाठीच्या सर्वात वरच्या मणक्यालाही जोडलेली असते... हे एक शास्त्रीय सत्य आहे.

कोणताही चित्रकार वा शिल्पकार चेहऱ्याकडे पाहत असताना पहिले काय बघत असेल, तर तो त्यात दडलेला कवटीचा आकार! त्यावर थर लावून मग तो त्यावरच्या चेहऱ्याचे व्यक्तिमत्त्व बाहेर काढतो. मी असे पोर्ट्रेट कधी केले नाही. मला तसे शिक्षणही मिळाले नाही. लहानपणापासून मला प्रश्न पडायचे : मला हा मित्र, मैत्रीण, शिक्षक, शेतकरी का आवडतो? काही जण देखणे व जवळ असूनही का आवडत नाहीत? नंतर जसजसा मी मोठा होत गेलो तसतसे मला कळले की मला त्यांचे इतर एक्स्प्रेशन आवडते. कित्येक मित्र-मैत्रिणी, आदरणीय शिक्षक, कामगार यांची माझी मैत्री ही त्यांच्या मनाशी झाली. त्यांचे पोर्ट्रेट करून मी भिंतीवर लटकवले नाही. त्यांचा तो सहवास, आठवणीतले चेहरे सतत मनात बरोबर असतात. त्यांचा फोटो अल्बमही माझ्यापाशी नाही.

चेहऱ्यांच्या आत कुठले दुसरेच चेहरे असतात. त्यांचे पोर्ट्रेट करण्याचा अट्टहास माझ्याकडे नाही. युद्धात जखमी होऊन गावात परतलेला शेतकऱ्याचा जवान मुलगा, शेतात जळलेले घर, पुरात वाहून गेलेले वृक्ष, जनावरे, लहानपणापासून प्रेम करणारी परकरातली मैत्रीण, शाळेत भांडण झालेल्या नातवाला थोपटणारे आजोबा, ट्रिपला जाताना डब्यात तिखट-मिठाच्या पुऱ्या आणि मुरलेले लोणचे देणारी आजी, गोधडीत लपवून 'चांदोबा' वाचायला देणारी बहीण, पगार मिळत नसतानाही गावातील मुलांना शिकवणाऱ्या फाटक्या गुरुजींच्या अंत्ययात्रेला जमलेल्या गावकऱ्यांचे चेहरे, कबड्डीत राष्ट्रीय पारितोषिक घेऊन घरी परतल्यानंतर रापलेल्या चेहऱ्यावर कौतुकाने हसणारे त्या खेळाडूच्या आई-वडिलांचे चेहरे आणि भोवती गुलाल उधळत नाचणारे गाव, शहरातल्या म्युझिक कॉम्पिटिशनमध्ये स्टेजवर गाणाऱ्या आपल्या छोट्या मुलीला पाहून डोळ्यात पाणी आलेले पालक, एअरपोर्टवर परदेशी निघालेल्या मुलाला सोडायला आलेल्या कुटुंबाचे कासावीस चेहरे, उन्हाळ्यात पोहायला शिकवणारा प्रेमळ मामा, गावातल्या वेडसर मुलाचे आणि अधू मुलीचे लग्न लावणाऱ्या गावकऱ्यांचे समाधानी चेहरे, घटस्फोट होऊन घरी परतलेल्या मुलीला कवेत घेणारे आई-वडील... असे अनेक चेहरे आयुष्यात आसपास येत-जात असतात. हेच चेहरे माझ्या पेंटिंग्जमध्ये येत गेले. त्यात हमाल, मुळशीचे शेतकरी, नट, गुहेतले साधू, मुंजीतला छोटा बटू, नाहीतर झाडे आली. डोंगरांनाही स्वतःचा चेहरा असतोच.

निसर्गाने अद्भुत सौंदर्याची दैवी भेट सर्वांना दिली आहे. कळत-नकळत ती प्रत्येकाकडे असतेच. पण त्याची जाणीव असेलच असं नाही. आरशातलं प्रतिबिंब सतत तुम्हाला दिसत असतं. प्रत्येक जण आपल्या चेहऱ्यावर प्रेम करतो. तो चेहरा टिकावा म्हणून ब्युटीपार्लर्स भरलेली असतात. चेहरा जपण्याची सौंदर्यप्रसाधने जगभर विकली जातात. निरनिराळे डाएट्स, जिम्स, फॅशन्स, लिपस्टिक लावावी, तसे मेडिटेशन आणि केसांचे कलप अहोरात्र मदतीला असतात. जंगलातल्या आदिवासी स्त्रियादेखील अंगावर फुले, हार, कथलाचे स्वस्त दागिने घेऊन नटतात. पक्ष्यांना निसर्गाने कितीतरी रंग, सुंदर आकार दिले. गाढवाची पिल्लंसुद्धा लहानपणी किती सुंदर दिसतात. एखाद्या सुंदर स्त्रीसारखं प्रत्येक झाड आपला मोहोर, फुले, पक्षी अंगावर घेऊन थाटात उभे असते. हे सारे उपजत असते. सर्वसाधारण व्यक्तीही आपल्या आत्मिक सौंदर्याने उठून दिसते. चेहऱ्याच्या आतला चेहरा तुम्ही म्हातारे झाल्याची जाणीव करून देत नाही. ऐंशी-नव्वदच्या दशकामधील अत्यंत सुंदर नटी आता वयस्कर झाली आहे. तिच्याकडे मी कॉफीला गेलो की ती थाटात बसलेली असते. मला विचारते, 'सुब्बु, मी कशी दिसते?' ती आरशात बघते, नटते, त्यावेळी ती तरुण चेहराच आरशात बघते. तुमचे मन तुम्ही बदललेले आहात याची जाणीव तुम्हाला करून देत नाही. ती जाणीव असती तर आजी किती सुंदर दिसते, साईसारखी तिची मऊ त्वचा, तिचे प्रेमाचे मऊ लुसलुशीत हात, तिच्या गळ्याला घट्ट मिठी मारत 'माझी लव्हली फ्रेंड' म्हणणाऱ्या खोडकर नातीच्या नात्यातही हेच सौंदर्य दिसायला हवे. टक्कल पडलेला पुरुषदेखील डोक्यावर केस असल्याच्या सवयीने हात फिरवून ठीकठाक करतो.

गरट्रुड स्टाईन ही अमेरिकन लेखिका, कवयित्री, नाटककार होती. ती पॅरिसमध्ये राहत होती. तिचा भाऊ श्रीमंत होता. त्यांनी आर्ट कलेक्शन करायला सुरुवात केली होती. मातीस, पिकासोंच्या चित्रांचे मोठे कलेक्शन त्यांच्याकडे झाले. पिकासोनं तिचे पोर्ट्रेट केले. ते जगप्रसिद्ध आहे. तिने पिकासोच्या स्टुडिओमध्ये नव्वद वेळा सीटिंग दिले. ते पोर्ट्रेट झाले तेव्हा सगळेजण म्हणाले, 'पोर्ट्रेटमधली ती गरट्रुड दिसत नाही.' त्यावर पिकासो म्हणाला, 'थांबा... काही दिवसांनी ती तशी दिसायला लागेल.' तिचे पोर्ट्रेट करताना तो चेहरा पेंट करीत नव्हता. ती तिथे समोर बसली होती, इतकंच! त्याच्या डोक्यात नवीन स्टाईल घोळत होती. झालेही तसेच. तो चेहरा रंगवताना त्याने 'क्यूबिझम'ला जन्म दिला. डोरा मारचे पोर्ट्रेटही याला साक्षी ठरते.

सेल्फ पोर्ट्रेट करताना चित्रकार स्वतःचा चेहरा रंगवत नसतो. चेहऱ्याच्या आतल्या त्याच्याच मनातल्या अनेक चेहऱ्यांची गुंतागुंत प्रकट करण्याचा तो प्रयोग असतो. त्याचे ते पोर्ट्रेट हे त्याचे इनर एक्स्प्रेशन असते. कदाचित तो त्यावेळी मनात वडिलांबरोबर सायकलवर डबल सीट बसून ग्राऊंडकडे निघाला असेल, पेनचे टोपण हरवल्यासारखा चेहरा असलेल्या मित्रांबरोबर कॅफेमध्ये सिग्रेट ओढत असेल, जीव व्याकूळ होऊन बें-बें ओरडणाऱ्या बकरीच्या पिल्लाला पाणी पाजीत असेल, नाही तर कापाडोसियातल्या जमिनीच्या आत खोदलेल्या चर्चमध्ये एकटा बसला असेल. तो चेहरा रंगवणे हे फक्त निमित्तमात्र असते. तो भास-आभासात अडकलेला त्याचा चेहरा नसतो किंवा असतो. कारण शेवटी पेंटिंगमधल्या चेहऱ्याच्या आत काय दडले आहे, हे मला तरी आजपर्यंत समजलेले नाही.

आजवर मी जगलेल्या ऋतूंनी मला किती चेहरे दिले?

◆ Subhash.awchat@gmail.com



प्रवीण दशरथ बांदेकर

अरतें ना परतें...



# वेशीबाहेरच्या सात बहिणींची गोष्ट

आटपाट नगर होतं. खाऊन-पिऊन सुखी होतं. आनंदात जगत होतं. आटपाट नगराच्या वेशीबाहेर राहत होत्या सात बहिणी. सात बहिणींची सात घरं. सात घरांत फक्त सातजणी. पण गंमत अशी की, या सात बहिणी सगळ्यांनाच दिसू शकत नव्हत्या. पुरुषांना तर नाहीच नाही. बायकांतही फक्त कुमारिकांना. हे असं का? आम्हाला का नाही दिसत सात बहिणी? आणि यांचीच घरं अशी वेशीबाहेर का? कुणी काढलं यांना नगराबाहेर? या प्रश्नांना उत्तरं नव्हती कुणापाशी. कुणाला काही माहीत नव्हतं.

हा तसा सार्वत्रिक अनुभव. कुणालाच काही माहीत नसतं. आटपाट नगराच्या आत आपण आनंदात जगत असतो. आपल्याला कसली ददात नसते. कसली फिकीर नसते. त्यामुळे वेशीबाहेर काय आहे, कोण राहतंय, का राहतंय, आपल्याला काही माहीत नसतं. सहज माहीत झालं तर ठीक; मुद्दामहून माहीत करून घेण्याचे कष्ट आपण सहसा घेत नाही. आपण बरं की आपला संसार बरा... जगाच्या उठाठेवी हव्यात कशाला, असे आपले संस्कार. अगदी असंच काहीसं माझ्या बाबतीतही झालं. जन्मापासून मी जिथं वावरतोय, माझ्या पंधरा-वीस पिढ्या ज्या गावात नांदत आल्या आहेत, त्या गावाच्या वेशीबाहेरचं आपल्याला काही माहीत नाहीये, हे मला एका गोरज वेळेला कळून आलं.

जेमतेम वर्षभरापूर्वीची गोष्ट. होळीसाठी गावी गेलो होतो. अचानक एका रात्री 'जहां भी हो वहीं रहिये'ची घोषणा झाली. आम्ही सगळे निस्सीम देशभक्त असल्यामुळे आणि महामारीला हरवण्याच्या इर्ष्येने पेटून उठल्यामुळे मिळालेला आदेश शिरसावंद्य मानला. सगळ्या गैरसोयी सहन करीत घरीच ठाण मांडून राहिलो. महाराष्ट्र आणि गोमंतकाच्या सीमेवरच्या गावातलं हे आमच्या वाडवडिलांचं मूळ घर. इथं शहरातल्या माणसांचा वेळ जावा अशी साधनं फारशी नाहीत. ना टीव्ही, ना वर्तमानपत्रं. फोनला रेंज कुठे मिळेल याच्या शोधात फिरावं लागतं. साहजिकच रिकामटेकडे घरात बसून सगळे कंटाळले होते. तरी एक बरं होतं : दारातून वाहणारी नदी होती आणि घराच्या पाठीमागे झाडापेडांनी गच्च भरलेला डोंगर होता. त्यामुळे करवंदं, जांभळं, रातांबे, तोरणं, काजूबोंडू असा रानमेवा शोधत डोंगरात भटकणं आणि नदीत डुंबणं हा तरी वेळ घालवायचा एक मार्ग होता.

तशातच एकदा कंटाळलेल्या मुलांना घेऊन मी नदीकाठानं फिरत निघालो. भटकत भटकत आम्ही वस्तीपासून बरेच दूर आलो होतो. पुढे पुढे सगळाच निर्जन भाग. रानझुडपांची दाटीही बरीच. वाट काढत थोडं जपूनच पुढे जावं लागत होतं. इतक्यातच काहीशा उंच टेकाडासारख्या ठिकाणी एकावर एक रचलेले दगड असावेत तसं काहीतरी दिसलं. काय असावं बरं, म्हणून अचंबा करीत जवळ जाऊन पाहिलं तर पुरुषभर उंचीची तुळशी वृंदावनं दिसली. एक-दोन नव्हेत, तर चक्क सात. खूप जुनी, दगडी. आसपास लाजरी, रानमोडीसारखं रानगवत आणि हसोळी-करवंदीच्या वगैरे झाळकटी वाढल्या होत्या. त्यात दडल्याने ओबडधोबड दिसत असली तरी मुळात ते सुबक बांधकाम असावं. त्यांच्या शेजारी काही कमी-जास्त उंचीचे पाषाणही पुरलेले. नदीपात्रापासून जेमतेम चार-पाचशे मीटर अंतरावर ते टेकाड; तरीही तिथं माणसांचा वावर कमीच असावा. गुरं राखणारे या दिशेला येणं बहुतेक टाळत असावेत. अन्यथा हे ठिकाण असं निर्वावर जाणवलं नसतं. काहीशी भीतीदायक अशीच ही जागा वाटत होती. जाणत्यांच्या तोंडून ऐकून मला या जागेविषयी थोडीफार माहिती होती. पण मी याआधी कधी या बाजूला आलो नव्हतो. मुलांना तर नदीकाठी अशी एखादी जागा असेल याची जराही कल्पना नव्हती. त्यामुळेच ही निर्जन जागा नि ती पुराणी वृंदावनं बघून मुलं काही क्षण बावरल्यासारखी झाली.

गावापासून दूर, इतक्या दाट रानात, नदीकाठी ही तुळशी वृंदावनं कुणी आणि कशासाठी बांधली असतील? मुलांच्या मनातलं कुतूहल जागं झालं होतं. 'बाबा, पूर्वी इथं आपल्या गावाची स्मशानभूमी वगैरे होती की काय?' संवादने विचारलं. अनेक ठिकाणी नदीकाठी स्मशानभूमी असते हे त्याला माहीत होतं.

'गाववाले सांगतात- या सात बहिणी आहेत. गावावर शत्रूचा हल्ला झाला तेव्हा शीलरक्षणासाठी त्यांनी नदीच्या कुंडात जीव दिला. काहीजणांना वाटतं, ज्यानं गाव वसवला त्याच्या त्या सात राण्या. त्याच्या मृत्यूनंतर सती गेलेल्या. त्यांच्या आठवणीसाठी बांधलेली ही वृंदावनं...' लहानपणापासून ऐकून माहीत असलेल्या कहाण्या मी मुलांना सांगितल्या.

गार्गी काहीतरी विचार करत गंभीरपणे म्हणाली, 'तुळशी वृंदावनं म्हणजे बायकांशीच संबंधित काहीतरी असणार, हे नक्की. आणि एवढ्या मोठ्या आकाराच्या... म्हणजे तसंच काहीतरी महत्त्वाचं असणार. नाही तर कोण कशाला एवढा खर्च करेल?'

मी म्हटलं, 'पण जे काही महत्त्वाचं घडलं होतं, ते काय असू शकतं? लोकांच्या स्मृतींचा इतिहासही फार चुकीचा असेल असं वाटत नाही. बाईचं शील ही गोष्ट आपल्या समाजाला कायमच खूप महत्त्वाची वाटत आली आहे. चुकीचं की बरोबर- ते नंतरचं; पण आपल्या भारतीय लोकांनी 'बाईनं काय वाट्टेल ते झालं तरी आपली अब्रू जपली पाहिजे,' असंच कायमच सांगितलेलं आहे. अब्रूसाठी बाईला जीव गमवावा लागला तरी त्यात काही गैर नाही वाटत कुणाला. त्यामुळे एखाद्या आक्रमणाच्या वेळी एखाद्या घरातल्या किंवा गावातल्या काही स्त्रियांनी शत्रूच्या हाती लागून अब्रू गमवावी लागण्यापेक्षा धीरानं नदीचा हा डोह जवळ केला असेल, तर तशीही शक्यता मान्य करायला हरकत नाही.'

गार्गी म्हणाली, 'आणि अशा गोष्टीचं ग्लोरिफिकेशन करणं समाजाला नेहमी आवश्यक वाटत असतं. त्यामुळे बाकीच्या बायकांना आणि नंतरच्याही पिढ्यांना आपसूकच समजतं, बाईचं शील किती महत्त्वाचं मानलं जातं ते! त्यासाठी प्रसंगी प्राणही गमवावा लागला तरी आपला समाज त्या बायकांना कसं विसरत नाही, त्यांच्या आठवणी जतन करून ठेवतो, त्यांना देवीसमान आदर देतो, हेही मनावर ठसवलं जातं इनडायरेक्टली.'

गार्गीचा तर्क पटण्यासारखा होता. पण सती गेलेल्या बायकांच्या स्मृतीवाली ती दुसरी मिथ्यकथा मात्र मान्य होईलच अशी नव्हती. एक तर सती जाण्याची प्रथा काही विशिष्ट सामाजिक स्तरांतील स्त्रियांपुरती मर्यादित होती. आमच्या गावात नि आजूबाजूच्या परिसरातही तशी काही घरं नव्हती. उलट, कोकणातल्या नि गोव्याच्या या भागात अनेक बहुजन जातींमध्ये पाट लावणे, पुनर्विवाह करणे हेही समाजमान्य होतं. त्यामुळे तशा कुण्या सरदाराच्या बायका एकसमयावच्छेदेकरून सती गेल्या असतील, ही शक्यता जवळपास नव्हतीच. पण असे प्रत्यक्षात सती गेल्याचे काही पुरावे नसले तरी सती आणि सतीच्या नावाने बांधलेल्या तुळसी, घुमट्या, देवळं वगैरे अनेक ठिकाणी आढळतात. कदाचित एखाद्या सवाष्ण गेलेल्या बाईलाही 'सती' संबोधून तिच्या स्मृती जपल्या गेल्या असाव्यात. काहीही असो, सती ही काहीतरी भयंकर पवित्र समजली जाणारी संकल्पना लोकांच्या मानसिकतेत यानिमित्ताने रुजवली गेली आहे, हे मात्र नक्की. आपल्या गावात अशी एखादी 'सती' होती हेसुद्धा काही लोक अनेकदा अभिमानाने सांगत असतात, हेही याच मानसिकतेचं द्योतक आहे.

गार्गीने मग एक नवाच मुद्दा काढला. ती म्हणाली, 'आपण हा असा तरी विचार कशाला करायचा? मला काय वाटतं, पोर्तुगीज राजवटीच्या काळात गोव्यातून तिथल्या धर्मछळाला कंटाळून आपले लोक देवबिव घेऊन पळून आलेत ना इकडे? मग कदाचित त्याच आपल्या पूर्वजांच्या या स्मृती नसतील कशावरून?'

अचानक मला आठवलं... काही दिवसांमागे नद्यांकाठच्या सांस्कृतिक जीवनाविषयीचं एक पुस्तक वाचनात आलं होतं. त्यातून विश्वास बसू नये अशा अनेक गोष्टी नव्यानेच कळल्या होत्या. वेगवेगळे मानवी समुदाय नद्यांच्या काठी वसले; वेगवेगळ्या मानवी संस्कृतीही नद्यांच्या काठी विकसित झाल्या, हे आपल्याला माहीत असतं. पण नदीकाठच्या या मानवी वसाहतींच्या नदीशी जोडलेल्या चित्रविचित्र श्रद्धा, चालीरीती, परंपरा यांविषयी आपल्याला फारसं माहीत नसतं. काही गोष्टी काळाच्या ओघात लुप्त झालेल्या असू शकतात. काही गोष्टी आपल्याला परिचित असलेल्या संस्कृतीपेक्षा पूर्णपणे वेगळ्या असतात. त्यामुळे साहजिकच आपण चकित होऊन जातो. आपल्या पूर्वजांच्या कल्पकतेचं कौतुक करावं की भयगंडातून त्यांनी स्वीकारलेल्या रूढींची चिरफाड करावी, आपल्याला कळेनासं होतं. मला चांगलं आठवत होतं, त्या पुस्तकातला एक संदर्भ वाचताना मी चमकलो होतो. काही समूहांत नदीकाठी वस्ती करताना नदीला कुमारिका अर्पण करण्याच्या प्रथेविषयी त्यात नोंदवलं होतं. सती जाणाऱ्या स्त्रीप्रमाणेच एक वा अनेक कुमारिकांना सजवलं जात असे आणि वाद्यांच्या गजरात, फुलांच्या वर्षावात डोळे, तोंड, हात-पाय बांधून त्यांना नदीच्या वाहत्या पात्रात सोडलं जात असे. ज्या नदीकाठी वास्तव्य करायचं आहे तिनं काही विघ्न आणू नये म्हणून तिला संतुष्ट करण्याचा हा विधी. पण मग गार्गी म्हणतेय तसे आपलेही पूर्वज असेच सात डोंगर ओलांडून इथे आले, या नदीकाठी वसले. त्यांनीही असं काहीतरी अघोरी कृत्य केलं नसेल ना? आणि मागाहून त्याची स्मृती अशा वृंदावनांमधून जपली असेल. असेल वा नसेल; पण मुलीला हे सांगण्याचं धाडस त्या क्षणी तरी मला झालं नाही. आपल्या स्वार्थासाठी पिढ्यान् पिढ्या स्त्रीला 'नकुशी' ठरवून अन्याय-अत्याचार करणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीचा मी वर्तमानातला प्रतिनिधी. कधीही, कशानंही भरपाई न होणाऱ्या त्या पापाचं ओझं वाहणाऱ्या माझ्या मनात दाटून आलेला अपराधभाव मला मुलीकडे नजर वर करून पाहण्याचीही हिंमत देत नव्हता. कदाचित वेशीबाहेरच्या त्या कुमारिकांकडे पाहायचे स्वच्छ, निर्मळ डोळे माझ्याकडे नव्हते, हे जास्त खरं होतं.


गावोगावी आढळणाऱ्या अशा स्मारकांमागे असाही काही काळाकुट्ट इतिहास असू शकतो. इतिहासाच्या पुस्तकात कुठल्याच पानावर एखादीही ओळ पुराव्यादाखल सापडत नाही. त्यामुळे लोकस्मृतींवर अवलंबून राहावं लागतं. तर्ककुतर्क करून कुठे काही धागेदोरे जुळतात का पाहावं लागतं. नेहमीच यात यश येतं असं नाही. बऱ्याचदा इतिहास उरीपोटी जपणाऱ्या या खाणाखुणा तशाच संदर्भहीन पडून राहतात. काळासोबत सांगोवांगीच्या कहाण्यांची पुटं त्यांच्यावर चढत राहतात... गडद होत जातात. आपण केलेल्या पापाचं उदात्तीकरण पिढ्यान् पिढ्या होत राहतं. आपल्या पूर्वजांच्या बऱ्या-वाईट जगण्याचा पुरावा असलेलं हे खास आपलंच असं काहीतरी शोधायला कुणापाशी वेळही नसतो. मला ठाऊक आहे, सात बहिणींच्या या पाषाणी स्मारकांचंही असंच होऊन जाणार आहे. वेशीबाहेरच्या इतिहास आणि संस्कृतीशी जोडणारा एक दुवा आपल्याच नतद्रष्टपणामुळे नष्ट होऊन गेला आहे. वेशीबाहेरच्या सात बहिणींची गोष्ट अधुरी राहिली आहे, हेच तेवढं मग मनात छळत राहील!

◆ samwadpravin@gmail.com



डॉ. संजय ओक

मोकळं आकाश...



# फ्युज्ड बल्ब

परवा एके ठिकाणी वाचनात निवृत्त व्यक्तींच्या मानसिक घालमेलीचा उल्लेख होता. गत आयुष्यात अनुभवलेली पदे, प्रतिष्ठा, पैसा हे जणू भुते बनून त्याच्या मनात पिंगा घालत राहतात; आणि पर्यायाने त्याचे स्वतःचे आणि त्याच्या भोवताली असलेल्या इतरांचे आयुष्यही जगायला कठीण किंवा जरा स्पष्टच बोलायचे तर लिव्हिंग हेल या स्वरूपाचे करतात, असे ते वर्णन होते. निवृत्त व्यक्तीची समजूत काढताना लेखकाने म्हटले होते, 'आपण आता एक फ्युज्ड बल्ब आहोत हे सत्य स्वीकारा.'

'फ्युज्ड बल्ब' हा शब्द माझ्या मनात घोळत राहिला. प्रशासनाच्या कामातून प्रकृतीच्या कारणास्तव मीही सहर्ष स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली होती आणि पूर्ण वेळ सर्जरी करायला प्रारंभ केला होता. काहीतरी करत होतो, हात चालत होते आणि मेंदू विचारी होता. तेव्हा पूर्ण अर्थाने मी 'फ्युज्ड' झालो नव्हतो आणि तरीही आपण केले ते योग्य केले की घाईगडबडीने? अजून काही वर्षे काम करू शकलो नसतो का? पगाराचे केवढे नुकसान? उरलेल्या वेळाचे करायचे काय? घरातल्या लोकांना आपण घरात हवे आहोत का? बागेत फेऱ्या किती वेळ मारायच्या?... अशा असंख्य प्रश्नांचा माझ्या डोक्यात भुंगा झाला होता. बरं, मनातले सगळे विचार व्यक्त करण्याची सोय नव्हती.

घरातल्या लोकांचा ॲप्रोच... तुझा तू निर्णय घेतला आहेस, म्हणजे थोडक्यात- भोग आपल्या कर्माची फळे- असा असायचा. शेजाऱ्या-पाजाऱ्यांना आणि मित्रांना वेळ नसायचा, कारण ते थोडेच माझ्यासारखे 'फ्युज्ड' झाले होते? तेव्हा ठरवले की, 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे' आणि 'आपुलाची वाद आपणांसी'- जे काही बोलायचे ते आपण आपल्याशी. नवी प्रयोजने शोधायची. निवृत्तीनंतर आपली गरज नाही असे नाही, तर त्या गरजांच्या जागा बदलल्या आहेत. तुम्ही खूप ठिकाणी हवे आहात. ती ठिकाणे शोधून काढायची. खणल्याशिवाय हिरा मिळतच नाही आणि मिळतो- तोही कोळशात बरबटलेला. कामाचे पारिश्रमिक अपेक्षित ठेवायचे नाही. शासकीय भाषेत टाडा मिळाला बास झाले. खाजगी क्षेत्रातील *Monetary Compensation* चा विषय येथे आणायचा नाही. एकदा ठरल्यावर मग मी सायन रुग्णालयातील माझ्या शस्त्रक्रिया वाढविल्या. दर रविवारची गावोगावची शिबिरे वाढवली. करोनाच्या प्रतिबंधनात्मक नियमांमुळे गावांमधून शस्त्रक्रिया करणे कठीण होते, पण निदानात्मक शिबिरे *(Diagnostic Camps)* करून रुग्णांना मुंबईला आणणे शक्य होते. आणि त्याच कामाला प्रारंभ झाला. प्रयोजन तेच होते, पद्धती आणि योजना फक्त बदलल्या. फ्युज्ड बल्बमध्ये थोडीफार धुगधुगी अजूनही शिल्लक होती.

सकाळ-संध्याकाळ शहराच्या पार्क किंवा नाना-नानी गार्डनमधून फेरफटका मारला तर एक विलक्षण विरोधाभासात्मक दृश्य दिसते. तरुणाई ग्राऊंडच्या मध्यभागी क्रिकेटमध्ये दंग असते. मध्यमवयीन वर्ग हिरवळीवर योगाभ्यासात गर्क असतो आणि चालण्याच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या बाकांवर अनेक फ्युज्ड बल्ब प्रकाशमान असतात. पार्कातली भटकी कुत्री हमखास शेपूट हलवत त्यांना साथसोबत करत असतात. या बल्बजची पूर्वपीठिका जाणून घेतली तर कोणी सिटी इंजिनीअर, कोणी चीफ अकाऊंटंट, कोणी सीईओ, तर कोणी प्राचार्य. पदावरून पायउतार झाल्यावर थोडे दिवस 'माजी' लावण्याचा माज किंवा मोह मंडळी करतात आणि नंतर 'अकस्मात तोही पुढे जात आहे' अशा न्यायाने पुसला जातो. ओळख उरते ती फक्त नावाने आणि नीतीने. पेन्शनर- अर्थात निवृत्ती वेतनधारक किंवा आजच्या शब्दांत बोलायचे झाल्यास 'फ्युज्ड बल्ब' या बल्बचे वॅटेज ४०, ८०, १२०, २४० होतं की तो हॅलोजन / झेनॉन होता याला कशाला काही अर्थ उरत नाही.

करोनाने गेल्या ६-८ महिन्यांत या फ्युज्ड बल्बची संख्या वाढवली आणि ती अवस्था आयुष्यात ऐन पंचेचाळिशीतच यायला लागली. काही बल्बज् मात्र त्यातही कर्तबगार निघाले. त्यांनी ट्रॅक बदलला, ट्रॅकसूट नाही. पंचतारांकित हॉटेलातली शेफची नोकरी सुटल्यावर एक मराठमोळ्या वीराने स्वतःचे बिर्याणी हाऊस काढले. गॅरेज बंद झाल्यामुळे घरी बसण्याऐवजी मंडळींनी घरोघरी जाऊन गाडी सर्विस करून देण्याचा व्यवसाय काढला. प्रश्न जर नवे होते तर त्यांना उत्तरेही नवीच शोधायला हवी होती. त्यात कल्पकतेला वाव होता, कालानुसार होणाऱ्या वयोमर्यादेला नाही. मी पूर्वी कोणीतरी होतो... तेव्हा हे काम मी आता कसे करू? हा प्रश्नच मुळात चुकीचा होता *Dignity of labour* ही *Dignity Of Individual* पेक्षा मोठी होती. हे ज्यांना लवकर समजले आणि आत्मसात करता आले त्यांची निवृत्ती लवकर सुखकारक झाली. समाजाला आता माझी पूर्वीसारखी गरज नाही असे म्हणून रडत बसण्यापेक्षा पुलंच्या चितळे मास्तरांचे वाक्य आठवावे... 'अरे पुर्ष्या, टाइम्स हॅव चेंज्ड.'... समाजाला नव्या गरजा निर्माण होतात. त्या शोधून तेथे आपण कोठे चपखल बसतो हे तपासणे महत्त्वाचे. तंत्रज्ञान जितके आत्मसात करू तेवढे चांगले. तेव्हा आपण फ्युज्ड व्हायचे नसेल तर आपणच आतून प्रकाशित राहणे गरजेचे आहे हे लक्षात ठेवायला हवे.


... दिवाळीच्या दिवसांत आमच्या पुण्यात किल्ल्यांची स्पर्धा होते. एकदा असाच परीक्षक होण्याचा योग आला. एकाहून एक सुंदर प्रतिकृती... राजगड, रायगड, तोरणा, जंजिरा... एका किल्ल्याला केलेली पांढरी शुभ्र घुमटाकार गोलांची केलेली तटबंदी मला फार आवडली. मी त्या रचनाकार मुलाला विचारले, 'हे सगळे काचेचे घुमट इतके प्रमाणबद्ध अर्धवर्तुळाकार तू कसे बरे मिळवले? तो हसला आणि म्हणाला, 'सर, मी फ्युज्ड बल्ब वापरले.'

◆ sanjayoak1959@gmail.com



डॉ. चैतन्य कुंटे

अंतर्नाद



# चलो री माई औलिया के दरबार

*स्थळ :* दिल्ली, *काळ :* १३ वे शतक.

एकदा शेख निझामुद्दीनकडे कोणी पाहुणे आले. त्यांच्या खातरदारीसाठी वाणसामान हवे होते.

वाणी म्हणाला, ''उधार देणार नाही, तुम्ही काही तरी गहाण ठेवा.''

शेखसाहेब म्हणाले, ''मी राग 'पूर्वी' गहाण ठेवतो. जोवर उधारी चुकती करणार नाही तोवर मी 'पूर्वी' राग ऐकणार नाही.''

बरेच दिवस उधारी काही चुकवता आली नाही. म्हणून पूर्वी रागही ऐकता आला नाही. त्यामुळे शेखसाहेब आजारी पडले.

ही बातमी त्यांचा प्रिय शिष्य अमीर खुस्त्रोला कळल्यावर त्याने उधारीची परतफेड केली आणि 'पूर्वी' रागात *'चलो री माई औलिया के दरबार, जहाँ पूर्वी दुल्हन बन बनी आई'* ही रचना गात तो शेखसाहेबांकडे आला.

'पूर्वी' राग ऐकताच शेखसाहेब तंदुरुस्त झाले!

भारतात इस्लामचा प्रसार मोठ्या स्तरावर होण्यासाठी कारणीभूत ठरलेला, सुफी संप्रदायाचा एक प्रवर्तक हजरत शेख निझामुद्दीन चिश्ती याला राग 'पूर्वी' अत्यंत प्रिय होता, त्याची ही कथा. इस्लाम आणि भारतीय संगीताच्या संबंधाविषयी अशा अनेक कथा प्रसृत आहेत.

इस्लाम हा आज जगातील सर्वव्याप्त धर्म आहे. विकिपीडियाच्या आकडेवारीनुसार, जगातील लोकसंख्येतील सर्वाधिक, म्हणजे ३१.११% जनता ख्रिश्चन असून त्याखालोखाल, म्हणजे सुमारे २५% जनता मुस्लीम आहे. या आकडेवारीवरून इस्लामचे जगभरातील वर्चस्व लक्षात येते. अन्य धर्मांच्या तुलनेत इस्लाम हा उशिराने उदयाला आलेला धर्म असूनही त्याचे वैश्विक उलथापालथीत आणि सांस्कृतिक घडामोडींतही लक्षणीय स्थान आहे.

इतर धर्मांशी इस्लामचे संबंध कायमच तणावाचे राहिले. आक्रमक, हिंसक व मूर्तिभंजकांचा धर्म अशी इस्लामची सर्वसामान्य प्रतिमा भारतातच नव्हे, जगभर आहे. मात्र एवढेच इस्लामचे रूप नाही. इस्लामच्या काही संप्रदायांनी समन्वयाची, सलोख्याची भूमिका घेतली आहे. इस्लामचे आक्रमण, काफिर म्हणून त्यांनी भारतातील हिंदूंची केलेली कत्तल, हिंदू मंदिरे व मूर्तींचा विध्वंस इ. अनेक बाबींमुळे भारतीय हिंदू समाजमन तर इस्लाम म्हटले की नकळत आक्रसतेच. वास्तविक इस्लाम आणि हिंदू धर्मांच्या एकोप्याची शेकडो उदाहरणे आहेत. त्यातून भारतात संस्कृतिसंगमाची एक खरोखरच सुंदर अशी परंपरा निर्माण झाली. मात्र केवळ कुरूपताच दिसणाऱ्या कलुषित मनांना (हिंदू आणि मुस्लीम दोन्ही धर्मांतील बरे!) त्यातील उदात्त-मंगल रूप कसे दिसावे? म्हणून मनाची कवाडे थोडी उघडू-तरच इस्लामच्या धर्मसंगीतातील 'रंग' आपल्याला दिसतील!

काही अभ्यासकांचे म्हणणे असे की, इस्लामी संस्कृती, इस्लामी संगीत हाच मुळात वदतोव्याघात आहे. एकमेकांत सतत भांडणाऱ्या व खूनखराबा करणाऱ्या अरबी टोळ्यांना एकत्र करून महंमदाने स्थापन केलेला इस्लाम हा तलवारीच्या बळावर प्रदेश पादाक्रांत करत गेला. जेथे पसरला तेथील संस्कृती, विद्या, कला, संगीत त्याने अंगीकारले. त्यामुळे मूळची अस्सल इस्लामी म्हणावी अशी संस्कृती व संगीत नाहीच, ती इतरांची उसनवारी आहे. हे मत स्वीकारा वा नाकारा, एक मान्यच करावे लागेल की साहित्य, चित्र, स्थापत्य, संगीत अशा अनेक कलांत खास इस्लामी ठसा असलेली कला जोपासली गेली आहे आणि इस्लामचे या कलांसाठी मोठे योगदान आहे.

संगीताशी इस्लामचे नाते उगमाच्या काळापासूनच विरोधप्रीतीचे आहे! एका बाजूला 'मौसिकी हराम' म्हणून संगीताला निषिद्ध म्हणणाऱ्या इस्लामची सांगीतिक संपन्नता लक्षात घेण्यासारखीच आहे. संगीत, गायक-वादक, नर्तक यांवर इस्लामी शरीयत निर्बंध घालते. विशेषतः संगीतकार स्त्रियांवर त्यांचा फारच रोष. गेल्या काही दशकांत तर या कडव्या निर्बंधांच्या लाटा सततच कलाविश्वावर आदळलेल्या आपण अनुभवल्या आहेत. कधी रॉक बँडमध्ये मुली गायल्या म्हणून, तर कधी रिॲलिटी शोमध्ये मुस्लीम मुलीने हिंदू भजन गायले म्हणून मुस्लीम धर्ममार्तंडांनी उठवलेली झोड व फतवा काढणे ही बाब इस्लामच्या कडव्या स्वरूपाची निदर्शक आहे. उलटपक्षी, अनेक मुस्लिम देशांत असलेली समृद्ध संगीत परंपरा व भारतीय संगीताविष्कारांत मुस्लिमांचा लक्षणीय सहभाग, योगदान या बाबी इस्लामच्या समावेशक रूपाच्या निदर्शक आहेत. यातील खरा इस्लाम कोणता? दोन्ही खरेच आहेत! धर्माचे स्वरूप स्थलकालानुसार पालटते आणि त्यामुळे संगीताशी असलेले त्याचे संबंधही सदैव एकसारखेच नसतात, हे सूत्र लक्षात घेतले तर इस्लाम आणि संगीताच्या बहुरंगी तानाबान्यांचे आकलन नेमकेपणे होईल.

इस्लाममध्ये 'हलाल' म्हणजे ग्राह्य व 'हराम' म्हणजे निषिद्ध अशा काही बाबी मानल्या आहेत. संगीताच्या संदर्भात हलाल मानलेल्या बाबींत अल्लाचे नाव उच्चारणे, ते उच्चारताना भावावेगाने स्वरांत चढउतार करणे, ते शब्द लयीत उच्चारणे, तसेच अलीच्या नावाने शोक करणे, धर्मतत्त्वे वा धर्मयात्रेला प्रोत्साहन देणारे गीत गाणे, युद्धाचा पुकारा म्हणून गाणे, हल्ला चढवताना त्वेष संचारावा म्हणून वाद्ये वाजवणे अशा क्रिया आहेत. उलट, हराम मानलेल्या बाबींत मनोरंजन म्हणून गाणे-बजावणे, वाद्ये वाजवणे, अधार्मिक उद्देशाने कोणताही स्वर निर्माण करणे, लयीत डोलणे वा नाचणे, आवाहक किंवा लालसा उत्पन्न करेल अशी गीते गाणे इ. क्रिया आहेत. धार्मिक वा आध्यात्मिक उद्देशाने वापरले तर संगीत चांगले, अन्यथा ते त्याज्य असे दुटप्पी धोरण हे काही एकट्या इस्लामचेच नाही, हे आपण याआधीच्या लेखांतही पाहिले होते. मग इस्लामबद्दल अधिक गलका का? याचे कारण- कुराण, हदीथ इ.चा दाखला देत आजवरच्या इस्लामी कायद्याने सातत्याने व आक्रमकपणे संगीताचा निषेध केला आहे. म्हणूनच इस्लाम आणि संगीत यांत विरोधप्रीती आहे, हे पटावे.

इस्लाम आणि भारतीय कला संगीत हा तर संगीतकार आणि विचारवंतांत मोठाच वादाचा विषय अनेक दशके आहे. एका बाजूला आजचे भारतीय कला संगीत ही कशी इस्लामचीच (पक्षी अरब-इराणी संस्कृतीची) देणगी आहे असे हिरिरीने पटवणारे लोक आहेत, तर दुसऱ्या बाजूला त्याच्या विरोधात पुरावे देऊन मतखंडन करत हे कलासंगीत कसे विशुद्ध भारतीय (पक्षी हिंदू!) आहे याचे प्रतिपादन केले जाते. हजरत अमीर खुस्त्रो, त्याचे भारतीय संगीताला योगदान, एकंदरच भारतीय कला संगीत आणि मुस्लीम परंपरा यांविषयी परस्परविरोधी मतांतरे इतकी आहेत की, त्यांचा समग्रतेने समाचार घ्यायला एखादा खंडात्मक ग्रंथच लिहावा लागेल. त्याविषयी पुन्हा कधी तरी लिहीन, पण आज इस्लाममधील संगीताचे एकंदर स्वरूप काय आहे हे जाणून घेऊ.

हे स्वरूप जाणून घेण्यासाठी इस्लामची पंथोपपंथ रचना पाहावी लागेल, कारण त्यावर संगीताचा निषेध वा स्वीकार यांचे धोरण ठरते. इस्लामच्या दोन मुख्य प्रवाहांतील शिया हा अधिक वर्चस्व असलेला संप्रदाय. महंमद पैगंबराचा जावई असलेला अली हाच अधिकृत खलिफा (उत्तराधिकारी) असे मानणारा हा संप्रदाय. शियांत पाच (झाइदी), सात (इस्माईली) वा बारा (इथ्ना अशारी) इमाम मानणारे पंथ आणि उपपंथही आहेत. उदा. इस्माईली शियांचे निझारी (खोजा), तय्यबी इस्माईली (म्हणजे बोहरा) व यांचे दाऊदी, सुलेमानी, अलवी हे उपपंथ, हाफिझी, सत्पंथी, बाबी व त्यातून पुढे आलेला बहाई पंथ इ.

महंमदाचा वारसदार म्हणून अबू बक्र यास मानणारे ते सुन्नी. सुन्नीतही हनाफी, मलिकी, शफीई, हन्बली असे चार उपपंथ आहेत. पहिल्या फित्ना म्हणजे इस्लामी धर्मयुद्धाच्या वेळी शिया आणि सुन्नी या दोन्ही गटांपासून वेगळे झालेले 'खवारिज' म्हणून ओळखले जातात.

यांशिवाय सुफी हा इस्लामचा महत्त्वाचा संप्रदाय. हा संप्रदायापेक्षा एक विचारसरणी आहे, असे म्हणणे उचित ठरेल. आध्यात्मिक तत्त्वचिंतनाच्या माध्यमातून अल्लाशी थेट संवाद साधता येतो असे मानणारा हा पंथ मुसलमानांत सर्वाधिक संगीताभिमुख आहे. किंबहुना सुफी संप्रदाय व त्याच्या संगीतानुकूल धोरणामुळेच इस्लाम भारतात वाढला व टिकला असे म्हणता येते. सुफींतही चिश्तिया, सुहरावर्दिया, कादिरी, मेवलवी, नक्षबंदी, निमातुल्लाही, बेकतशी, नूरबक्षीया, अझीमीया इ. उपपंथ आहेत.

कुराण हा इस्लामचा धर्मग्रंथ. पैगंबराने प्रत्यक्ष अल्लाची वचने या ग्रंथात संकलित केली आहेत अशी श्रद्धा आहे. कुराणचे अध्याय म्हणजे सुरा. असे एकंदर ११४ सुरा आहेत. सुरा-ए-फतेहा म्हणजे इस्लामी प्रार्थनेचा आरंभीचा भाग. इस्लामी दैनंदिन प्रार्थनेत काही ठरावीक शारीरिक हालचाली अनिवार्य मानल्या आहेत, त्यांना रका म्हणतात. शरिया किंवा शरीयत म्हणजे इस्लामी कायदा. कुराण, हदिथ आणि अन्य धर्मग्रंथांच्या अनुसार तयार झालेली ही इस्लामी कायदाव्यवस्था आहे. सलात ही दैनंदिन पाच वेळा करण्याची, अनिवार्य अशी प्रार्थना. सलात म्हणण्याची क्रिया म्हणजेच नमाज. दुआ म्हणजे मशीद, दर्गा अथवा घरी नित्य म्हटली जाणारी प्रार्थनावचने आहेत. अशा प्रार्थनेचे आवर्तनात्मक पठण म्हणजे वझीफा. जिक्र किंवा धिक्रचा शब्दशः अर्थ आहे नामस्मरण. अल्लाचा नामजप असलेला धिक्र हा लयाघातप्रधान व पुनरावर्तनात्मक प्रकार असून एकच आकर्षक, अंतर्मुख करणारी, मोजक्या सुरांची धून योजलेली असते. तस्बीह हा जिक्रचा विशेष प्रकार असून त्यात 'अल्लाहू अकबर', 'अल हम्दू इल्लाह' आणि 'सुभानअल्ला' हे शब्दसमूह अनुक्रमे ३४, ३३ व ३३ वेळा उच्चारले जातात. कसीदा या दीर्घ प्रार्थना असतात. झियारत म्हणजे मक्का, मदिना येथील मुस्लीम धर्मयात्रा. याविषयीची धर्मगीतेही झियारत म्हणूनच ओळखली जातात.

इस्लाममध्ये धर्मपुरुषांसाठीही बरेच शब्द आहेत. त्यांचा नेमका अर्थ कळला तर गीतांत येणारे त्यांचे संदर्भही लक्षात येतील-

नबी = प्रेषित, पैगंबर. यालाच रसूल, म्हणजे अल्लाचा संदेशवाहक असेही म्हणतात. एकंदर २५ नबी झाले व त्यांतील महंमद हा शेवटचा. त्यापूर्वीचे प्रेषित हे ख्रिश्चन धर्मातही मानले जातात. उदा. आदम (ॲडम), इद्रीस (इनॉक), इब्राहिम (अब्राहम), इस्माईल, इशाक (आयझॅक), याकुब (जाकोब), युसुफ (जोसेफ), मूसा (मोझेस), हारून (आरॉन), दाऊद (डेविड), सुलेमान (सॉलोमन), इल्यास (एलिजा), युनुस (जोनाह), याह्या (जॉन), इसा (जीजस).

वली = मुस्लीम संत. (देवसखा रक्षक हा शब्दशः अर्थ.)

पीर = सुफी धर्मवेत्ता.

इमाम = कुराण (धर्मग्रंथ) व हादिथ (धार्मिक नियम) यांचे ज्ञान असलेला धर्मगुरू.

मौलवी = मार्गदर्शक, उपदेशक.

मुल्ला = मुस्लीम धर्माचा विद्वान, शिक्षक व सामूहिक उपासनेचे नेतृत्व करणारा.

ही झाली इस्लामी धर्मसंगीताची पूर्वपीठिका. पुढल्या भागात अझान, कव्वाली, सोज, मर्सिया अशा इस्लामी गीतांचा प्रत्यक्ष परिचय करून घेऊ.

जाता जाता एक मौजेचा प्रसंग सांगतो-

मराठी नाट्यसंगीताच्या प्रेमींना बालगंधर्वांच्या 'संगीत द्रौपदी' नाटकातील 'मी जरी माधवा' हे भैरवी रागातील पद माहीत असावे. 'देवगंधर्व' भास्करबुवा बखले यांनी ते स्वरबद्ध केले होते भैरवी रागातील एका ठुमरीवरून; पण त्यातील एक विवक्षित, तार सप्तकातील पुकारयुक्त सुरावट त्यांनी योजली होती 'सोज'वरून. बडोद्याला त्यांना तालीम देणाऱ्या उस्ताद फैझ महमंद खांसाहेबांनी त्यांना हा सोज- म्हणजे इस्लामी शोकगीत शिकवले होते.

महाभारतातील द्रौपदी आणि तिच्या तोंडी सोजची सुरावट! संगीताद्वारे संस्कृतिसंगम झाल्याचे हे मनोज्ञ उदाहरण आहे, नाही का!

◆ keshavchaitanya@gmail.com

*(लेखक संगीतकार, संस्कृती-संगीतशास्त्राचे अभ्यासक व 'डॉ. अशोक दा. रानडे अर्काईव्हज्' या प्रयोगकला अध्ययन केंद्राचे संस्थापक-संचालक आहेत.)*

# अस्पर्शी द्वंद्वांची उकल



संध्या गोखले

चैतन्य ताम्हाणेकृत 'द डिसायपल' या आगळावेगळा आशय आणि सादरीकरण असलेल्या तसेच अनेक प्रतिष्ठित पुरस्कारप्राप्त चित्रपटाचे आस्वादक रसग्रहण...

*'विचार संपला की उगाच ताणू नकोस. विचारपूर्वक मेहनत कर. नवीन जागा सुचत नाहीत म्हणजे काय? रियाज कमी पडतो.'*

*'२४ तास मी फक्त रियाजच करतो.'*

*'उपज कमी पडते आहे. अस्थिर आहे सगळं!'*

गुरू-शिष्यामधला हा छोटासा संवाद. नुकत्याच झालेल्या बैठकीचं रेकॉर्डिंग लॅपटॉपवर दाखवून गुरूची प्रतिक्रिया घेऊ पाहणाऱ्या शिष्याला गुरूकडून मिळालेलं जीवनाचं सार! *'उपज कमी पडते आहे.'* चित्रपटाच्या संदर्भात, भारतीय शास्त्रीय संगीताची आस असलेल्या आणि नसलेल्या दोहोंमध्ये वैश्विक नाळ साधणारं वाक्य!

उथळ-सखोल, अभिजात-उच्छृंखल, उल्लाट-सौम्य, उपासक-ढुढ्ढाचार्य, उणवट-शाश्वत हे आणि असेच दुभंग असलेल्या दोन प्रवृत्तींमधल्या द्वंद्वांची उकल करून देणारा चित्रपट... चैतन्य ताम्हाणेचा 'द डिसायपल'! ती उकल विलक्षण ताकदीने करून दिली आहे त्याबद्दल लेखक, दिग्दर्शक, कलाकार आणि सर्व तंत्रज्ञांचं अभिनंदन.

उलगडत जाताना हा चित्रपट त्यात असलेली एक अंतर्भूत अस्वस्थता आपल्यात पेरत जातो. समोरच्या पडद्यावर जौनपुरी ऐकत असताना, किशोरीताई, अमीरखांसाहेबांचे आर्त सूर, तसंच कुमारांनी अलवार उलगडून दाखवलेल्या गंधार, निषाद आणि धैवताचं कोमल स्वरूप मनात उमटत राहतं. खरं तर चित्रपटाची पकड कमी झाली तर इकडचे तिकडचे विचार येत राहतात. मात्र, वर्षानुवर्षं मुळं रुजवलेल्या वटवृक्षाच्या ताकदीने 'द डिसायपल' वेगवेगळ्या अंगाने भिडत प्रवृत्तींचं कोलाज साकारत राहतो. त्यामध्ये अन्नपूर्णादेवी, मोगूबाई, रघुनंदन, कलापिनी-मुकुल असतात; महेश काळे आणि निलाद्री कुमारही असतात. कलेतील सौंदर्यशास्त्रामधल्या द्वंद्वाची सुरुवात मैफिलीच्या पहिल्याच *static, long shot* मधून खाली बसून रियाज करणारा आणि गुरूची पाठ चेपणाऱ्या शिष्याच्या *close-up* कडे जातो तेव्हापासूनच होते.

समकालीन संदर्भांसहित चालू झालेला ताळमेळ अकस्मात थांबवून, शास्त्रीय संगीताची साधना करणाऱ्या २४ वर्षीय शरद नेरूळकरच्या भावविश्वात जाऊन पोहोचतो. रात्री फटफटीवरून जाताना तो निर्मनुष्य रस्ते मागे सोडत राहतो; पण कानात मात्र विदुषी माईंचे विचार दुमदुमत असतात. त्याच्या समकालीन वास्तवाची लय आणि त्या नामशेष होणाऱ्या विचारांची लय यामधील परस्परविरोध दाखवताना चैतन्यने वापरलेल्या स्लो-मोशन तंत्राचा वापर चित्रपटाला अप्रतिम अतिवास्तववादी परिमाण देऊन जातो.

चित्रपटातील गुरू-शिष्य दोघेही पुरुषच आहेत; सवर्ण आहेत. परंतु दोघांपैकी एक निम्न जातीतील असता वा एक स्त्री असती तर त्याचं समीकरण बदललं असतं. संगीत क्षेत्रातील वर्णभेद वा पुरुषसत्ताक मुजोरी हे मुद्दे या चित्रपटाच्या परिप्रेक्ष्यात येत नसल्याने त्यांचा विचार मी इथे करत नाही. या लेखापुरते तरी 'गुरू आणि शिष्य' दोन्ही शब्द लिंगभावनिरपेक्ष वापरले आहेत.

पंडित विनायक प्रधान या वार्धक्याकडे झुकलेल्या गुरूची सेवा करत साधना करत असताना शरदने त्यांच्या नात्यामधलं वय/ अनुभव/ प्रतिभा यातलं अंतर मान्य केलंय. पण त्या नात्यातल्या अंतर्भूत उतरंडीचे पदर बाळबोधपणे दृष्टिआडच ठेवलेत. अंतरपाटापलीकडचं राजकारण (*politics of pedagogy*) 'द डिसायपल'मधून आपल्यासमोर झिरपत राहतं... संयतपणे, वेगवेगळ्या प्रसंगांतून, व्यक्तिरेखांमधून! या अस्पर्शी विषयाला हाताळण्याचं आव्हान चैतन्यने समर्थपणे पेललं आहे.

आध्यात्मिकतेकडे नेणारा *esoteric pursuit* असंच संगीताकडे आजवर बघितलं गेलंय. त्यामुळे हे नातं 'सत्तास्थानावरील गुरू आणि अप्राप्य लाभेच्छुक शिष्य' या असमानतेतून उपजलेल्या शोषणावर आधारित असतं, हे आपल्याला पटत नाही. 'गुरू' हे एक मिथक तयार होतं ते त्या अविभाज्य उतरंडीतून! गुरूचे माहात्म्य उगाळताना एकेका सुरावर, रागावर महिनोन् महिने तालीम करणे, आचारविचारांत बंडखोरी न करणे, पडेल ते काम, सांगतील ती सेवा करत राहणे अशी मूल्यं जोपासली जातात. शिष्यातल्या भक्तीची आणि अंधश्रद्धेची उपज होते. गुरूच्या प्रतिभेचं आणि देत असलेल्या विद्येचं वस्तुनिष्ठ मूल्यमापन हा विचारही रुजवला जात नाही. किंबहुना ते पापच ठरतं. स्वरदिव्यत्वाच्या आख्यायिकांमुळे न्यूनगंड तयार होतो; त्याचं सृजन थांबतं. जोपर्यंत शिष्य मोठा होत नाही तोपर्यंत गुरू अढळ असतो. शिष्याचं अस्तित्व दखलपात्र झालं की त्याला स्वतंत्र बैठकीचे निमंत्रण न येऊ देण्याची खबरदारी घेणं, वा स्वतंत्र गाण्यासाठी तुझी तयारी आहे असा विश्वास न जोपासणं, इ. कोतेपणा गुरूकडून सुरू होतो. हातचं राखून विद्यादान हे त्याच कोतेपणाचं दुसरं रूप! तरीही पाया पडणे, ज्येष्ठांचे नाव घेताना कानाला हात लावणे, इ. दिखाऊ रिवाज चालूच राहतात.

संगीताचे समकालीन बाजारू रूप बघत असणारा शरद माईंचे व्याख्यान आवर्जून ऐकत राहतो. *'ज्याचं मन स्थिर नाही ती व्यक्ती ख्यालसंगीत सखोलतेने गाऊ शकत नाही. प्रत्येक स्वराची, श्रुतीची पूजा जर करायची असेल तर मन निर्मळ आणि स्वच्छ पाहिजे. राग मांडत असताना मनात असत्य, लोभ आणि अपवित्रता यांना जागा नाही. तांत्रिक प्रभुत्वाने सत्याचा शोध लागणार नाही...'* अशा मिथकांचं अस्तित्व माईंच्या आवाजाच्या स्वरूपात *background* ला ठेवल्याने वास्तवाशी असलेली अंतर्व्यस्तता ठळक होत राहते. त्या मिथकांच्या दडपणाखाली शरदचं घरंगळत राहणं स्लो-मोशन तंत्राने टिपलं गेलंय. ख्यालसंगीत ही एक अप्राप्य *commodity* करण्यामागे स्पर्धेचे दमन करणे हा सरळ हेतू असू शकत नाही का? 'टीडीएस कापू नका, कॅशमध्ये पैसे द्या' अशा गरीब मागण्या करणारे उत्तम ख्याल गात नाहीत का? उत्कृष्ट ताना घेताना कानातले झुमके नीट हलत आहेत ना, विग नीट बसलाय ना, असले विचार येत नसतील? कोणाचं मन एवढं निर्मळ आणि स्वच्छ असतं? आपल्या आधीच्या वा नंतरच्या कलाकाराच्या सादरीकरणाला विंगेतूनसुद्धा हजेरी लावायची नाही, हा अलिखित नियम अपवित्रच नाही का?

*'रागसंगीतातून परमेश्वरापर्यंत पोचण्याची वाट दाखवली आहे. मार्गी संगीताची वाट धरताना त्याग हा करावाच लागणार. एकटं आणि उपाशी राहणं याला पर्याय नाही...'* माई संगीतातील शुचिर्भूतता सांगत राहतात. प्रसिद्धी, पैसा यांचं प्रलोभन न ठेवता आलेल्या संधीला डावलणारा शिष्य तोच सच्चा, घराण्याच्या परंपरेला साजेसा! त्याची पात्रता नसली तरी तोच घराण्याचा वारसदारही ठरू शकतो. लाखो रुपयांची बिदागी, पंचतारांकित निवास इत्यादी अटी हक्काने मागणाऱ्या गुरूंना काय नैतिक अधिकार आहे शिष्यांना त्यागाचे धडे द्यायचा? तसंच वासना, लग्न, प्रापंचिक जबाबदाऱ्या यांचा त्याग करणं हेसुद्धा शिष्याकडून अभिप्रेत असायचं. लीन होऊन गुरूचे पाय चेपणारा वा तानपुऱ्यावर स्वर लावणारा शरद- त्याच हातांनी तल्लीन होऊन हस्तमैथुन करतो तेव्हा आपल्यात रुजलेल्या सांगीतिक आध्यात्मिकतेला नकोसा

(पान ४ वर)



# बहरू कळियांसि...?

अतुल देऊळगावकर

मृणाल सेन यांच्या 'खारीज' ('बंद केलेला खटला') चित्रपटात (१९८२) कोलकात्याच्या चाळीत राहणारं एक मध्यमवर्गीय जोडपं त्यांच्या मुलाला सांभाळण्यासाठी एक दहा वर्षांचा मुलगा गडी म्हणून आणतात. एके रात्री प्रचंड थंडी पडल्यावर तो जिन्याखालची नेहमीची जागा सोडून स्वयंपाकघरात झोपायला जातो. शेगडीची ऊब घेऊन झोपतो. सकाळी उठल्यावर जोडप्याला बंद स्वयंपाकघर उघडता न आल्यामुळे ते फोडावं लागतं. आतमध्ये तो मुलगा मृत्यू पावला असल्याचं लक्षात येतं. त्यावरून अनेक शंकांना उधाण येतं. विविध गटांच्या छटांनुसार निरनिराळे 'सिद्धांत' मांडले जातात. त्या मध्यमवर्गीय कुटुंबाला स्वतःच्या घरात काम करणाऱ्या मुलाचं गाव व पत्तासुद्धा माहीत नसतो. मग त्या परिसरातील घरगड्यांकडे विचारपूस करत त्याच्या गावी जाऊन वडिलांना निरोप दिला जातो. इकडे शवविच्छेदनानंतर समजतं की, शेगडीतून येणाऱ्या धुरातून कार्बनमोनोक्साइड श्वासावाटे शरीरात गेल्यामुळे मुलाचा मृत्यू झाला आहे. मुलाच्या मरणाची बातमी पसरल्यावर त्या भागातील झोपडपट्टीत राहणारे कष्टकरी जमू लागतात. हे आक्रमण मानून त्यांच्याविरुद्ध मध्यमवर्गीय लोक एकवटून वातावरणात तणाव निर्माण होतो. ते जोडपं अपराधी भाव, पोलीस भीती, आरोपाचा प्रतिकार या भावभावनांतून जात राहतं. अखेरीस मुलाचे वडील अंत्यसंस्कार करून येतात. मालकाला नमस्कार करून निघून जातात. आणि खटला उभा राहण्याआधीच संपून जातो.

१९८० च्या दशकात मध्यमवर्गीयांची आर्थिक आगेकूच सुरू झाल्यामुळे त्यांना घरकाम, स्वयंपाक व इतर कामांसाठी गडी ठेवणं 'परवडू' लागलं होतं. त्याचवेळी आपल्यासाठी कष्ट करणाऱ्यांची कोणतीही जबाबदारी न स्वीकारण्याचा बाणाही त्यांच्या अंगी शिरला होता. प्रस्थापितांच्या वाढत्या साम्राज्यासाठी विस्थापितांच्या कष्टांची गरज आहे, कामापुरते व तितकेच नाते असा उपयोगितावाद रुजतो आहे... अशा विदारक अवस्थेतील एका वास्तव घटनेला मृणाल सेन यांनी बहुविध पातळ्यांवर नेऊन आपल्याला अस्वस्थ केलं. त्या मध्यमवर्गीय परिवाराकडून थेट गुन्हा घडलेला नाही. परंतु राबराब राबणाऱ्या कष्टकऱ्यांना जिन्याखाली वा सोयी नसलेल्या गलिच्छ वस्तीत राहावं लागतं. कोणत्याही आपत्तीजनक परिस्थितीत सर्वात आधी बळी त्यांचाच जातो. स्वतःला सुसंस्कृत मानणाऱ्या मध्यमवर्गीयांची 'माणुसकी' ही निवडक व दांभिक आहे. संवेदनशीलता हद्दपार करीत पुढे निघालेल्या मध्यमवर्गीयांचं बिंब-प्रतिबिंब आणि त्याचवेळी कष्टकऱ्यांना मिळणाऱ्या 'न्याया'चं स्वरूप दाखवण्याचं कार्य सेन यांनी या चित्रपटात केलं.

या चित्रपटातील काळाला ४० वर्षं उलटून गेली आहेत. दरम्यानच्या काळात शहरे, मध्यमवर्गीय आणि झोपडपट्टीवासीय या सर्वांच्या संख्या गुणाकाराने वाढत गेल्या. या शहरांतून शाही, आलिशान, साधारण व सुमार अशा तऱ्हतऱ्हेच्या आवासांचा विकास क्रमशः चालू आहे. शहरांसाठी लागणाऱ्या वस्तूंचं उत्पादन व सेवा देण्यास देशाच्या कानाकोपऱ्यांतील खेडूत शहरातील (पर्यावरणीय) निर्वासित होत आहेत. आता मरणासाठी बंद खोलीत जाऊन गुदमरण्याची गरजच नाही. ते कार्य शहरातील खुली हवाच सक्षमपणे करत आहे. जात-धर्म-वर्ग-भाषा-प्रदेश अशी क्षुद्र बंधनं न जुमानणारी ही हवा तुलनेने गरिबांच्याच वाट्याला अधिक येते. २०१७ साली भारताच्या केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याण विभागाने व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने 'हवेच्या प्रदूषणामुळे होणारे मृत्यू व आजार' यांचा एक व्यापक अहवाल तयार केला होता. 'द लॅन्सेट प्लॅनेटरी हेल्थ' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या या अहवालात 'भारतात दरवर्षी १२.४ लक्ष लोक प्रदूषित हवेचे बळी जातात. भारतामधील प्रत्येक आठवा मृत्यू हा विषारी हवेमुळे होतो. हृदयविकाराचा वा मज्जासंस्थेचा झटका, कर्करोग, फुप्फुसाचे विकार, श्वसनयंत्रणेचे आजार यासाठी ही हवा जबाबदार आहे. प्रत्येक राज्याला पडलेला विषारी वायूंचा विळखा व त्याचे बळी वाढतच आहेत' असं म्हटलं होतं.

आपली हवा कशी आहे? ती तशी का आहे? अशा चौकशा न करता 'दोष ना कोणाचा!' हेच परमसत्य मानून 'पराधीनांचं' हवापाणी चाललं होतं. जगभरातही अशीच रीत होती. पण आता लंडनमधील एका बालिकेच्या मृत्यूच्या प्रदीर्घ चौकशीनंतर 'न्यायात' व कायद्यात बदल करावा लागत आहे. ही बालिका जगातील हवाप्रदूषण बळींचं प्रतीक होत असल्यामुळे जगातील 'न्याय' बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ब्रिटनच्या न्यायालयानं ऐतिहासिक निर्णयातून 'विषारी हवेस स्थानिक प्रशासनाला जबाबदार ठरवलं' असल्याचा उल्लेख 'लोकसत्ता'मध्ये ('लोकरंग', २० डिसेंबर २०२०) केला होता. लंडनच्या गरिबीनं ग्रासलेल्या अतिप्रदूषित वस्तीत राहणाऱ्या एला अडू किसी देब्रा या नऊ वर्षांच्या मुलीला दम्याच्या विकारामुळे तीन वर्षांत ३० वेळा रुग्णालयात दाखल करावं लागलं होतं. २०१३ साली ती मरण पावली. एलाच्या आई राजमंड यांनी 'माझ्या मुलीचा आजार व मृत्यू यासाठी प्रदूषणच जबाबदार आहे,' असा आरोप करून लंडनच्या न्यायालयात दाद मागितली होती. मात्र, २०१८ मध्ये 'दम्यामुळे श्वसनयंत्रणा निकामी होऊन एला दगावली' असा निकाल देऊन खटला संपवला गेला होता. पण रोजमंड यांनी निराश न होता स्वयंसेवी संस्था, वैज्ञानिक व वकील यांच्या मदतीने सज्जड पुराव्यानिशी नव्यानं आरोपपत्र दाखल केलं. परिणामी २०२० च्या डिसेंबरमध्ये एलाच्या मृत्यू प्रमाणपत्रात बदल करून त्यामध्ये 'दूषित हवेमुळे एलाचा मृत्यू झाला' असं स्पष्टपणे नमूद केलं गेलं. त्यानंतर न्यायालयाने 'एला ही हवेच्या प्रदूषणाची बळी आहे,' असं घोषित केलं. जगाच्या इतिहासात प्रथमच हवाप्रदूषणाचा बळी व त्याची जबाबदारी ठरविण्याचा निवाडा झाला.

संपूर्ण जगाचं लक्ष वेधून घेणाऱ्या एलाच्या खटल्याची प्रदीर्घ सुनावणी अजूनही चालूच आहे. कायदा व आरोग्य क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञांची मते घेतली जात आहेत. यानिमित्ताने एखाद्या मृत्यूची सखोल चौकशी कशी असते याचा नमुना जगासमोर येत असून, त्याचा अहवाल न्यायालयासमोर सादर करण्यात येत आहे. तिथल्या श्वसन व फुप्फुस विकार तसेच सार्वजनिक आरोग्यतज्ज्ञांनी 'हवा छानच आहे. विकार असलेल्या व्यक्ती दगावतच असतात. कधी आकस्मिक मृत्यू होतात,' असं न सांगता आपल्या सरकारी यंत्रणेचं वस्त्रहरण केलं. त्यांच्या तज्ज्ञांनी 'ब्रिटनमध्ये दरसाल २८,००० ते ३०,००० हवाप्रदूषणाचे बळी जातात. दक्षिण लंडनमधील दक्षिण वळणरस्त्याजवळ राहणाऱ्या एलाचा परिवार हा हवाप्रदूषणाच्या अतिशय घातक पातळीला सामोरा जात होता. ही दूषित हवा एलाच्या दम्यास व मृत्यूस कारणीभूत ठरली आहे. ब्रिटनमधील सूक्ष्म घन कणांची (पीएम २.५) मर्यादा ही जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकापेक्षा अडीच पटीने अधिक आहे. हेच सूक्ष्म कण फुप्फुसात खोलवर जाऊन प्राणघातक ठरतात. एकंदरीतच ब्रिटनमधील हवा व पर्यावरणविषयक कायदे व त्यांचं नियमन यांचा नव्याने विचार होणं आवश्यक आहे,' असं ठणकावून सांगितलं. (शासकीय यंत्रणा वाकल्या नाहीत तर त्यांचा असा धाक असू शकतो.)

येत्या नोव्हेंबरमध्ये ब्रिटनच्या ग्लासगो शहरात जागतिक हवामान परिषद भरणार असून, त्याआधी त्यांना प्रदूषणमुक्तीकडे जाण्याची इच्छा आहे. 'स्वच्छ हवेचा काळानुरूप कायदा' व त्याच्या अंमलबजावणीची निकड ही त्यासाठी आहे. ब्रिटनमधील शास्त्रज्ञ, विधीज्ञ व स्वयंसेवी संघटनांचा 'नव्या कायद्याचे 'एला कायदा' असे नामकरण व्हावे,' असा आग्रह आहे. या मागणीला जनतेचा भरघोस पाठिंबा मिळत आहे. हाडाच्या शिक्षिका असलेल्या एलाच्या आई रोजमंड गेली सात वर्षं हवेच्या प्रदूषणाविषयी जागरूकता वाढवत आहेत. त्या म्हणतात, 'प्रदूषित हवेमुळे दरवर्षी हजारो बालकांचं आणि कुटुंबांचं हास्य हिरावून घेतलं जात आहे. ६५ लाख लोकांना श्वसनाचे विकार होत आहेत. दम्यामुळे बालकांचं मरण ओढवू द्यायचं नसेल तर सरकारनं दोन-पाच वर्षं अशी मुदत न देता तात्काळ कारवाई करणं अनिवार्य आहे.' सरकारी प्रवक्ताही संवेदनशीलता दाखवीत म्हणाले, 'एलाचे कुटुंब व आप्त यांना होत असलेल्या मानसिक यातनांमुळे आम्हीही व्यथित आहोत. न्यायालयात सादर होणाऱ्या सर्व शिफारशी व अहवाल यांचा गांभीर्याने विचार करून कृती करण्याच्या प्रयत्नात आम्ही आहोत. सार्वजनिक वाहतूक सुधारणा करणे, कर्ब व नायट्रोजन वायूंचे तसेच सूक्ष्म घन कणांचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी ३.८ अब्ज पौंडांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.'

एलाच्या मृत्यूचा न्यायालयीन खटला हा पर्यावरण चळवळीतील वळणबिंदू ठरत आहे. संयुक्त राष्ट्रसंघ, इंटरगव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज, जागतिक आरोग्य संघटना या संस्थांच्या बैठकांमध्ये हवामान बळींतील बालकांच्या संख्येविषयीची चर्चा वाढली आहे. जागतिक वैज्ञानिक संस्था व अनेक आरोग्यतज्ज्ञांनी परखडपणे सांगितलं आहे- 'हवेचं प्रदूषण अधिक असणाऱ्या भागात करोनाचे रुग्ण व मृत्युसंख्याही अधिक आहे.' त्यामुळे महासाथी रोखण्यासाठी पर्यावरणरक्षणाचा नव्याने विचार व कृतीआराखडा देण्यावर मंथन चालू आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी 'हवामान हेच महत्त्वपूर्ण आहे...' अशी घोषणा करून त्यांनी पर्यावरणकेंद्री अर्थधोरणाकडे वाटचाल चालू केली आहे. आगामी हवामान परिषद ही निर्णायक व दशकाला दिशा देणारी ठरावी याकरिता बायडेन हे कसून प्रयत्न करीत आहेत. त्यांनी अमेरिकेची कर्बकेंद्री अर्थव्यवस्था हरित करताना पायाभूत संरचना तयार करण्यासाठी २.६५ ट्रिलियन डॉलरचा निधी उपलब्ध करून दिला आहे. वाहतूक, वाहने, घरबांधणी यांना प्राधान्य देऊन नवीन हरित रोजगार निर्माण करण्यास चालना दिली जाणार आहे. अशी ठोस कृती केल्यानंतरच बायडेन यांनी वसुंधरादिनी दूरदृश्यप्रणाली माध्यमाद्वारे ४० राष्ट्रप्रमुखांची परिषद आयोजित केली. त्यांनी 'मतभेद बाजूला ठेवून पुढील पिढ्यांच्या उत्तम भविष्यासाठी कर्बउत्सर्जन कमी केलंच पाहिजे. त्यासाठी निधी व तंत्रज्ञान उपलब्ध करून सारे अडथळे दूर सारणं गरजेचं आहे,' हे आवर्जून सांगितलं. या परिषदेत अमेरिका व युरोपीय महासंघाने २०५० पर्यंत, तर चीनने २०६० पर्यंत कर्बमुक्त होण्याचं आश्वासन दिलं. भारतासह सर्व सहभागी राष्ट्रांनी कर्बउत्सर्जन कमी करण्यासाठीचा आराखडा सादर केला. अनेक वित्तीय संस्थांनी कर्बमुक्त तंत्रज्ञानासाठी निधी उपलब्ध करून देण्याची तयारी दाखविली आहे. अमेरिकेसह अनेक देशांना या उद्दिष्टपूर्तीसाठी देशांतर्गत व बाह्य दोन्ही अडथळ्यांच्या शर्यतीतून जावं लागणार आहे. तूर्तास नोव्हेंबरमधील जागतिक हवामान परिषदेसाठी पोषक वातावरण तयार झालं आहे. 'टाइम', 'बी. बी. सी.' आणि 'द इकॉनॉमिस्ट' यांसारख्या अग्रगण्य नियतकालिकांनी 'बायडेन धोरणा'ची 'आवरणकथा' करून सन्मान व्यक्त केला आहे. १९३२ च्या आर्थिक मंदीत अमेरिकेचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांत फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी 'नवा करार' आणून पायाभूत संरचनेत भरीव गुंतवणूक करीत रोजगार निर्माण केले. प्रसिद्धी माध्यमांतून रुझवेल्ट यांची कर्तबगारी आणि बायडेन यांचा 'नवा हरित करार' अमलात आणण्याचा धडाका यांच्यातील साम्यस्थळे दाखविली जात आहेत. तर काही जण बायडेन यांना मिळू शकणाऱ्या स्वातंत्र्याबाबत साशंक आहेत.

या पार्श्वभूमीवर आपण आपल्याकडे पाहिलं तर...? नुकताच जागतिक हवाप्रदूषणासंबंधीचा 'वर्ल्ड एअर क्वालिटी २०२०' हा अहवाल प्रसिद्ध झाला. त्यात जगातील ३० अतिशय प्रदूषित शहरांपैकी २२ शहरे भारतातील असल्याचं दिसून आलं आहे. त्यात दिल्ली, उत्तर प्रदेशातील गाझियाबाद, बुलंदशहर, बिसराख, जलालपूर, नोएडा, ग्रेटर नोएडा, कानपूर, लखनौ, मेरठ, आग्रा आणि मुझफ्फरनगर, तर राजस्थानमधील भिवारी, हरियाणातील फरिदाबाद, जिंद, हिसार, फतेहाबाद, बंधवारी, गुरुग्राम, यमुनानगर, रोहटक व धारुहरा आणि बिहारमधील मुजफ्फरपूर यांचा समावेश आहे. या व अशा शहरांमधील हवा सोसणाऱ्या बालकांची व वृद्धांची अवस्था कशी असेल? त्यांना न्याय मिळवून देण्याची अभिमानास्पद घटना आपल्याला अनुभवता येईल?


आपल्या देशातील १०२ शहरांमधील हवेतील १० मायक्रॉनहून कमी आकाराच्या सूक्ष्म धूलीकणांचं (पी. एम. १०) प्रमाण वाढत असल्यामुळे २०१९ च्या जानेवारीमध्ये केंद्र सरकारने हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी 'राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम' जाहीर केला होता. या शहरांमधील हवेची गुणवत्ता सुधारण्याचा आराखडा देण्यास सांगितलं होतं. त्या १०२ शहरांपैकी १८ शहरे महाराष्ट्रातील होती. २०२१ च्या मार्च महिन्यात महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने या १८ शहरांच्या हवेचा दर्जा जाहीर केला आहे. मुंबई, ठाणे, पुणे, औरंगाबाद, जालना, लातूर, नागपूर, चंद्रपूर व कोल्हापूर या नऊ शहरांमधील हवेची गुणवत्ता वरचेवर ढासळत असल्याचं त्यात स्पष्ट झालं आहे.

राज्याचे व देशाचे पर्यावरणमंत्री आपल्या वाट्याला येणाऱ्या हवेतील 'दुर्गुण' कोणते व त्यास कोण जबाबदार हे सांगू शकतील? प्रदूषकांना कधीतरी शिक्षा मिळेल अशी आशा करता येईल? देशातील व राज्यातील प्रदूषणामुळे होणाऱ्या विकारांवर 'इंडियन मेडिकल असोसिएशन' काही प्रकाश टाकेल? या 'जर-तर'वर असंख्य कळ्यांचा बहर अवलंबून आहे.

एलाची हसरी छबी घेऊन ब्रिटिश जनता न्याय मागताना 'यानंतर एलासारखा मृत्यू नको' असा इशारा सरकारला देत आहे. काही दिवसांत लंडनमधील न्यायालय स्थानिक व राज्य प्रशासनाला एलाच्या मृत्यूची भरपाई सुनावणार आहे. हे वाचताना गलिच्छ हवेने भरून गेलेल्या आपल्या शहरांमधील लाखो बालकांचं निरागस हास्य डोळ्यांसमोर येत राहतं. त्याचवेळी आठवतात- भोपाळच्या वायुपीडितांसाठी अथक लढलेले अब्दुल जब्बार! ३ डिसेंबर १९८४ ला भोपाळच्या युनियन कार्बाईड कारखान्यातील वायुदुर्घटनेमुळे ५००० लोक बळी गेले. नंतरही वायूच्या दुष्परिणामांमुळे रोज किमान तीन जण दगावत होते. 'भोपाळदिनी' आपापल्या मृत नातेवाईकांची छायाचित्रं घेऊन हजारो वायुग्रस्त शाहजहान उद्यानात जमत असत. जब्बार म्हणायचे, 'भोपाळला वायुकांड एकदाच झालं. आता शेकडो शहरांत सदासर्वकाळ 'शांतता! वायुकांड चालू आहे.' आज आपण आहोत. पुढच्या वर्षी आपलं छायाचित्र घेऊन दुसरं कोणीतरी येईल.'

atul.deulgaonkar@gmail.com

**लंडनच्या अतिप्रदूषित वस्तीत राहणाऱ्या एला अडू किसी देब्रा या नऊ वर्षांच्या मुलीचा दम्यामुळे २०१३ साली मृत्यू झाला. एलाच्या आई राजमंड यांनी 'माझ्या मुलीचा आजार व मृत्यू यासाठी वायुप्रदूषणच जबाबदार आहे,' असा आरोप करून लंडनच्या न्यायालयात त्यासंबंधात दाद मागितली. न्यायासाठी त्यांनी आजवर अथक लढा दिला. आणि आता एलाला न्याय मिळण्याची घटिका जवळ आली आहे...**




# अस्पर्शी द्वंद्वांची उकल

(पान ३ वरून) वाटणारा छेद जातो. भावगीते वा चित्रपटातली गाणी गाणे, ही संगीताची अवहेलना वाटते ती याच *purist* वृत्तीपायी!

शरदला गुरूचं असं रूप अनुभवायला येत नाही. गुरूप्रती अपार आदर, निष्ठा जपून ठेवणारा शरद आपल्या गुरूचा, माईंचा अपमान करणाऱ्या राजन जोशीच्या तोंडावर पाणी फेकतो. एका महिला गायिकेला गुजराती व्यापाऱ्याने ठेवलं होतं, ती वेश्या होती, इ. उद्गार त्याला सहन होत नाहीत. बाईच्या अंगीभूत कलेला लैंगिक दास्य पत्करायला लागल्याचा इतिहास फार दूरचा नाही. बीभत्स रूपापेक्षा काहीतरी अद्भुत, दैवी देऊ पाहणाऱ्या गुरू-विभूतीही होत्याच ना! अशी शक्यताही नाकारण्याएवढा अश्रद्ध चैतन्य नाही, ही फार मोठी जमेची बाब. खरं तर गुरू-शिष्य परंपरेतल्या रूढींचे अवडंबर माजवले नसते तर ते बंध अधिक काळ जिवंत राहिले असते. गुरूच्या छायेतून बाहेर येऊनसुद्धा गुरुचरणी नतमस्तक असणारे शिष्य आजही दिसतात. स्वतःच्या प्रतिभेच्या मर्यादा लक्षात आलेला शरद माईंच्या व्याख्यानाच्या टेप्स लायब्ररीला भेट देतो ते याच लीनतेने... याच प्रसंगी संगीतातल्या *exclusiveness* विषयीही भाष्य केलेलं आहे. *Open source* च्या जमान्यात कलेतील सौंदर्यविचार सर्वदूर पसरेल याचं शरदला समाधान वाटतं.

बहुतकरून हिरोचं पात्र हे सर्वगुणसंपन्न असतं. पण या चित्रपटातला हिरो अडखळणारा, वास्तव आणि आदर्श यांच्यातल्या दरीने भांबावून गेलेला, स्वतःच्या सुमारपणाचं भान असलेला आहे. तरीही तो संपूर्ण मालकंस गाताना गुरूला तळमळीने साथ देण्याचा प्रयत्न करणारा, माघार न घेणारा, तडजोड करताना स्वत्व न गमावणारा असा आहे. बैठकीमध्ये हमीरमधली पारंपरिक बंदिश गात असताना कुरघोडी करू पाहणाऱ्या तबलजीला बोटं मोकळी करू देतो, तेव्हा शरदच भाव खाऊन जातो. जीवाच्या आकांताने साधना करूनही *'जीव नाहीये संगीतात तुझा...'* असं गुरूकडून ऐकून घ्यावं लागणाऱ्या शरदच्या खांद्यावर हात ठेवावा वाटतो. तुटपुंजी आमदनी असूनसुद्धा घराण्याचा २०० वर्षांचा वारसा तो *digitize* करून लोकार्पण करतो. शरद आपल्यातलाच एक वाटतो तो त्याच्या सुपरमॅन नसण्यामुळे!

कथाबीजामध्ये कोणताही पूर्वग्रह न ठेवता, मोजक्या पात्रांमधून, विशेषतः 'राजन जोशी'च्या व्यक्तिरेखेतून विचारभेद तापता ठेवण्यात चैतन्य यशस्वी झाला आहे. त्यामुळेच चित्रपटातील प्रसंग, पात्रांमधले ताण, उद्रेक, शरदची घालमेल भारतीय संगीतापुरतीच मर्यादित राहत नाहीत, तर वैश्विक अनुभव पदरात घालून अस्वस्थ करते. शरदच्या *survival* चा प्रश्न फक्त वैयक्तिक न राहता कोणीही त्याच्याशी तादात्म्य पावू शकतं. अनुभवांच्या व्यामिश्रतेची आडकाठी न येता वैश्विक सत्याकडे आपला प्रवास सुरू होतो.

अप्रतिम छायालेखन, संकलन, ध्वनिसंयोजन, उत्कृष्ट नेपथ्य-वेशभूषा, तितकीच यथोचित कलाकारांची निवड अशी खास भट्टी जमल्यामुळे ही समृद्ध कलाकृती जगन्मान्य झाली आहे. जयपूर घराण्याची तालीम घेतलेल्या अरुण द्रविडांनी साकारलेला सरत्या दिवसांमधला गुरू 'त्याची सम तोच' आहे. कोरिस्मोस्कीच्या *dead pan* शैलीच्या जवळ जाणारा अभिनय करण्याचं फार मोठं शिवधनुष्य आदित्य मोडकने समर्थपणे पेललं आहे.

***

हे लिहून हातावेगळं करत असतानाच संगीतातल्या एका दर्दी मित्राचा त्रासिक होऊन फोन आला.

'हेतू काय आहे या चित्रपटाचा? दिग्दर्शकाला काय मांडायचंय हेच कळत नाही. किती विस्कळीत आहे. त्यापेक्षा 'शंकराभरणम्' कसा ठसठशीत होता.'

'तीच तर ताकद आहे या चित्रपटाची- *Subtlety is its virtue. Its abstraction is so poetic.*'

'शंकरभरणम् काय पोएटिक नव्हता?'

'अरे, पण पाडगावकरांची कविता वेगळी, आरती प्रभूंची वेगळी; ग्रेसपण कवीच! प्रवृत्तींमधल्या भिन्नत्वाची उकल होत नसेल तर खरंच सगळं गंडलंय. कृपा करून 'बंदिश बँडिट' नामक थोर कलाकृतीबरोबर या चित्रपटाची तुलना करू नकोस, ही कळकळीची विनंती!'

sandhyago@gmail.com

# तुझी गोधडी चांगली...

(पान १ वरून) आपली ताकद उभी केली. २०१९ मध्ये हे प्रमाण साधारण ५०-५० टक्के होते असे 'लोकनीती'ची पाहणी दाखवून देते.

या निवडणुकीच्या निकालानंतर माध्यम-व्यवस्थापननिपुण भाजपकडून आणखी एक लोणकढी सोडली गेली. पूर्वाश्रमीच्या डाव्यांची मते आपल्याकडे वळवण्यात यश आल्याचा दावा भाजपकडून केला गेला. म्हणजे डाव्यांना आपण नेस्तनाबूत केले असा त्या म्हणण्याचा अर्थ. वास्तविक डावे आपल्या कर्मानं स्वतःची धुळधाण करून घेत आहेतच. त्याचे श्रेय भाजपने स्वतःकडे घेण्याचे काहीच कारण नाही. पण 'तुमचे ते आमचे' हे भाजपच्या सध्याच्या कार्यशैलीशी सुसंगत असले, तरी सत्य तसे नाही. २०१६ च्या विधानसभा निवडणुकीत डावे आणि काँग्रेस यांच्याकडे ७६ आमदार होते. यावेळी एकही नाही. त्यावेळी भाजपची आमदारसंख्या होती फक्त तीन. ती आता झाली- ७७. गेल्या वेळी तृणमूलकडे २११ आमदार होते. त्यात दोनची भर पडून ही संख्या यावेळी २१३ वर गेली. यातील भाजपच्या ७७ पैकी ४८ आमदारांनी तृणमूलकडून हे मतदारसंघ हिसकावून घेतले आहेत. एकूण लढवलेल्या मतदारसंघांपैकी अवघे १५ मतदारसंघ काँग्रेसकडून आणि फक्त ९ मतदारसंघ डाव्यांना पराभूत करून भाजपला मिळवता आले आहेत असे विख्यात लेखक व पत्रकार ए. के. भट्टाचार्य दाखवून देतात. दावे काहीही केले जात असले तरी आकडेवारीनुसार तृणमूलने आपल्या साधारण एक-पंचमाश जागा भाजपला गमावल्या आणि हे झालेले नुकसान डावे व काँग्रेस यांच्या जागा हिसकावून भरून काढले. म्हणजे डावे व काँग्रेस यांना नेस्तनाबूत करण्यात मोठा वाटा तृणमूलचा आहे. ते श्रेय स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न भाजप करीत असला तरी वास्तव तसे नाही.

हे झाले संख्याधारित निष्कर्ष. त्यापलीकडे या सर्वांस पुरून उरेल असा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा या निवडणुकीने पुन्हा एकदा समोर आणला.

तो असा की, या देशात प्रामुख्याने बहुसंख्य हिंदू आहेत हे खरेच असले तरी या हिंदुत्वास अनेक छटा आहेत. त्या सर्वांना तितकाच मान द्यायला हवा. गेली काही वर्षे आसेतुहिमाचल हा देश एकच एक रंगछटेत रंगवण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रयत्नांचा आग्रह असा की, हा रंग एक हवा; त्या रंगाच्या अभिव्यक्तीची भाषा एक हवी; इतकेच काय, पण त्याचा आनंद आणि रागाचा मुद्दाही एकसारखा हवा. या सर्वांस एकच एक पूजनीय हवा; आणि त्यांचे नायकत्वही कथित बहुसंख्य म्हणतील त्याच्याकडेच हवे.

ताज्या निवडणुकांच्या निकालांनी हा प्रयत्न पुन्हा एकदा हाणून पाडला. राष्ट्रवादाच्या नावाखाली स्थानिक उपराष्ट्रवादास चिरडून टाकण्याचा आणखी एक प्रयत्न अयशस्वी ठरला, हा या निवडणूक निकालाचा खरा आनंद. त्याचे महत्त्व शहाण्यांनी तरी समजून घ्यायला हवे. तृणमूल वा द्रमुक यांना मतदान करणारेही 'हिंदू'च आहेत आणि म्हणून भाजपला अव्हेरणारेही 'हिंदू'च आहेत. याचा अर्थ असा की, केवळ आणि केवळ धर्माच्या आधारे हा देश बांधता येऊ शकत नाही. धर्माइतकेच, किंबहुना काही प्रसंगी त्यापेक्षा अधिक भाषा, जात, प्रांत हे घटकदेखील माणसांस बांधून ठेवण्यात महत्त्वाचे असतात. धर्माधिष्ठित राष्ट्रवादाइतकाच या अन्य घटकांचा उपराष्ट्रवादही तितकाच निर्णायक असतो. आणि देश व्यापण्याचे स्वप्न पाहणाऱ्या राजकीय पक्षांनी त्याचा विचार करणे आवश्यक असते. थोडक्यात- बोलून बोलून अर्थशून्य झालेली 'विविधतेतील एकता' आणि तिचे मोठेपण आपण लक्षात घ्यायला हवे.

हा देश एकच एकरंगी, एकपोती शाल वा वस्त्र नाही; तर ती बहुरंगी, बहुआकारी, बहुपोती तुकड्यांतून बनलेली अशी एक विशाल गोधडी आहे. तिच्याकडे पाहताना ज्ञानेश्वरांच्या शब्दांत काहीसा बदल करून *'कान्होबा, तुझी गोधडी चांगली'* असे म्हणता यायला हवे. म्हणजे मग *'आम्हासी का दिली वांगली रे'* अशी तक्रार करावी लागणार नाही.

girish.kuber@expressindia.com
@girishkuber

# प्रखर बुद्धिवादाचा महामेरू

(पान १ वरून) मला 'ज्येष्ठ वकील' (सीनिअर कौन्सेल) म्हणून नेमण्यात आले आहे काय, अशी विचारणा त्यांनी केली. ही चौकशी करण्याचे कारण असे होते, की सोली सोराबजी (त्यावेळी भारताचे ॲटर्नी जनरल या नात्याने) माझ्या नावाची शिफारस भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल या पदावर नियुक्तीसाठी करू इच्छित होते. ज्या कालावधीत सोली ॲटर्नी जनरल होते, त्यावेळी मी मुंबईबाहेर स्थित असलेला अतिरिक्त सॉलिसिटर जनरल होतो. एकमेकांशी संवाद साधण्याच्या अनेक संधी त्यावेळी मला मिळाल्या. एक विधी अधिकारी (लॉ ऑफिसर) म्हणून सोली यांनी त्यांच्या कामात उच्चकोटीची वस्तुनिष्ठता, निःपक्षपातीपणा व प्रामाणिकपणा कायम राखला. किंबहुना, वस्तुनिष्ठता आणि प्रामाणिकपणा ही सोली यांच्या न्यायाबाबतच्या बांधिलकीची विविक्षित अशी वैशिष्ट्ये राहिलेली आहेत.

प्रशंसा आणि सन्मान यांचे सोलींना नावीन्य नव्हते. १९९७ साली ते नायजेरियातील मानवाधिकारांबाबतच्या परिस्थितीसंबंधात संयुक्त राष्ट्रांचे 'रॅपोर्टिअर (संवाददूत) होते. (त्या देशातील मानवाधिकारांबाबतच्या परिस्थितीचा तपास करून उपाय सुचवण्यासाठी त्यांची नेमणूक करण्यात आली होती.) १९९८ ते २००४ या काळात मानवाधिकारांची जोपासना व संरक्षण याबाबतच्या संयुक्त राष्ट्रांच्या उप-आयोगाचे ते आधी सदस्य व नंतर अध्यक्ष होते. अल्पसंख्याकांबाबत होणारा पक्षपात व त्यांचे संरक्षण यावरील संयुक्त राष्ट्रांच्या उपआयोगाचे ते सदस्य होते. २००० ते २००६ या कालावधीत सोली हे लवादविषयक कायम न्यायालयाचे (पर्मनंट कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन) सदस्य होते. २००२ साली मिळालेला 'पद्मविभूषण' पुरस्कार हा त्यांच्या उल्लेखनीय व गुणवत्तापूर्ण कारकीर्दीचा झालेला सन्मान होता.

सोली यांच्या ज्युनिअर्सकरता या सगळ्यापेक्षा महत्त्वाचे काही असेल, तर शिकण्याच्या ध्येयाबाबत असलेली त्यांची बांधिलकी, साहित्याबद्दल त्यांना असलेले प्रेम आणि न्यायतत्त्वाचा ठाम पाठपुरावा यांचे निरीक्षण करण्याची संधी या गोष्टी होत्या. त्यांच्या कायद्याबाबतच्या गंभीर चर्चांच्या अधेमधे कधीतरी एखाद्या निष्ठुर न्यायाधीशाचा किंवा बेसावध प्रतिस्पर्ध्याचा क्वचित् प्रसंगी केलेला उपहास डोकावून जाई. परिपूर्णतेचे अनुकरण करण्याचे कौशल्यही त्यांच्यापाशी होते. सोली यांच्या छत्रछायेखाली आपले आयुष्य आणि भवितव्यही घडवण्याचे भाग्य ज्यांना लाभले, अशा सर्वांना त्यांच्या सान्निध्यात त्यांची आत्मीयता आणि काळजी अनुभवता आली.

त्यांचे जाणे मला कायम जाणवणार आहे. गतकालीन कवी लॉर्ड टेनिसन याने 'युलिसिस' या कवितेत 'हिंस्र प्रजेसाठी असमान कायदे' अशा अर्थाचा ('अनइक्वल लॉज अन्टु अ सॅव्हेज रेस') उल्लेख येतो. सोली सोराबजी यांची निष्ठा कायद्याच्या समानतेवर होती. कायदे समान असावेत, त्यांची अमलबजावणी समन्यायीपणे व्हावी आणि यातून आपण एक समाज म्हणून स्वातंत्र्याच्या आपल्या परंपरेपासून कदापिही ढळू नये यासाठी सोलींनी जीवन वेचले. सोली यांची उणीव नेहमीच जाणवत राहणारी आहे.

*(लेखक सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ न्यायाधीश आहेत.)*

अनुवाद : **मनोज जोशी**

*(वरील मजकुरास 'डाउन मेमरी लेन' या सोली सोराबजी गौरवग्रंथासाठी न्या. चंद्रचूड यांनी पाठविलेल्या संदेशाचा आधार असून, लेखकाच्या अनुमतीने तो अनुवादित करण्यात आला आहे.)*

